# घटक १
# स्त्रीवाद आणि मूलभूत दृष्टिकोन
(Feminism and Basic Approaches)

**घटक संरचना**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ स्त्रीवादाचा अर्थ, व्याख्या, उत्पत्ती व विस्तार

१.२.२ उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद

१.२.३ जहालमतवादी स्त्रीवाद, समाजवाद

१.२.४ उत्तर आधुनिकतावाद, कृष्णवर्णीय स्रीवाद

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

१. स्त्रीवादाचा अर्थ व व्याख्या यांची माहिती मिळेल.

स्त्रीवादी चळवळीचे ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून येईल.

२. स्त्रीवादाचे मूलभूत दृष्टिकोन समजतील.

उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद यांची माहिती मिळेल

३. जहाल मतवादी स्त्रीवाद, समाजवादी स्रीवाद यांची माहिती मिळेल.

४. आधुनिक काळानंतरचा स्त्रीवादी दृष्टिकोन याबद्दल माहिती मिळेल.

५. पाश्चात्य स्त्रीवादी चळवळ व विकास या विषयी माहिती मिळेल.

## १.१ प्रास्ताविक

स्त्रीवाद हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासातील एक महत्त्वाचा प्रवाह आहे. ही पाश्चात्त्य संकल्पना असून पाश्चात्य विचारातून उदयास आली. ही पाश्चात्त्य संकल्पना भारतामध्ये २० व्या शतकामध्ये आल्याचे मानले जाते. त्यातून नंतरच्या काळात त्याचा विस्तार व कालांतराने या स्त्रीवादाबद्दल वेगवेगळे दृष्टिकोन मांडले गेले. स्त्रियांच्या शोषणाला विरोध करण्यासाठी तसेच त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक व लैंगिक हक्क मिळवून देण्यासाठी स्त्रीवादी चळवळ उभी राहिली. १९६० च्या दशकामध्ये स्त्रीवादी विश्लेषकांनी जागतिक शांतते विषयी विचार मांडले. दोन महायुद्धांच्या काळात स्त्रीवादी संघटनांनी शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. सुरक्षा या संकल्पनेची व्याप्ती वाढली. मानवी हक्कांची सुरक्षा या संज्ञेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संशोधनाच्या इतर शाखांप्रमाणे स्त्रीवादामध्ये देखील झाला. १९८० च्या दशकात खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासात स्त्रीवादी दृष्टिकोनाला महत्त्व प्राप्त होण्यास सुरुवात झाली. या काळात स्त्रीवाद्यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या प्रस्थापित चौकटीला आव्हान दिले. वैश्विक समजल्या जाणाऱ्या अनेक संज्ञा पुरुषी मानसिकतेतून निर्माण झाल्या आहेत असे त्यांचे मत आहे. त्यांनी युद्ध, सुरक्षा व आंतरराष्ट्रीय राजकारण या संबंधाच्या ज्ञानाच्या संरचनेमध्ये लिंगभाव विषयक मुद्द्यांचा समावेश नाही असा युक्तिवाद केला.

इ.स. १९९० च्या जनगणनेनुसार अमेरिकेमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येपेक्षा जवळजवळ ६८ लाखाने अधिक भरली आणि तरीसुद्धा त्यांची गणना अल्पसंख्यांक केली जाते. ही अमेरिकेतील विसंगतीपूर्ण शोकांतिका आहे. स्त्रियांच्या संबंधी अतिशय परंपरागत दृष्टिकोन अमेरिकेमध्ये अस्तित्वात होता. विज्ञान तंत्रज्ञानाने प्रगत अशा अमेरिकन राष्ट्राला आपल्या राष्ट्राचा पायाभूत घटक असणाऱ्या नैतिक आणि तितक्याच संवेदनशील प्रशाला वाचा फोडण्यास विसावे शतक उजाडावे लागले.

स्त्रियांचे कार्यक्षेत्र पती, मूल व कुटुंबापर्यंत सिमित करण्यात अमेरिका ही मागे नव्हती. स्त्रियांचे एक व्यक्ती म्हणून अस्तित्व मान्य करण्यास अमेरिका सुद्धा मागेच पडल्याचे दिसून येते. पितृसत्ताक व्यवस्थेने स्त्रीला नेहमीच गौन स्थान दिलेले असून स्त्रियांच्या आत्मविश्वासाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न सातत्याने पुरुषप्रधान व्यवस्थेने केलेला आढळतो. 'स्त्रियांच्या शोषणाला कारणीभूत ठरलेली पुरुषप्रधान व्यवस्था नष्ट करण्याची भाषा स्त्रीवाद करतो. प्रस्थापित पुरुषप्रधान व्यवसाय नष्ट करून स्त्रियांच्या हक्कांना महत्व देणाऱ्या आणि स्त्रियांच्या विकासाला वाव देणाऱ्या नवसमाजारचनेची मांडणी करणाऱ्या विचार प्रणालीला 'स्त्रीवाद' म्हणतात.

मूलभूत स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कांमध्ये भर घालणारी विचार प्रणाली नसून समाज परिवर्तनाचा मार्ग दाखवणारी आणि परिवर्तनाचा प्रचार आणि प्रसार करणारी विचारधारा होईल. १९६० च्या दशकानंतर विविध राष्ट्रांमधील राज्यव्यवस्थांनी सामाजिक चळवळीचा नेमका अर्थ लावताना हे लक्षात आले की, स्त्रीवादी विचाराची पार्श्वभूमी व स्त्रीवादाचा प्रवाह खूप जुना व बहुआयामी आहे. स्त्रीवाद ही एक राजकीय प्रणाली आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय?**

स्त्रीवादी अभ्यासक लिंडा यांनी आपल्या 'यू वुमेन' या ग्रंथात 'स्त्रीवाद' या शब्दाचा सर्वप्रथम वापर इ.स. १८९० मध्ये केला. तर एलीन डयूबोयस यांनी इ.स. १९१० मध्ये स्त्रीवाद आणि मताधिकार या विषयावर लिहिलेल्या संशोधन लेखात राजकीय चळवळ या हेतूने स्त्रीवाद हा शब्द वापरला. स्त्रीवाद या शब्दाचा वापर खूप पूर्वीपासून केला जात असला तरी सशक्त विचारधारा म्हणून ही संकल्पना विसाव्या शतकात उदयास आली. स्त्रीवाद ही राजकीय प्रणाली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. स्त्रियांच्या अधिकाराचा पुरस्कार करणारी स्त्रीवाद ही सर्वसमावेशक विचारसरणी आहे. स्त्रीला आपल्या क्षमता सिद्ध करण्यासाठी समाजाने पुरुषांच्या बरोबरीने संधी उपलब्ध करून दिली पाहिजे, ही स्त्रीवादाची प्रमुख मागणी असून लिंगभेदाधिषठीत राजकारणाविरुद्ध संघर्ष करणारी कृतीशील विचारधारा म्हणजे स्त्रीवाद होय!

**स्त्रीवादाच्या व्याख्या:-**

फेमिनीझम हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील असून ही आधुनिक काळातील संकल्पना आहे. फेमिना याचा अर्थ वूमन असून स्त्रियांना त्यांच्या बाईपणामुळे दुय्यमत्व मिळते. १८९० च्या दशकात Womanism च्या ऐवजी Feminism हा शब्द प्रथम वापरला गेला. एलिसा रॉसी हिने २७ एप्रिल,१८९५ रोजी हा शब्द प्रथम वापरला व तो पुढे सगळीकडे रुढ झाला. Womanism हा शब्द लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांच्या हक्काची चळवळ या अर्थाने वापरला जाऊ लागला. Womanism हा इंग्रजी शब्द wifiman या शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ स्त्री व्यक्ती असा होतो. Wmanism हा शब्द theory of sexual equality and the movement for women's right म्हणजे 'लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांच्या हक्काची चळवळ' या अर्थाने वापरला जाऊ लागला. जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय.

१. **डेल्मर:** स्त्री-पुरुष संबंधातील परस्पर विरोधामधून स्त्रीवादी चळवळ उदयास आली. आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराचा विरोध करण्याच्या दृष्टीने केलेला प्रयत्न म्हणजे स्त्रीवाद होय, असे या विचारवंताचे मत होते.

२. स्त्रीमुक्तीसाठी केली जाणारी चळवळ किंवा स्त्री-पुरुषांमध्ये समानता आणण्यासाठी उभारलेला लढा म्हणजे स्त्रीवाद होय!

३. **वेबस्टर शब्दकोशानुसार:** स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार देणे होय.

४. तत्त्वज्ञान शब्दकोशानुसार स्त्रियांच्या हक्काचे समर्थन करणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय!

५. **सिमॉन दि बुव्हा यांच्या मते:** स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्काचे समर्थन नसून स्त्रीची स्त्री म्हणून ओळख करून देणे आणि स्त्रियांच्या प्रश्नाविषयी समाजामध्ये आस्था विकसित करणारी विचारधारा आहे.

**हेअर आईन्स्टाईन**

स्त्रीवाद मानवी हक्क, समाजवादी सिद्धांत आणि लिंगभेद विषयक अभ्यास या तीन विचारधारांवर आधारित आहे.

**Rutht Bradwin**

Feminism is a perspective, a thought structure, a value belief system that is an alternative way of viewing the world.

म्हणजे वैचारिक रचना व मूल्य आधारित विश्वासाची पद्धती असणारा जगाकडे पाहण्याचा पर्यायी दृष्टिकोन म्हणजे स्त्रीवाद होय.

इतिहासकार लिंडा गॉर्डन यांच्या मते, 'स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद आहे'

**According to Wikipedia and Oxford dictionary:**

Feminism is a collection of moments and idealogies aimed at defining, establishing and defending equal political, economic, cultural and social rights for women. अर्थात स्त्रियांच्या समान राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्काची व्याख्या करून त्यासाठी लढणारे व हे हक्क कायम ठेवण्यासाठी लढणारे वेगवेगळ्या विचारसरणी व आंदोलने यांना एकत्रितपणे स्त्रीवाद म्हणता येईल.

**हेस्टर आईन्स्टाईनः**

मानवाचे हक्क, समाजवादी सिद्धांत आणि लिंगभेद विषयक अभ्यास या तीन विचारधारांवर स्त्रीवाद आधारित आहे.

**जाकी स्टेसी:**

विशेष अनुभवांचे विश्लेषण करून स्त्रियांचे दुय्यमत्व समजावून घेऊन ते बदलण्याची दिशा दाखवणारे, लिंगभेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देऊन त्याला राजकीय दृष्ट्या संप्रेशीत  करण्यासाठी कोणती व्यूहरचना असावी याविषयी मार्ग सुचवणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रात होणारे स्त्रियांचे शोषण आणि दुय्यमत्व नष्ट करणे यासाठी प्रयत्न करणे म्हणजे स्त्रीवाद होय!

न्यू एनसासायक्लोपीडिया ब्रिटानिकांमध्ये स्त्रियांची- चळवळ म्हणजे स्त्रियांची भूमिका बदलून पाहणारी चळवळ अशी व्याख्या दिली आहे. त्यामध्ये बहुवीध आणि व्यापक संघटना, व्यक्ती आणि कल्पनांचा समावेश होतो आणि समाजामध्ये सौम्य सुधारणा करू पाहणाऱ्यांपासून जहाल परिवर्तन करू पाहणाऱ्यांपर्यंत सर्वांचा विचार केला जातो. सर्वांमध्ये एकवाक्यता असते ती म्हणजे, स्त्रिया स्वतःचे कार्यक्षेत्र आणि जीवनाचा ढाच्या घडवण्यासाठी स्वतंत्र झाल्या पाहिजेत या मुद्द्यावर.

एकंदरीत स्त्रीवाद म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अधिकार मिळवण्यासाठी चालू असलेला तात्विक संघर्ष होय.

**स्त्रीवादी चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

जागतिक इतिहासामध्ये विशेषता वेदपूर्व काळामध्ये प्रारंभीचा टप्पा हा मातृप्रधान कुटुंब व्यवस्थेचा होता. ज्यामध्ये स्त्रियांचे स्थान पुरुषांपेक्षा वरचे होते. शेतीचा किंबहुना कृषी संस्कृतीचा उगम मुळी स्त्रियांनी केला. पुढे श्रम विभागणीमुळे स्त्रियांना दुय्यमत्व बहाल केले आणि धर्मग्रंथांनी तर स्त्रियांच्या अस्तित्वाला उपभोग्य वस्तूच मानले. मनुस्मृतीनुसार, मनूच्या मते स्त्रीच्या रक्षणासाठी तिने पिता, पती, पुत्र यांच्या अधिपत्याखाली राहावे असे मानले गेले होते. त्यामुळे स्त्रीचे स्वातंत्र्य नष्ट झाले. पुढे सरंजामशाही कालखंडामध्ये स्त्रियांवर अनेक बंधने लादली गेली. स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. आधुनिक युगामध्ये विज्ञानाच्या उदयातून इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. त्यातून वसाहतवाद व वसाहतवादातून साम्राज्यवाद उदयास आला. मात्र वर्चस्ववादी सत्तांनी आणि वसाहतवाद व साम्राज्यवादांच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये स्त्रियांच्या अस्तित्वालाच दुय्यम स्थान देण्याचे धोरण अंगीकारले. मात्र फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता व बंधुतेचा मांडलेला विचार, पहिले महायुद्ध, अमेरिकेतील व जगातील चळवळी या घटनांनी स्त्री वादाला चालना दिली आणि त्यानंतर ब्रिटनमध्ये स्त्रियांच्या हक्कांसाठी चळवळ सुरू झाली. या चळवळचे नेतृत्व मेरी वेल्स्टनक्राफ्ट या विद्वान स्त्रीने केले. त्यांनी १७९१ मध्ये स्त्रियांच्या हक्कांसाठी प्रयत्न केले. त्यादृष्टीने 'दि व्हिडीकेशन ऑफ द राइट्स ऑफ वुमन' हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या हक्कासाठी सर्वप्रथम आवाज उठवला. हा ग्रंथ म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नांची वैचारिक मांडणी करणारा पहिला प्रयत्न मानला जातो. स्वातंत्र्यानंतर स्त्रीला पुरुषाप्रमाणे शिक्षणाची संधी मिळावी, त्यांचा समाजकारणात क्रियाशील सहभाग वाढावा यासाठी न्याय हक्कांच्या पूर्ततेसाठी स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला, असे मानले जाते.

१९७० च्या दशकामध्ये स्त्रियांच्या अभ्यासाला मान्यता मिळू लागली. १९६० च्या दशकामध्ये लिंगभेदामुळे स्त्रियांवर सर्वच क्षेत्रांमध्ये अन्याय केला जात होता, याची जाणीव झाली. त्यातूनच समाज निर्माण होण्याच्या प्रयत्नातून व्यक्तीस्वातंत्र्याचा उदय झाला. स्त्रियांचे शोषण होत आहे तसेच त्यांना दुय्यम स्थान पाश्चात्त्य देशातही दिले जात होते, याची जाणीव होऊन त्यातून चळवळीची सुरुवात झाली. या चळवळीतून स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला. या चळवळीमुळे स्त्रियांचे प्रश्न समाजापुढे आले व त्यातून ते प्रश्न सोडवण्यासाठी या स्त्रीवादी चळवळीचा विस्तार झाला. यातूनच स्त्रीवादी चळवळीकडे पाहण्याचा एक विशेष दृष्टिकोन निर्माण झाला. या दृष्टिकोनातून स्त्रीमुक्तीसाठी कार्य केले गेले आणि त्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी कार्य केलेले आढळून येते. १९६० नंतर स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला दिसतो.

युरोपमध्ये महिलांना मतदानांचा हक्क सुरुवातीला नव्हता. त्यासाठी १९ व्या शतकाच्या सुरुवातीला मतदानाच्या हक्कासाठी युरोपमध्ये चळवळी सुरू झाल्या व त्यातून स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. त्या दृष्टिकोनातून स्त्रीवादी चळवळ सुरू झाल्या व त्यातून स्त्रियांच्या समस्या जाणून घेऊन त्यामधून त्यांची

मुक्ती करण्यासाठी या चळवळीची सुरुवात युरोपमध्ये झाली व त्याचा विस्तार नंतरच्या शतकात झाला व पाश्चात विचारधारेतून ही स्त्रीवादी संकल्पना भारतात आली. भारतामध्ये सुद्धा स्त्रीवादी चळवळीचा विस्तार झाल्याचे आढळून येते.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामधील काही काळ म्हणजे १९२० ते १९६० या काळात स्त्रियांच्या हक्कांसाठी जी चळवळ सुरू झाली होती ती १९ व्या शतकामध्ये मागे पडली होती असे आढळून येते. पहिल्या महायुद्धात सुद्धा काही काळ ही चळवळ थांबली होती. पण १९६० नंतर मात्र या चळवळीमध्ये नवीन चेतना निर्माण झाल्याचे आढळते. १९६० ते १९७० दशकामध्ये या चळवळीत परिवर्तन घडवून येऊन विकास होण्यास सुरुवात झाली. अमेरिकेमध्ये स्त्रियांच्या हक्कांसाठी स्त्रीवादी चळवळ बेटी फ्रीडन हिच्या नेतृत्वाखाली सुरू झाली. तिने 'The Feminine Mystique' हा ग्रंथ प्रसिद्ध करून यातून पहिल्यांदा तिने व्यक्तिवादी विचारसरणी मांडली. त्यातून तिने स्त्रियांच्या समस्येबद्दल चर्चा केली व त्या समस्येतून मुक्ती मिळवण्यासाठी स्त्रियांनी प्रतिकार करावा, चळवळी कराव्यात असे विचार मांडले. त्यासाठी त्यांनी प्रयत्न सुद्धा केल्याचे आढळून येते. त्यांच्या प्रेरणेतूनच स्त्रीवादाचा उदय व विस्तार अमेरिकेमध्ये झाला. या स्त्रीवादी चळवळीचा उदय १९व्या शतकापासून झाल्यामुळे पाश्चात विचारधारा जेव्हा भारतामध्ये आली त्यानंतर त्याच्या प्रेरणेतून समाजसुधारकांनी स्त्री उद्धाराचे कार्य करण्याच्या दृष्टीने स्त्रियांना त्यांचे हक्क कोणते याची जाणीव करून देण्याचे कार्य स्वातंत्र्यापूर्वीपासून करण्याचा प्रयत्न केला. यांच्या विकासासाठी अनेक केंद्रांची स्थापना करण्यात येऊ लागली. त्यामध्ये स्त्रियांच्या समस्येबद्दल, त्यांच्या मुक्तीसाठी त्याचा अभ्यास या केंद्रातून केला जाऊ लागला. त्याचबरोबर अनेक समित्या, महिला दक्षता समिती अशी संस्थांची स्थापना करून त्यांच्या विकासासाठी स्त्रियांनी अनेक चळवळी उभ्या करून त्यातून स्त्रियांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. या चळवळीमुळेच आज महिलांना ३३% आरक्षण प्राप्त झाल्याचे आढळते.

अमेरिकेत लुसी स्टीन यांनी महिला आंदोलन सुरू केले. इ.स. १८९० नंतर स्त्रियांना मतदानाचा हक्क असावा या राजकीय मागणीसाठी विविध देशात चळवळी सुरू झाल्या. इंग्लंडमध्ये मताधिकारासाठी झालेल्या आंदोलनातून स्त्री चळवळीला व्यापक दिशा मिळाली. महायुद्धातील स्त्रियांच्या कार्याने प्रभाव ठेवून इंग्लंडने मतदानाचा अधिकार बहाल करण्याचे पाऊल उचलले. इ.स. १९१० मध्ये कोपनहेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने जगातील स्त्रियांच्या हक्काचे स्मरण करण्यासाठी ८ मार्च हा जागतिक 'महिला दिन' म्हणून साजरा केला जावा हा ठराव संमंत केला. इ.स. १९२० ते १९६० हा स्त्रीवादी चळवळीचा प्रती क्रांतीचा काळ मानला जातो. मात्र इ.स. १९४८ मध्ये युनोने जाहीर केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यामुळे स्त्रियांच्या अधिकाराला वैश्विक मान्यता मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतरच खऱ्या अर्थाने स्त्री प्रश्नांचे वैचारिक मांडणी करणारे लेखन खूप मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होऊ लागले. इसवी सन १९४५ ते१९६० या कालखंडातील स्त्री जीवनाचे वैशिष्ट्य म्हणजे सुखसोयी, सुबत्ता यामध्ये स्त्रिया पुरुष प्रधान संस्कृतीत गुरफटल्याचे दिसून येते. १९७०-८० या कालखंडात स्त्रीवादी चळवळीने व्यापक स्वरूप धारण केले. इ.स. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले गेले. इ.स. १९८० ते २०१० हा कालखंड स्त्रीवादी चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरला व स्त्रीवादा संदर्भातील गोंधळ दूर होऊन

स्त्रीवादाचे नव्याने आकलन केले जाऊ लागले. खऱ्या अर्थाने या चळवळीला अजूनही खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे.

**स्वयं- अध्ययनासाठी प्रश्न-१**

अ) योग्य पर्याय निवडा.

१) मेरी वेल्सन क्राप्ट यांनी प्रथम...... साली 'स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली' म्हणून पुस्तक लिहिले.

अ) इ.स.१८०२ ब) इ.स.१७९२ क) इ.स.१६९० ड) इ.स.१७९०

२) आधुनिक काळात बेटी फ्रीडन हिने ........ हे पुस्तक लिहिले.

अ) स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन ब) स्त्रीत्वाचे गूढ

क) स्त्रियांचा विषय ड) फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन

३) स्त्रिया....... या दृष्टीने स्वावलंबी झाल्या तर त्यांच्यावर पुरुषांचे वर्चस्व होणार नाही.

अ) राजकीय ब) शैक्षणिक क) आर्थिक ड) सामाजिक

४) ....... चा दशकामध्ये स्त्रियांच्या अभ्यासाला मान्यता मिळू लागली.

अ) १९७८ ब) १९८० क) १९६० ड) १९७०

५) आज महिलांना...... आरक्षण प्राप्त झालेले आहे.

अ) ३१% ब) ५०% क) ३३% ड) २५%

६) स्त्रीवादाच्या शब्दाचा प्रथम वापर .......... यांनी केला.

अ) जॉन स्टुअर्ट मिल ब) लिंडा

क) बार्बरा स्मिथ ड) मेरी वेल्स्टन क्राप्ट

७) संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष ........साली जाहीर केले.

अ) १९७० ब) १९७५ क) १९८० ड) १९८५

अ) खालीलपैकी योग्य जोड्या लावा.

| | |
|---|---|
| १. मेरी क्राफ्ट | अ) न्यू वुमन |
| २. बेटी फ्रीडम | ब) स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन |
| ३. फ्रेंच राज्यक्रांती | क) स्त्रीत्वाचे गुढ |
| ४. लेंडा | ड) स्वातंत्र्य, समता, बंधुता |

अ) १-ब, २-क, ३-ड, ४-अ

ब) १-क, २-ब, ३-अ, ४-ड

क) १-ड, २-क, ३-ब, ४-अ

ड) १-अ, २-ब, ३-क, ४-ड

**ब) खाली दिलेल्या दोन वाक्यापैकी बरोबर चूक लिहा.**

१. 'फेमिनिझम' हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील आहे.

२. १८९० च्या दशकात Womanism ऐवजी Faminism हा शब्द वापरला गेला.

अ) पहिले वाक्य बरोबर असून दुसरे वाक्य चुकीचे आहे.

ब) पहिले वाक्य चुकीचे असून दुसरे वाक्य बरोबर आहे.

क) पहिले व दुसरे वाक्य बरोबर आहे.

ड) पहिले व दुसरे वाक्य चुकीची आहेत.

## १.२.२ स्त्रीवादाचे मूलभूत दृष्टिकोन:

लिंगभेद व स्त्री-पुरुषांमधील असमानतेतून जो स्त्रीवाद निर्माण झाला त्यामधून वेगळे दृष्टिकोन निर्माण झाले. स्री स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास करून अभ्यासकांनी प्रमुख सिद्धांत व दृष्टिकोन मांडले ते खालील प्रमाणे:

१.२.२ **१) उदारमतवादी स्त्रीवाद** (Liberal Feminism)

**२) मार्क्सवादी स्त्रीवाद** (Marxist Feminism,)

**प्रस्तावना**

वरील स्त्रीवादी विचार प्रवाह हे स्त्रियांचा दर्जा संदर्भात विविध विचार मांडणारे आहेत. या प्रवाहातून स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार यांची जाणीव स्त्रियांसोबत समाजासही होऊ लागली. या जाणीवेतून स्त्रियांनी स्वतःच्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी तसेच स्वतःला समाजामध्ये समानतेचे, मानाचे व सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण केल्या. या वेगवेगळ्या विचार प्रवाहांनी स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपापल्या विचारांनी सैद्धांतिक बैठक निर्माण केली. या सैद्धांतिक बैठकीचे मूलभूत तत्त्व म्हणजे मानवी हक्क होय! मानवी हक्क लक्षात घेऊन समाजवादी विचारसरणीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघितले. मार्क्सवादी उत्पादनाच्या साधनावर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना मालकी हक्क असणे म्हणजे सामाजिक न्याय म्हणतात तर लिंगभेद दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष संबंधाचा अभ्यास २० व्या शतकाच्या सुरुवातीस करण्यास सुरुवात झाली.

**१. उदारमतवादी स्त्रीवाद**

उदारमतवादी स्त्रीवाद १८ व्या शतकामध्ये युरोपमध्ये उदयास आला व त्याचा विस्तार झाला. हळूहळू तो भारतामध्ये आला. प्राचीन काळापासून स्त्रीला दुय्यम दर्जा प्राप्त होऊ लागला व तिचे स्वातंत्र्य नष्ट झालेले आढळून येते. स्रीवादी चळवळीतून उदारमतवादी दृष्टीकोन निर्माण झाला. हा दृष्टिकोन उदारमतवाद्यांनी प्रथम मांडला. या विचारधाराने प्रथम स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहिले. जॉन स्टुअर्ट मिल याने 'दि सब्जेक्शन ऑफ विमेन' या ग्रंथातून उदारमतवादी दृष्टिकोन मांडला.

१८ व्या व १९ व्या शतकामध्ये उदारमतवाद्यांनी मुख्यता दोन गोष्टींवर भर देऊन उदारमतवादी स्त्रीवादाची चळवळ उभी केलेली होती. स्त्री शिक्षणावर त्यांनी प्रथम भर दिला व दुसरा भर म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान संधीचा आग्रह झाला. त्यातून या उदारमतवादी स्त्रीवादाचा जन्म झाला. उदारमतवादी स्त्रीवादाचा अर्थ असा की, स्त्री-पुरुषांमध्ये कोणताही भेदभाव न मानता स्त्री व पुरुषांना समानतेची वागणूक मिळावी, त्यांना समाजात समान संधी प्राप्त व्हावे, असा होता. त्या दृष्टीने युरोपमध्ये प्रयत्न केले गेले. त्याचा प्रसार व प्रचार पूर्ण युरोपभर करण्यात आला. पाश्चात्य शिक्षणामुळे ही विचारणारा भारतामध्ये १९ व्या शतकात आली व त्यांचा प्रचार भारतभर झाला. यातून स्त्रियांना समाजात समान स्थान मिळावे ही भावना पुढे आल्याने स्त्रियांना जो दुय्यम दर्जा प्राप्त होता तो हळूहळू कमी होऊ लागला. स्त्रियांना व्यवसाय क्षेत्रामध्येही या दृष्टिकोनामुळे समानतेची वागणूक मिळाली असे विचार मांडले गेले व स्त्री-पुरुष असा भेदभाव न करता स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने व्यवसायात समान संधी काही प्रमाणात प्राप्त होऊ लागली. यासाठी या उदारमतवादी स्त्रीवादाच्या चळवळीने मोलाचे सहकार्य केल्याचे आढळते.

उदारमतवादी स्त्रीवादामुळे स्त्रियांना कायद्यांमध्येही समानता प्राप्त झाली असल्याचे आढळते. या समानतेच्या भावनेमुळे स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात स्त्रियांनी मोलाचे कार्य केल्याचे आढळते. या लढ्यात त्या पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य संग्रामात सामील झाल्या. या स्त्रीवादाचा प्रसार होण्यासाठी प्रथम स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाले पाहिजे. त्यातून त्यांना त्यांच्या हक्क व अधिकाराची जाणीव होईल यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे हे उदारमतवादयांनी जाणले होते. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. म्हणूनच ही चळवळ महत्त्वाची मानली जाते. त्याप्रमाणे त्यांच्या मते, शिक्षणाचा अधिकार पुरुषांप्रमाणे स्त्रीलाही आहे. त्याप्रमाणे शिक्षण महत्वाचे मानले गेले. त्यामुळे त्यातून स्त्रियांसाठी शिक्षण संस्थांची निर्मिती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

**उदारमतवादी स्त्रीवादाचा उदय व विस्तार :**

या उदारमतवादी स्त्रीवादाचा उदय १८ शतकात युरोपमध्ये अस्तित्वात आला. या उदारमतवादी विचाराने प्रथमच स्त्रीकडे एक सजीव व्यक्ती म्हणून पाहिले गेले. तिला समाजामध्ये समान स्थान असावे, तिला समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने हक्क असावेत असे मानले गेले. त्या दृष्टीने अठराव्या शतकात पाश्चात्य देशात अनेक विचारवंतांनी या उदारमतवादी स्त्रीवादावर आपली मते मांडली आहेत. त्यातून त्यांनी या उदारमतवादी स्त्रीवादाच्या प्रसाराला मोलाची मदत केल्याचे आढळते. त्यातूनच या उदारमतवादी विचारांना चालना प्राप्त होऊन त्याचा विस्तार झाला. १९ व्या व २० व्या शतकात तर त्याचा प्रसार पूर्ण जगामध्ये झाला. त्यामुळे स्त्रियांमध्ये जागृती निर्माण झाली व त्यातूनच स्त्रिया या दुर्बल न बनता त्या स्वावलंबी बनल्या. त्यातून स्त्रियांमध्ये सुधारणा घडवून येण्यास सुरुवात झाली.

**उदारमतवादी स्त्रीवादाची वैशिष्ट्ये:**

१. स्त्रियांच्या हक्कांसाठी आग्रह धरणे

२. स्त्रियांना ज्ञानाचे क्षेत्र निर्माण करून देणे

३. स्त्रियांना पुरुषांच्या एवढेच स्वातंत्र्य देणे

**उदारमतवादी स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान:**

उदारमतवादी कायदेशीररीत्या स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यावर भर देतात. त्याचबरोबर समाजामध्ये असणारी विषमता अवैध ठरविण्याचे कामही कायद्याने केले पाहिजे, असे त्यांचे मत आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात सहभाग घ्यायचा असेल तर त्यांच्या स्वतःच्या जननक्षमतेवर ताबा हवा आणि अपत्य संगोपनाची जबाबदारी घरामध्ये विभागली गेली पाहिजे. स्त्रीमुक्ती मध्येच पुरुषांच्या मुक्तीचे बीजे आहेत असे उदारमतवादी मानतात. कारण स्त्रीमुक्तीमुळेच पुरुषांना जसे काही सवलतींना मुकावे लागेल तसेच, अर्थोत्पादनाच्या व देश संरक्षणाच्या एकाकी जबाबदारीतून त्यांना सुटका मिळेल.

थोडक्यात, उदारमतवादी स्त्रीवाद स्त्रियांसाठी कायदेशीर समान हक्क आणि समान संधीची मागणी करतो. स्त्रियांच्या मार्गातील शैक्षणिक आणि व्यावसायिक अडथळे दूर करण्यावर भर देतो. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे हक्क व अधिकार मिळवण्यासाठी समाजाची मूळ संरचना बदलणे त्यांना गरजेचे वाटत नाही तर स्त्रियांनी स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी स्वतः प्रयत्न करावे, असे त्यांना वाटते. मात्र सुधारणावादी मोहिमेवर त्यांचा विश्वास होता. स्त्री-पुरुषांमध्ये कोणताही भेदभाव न मानता स्त्री- पुरुष समानतेची वागणूक मिळावी. त्यांना समाजात समान संधी प्राप्त व्हावी, हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

**उदारमतवादी विचारवंत:**

या उदारमतवादी विचारवंतांनी स्त्रियांच्या समानतेवर व शिक्षणावर अधिक भर दिला. उदारमतवादी स्त्रीवादाची मांडणी करण्याच्या भूमिकेतून अनेक विचारवंतांनी प्रयत्न केले त्यातील प्रमुख विचारवंत खालील प्रमाणे-

**मेरी वोल्स्टनक्राफ्ट :**

या लेखिकेने प्रथम इ.स. १७९२ मध्ये 'स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन' म्हणजे Vindication of the Rights of Women हे पुस्तक लिहून स्त्रियांना समानतेची वागणूक मिळावी हे आग्रही मत मांडले. त्यांना समाजामध्ये मानाने जगण्याचा अधिकार आहे, हा विचार त्यांनी मांडला. स्त्रिया या स्वतःच्या कर्तृत्वावर स्वतंत्र जीवन जगू शकतात असेही मत त्यांनी व्यक्त केले होते. मेरी क्राफ्ट यांनी रुसो या विचारवंताने लिहिलेल्या 'फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन' या पुस्तकावर टीका केलेली आढळते. कारण रुसोने या पुस्तकांमध्ये स्त्रीपुरुष यांच्यामधील असमानतेची माहिती दिली. तसेच त्यांनी स्त्रीला फक्त शृंगार, कला व काव्याबद्दल ज्ञान द्यावे, असे मत व्यक्त केले. या वक्तव्यावर मेरी क्राफ्टने टीका केली असून तिच्या मते स्त्रीला सर्व गोष्टीचे शिक्षण द्यावे. त्यामुळे स्त्री ही समाजामध्ये स्वतंत्ररित्या स्वकर्तृत्वावर वावरू शकते व स्वतंत्र आयुष्य जगू शकते. तिला दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची गरज भासत नाही. त्या दृष्टीने सर्व गोष्टींचे ज्ञान आवश्यक आहे असे मत मांडून स्त्रियांना समाजात समानतेचे स्थान देण्याचे अनमोल कार्य मेरी क्राफ्ट यांनी केलेले आढळते.

**जॉन स्टुअर्ट मिल**

यांनी देखील स्त्री-पुरुष असमानतेबद्दल विचार मांडले आहेत व उदारमतवादी स्त्रीवादी दृष्टिकोन समाजापुढे ठेवला आहे. त्यांनी आपल्या 'स्त्रियांची पराधीनता' या पुस्तकातून स्त्री-पुरुषांमधील समानता ही कशी विषम पातळीवर होते व असा प्रकार किती गैर आहे, हे त्यांनी आपले मत व्यक्त केले. समाजामध्ये स्त्री-पुरुष समानता निर्माण व्हावी असे त्यांचे मत होते. स्त्री-पुरुष यांच्यातील भेदभाव नष्ट व्हावा व त्यामध्ये समानता निर्माण व्हावी, असा उदारमतवादी स्त्रीवादी विचार त्यांनी मांडला.

विसाव्या शतकामध्ये आणखीन नवीन विचारांची निर्मिती झाली. विसाव्या शतकास आधुनिक कालखंड मानला गेला व या काळात उदारमतवादी स्त्रीवादाची नवीन संकल्पना जगापुढे आली व त्याचा प्रसार संपूर्ण जगामध्ये कालांतराने झाला. त्यातून अनेक भागांमध्ये वेगवेगळ्या संघटनांच्या स्थापना झाल्यावर त्यातून स्त्रीमुक्तीसाठी, स्री समानतेसाठी व उदारमतवादी स्त्री-वादाच्या दृष्टिकोनातून कार्य केल्याचे दिसून येते.

**बेटी फ्रीडन:**

आधुनिक कालखंडामधील बेटी फ्रीडन हिने 'स्त्रीत्वाचे गुढ' (Feminine Mystique) हे पुस्तक लिहून स्त्रियांना समाजामध्ये कसे दुय्यम स्थान दिले आहे, त्यामुळे स्त्रिया या कशा अबला बनल्या आहेत याची जाणीव करून देण्याचे कार्य त्यांनी केले. तसेच त्या आपल्या न राहता सबला कशा बनतील यासाठी त्यांनी बहुमूल्य प्रयत्न केले. स्त्रीला स्वातंत्र्य तर दिलेच पाहिजे पण त्याचबरोबर तिला समाजामध्ये मानाचा समानतेचा अधिकार दिला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. त्या दृष्टीने प्रयत्नही केला. स्त्रियांच्या समाजातील या असमान दर्जामुळे स्त्रीला आपले कर्तृत्व दाखविता येत नाही. त्यामुळे ती स्वावलंबीही बनू शकत नाही. अशा परिस्थितीमुळे तिच्यावर अनेक बंधने लाधली जातात. तिच्यावर कोणत्या ना कोणत्या कारणाने अत्याचार केले जातात व ती अत्याचार निमुटपणे सहन करते. कारण स्त्रियांना समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने समान स्थान दिले जात नसल्यामुळे असे प्रकार समाजात घडतात. त्या दृष्टीने उदारमतवादी दृष्टिकोनातून स्त्रीच्या स्थितीमध्ये प्रगती घडून येते असे मानले जाते. बेटी फ्रीडन हिने ग्रंथ लिहून स्त्रियांची समाजातील स्थिती प्रगट केल्यामुळे स्रीवादास चालना प्राप्त झाल्याचे आढळते.

अशाप्रकारे स्त्रीवादी संकल्पनेमध्ये उदारमतवादी स्त्री दृष्टिकोनाचा समावेश झाल्याने स्त्रीवादी चळवळ प्रकर्षाने जगभर सुरू झाली. सुरुवातीला मेरी क्राफ्ट हिने उदारमतवादी दृष्टिकोन मांडल्याचे आढळते. त्याला त्या नंतरच्या शतकातील जॉन स्टुअर्ट मिलने उदारमतवादी स्री वादाला चालना दिली व त्याचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. आधुनिक काळात तर बेटी फ्रीडन हिने उदारमतवादी स्त्रीवादाचा प्रचार पूर्ण जगामध्ये करण्याचा प्रयत्न केला. या उदारमतवादी स्त्रीवादानुसार समाजामध्ये स्त्रियांचे स्थान कसे दुय्यम होते, ते स्थान समानतेचे असायला हवे याची जाणीव सामान्य स्त्रीला करून दिली. त्यातून स्त्रीवादी चळवळीला चालना प्राप्त झाली. स्त्रियांच्या प्रगतीसाठी अशी स्त्रीवादी चळवळ होणे गरजेचे होते. या स्त्रीवादी चळवळीची सुरुवात युरोपमध्ये झाली व त्याचा प्रसार हळूहळू पूर्ण जगभर झाल्याचे आढळते. हा स्रीवाद भारतामध्ये जरी उशिरा झाला तरीसुद्धा त्याचा प्रसार मात्र जलद झाल्याचे आढळते. त्यामुळे त्यातून स्त्रियांचा दुय्यम दर्जा नष्ट होऊन

आधुनिक काळामध्ये स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र प्राप्त होण्यास चालना मिळाली. स्त्रीवादी संकल्पनेतूनच ही स्त्री मुक्ती अथवा स्त्रीवादी चळवळ उदयास आली. या दृष्टिकोनाने स्त्रिया या आपले जीवन स्वकर्तृत्वावर जगू शकतात. हा विचार प्रथम मांडला गेला. त्या दृष्टीने तिला पुरुषांबरोबर समाजामध्ये प्रत्येक क्षेत्रात समान अधिकार द्यावेत, अशी मागणी या उदारमतवाद्यांनी केलेले आढळते. त्यामध्ये शिक्षणाची संधी हा सर्वात महत्त्वाचा अधिकार त्यांनी स्त्रियांना द्यावा अशी मागणी करून या उदारमतवादी स्त्रीवादास चालना दिली आहे. त्यामुळे हा स्त्रीवाद महत्त्वाचा मानला गेला आहे.

२. **मार्क्सवादी स्त्रीवाद** (Marxist Feminism)

**प्रस्तावना–**

उदारमतवादी स्त्रीवादी दृष्टिकोनानंतर युरोपमध्ये मार्क्सवादी स्त्रीवादाचा विचार समाजापुढे आला व त्याचा प्रसार व प्रचार पूर्ण जगामध्ये कालांतराने झाला. ही मार्क्सवादी स्त्रीवादाची संकल्पना मार्क्सवादी विचारवंत मार्क्स व एंगल्स या दोघांच्या विचारातून उदयास आली. मार्क्सच्या मते खाजगी मालमत्तेच्या अधिकारापेक्षा समानतेच्या तत्त्वावर मालमत्तेवर अधिकार असल्यास गरीब, श्रीमंत असा भेदभाव न राहता समाजामध्ये एकता आढळते. खाजगी मालमत्तेमध्ये उत्पादन साधनांवर पुरुषांचे वर्चस्व होते व त्यामुळे स्त्रियांच्या वर सुद्धा पुरुषांचे जास्तीत जास्त वर्चस्व निर्माण होत गेले व त्या अबला बनल्यावर त्यांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. त्यांचा दर्जा दुय्यम बनला. त्यामुळे स्त्री ही आर्थिक दृष्ट्या पतीवर अवलंबून राहू लागली. तिचा मालमत्तेवरील हक्क कमी झाला. अशा प्रकारचे मत मार्क्सने मानले होते. या मार्क्सवादी स्त्रीवादाची विचारसरणी युरोपमध्ये भांडवलशाहीच्या उदयानंतर अस्तित्वात आली. त्याचा प्रसार युरोपमध्ये झाला व त्यामुळे स्त्रीवादी चळवळीला नवीन दृष्टिकोन लाभला व स्त्रीच्या मुक्तीसाठी नवीन विचारधारा, त्यांचा प्रयोग केला गेला. त्यामुळे समाजात स्त्रियांना मालमत्तेबद्दल काही अधिकार प्राप्त झाले व स्त्रियांवर होणारे अत्याचार या मार्क्सवादी दृष्टीकोनामुळे कमी झालेले आढळतात. मार्क्सवादी स्त्रीवाद समजण्यासाठी प्रथम त्याचा अर्थ व त्यांचा उदय व नंतर त्यांचा झालेला विस्तार पाहणे गरजेचे आहे. त्यातून स्त्री समाज कल्याणासाठी कार्य करण्यात आले.

**मार्क्सवादी स्त्रीवाद:**

युरोपमध्ये औद्योगिक प्रगतीमुळे भांडवलशाहीचे अस्तित्व जास्त स्वरूपात होते. औद्योगिक क्रांतीने तांत्रिक, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्र ढवळून निघाले. हे अस्तित्व १९ व्या शतकामध्ये अधिक वाढत गेले. त्यामुळे मध्यम व उच्च वर्णीय स्त्रियांची आयुष्य वेगवेगळ्या पद्धतीने प्रभावित झाली. स्त्री कामगारांची संख्या भांडवलशाहीत वाढत गेली. कारखान्यांमध्ये पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही रोजगार प्राप्त होऊ लागला पण समाजातील स्त्रीला प्राप्त झालेले दुय्यम स्थान हे या कारखान्यांमध्येही असलेले आढळते. त्या दृष्टीने मार्क्सने स्त्रीला समाजामध्ये तर मनाचे स्थान प्राप्त व्हावे पण कारखान्यांमध्ये मानाचे स्थान प्राप्त व्हावे, तिला पुरुषांच्या बरोबरीने समानता मिळावी या दृष्टीने प्रयत्न केला. भांडवलशाही असल्यामुळे समाजामध्ये ज्याप्रमाणे गरीब–श्रीमंत कामगार व मालकवर्ग असे दोन वर्ग पडतात. त्याप्रमाणे स्त्रियांचे शोषण केले जाते.

त्यांना दुय्यम ठरवून त्यांच्यावर अत्याचार केला जातो. अशावेळी संपत्तीवर सामुहिक हकक असेल, त्यात भेदभाव नसेल तर स्त्री पुरुष असा भेदभाव सुद्धा होणार नाही. आशी धारणा मार्क्सची होती. त्या दृष्टीने त्यांनी मार्क्सवादी स्त्रीवादाची संकल्पना मांडली. त्यातून स्त्रियांच्या समान मालमत्तेवरील हक्काबद्दल अनेक विचार मांडले गेले व त्यांचा विस्तार होऊन स्त्रीच्या उद्धारासाठी मोलाचे सहकार्य या संकल्पनेमुळे प्राप्त झाले. तरीसुद्धा १९६० नंतरच्या स्त्रियांच्या चळवळीमध्ये मार्क्सवादी विचारव्यवस्थेमध्ये स्त्रीवादाचे स्थान कोणते हा विषय वादविवादाचा ठरला आहे.

**मार्क्सवादी स्त्रीवादाची वैशिष्ट्ये:**

दडपणूक आणि शोषण यातून स्त्रियांची मुक्ती व्हावयाची असेल तर ते मानवमुक्तीचा भाग म्हणून होणार आहे आणि हे सगळे व्हायचे तर सामाजिक क्रांतीला पर्याय नाही. यासाठी मार्क्सवाद्यांनी स्त्रियांचे कुटुंबातील व समाजातील स्थानाची चिकित्सा केली.

**मार्क्सवादी स्त्रीवादाचा दृष्टिकोन**

भांडवलशाहीमुळे स्त्री जरी स्वकर्तृत्वावर जगत असली म्हणजे कारखान्यात नोकरी करून जरी ती आपली जीवन जगत असली तरी तिच्यावर दुय्यमत्त्वाच्या भावनेने अत्याचार केले जात असत. शिवाय त्यातील काम करणाऱ्या स्त्रिया या फक्त श्रमिक वर्गातील असल्याचे आढळून येते. त्या सर्व प्रकारचा दबाव सहन करून काम करत होत्या. त्यामुळे अशा स्त्रियांचे कारखानदारीतील मालक वर्ग शोषण करत असत व त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारातून मुक्तता होण्यासाठी मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोन कारणीभूत ठरला, असे मानले जाते. पण काही वेळा श्रमिक वर्गातील स्त्रियांनी कारखान्यात नोकरी करून समाजामध्ये मानाचे चांगले स्थान प्राप्त केल्याचे दिसून येते. पण उच्च वर्गातील व श्रीमंत स्त्रिया या नोकरीपासून बाहेर न पडल्यामुळे त्यांची स्थिती सुद्धा दुय्यम बनण्याचे आढळते. त्यामुळे समाजामध्येही विषमता आढळते. नोकरी करणे अथवा न करणे मर्जीवर अवलंबून असते. तसेच खाजगी स्वरूपात व्यवसाय असल्याने नोकरी ही श्रमिक स्त्रियांना जास्त प्रमाणात प्राप्त होत असे. कारण त्याच्याकडून जास्तीत जास्त श्रम करून घेऊन स्वतःच्या संपत्तीमध्ये भांडवलदारांना वाढ करून घ्यायचे असते. त्या दृष्टीने अशा प्रकारचे प्रयत्न केले जातात. साम्यवादी व्यवस्थेमध्ये संपत्ती ही सर्व समुदायाच्या मालकीची असल्यामुळे हा भेदभाव होत नाही व स्त्री-पुरुषांना समान संधी प्राप्त होत असल्याने मार्क्सने साम्यवादी विचारसरणीचा अवलंब केल्याचे आढळते.

मार्क्सच्या मते, स्त्रियांनी नोकरी केल्यास ती स्वतंत्र बनते व समाजामध्ये तिला समानता प्राप्त होते. त्या दृष्टीने साम्यवाद हा शब्द स्त्रीवादास कारणीभूत ठरतो. संपत्तीवर सर्वांची समान मालकी असल्यामुळे ज्याप्रमाणे उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, मालक वर्ग-कामगार वर्ग असा भेदाभाव होत नाही. त्याप्रमाणे स्त्री-पुरुष, उच्च वर्गीय स्त्रिया-श्रमिक स्त्रिया असा भेदभाव न होता सर्वांना समान रोजगार प्राप्त होतो. सर्वांना समान वेतन प्राप्त होते. त्यामुळे समाजात स्त्रीने केलेल्या नोकरीमुळे ती स्वतंत्र होऊन सबला बनेल व समाजातील मानाचे व समानतेचे स्थान प्राप्त होईल असे मार्क्सने विचार मांडले आहेत. त्याचबरोबर स्त्रिया या आर्थिक दृष्ट्या

स्वावलंबी झाल्या तर त्यांच्यावर पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित होणार नाही. ती स्वतःची प्रगती करू शकेल. समाजामधील आपला दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करू शकेल.

अशा प्रकारचे विचार मार्क्सने मांडले होते. मार्क्सवादी अनेक विचारवंत या विचारांनी प्रभावित झाले होते. त्या दृष्टीने ही मार्क्सवादी स्त्रीवादाची संकल्पना अस्तित्वात आली. ही संकल्पना सुद्धा प्रथम युरोपमध्ये अस्तित्वात आली. त्यानंतर काही काळानंतर हळूहळू ही संकल्पना भारतामध्ये आली. त्यामुळे भारतातील स्त्रीचा दर्जा उंचावण्यास सुरुवात झाली. स्त्रीचे समाजातील स्थान बदलत जाण्यासाठी अशा संकल्पनांचा फार मोठा हातभार लागल्याचे आढळते. मार्क्सवादी स्त्रीवाद स्त्रियांना समाजामध्ये समान अधिकार मिळावेत यासाठी प्रयत्नशील राहिला. पुरुष वर्गाने स्त्रियांना अधिकार न देता त्या अधिकारापासून तिला वंचित ठेवून तिला दुय्यम दर्जा दिला होता. त्यापासून मुक्तता प्राप्त करण्यासाठी मार्क्सवादी दृष्टिकोन मोलाचा ठरला. या मार्क्सवादी विचारांवर अनेकांनी टीका केल्याची आढळते. यामध्ये ऑलिसन यागर म्हणतो, मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी वर्गीय शोषणाला महत्त्व देऊन लिंगभेदाकडे वर्गीय विषमतेचे प्रतीक म्हणून पाहिले. त्यामुळे लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाकडे कधीच महत्त्वाचा मुद्दा म्हणून पाहिले नाही. वंशसातत्य, स्त्रियांविरुद्ध अत्याचार या संबंधित विषयाकडे मार्क्सवाद दुर्लक्ष करतो. त्यामुळे याचा प्रसार खंडित व्हावा व मार्क्स प्रणित स्त्रीवादाचा विस्तार जगभर होऊ नये असा प्रयत्न या टीकाकारांनी केला असावा असे मानले जाते. काही वेळा या टीका अयोग्य वाटतात तर काही वेळा या ठिकाणी योग्य वाटतात. टीकाकांच्या मते जरी स्त्रीने नोकरी अथवा व्यवसाय केला तरी ती स्वावलंबी होते. तिला स्वातंत्र प्राप्त होते पण त्याचबरोबर तिला व्यवसाय व घराची जबाबदारीही सांभाळावी लागते. त्यामुळे तिला दुप्पट जबाबदारी सांभाळावी लागते असे आढळून येते. त्यामुळे काही वेळा स्त्रीचे घर व नोकरी  द्विधा मन:स्थिती  झालेली आढळते. अशा प्रकारची मार्क्सवादी विचारसरणी ही १९ व्या शतकामध्ये अस्तित्वात आली. तिच्या उद्धारासाठी पुढे त्यातून स्त्रीमुक्तीची आंदोलने निर्माण झाली व स्त्रीचा दर्जा सुधारण्यासाठी व तिला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होण्यासाठी या संकल्पनेतून मोलाची मदत प्राप्त झाल्याचे आढळते.

**मार्क्सवादी स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान:**

१. उत्पादन प्रक्रियेतील स्त्रियांच्या योगदानाची योग्य दखल प्रथम मार्क्सवाद्यांनी घेतली.

२. स्त्रीमुक्ती शिवाय क्रांती होऊ शकत नाही.

३. सामुदायिक अर्थव्यवसाय निर्माण करून सामुहिक धनोत्पादनामध्ये स्त्रियांनी भाग घ्यायला पाहिजे. त्यानंतर पुरुषांची जे स्थान आहे तेच स्त्रियांना प्राप्त होईल असे मार्क्सवाद्यांना वाटते.

४. समाजसत्तावाद आणणे म्हणजे स्त्रियांना सर्व क्षेत्रात संपूर्णपणे समान अधिकार देणे.

५. कल्याणकारी उपाययोजनांनी स्त्री मुक्ती होणार नाही तर त्यासाठी अमुलाग्र समाज परिवर्तनच व्हावयास हवे अशी मार्क्सवाद्यांची भूमिका आहे.

**मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोन मांडणारे विचारवंत:**

**एंगल्स:**

एंगल्सने 'कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था यांचा उगम' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने स्त्रिया पुरुषांपेक्षा खालच्या दर्जाच्या असतात हा आरोप आणि त्यांचे दास्य या नैसर्गिक गोष्टी नाहीत इतकेच नव्हे तर प्राचीन समाजात स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा होता. कुटुंबात व समाजात त्यांना मानाचे स्थान होते. त्यांचे प्रारंभीचे स्थान व स्वातंत्र्य कोण कोणत्या अवस्था मधून नष्ट झाले व त्या पारतंत्र्यात गेल्या याचे सखोल विवेचन केले. त्याने दाखवून दिले की, या बदलाच्या मुळाशी उत्पादन साधनातील बदल आहेत. प्रसिद्ध अमेरिकन वंश शास्त्रज्ञ लेविस मार्गन याचा 'प्राचीन समाज' या ग्रंथाचा आधार घेऊन सामाजिक संबंध व कुटुंब संस्था कशा निर्माण झाल्या हे एंगल्सने दाखवून दिले. एक पती-पत्नीत्वावर आधारित कुटुंबाचा पाया हा खाजगी मालमत्ता आणि स्त्रीदास्य यावर आधारलेला आहे. मातृसत्ताक कुटुंबपद्धती नष्ट होऊन पितृप्रधान कुटुंब व्यवस्था उदयास आली. या संदर्भात एंगल्स म्हणतो की, जगातील स्त्रियांचा हा ऐतिहासिक पराभव आहे. घरामध्ये पुरुषांनी स्वामीत्व मिळवले आणि स्त्रिया खालच्या दर्जाला, दासी पदाला पोहोचल्या. वर्गीय जुलमाचा प्रारंभ व पुरुषांनी स्त्रियांवर लादलेल्या दास्याचा प्रारंभ एकाच वेळी झाला.

त्याने समाजसत्ता स्थापन करण्याच्या कार्यामध्ये स्त्री-पुरुषातील असमान संबंधाचा शेवट होऊन त्यांच्यात समतेचे नवे संबंध कसे निर्माण होतात हेही दाखवून दिले.

**कार्ल मार्क्स:**

कार्ल मार्क्स याने 'दास कॅपिटल' या ग्रंथात शास्त्रशुद्ध समाजवादाचा विचार मांडला. १८४८ मध्ये कामगारांचा जाहीरनामा प्रसिद्ध करून क्रांतीचे तत्त्वज्ञान व कार्यक्रम मांडला. 'आहे रे व नाही रे' या वर्गातील संघर्षाचा इतिहास त्याने मांडला. जगाला समाजवादाचा विचार त्यांनी दिला. त्याच्या या विचारातच स्त्रीमुक्तीची विचारसरणी सामावली आहे. स्त्रिया व मुलांच्या अमानुष पिळवणुकीचे कठोर सत्य त्याने 'दास कॅपिटल' या ग्रंथातून दाखवून दिले व पिळवणुकीची कारणे व परिणामही सांगितले. त्याने स्त्रियांच्या विमोचनचा आणि सामाजिक जीवनात सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान त्यांना प्राप्त होण्याचा कम्युनिझम हाच मार्ग आहे असे सांगितले.

**मार्क्सवादी स्त्रीवादावरील टीका:**

मार्क्सवादवर टिका करताना ऑलिसन म्हणतो, मार्क्सवादी स्त्रीवाद्यांनी वर्गीय शोषणाला महत्त्व देऊन लिंगभेदाकडे वर्गीय विषमतेचे प्रतीक म्हणून पाहिले. त्यामुळे लिंगभेदामुळे होणाऱ्या शोषणाकडे कधीच महत्त्वाचा मुद्दा म्हणून पाहिले नाही. वंशसातत्य, स्त्रियांविरुद्ध अत्याचार या संबंधित विषयाकडे मार्क्सवाद दुर्लक्ष करतो.

**स्वयंअध्यनासाठी प्रश्न. २**

अ) योग्य पर्याय निवडा.

१) उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा उदय ......... शतकात झाला.

अ) १९व्या  ब) १८ व्या  क) २० व्या  ड) १६ व्या

२) फेमिनीझम हा मूळ शब्द ........ भाषेतील आहे.

अ) इंग्रजी  ब) लॅटिन  क) फ्रेंच  ड) अरब

३) मार्क्सवादी स्रीवादाचा उदय युरोपात ....... च्या उदया नंतर अस्तित्वात आला.

अ) साम्राज्यवाद  ब) हुकुमशाही  क) भांडवलशाही  ड) लोकशाही

४) साम्यवादी व्यवस्थेमध्ये ही........... सर्व समुदायाच्या मालकीची असते.

अ) सत्ता  ब) संपत्ती  क) भांडवलशाही  ड) लोकशाही

५) जॉन स्टुअर्ट मिलने ........ ग्रंथ लिहिला.

अ) स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन  ब) स्त्रियांची पराधीनता

क) लैंगिकतेचे राजकारण  ड) द वुमेन युनक

**प्रश्न– दोन अ) योग्य जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| १. रुसो | अ) कुटुंब संस्था, खाजगी मालमत्ता व राज्य संस्था यांचा उगम |
| २. कार्ल मार्क्स | ब) प्राचीन समाज |
| ३. एंगल्स | क) दास कॅपिटल |
| ४. लेविस मार्गन. | ड) फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १-ब, | २-अ, | ३-क, | ४-ड |
| ब) | १-अ, | २-ब, | ३-क, | ४-ड |
| क) | १-ड, | २-क, | ३-अ, | ४-ब |
| ड) | १-क, | २-ड, | ३-ब, | ४-अ |

**ब) खालील दोन वाक्यापैकी कोणते वाक्य बरोबर आहे व कोणते वाक्य चुकीचे आहे ते लिहा.**

१. उदारमतवादी स्रीवादाचा अर्थ असा की स्त्री पुरुषांमध्ये कोणताही भेदभाव न मानता त्यांना समानतेची वागणूक मिळावी.

२. उदारमतवाद 'आहे रे, नाही रे' हे तत्त्वज्ञान मांडतो.

अ) पहिले वाक्य बरोबर असून दुसरे वाक्य चुकीचे आहे.

ब) पहिले वाक्य चुकीचे असून दुसरे वाक्य बरोबर आहे.

क) दोन्ही वाक्य बरोबर आहेत.

ड) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

**१.२.३ १) जहालमतवादी स्त्रीवाद** (Radical Feminism)

**२) समाजवादी स्त्रीवाद** (Socialist Feminism)

**१. जहालवादी स्त्रीवाद:**

**प्रस्तावना:**

जहालवादी स्त्रीवाद विसाव्या शतकामध्ये अस्तित्वात आला. इ.स. १९७० ते १९८० च्या दशकामध्ये स्त्री चळवळीने आक्रमक रूप धारण केले. या कालावधीमध्ये एक प्रकारचा जहालपणा या चळवळीला आल्याचे दिसून येते. जहालवादी दृष्टिकोनातून स्त्रियांचे समाजातील स्थान घसरण्यासाठी पुरुष जात कारणीभूत असल्याचे मानले आहे. आत्मसन्मानासाठी प्रस्थापित व्यवस्थेवर चीड व्यक्त करण्यात येऊ लागली. या दशकामध्ये गर्भपात हा स्त्रीचा हक्क आणि अधिकार असून गर्भपात विरोधी कायदे रद्द करण्याचा आग्रह या स्त्री चळवळीने केला. इ.स. १९६० च्या दशकात सन्मान मिळावा एवढी माफक अपेक्षा असणारी स्त्री चळवळ इ.स. १९८० च्या दशकात उग्र व लैंगिक जीवनावर पूर्णता स्वतःचेच नियंत्रण असण्याची भाषा करू लागली. जनन प्रक्रिया, गर्भपात आणि कुटुंब नियोजन यावर तिचेच नियंत्रण असेल हा भाव या कालावधीत स्त्री चळवळीने व्यक्त केला. त्याचबरोबर स्त्री दृष्टिकोनातून बायबलच्या पुनर्लेखनाची मागणी करण्यात आली. पुरुषांमध्ये शारीरिक बळ असल्यामुळे पुरुष स्त्रियांच्यावर वर्चस्व करत असत. स्त्रियांवर नियंत्रण ठेवून त्यांच्यावर लैंगिक संबंधासाठी जबरदस्ती करत असल्याचे आढळते. मध्ययुगामध्ये तर स्त्रीला उपभोग्य वस्तू म्हणून समाजामध्ये दुय्यम दर्जा दिला गेला होता. त्या विरुद्ध प्रतिकार करण्याच्या दृष्टीने हा जहालवादी स्त्रीवादाचा दृष्टिकोन निर्माण झाला. स्त्रीचे शोषण करण्यासाठी व तिच्यावरच्या वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी तिला धाकात ठेवले जात असे. बळजबरीने तिच्यावर सत्ता गाजवली जात असे. पितृसत्ताक पद्धतीने पुरुषांना स्त्रियांपेक्षा जास्तीत जास्त प्रमाणात हक्क-अधिकार सोपवण्यात आले होते. त्यामुळे त्याचा गैरवापर पुरुष करत असत. त्या दृष्टीने या अधिकाराविरुद्ध स्त्रीला पुरुषांपेक्षा वरचढ अधिकार प्राप्त व्हावा या उद्देशाने जहालवादी स्त्रीवादाचा दृष्टिकोन जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे स्त्रियांवर होणारा अत्याचार हा खंडित करता येईल व स्त्री ही या जाचापासून मुक्त होऊन स्वतंत्र व मानाचे जीवन जगण्यास लाईक बनेल असा उद्देश या दृष्टिकोनामध्ये होता.

**जहालवादी स्त्रीवादाचे स्वरुप:**

जहाल स्त्रीवाद स्त्रियांच्या दुय्यमत्वाची चिकित्सा करतो व सर्वस्वी या दुय्यम परिस्थितीस पुरुषवर्ग कसा जबाबदार आहे याची शहानिशा करतो. ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रियांचे शोषण हे सर्वात प्रथम झाले हे शोषण सर्वात जास्त व्याप्ती असणारे म्हणून त्याकडे आपणास पाहता येईल. हे शोषण इतर शोषणाला चौकट पुरवते. अशा शोषणाला स्त्रिया बळी पडतात व स्वतः मात्र या शोषणाबद्दल अज्ञान या कारणांमुळे पुरुषसत्ताक व्यवस्था स्त्रियांच्या मातृत्व संबंधित काही मिथकांची निर्मिती करते. या मिथकांमार्फत स्त्रियांचे जीवन बंदिस्त केले जाते. जहाल स्त्रीवाद या संदर्भात त्यांच्या जाणीव जागृती करतात. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही वंश सातत्यात स्त्री आणि पुरुषाने बजावलेल्या भूमिकेत आहेत असे म्हणतात. हे शोषण शारीरिक जैविक क्रांतीने संपुष्टात येईल असे म्हणतात. थोडक्यात, स्त्रियांनी मातृत्वाची जबाबदारी नाकारणे असा अर्थ काढता येईल किंवा कृत्रिम पुनरुत्पादनाच्या विचाराला या स्त्रीवाद्यांनी त्यांना दिली.

**जहालवादी स्त्रीवाद मांडणारे विचारवंत:**

**१) शुलामिथ फायरस्टोन:**

शुलामिथ फायर स्टोन हिने १९७३ मध्ये 'द डायलेक्टिक ऑफ सेक्स' (लैंगिक व्यवहाराची द्वंद्वात्मकता) हे पुस्तक लिहिले. यात तिने मांडले की समाजाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा नसून तो लिंगांमधील स्त्री व पुल्लिंग संघर्षाचा आहे. पुरुषपणा आणि बायकिपणा या समजुतीतून बाहेर पडायला हवे. तिच्या मते मूलभूत वर्गीय विभाजन आणि दडपणूक ही लैंगिकतेच्या आधारे केली जाते. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही स्त्री आणि पुरुष यांनी वंशसातत्यात बजावलेल्या भूमिकांमध्ये आहे. परंतु या विवेचनाचा शेवट स्त्रियांचे शोषण या शारीरिक/जैविक क्रांतीनंतरच संपुष्टात येईल.

**मातृत्व:**

पुरुषप्रधान समाजास वंश व वारसा चालवण्यासाठी मूल हवे असते. त्यात प्रत्येक स्त्रीस अपत्य हवे आहे आणि प्रत्येक अपत्याला आईची गरज असते. अशा मिथकामुळे स्त्रिया मातृत्वाच्या बंधनात स्वतःला अडकवून ठेवतात, असे जहालवाद्यांना वाटते.

**लैंगिकता व राजकारण:**

पुरुषप्रधान व्यवस्थेमधून आलेल्या या मिथकामुळे स्त्रियांचे सत्त्व व वर्तन नियंत्रित राहते. स्वतःच्या इच्छा व गरजा ओळखून त्यांना स्वतःचा विकास करता येत नाही. स्त्री-पुरुष समान संबंध समान पातळीवर आले तर स्त्रियांना राजकीय सामाजिक व आर्थिक क्षेत्रात समानता प्राप्त करता येईल. यासाठी स्त्रियांनी त्यांचे भावनिक, खाजगी व सामाजिक जीवनाचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांचे कुटुंबाशी असणारे कामाच्या ठिकाणी असणारे संबंध तपासण्यासाठी जाणीव जागृतीची संकल्पना जहाल स्त्रीवाद स्वीकारतो, व जे जे खाजगी तेथे राजकीय अशी घोषणा करतो. याचा साधा अर्थ असा की स्त्रियांच्या खाजगी बाबी सार्वजनिक जीवनाची निगडित असतात. या खाजगीचे राजकीयकरण करण्यात जाणीव-जागृती ही मध्यवर्ती प्रक्रिया होती. या

प्रक्रियेमुळे स्त्रियांना कौटुंबिक जीवनाशी निगडित असणाऱ्या स्वतःच्या ओळखी पलीकडे जाऊन स्वतःची स्वतंत्र ओळख शोधण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षाला बळ मिळेल.

### २) केट मिलेट:

केट मिलेट हिने 'सेक्सुअल पॉलिटिक्स' (लैंगिकतेचे राजकारण) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात सामाजिक आणि खाजगी जीवनातील पुरुषी वर्चस्वाची रचना तिने स्पष्ट केली आहे. जेव्हा एक गट दुसऱ्यावरती सत्ता गाजवतो तेव्हा या दोन्हीतील नाते राजकीय होते. तिच्या मते पुरुषांचे स्त्रियांवर असणारे लैंगिक वर्चस्व हे पाश्चात्य समाजातील पुरुषी वर्चस्वाचे कारण आहे. ही पुरुषी व्यवस्था टिकवण्यासाठी संस्कार करण्याची जबाबदारीही तिच्यावरतीच येते. महत्त्वाचे म्हणजे पितृनिश्चिती खेरीज मुलांना जगण्याचा अधिकार नाकारला जातो. तसेच कोणत्याही वर्गातील स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय स्तरांवर पुरुषांव्यतिरिक्त स्थान नसते.

### ३) जर्मेन ग्रीअर:

जर्मेन ग्रीअर हिने 'द विमेन युनक' या पुस्तकात स्त्रियांची लैंगिकता खऱ्या अर्थाने कशी नाकारली गेली आहे, याचे विवेचन केले आहे. ती म्हणते छोट्या विभक्त कुटुंबात स्त्रियांची कोंडी व दडपणूक होते आणि ती एकाकी होऊन छोट्या छोट्या स्त्रीत्वाच्या ओझ्या खाली चेंगरून जाते. म्हणून तिने विभक्त कुटुंबा ऐवजी सामुहिक कुटुंबाची कल्पना मांडली. यासाठी जहालवादी स्त्रीवाद्यांनी लैंगिक क्रांतीची मागणी केली.

१) अशी क्रांती झाली तर स्त्रिया मातृत्वाच्या जबाबदारीतून मोकळ्या होऊन अपत्य संगोपनाचे काम सामुदायिकरित्या समाजामार्फत होईल.

२) लैंगिक व्यवहार साचेबंधातून मुक्त होईल. यासाठी पितृप्रधान व्यवस्था उलटून टाकली पाहिजे.

३) लैंगिक व्यवहार साचेबंधणातून मुक्त होईल यासाठी पितृ प्रधान व्यवस्था उलथून टाकली पाहिजे व स्त्रियांनी सबला म्हणून स्वतंत्रपणे स्वतःची जडणघडण केली पाहिजे.

४) स्त्रियांचे शोषण समजावून घेण्यासाठी स्त्रियांच्या खाजगी व भावनिक जीवनाचे पुनर्मूल्यांकन केले असता जे जे खाजगी तेथे राजकीय अशी घोषणा केली.

### जहाल स्त्रीवादावरील टीका

जहाल स्त्रीवाद एकांकी विचार मांडणारा आहे. तो पुरुषांना दुय्यम ठरवतो. अशी या विचारप्रवाहावर टीका होते. फायरस्टोन म्हणतात, ज्यामुळे पुरुष स्त्रियांवर अवलंबून आहेत असा घटक म्हणजे स्त्रियांची वंश सातत्याची भूमिका होय. ती भूमिका सोडून देण्याचे तोटे फायरस्टोन यांनी लक्षात घेतले नाही.

### २. **समाजवादी स्त्रीवाद :** (Social Feminism)

समाजवादी स्त्रीवाद लिंगभाव व वर्गवादामुळे स्त्रियांच्या शोषणाच्या व्यवस्था निर्माण होतात असे मानतो. समाजवादी विचारप्रवाहाने मार्क्सवादी सिद्धांत स्त्री प्रश्नांचे विश्लेषण करताना अपुरा पडतो व

समाजवादी क्रांतीनंतर स्त्रीमुक्ती आपोआप घडेल हे गृहीत धरतो. असा आक्षेप मांडून उदारमतवाद व मार्क्सवाद यांचा संगम आपल्या मांडणीत करण्याचा प्रयत्न करतो. याप्रमाणे कुटुंब व्यवस्थेत अमूलाग्र बदल व कुटुंबात मुला-मुलींची जडणघडण एक माणूस म्हणून व्हावी असा आग्रह धरतो.

**समाजवादी स्त्री वादाचे स्वरूप/ तत्त्वज्ञान:**

समाजवादी स्त्रीवादाचा जन्म मार्क्सवादी स्त्रीवादातून झाला. मार्क्सवादामध्ये समाजवादी क्रांती झाल्यानंतर स्त्रीमुक्ती आपोआप होईल असे वाटत होते. मात्र असे झाले नाही. मार्क्सवादाने स्त्रियांच्या कुटुंबातील जडणघडण पुरुषसत्ताक व्यवस्थेमधून होते याकडे दुर्लक्ष केले. मार्क्सवादी स्त्रीवादाप्रमाणे वर्गवाद हा स्त्रियांच्या दुय्यम स्थितीस जबाबदार आहे असे समाजवादी स्त्रीवाद मानतो व त्यापुढे जाऊन लिंगभेद व वर्गवादामुळे स्त्रियांच्या शोषणाच्या व्यवस्था निर्माण होतात असे मानतो. म्हणून समाजवादी स्त्रीवाद लिंगभेद व पुनरूत्पादन यावर प्रकाश टाकतो.

**समाजवादी स्त्रीवाद मांडणारे विचारवंत:**

**जुलियट मिशेल**

जुलियट मिशेल ही समाजवादी स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखली जाते. तिचे १९७१ साली 'विमेन इस्टेट' ('स्त्रियांची मालमत्ता)' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. तिचे दुसरे पुस्तके १९७४ साली 'सायको अनालिसिस अँड फेमिनिझम' (मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद) प्रकाशित झाले. ज्युलियटने जहाल स्त्रीवादातील काही महत्त्वाच्या संकल्पना व विचार आत्मसात करून त्यांना आपल्या उदारमतवादी मार्कसवादाशी जोडण्याचा प्रयत्न केला. खाजगी संपत्तीचे उच्चारण झाले व स्त्रिया सार्वजनिक जगतात, उद्योग धंद्यामध्ये सहभागी झाल्या की त्यांचे दुय्यमत्व संपत नाही तर त्यासाठी कुटुंबरचना आमुलाग्र बदलावी लागेल, असे तिला वाटते. कुटुंबात मुलं-मुली वाढताना दोघात असमानता निर्माण होते. त्यांच्यावर व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून संस्कार झाले पाहिजेत, यावर त्यांनी भर दिला. थोडक्यात, समाजवादी स्त्रीवाद्यांनी स्त्री-पुरुष समानतेसाठी पितृसत्ताक व्यवस्था बदलली पाहिजे, यासाठी स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर स्वतंत्र चळवळी निर्माण झाल्या पाहिजेत व स्त्रियांनी भांडवलशाही व पुरुषप्रधानता याविरुद्ध एकाच वेळी आवाज उठवावा लागेल, असे प्रतिपादन केले.

**स्वयंअध्ययन प्रश्न- तीन**

**प्रश्न- १ अ) रिकाम्या जागा भरा.**

१. जहालमतवादी स्त्रीवाद....... या शतकात अस्तित्वात आला.

अ) सतराव्या ब) अठराव्या क) एकोणिसाव्या ड) विसाव्या

२. केट मिलेटने............हा ग्रंथ लिहिला.

अ) द विमेन युनिक ब) लैंगिकतेचे राजकारण

क) द डायलेक्टिक ऑफ सेक्स　　　　　　ड) स्त्रीत्वाचे गुढ

३. .......... हिने 'द विमेन युनक' या पुस्तकात स्त्रियांची लैंगिकता खऱ्या अर्थाने कशी नाकारली गेली आहे याचे विवेचन केले आहे.

अ) केट मिलेट　　ब) जर्मेन ग्रीयर　　क) शुलामीथ फायरस्टोन　ड) बेटी फ्रिडन

४. जुलीएट मिशेल ही............ स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखली जाते.

अ) जहालवादी　　ब) मार्क्सवादी　　क) समाजवादी　　ड) उदारमतवादी

५) समाजवादी स्त्रीवादाचा जन्म.............. स्त्रीवादातून झाला.

अ) उदारमतवादी　　ब) मार्क्सवादी　　क) मवाळवादी　　ड) आधुनिकतावादी

**प्रश्न– दोन अ) खालील योग्य जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. जुलीएट मिशेल | अ) द विमेन युनक |
| २. शुलामीथ फायरस्टोन | ब) लैंगिकतेच राजकारण |
| ३. केट मिलेट | क) द डायलेक्टिक ऑफ सेक्स |
| ४. जर्मेन ग्रीअर | ड) स्त्रियांची मालमत्ता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | १-ब, | २-क, | ३-ड, | ४-अ |
| ब) | १-ड, | २-क, | ३-ब, | ४-अ |
| क) | १-क, | ३-ड, | ३-ब, | ४-अ |
| ड) | १-अ, | २-ब, | ३-क, | ४-ड |

ब) खाली दिलेल्या दोन वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर व चूक आहे ते लिहा.

१. उदारमतवाद व पर्यावरणवादी स्त्रीवाद यांच्या संगमातून समाजवादी स्त्रीवादाची निर्मिती झाली.

२. मार्क्सवादी स्त्रीवादाचा उदय युरोपमध्ये भांडवलशाहीच्या उदयानंतर अस्तित्वात आला.

अ) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे.

ब) पहिले वाक्य चुकीचे आहे दुसरे वाक्य बरोबर आहे.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

ड) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

१.२.४ **१) उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद** (Post Modernist Feminism)

**२) कृष्णवर्णीय स्त्रीवाद** (Black feminist)

**१. उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद:**

ही संकल्पना अंतरशाखीय, वादग्रस्त व गुंतागुंतीची आहे. ती आधुनिकता वादाविरुद्धची भक्कम प्रतिक्रिया आहे. १९७९ च्या दशकात उत्तर आधुनिकतावादी संज्ञा प्रचारात आली. याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रस्थापित परंपरांना व प्रस्थापित आधुनिक जीवन मार्गाला या संकल्पनेने आव्हान दिले. उत्तर आधुनिकता वादात वंश, वर्ग, लिंग, राष्ट्रीयत्व व भिन्नवंशीयता इत्यादींचा समावेश होतो. इतिहास या ज्ञानशाखेच्या संदर्भात ही संज्ञा सत्ताहीनता लिहिलेल्यांना न लिहिलेले असे अनेक विषय उत्तर आधुनिकता वादाचे चिंतनाचे विषय आहेत. इथेच इतिहासातील स्त्रियांचे विषय मुद्दामच दुर्लक्षिले गेले आहेत का? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांना वाटते.

या संकल्पनेतूनच 'काळ्यांमध्येही सौंदर्य आहे' ही कल्पना पुढे आली व काळया स्त्रीवादाचा जन्म झाला. त्यांनी गोऱ्या स्त्रीवादाच्या सत्तेमध्ये हस्तक्षेप केला व असा आरोप केला की प्रस्थापित स्त्रीवादी चळवळीने विकसित केलेले पद्धतीशास्त्र ही गोऱ्या व मध्यमवर्गीय स्त्रियांच्या अनुभवावर अवलंबून आहे. यात काळया स्त्रियांच्या संदर्भात विचार केलेला नाही. परिणाम स्वरूप काळया स्त्रिया या स्वतः संदर्भात विचार करू लागल्या. त्यांच्यात जाणीव जागृती झाली. त्यातून त्यांना गोऱ्या स्त्रीवादाच्या अधिसत्तेमध्ये आधुनिक वादात हस्तक्षेप करण्यासाठी उपयुक्त विषय मिळाले. सन १९७४ मध्ये ब्रिटनमध्ये काळ्या स्त्रियांचा गट स्थापन झाला. यामध्ये अमेरिका व ब्रिटनमध्ये स्त्रियांनी वंशिकतेच्या आणि लिंगभेदाच्या मुद्द्यांवर एकत्र आले पाहिजे यावर भर दिला. यातून काळ्यास्त्रीयांची मुक्ती होईल अशी आशा निर्माण झाली.

**उत्तर आधुनिकवादाची वैशिष्ट्ये:**

१. आधुनिक स्त्रीवादात बुद्धीचे महत्त्व, सुनियंत्रितपणा, आधुनिक नैतिकता, कायदा सुव्यवस्था आहे. या आधुनिक व्यवस्थेतून निर्माण झालेली जीवन शैली, व्यवस्था आहे पूर्णतः सत्य आहे. याला आव्हान उत्तर आधुनिकवाद देतो व तुम्ही सत्य मानता ते योग्य कसे असा प्रश्न करतो.

२. आधुनिक जीवन मार्गाला व प्रस्तावित परंपरांना या कल्पनेने आव्हान दिले.

३. स्त्रीवादी इतिहास लेखनाच्या संदर्भात काळया स्त्रियांच्या व दलित स्त्रीयांच्या वंचितेचा प्रश्न घेऊन प्रस्थापित स्त्रीवादाला आव्हान दिले गेले.

**उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवादी इतिहास लेखक:**

**डेलयुझे आणि इरीगॅरे**

या उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी शरीर व लिंगभावाची व्यक्तिनिष्ठता यावर आपली लेखन पद्धती तयार केली. इरीगॅरे यांनी पुरुषसत्ताक संस्कृती व स्त्रियांचा पुरुषांपेक्षा 'इतर' म्हणून झालेल्या उल्लेखावर

आपल्या सिद्धांताची उभारणी केली. त्यानंतर ग्रोस यांनी स्त्री शरीराच्या भौतिकवादी उपयोगावर भर दिला. बटलर यांनी मिशेल फुको यांच्या मानसशास्त्रीय विश्लेषणाचा आधार घेऊन स्री शरीराचा भौतिकवादी सिद्धांत मांडला. त्यानंतर गॅलॉप यांनी शरीर व संस्कृती या दोन्ही दृष्टीने स्त्रियांच्या केलेल्या विरोधाला आव्हान दिले व स्त्रियांनी पुरुषसत्ताक पद्धतीला केलेल्या विरोधाबद्दल मत मांडले.

थोडक्यात, उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी परंपरागत पुरुषसत्ताक पद्धतीचा सत्ता साधनाला म्हणजे धर्मशास्त्र व निसर्ग यांना विरोध केला. अशाप्रकारे स्त्रियांच्या दर्जा संदर्भात विविध विचार मांडणारे मुख्य स्त्रीवादी विचारप्रवाह आहेत. या प्रवाहातून स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार यांची जाणीव स्त्रियांसोबत समाजासही होऊ लागली. या जाणीवेतून स्त्रियांनी  स्वतःच्या हक्कांसाठी व अधिकारांसाठी तसेच स्वतःला समाजामध्ये समानतेचे, मानाचे, सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी स्त्रियांचे प्रश्न समाजाकडे आणले. या वेगवेगळ्या स्त्रीवादी विचारप्रवाहांनी स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून देण्यासाठी आपापल्या विचारांना सैद्धांतिक बैठक निर्माण केली. या सैद्धांतिक बैठकीचे मूलभूत तत्त्व म्हणजे मानवी हक्क होय. मानवी हक्क लक्षात घेऊन समाजवादी विचारसरणीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे बघितले. मार्क्सवादी उत्पादनाच्या साधनावर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना मालकी हक्क असणे म्हणजे सामाजिक न्याय मानतात. तर लिंगभेद दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष संबंधांचा अभ्यास २० व्या शतकाच्या सुरुवातीस करण्यास सुरुवात झाली. याचा परिणामही स्त्रीवादी सिद्धांतावर झाला.

२. **कृष्णवर्णीय स्त्रीवाद** (Black Feminism):

स्त्रीवादी चळवळ ही श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय स्त्रियांची चळवळ होती. या चळवळीचा मुख्य उद्देश सामाजिक सुधारणे बरोबर सामाजिक क्रांती असा होता. आर्थिक सक्षमते बरोबरच वांशिक व लैंगिक अत्याचारापासून मुक्ती, राजकीकरणात सहभाग ही मूलभूत वैशिष्ट्ये या चळवळीमध्ये अस्तित्वात होती. कृष्णवर्णीय स्त्रीवादी चळवळ तर वरील घटकांना पायाभूत मानते कारण नाविन्याचा लवलेशही त्यांच्या जीवनामध्ये नव्हता. ॲलीस वॉकर यांनी कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांचा उल्लेख Feminist ऐवजी Womanist असा करतात. या कालखंडातील स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप जहालवादी होते. बेटी फ्रिडनने कुटुंबाची तुलना स्त्रीचा मानसिक छळ करणाऱ्या तुरुंगाशी केली.

**कृष्णवर्णीय स्त्रीवाद म्हणजे काय?**

ब्लॅक फॅमिझम ही एक चळवळ आणि अभ्यासाचे क्षेत्र आहे जे कृष्णवर्णीय स्त्रियांच्या उत्सवासाठी आणि संरचनात्मक वर्णद्वेष, लिंगवाद, वर्गवाद आणि पांढरे वर्चस्व यांच्यापासून मुक्तीसाठी त्यांच्या लढ्याला समर्पित आहे. कृष्णवर्णीय स्त्रीवादी चळवळ कृष्णवर्णीय स्त्रियांना होणाऱ्या विशिष्ट अन्यायांचे निराकरण करण्याच्या इच्छेतून वाढली.

एकाच वेळी लिंगवाद आणि वंशवादा विरुद्ध संघर्ष करणारी ही विचारधारा आहे. अमेरिकेतील गौरवर्णीय स्त्रियांच्या स्त्रीवादात साऱ्या पुरुषांबरोबर समानतेच्या मागणीवर त्यांचा भर आहे. त्यांना कृष्णवर्णीय

पुरुषांबरोबर समानतेचे नाते अभिप्रेत असते. गौरवर्णीय स्त्रीवादातील हा गर्भित वंशावाद लक्षात घेऊन अमेरिकेतील कृष्णवर्णीय स्त्रियांनी स्वतंत्रपणे आपल्या कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी केली. अमेरिका आणि आफ्रिकेतील निग्रोंच्या मध्ये जागृती घडून आल्यानंतर कृष्णवर्णीय स्त्रीवादाचा उदय झाला. ऑलीस वॉकर, पॉल मार्शल, रोमी मॉरिसन, बार्बरा स्मिथ व मेरी हेनॉन ह्या स्त्रीवादाच्या प्रमुख पुरस्कर्त्या होत्या.

१९७७ मध्ये बार्बरा स्मिथ यांनी Towards a Black Feminism या पुस्तकात प्रथम या विचार प्रणालीची मांडणी केली. या पाठोपाठ बेल हुक्स, विलीस इत्यादींनी ही विचारधारा पुढे नेली. स्त्रियांचे जगणे हे त्यांच्या कातडीचा रंग, वर्गीय स्थान, वांशिक गट यांनी नियंत्रित झालेले असते. गोऱ्या स्त्रियांना या सगळ्या परिणामांची जाण नाही, म्हणून कृष्णवर्णीय स्त्रियांनी आपला प्रतिवाद स्वतंत्रपणे करण्यासाठी निराळीच व्यूह रचना आखली. आपल्या परिस्थितीचा वेगळेपणा लक्षात घेऊन आपण ज्या वस्तीत राहतो त्या परंपरागत समाजावर पिढ्यांपिढ्या गुलामी लादली गेली आहे. ही वस्तुस्थिती त्या विसरू शकत नाहीत, ह्या काळया वस्तीत राहणारे कृष्ण-वर्णीय वंशवादाचे बळी आहेत. त्यांचे शोषण त्यांना मिळणारी हिंस्र वागणूक यापासून सुटका मिळवण्यासाठी स्त्री-पुरुष सगळ्यांनाच एकत्रितपणे झगडावे लागेल. गौरवर्णीयांच्या शोषणापासून कृष्णवर्णीयांनी मुक्त होणे हा या विचारसरणीचा पहिला टप्पा असेल.

दुसऱ्या टप्प्यात किंवा त्याचवेळी कृष्णवर्णीय पुरुषी वर्चस्वापासून मुक्ती मिळवणे, असा दुहेरी शोषणमुक्तीचा प्रवास कृष्णवर्णीय स्त्रीवादाला अभिप्रेत आहे.

**समकालीन काळा स्त्रीवाद**

आंतरविभागीयता हे कृष्णवर्णीय स्त्रीवादाचे केंद्रबिंदू बनले आहे. कारण या चळवळीने नवीन ट्रेंड स्वीकारले आहेत, ज्यात कट्टरपंथी कृष्णवर्णीय, उदारमतवादी कृष्णवर्णीय स्त्रीवाद, क्विअर ब्लॅक फॅमिनीझम आणि ट्रान्स ब्लॅक फॅमिनीझम यांचा समावेश आहे. कृष्णवर्णीय स्त्रीवाद देखील आफ्रिकन डायस्पोरा आणि वसाहतवादाविरुद्धच्या संघर्षाबद्दल दीर्घकालीन भेदभाव संबोधित करून जागतिक चळवळ बनवण्याचा प्रयत्न करतो. अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांनी सामाजिक न्याय मोहिमांमध्ये आघाडीवर कब्जा केला आहे. उल्लेखनीय म्हणजे आफ्रिकन, अमेरिकन सोरिटींनी कृष्णवर्णीय महिलांचे क्लब आणि विविध संस्थांचे कार्य सुरू ठेवून कृष्णवर्णीय स्त्रीवादाच्या स्थिरतेसाठी योगदान दिले आहे.

**काळ्या स्त्रीवादाची टीका:**

कृष्णवर्णीय स्त्रीवादी चळवळीची दीर्घकालीन टीका अशी आहे की, ती लैंगिक समानता तसेच वांशिक समानतेसाठी संघटित प्रयत्नांना कमकुवत करते किंवा कमी करते. काही विद्वानांनी असा युक्तिवाद केला आहे की, स्त्रीवादी संघटनांमधील वर्णद्वेषाचे आरोप हे दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद खंडित होण्याचे एक प्रमुख कारण होते.

**काळ्या स्त्रीवादी कार्यकर्त्या:**

इतिहासात अदृश्य राहिलेल्या काळया स्त्रियांच्या कर्तेपणाला १९८० च्या दशकात काळया स्त्रीवादी अभ्यासकांनी दृश्यरुप दिले. विविध दृष्टिकोनातून स्त्री चळवळीच्या दुसऱ्या लाटेतील १९६०-१९९० काळ्या स्त्रियांचे योगदान नमूद करण्यात आले. त्यातूनच काळे स्त्रीवादी अभ्यासक्ष क्षेत्र उभे राहिले. सोजारनर, फ्रान्सिस हार्पर, ईडा वेल्स, मेरिटेरल अशा असंख्य स्त्रियांनी स्वतःच्या वर्णीय अस्मिता व लिंग अस्मितांच्या जाणिवा जोपासून स्वतःचे व राजकीय लढ्याचे स्वरूपच बदलून टाकले. त्यामुळे समकालीन काळा स्त्रीवाद हा त्यांनी दिलेल्या बलिदानाचा तसेच त्यांच्या शौर्याचा व कर्तृत्वाचा परिणाम आहे.

**मिशन वॉलेस:-** यांनी 'काळ्या स्त्रीवाद्यांच्या भगिनीभावाचा शोध'या लेखात म्हटले आहे, आम्ही स्त्रिया म्हणून जगताना काळे म्हणून जगत असतो व स्त्रीवादी म्हणून जगत असतो आणि म्हणून अनेकदा थबल्यासारखे होते. कारण स्वायत्तपणे काम करण्यासाठी अजूनही सामाजिक परिस्थिती म्हणावी तशी पोषक नाही. आम्ही सर्वात तळाला असल्याने जे आजपर्यंत घडले नाही ते आम्हाला करावे लागणार आहे. वॉलेस निराशावादी नसून काळया स्त्रीवाद्यांच्या परिस्थितीची वास्तववादी मांडणी करतात. समाजात सर्वच बाबतीत आम्हाला एकटेपणा सोसावा लागतो. कारण समाजाने आम्हाला परिघावरच ठेवले आहे, पण या तळागाळातील स्थानावरून आम्ही सर्व क्रांतिकारी उडी घेऊ शकतो. कारण काळया स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी लढणे म्हणजे सर्वांच्याच स्वातंत्र्यासाठी लढणे! आम्हाला स्वातंत्र्य मिळायचे असेल तर समाजातील सर्व शोषण व्यवस्थांना संपुष्टात आणावे लागेल.

**अँजेला डेव्हिस:-**

या कार्यकर्त्यांनी साम्यवादी पक्षांतर्गत वर्णविरोधी व स्त्रीवादी भूमिका लावून धरण्याची भूमिका बजावली. १९४४ साली दक्षिणेतील कुटुंबात जन्मलेल्या डेव्हिसचे शिक्षण उत्तरेतील साम्यवादी शाळेत झाले. साम्यवादी शाळेत शिकणाऱ्या डेव्हिसने वयाच्या पंधराव्या वर्षी साम्यवादाचा जाहीरनामा वाचलेला होता. बालपणातील मित्र मैत्रिणींवर झालेल्या वर्णवादी खुनी हल्ल्यामुळे युरोपमध्ये उच्च शिक्षण घेत असलेल्या डेव्हिस अमेरिकेत परतल्या. त्यांच्या राजकीय प्रवासाला सुरुवात त्यांच्या नागरिक हक्क चळवळीतील सहभागातून झाली. त्या 'ब्लॅक पँथर फॉर सेल्फ डिफेन्स' या संघटनेत सामील झाल्या पण मागे वळून पाहताना ब्लॅक पँथर संघटनेच्या नेतृत्वाचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन पुरुषोत्ताक असल्यामुळे आपण चळवळीशी एकरूप होऊ शकलो नाही, असे त्या आत्मकथनात नमूद करतात. १९६८ साली डेव्हिस साम्यवादी पक्षाच्या सदस्य बनल्या व पुढील २३ वर्ष त्यांनी त्या पक्षाचे काम केले. १९९१ साली पक्षाने वर्णवाद, स्त्रीवाद व पक्षांतर्गत लोकशाहीवर पुनर्विचार करावा असे आव्हान करणारा लेख त्यांनी काही सहकार्यांसोबत लिहिला.१९६९ साली कॅलिफोर्निया विद्यापीठात तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापिका म्हणून डेव्हिस यांची नियुक्ती झाली. पण साम्यवादी काळी स्त्री असल्याची किंमत त्यांना द्यावी लागली. रेगन हे त्या काळात कॅलिफोर्नियाचे राज्यपाल होते व त्यांच्या नेतृत्वाखाली साम्यवाद्यांची चळवणुकीची मोहीमच आखली गेली. खोट्या आरोपाखाली अटक करून डेव्हिस त्यांना सोळा महिन्याची करावासाची शिक्षा दिली

गेली. या सोळा महिन्याच्या एकांतवासात डेव्हिस यांनी काळ्या स्त्रीवादाची  पायाभूत मांडणी केली आणि मार्क्सवादी/ साम्यवादी चळवळीच्या इतिहासात अदृश्य राहिलेल्या स्त्री कार्यकर्त्यांच्या योगदानाला उजाळा दिला. १९७० च्या दशकात स्री संघटनांनी पुकारलेल्या बलात्काराविरोधी चळवळीची व वर्णविरोधी संघटनानी पुकारलेल्या वर्ण आधारित हिंसा विरोधी चळवळीची त्यांनी चिकित्सा केली. लिंगभाव आधारित हिंसेचा विचार वर्ण आधारित हिंसेच्या बरोबरीनेच करावा लागेल. अन्यथा बलात्कार विरोधी चळवळीचा फायदा घेऊन राज्य शासन काळ्या पुरुषांना बलात्कारी ठरवून तुरुंगात दाबून ठेवेल असा इशारा त्यांनी दिला.

**बार्बरा स्मिथः-**

बार्बरा स्मिथ यांनी संपादित केलेला 'घरच्या लेकी' हा लेख कवितासंग्रह काळ्या स्त्रीवादी सिद्धांकनाच्या व राजकारणाच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरला. त्यांच्या मते लहानपणी वेगवेगळ्या वस्त्यांमधून कधी कचरा डेपोचे शेजारी पडक्या घरातून राहिलेला काळया स्त्रीवाद्यांसाठी घरी ही संकल्पना महत्त्वाची असते. बहुतांशी काळया स्त्रीवादी आपल्या ताकदीचे क्षेत्र स्त्रियांच्या कमाईवर चालणाऱ्या कुटुंबामध्ये वाढताना येणाऱ्या अनुभवांना देतात. आज्यांच्या कर्तृत्वातून उभ्या राहिलेल्या या मावश्या त्यांच्या मुलाबाळांच्या कुटुंबात, भौतिक परिस्थिती अनुकूल नसतानाही परिवर्तनवादी आहेत. ती परिस्थिती बदलेल यावर विश्वास ठेवत असत. स्मिथ म्हणतात, माझ्या घरातील स्त्रिया व त्यांच्या बरोबरीच्या सर्व स्त्रिया श्रम करत तेवढे श्रम मी तेव्हा किंवा आताही कोणाला करताना पाहिल्याचे आठवत नाही. तरी ही त्या स्त्रियांचा विश्वास अटळ होता. माझ्या आजीचा येशूवर, पाप-पुण्यावर विश्वास होता. आईचा शिक्षण व पुस्तकांवर, मावशीचा सौंदर्य, कला व पुस्तकांवर, त्यांच्या विश्वासामध्ये ताण असले तरी त्यांचा एकमेकीवरचा विश्वास अटळ होता. त्यामुळे मला व असंख्य काळ्या स्त्रियांना काळ्या स्री वादाचे बाळकडू घरातील स्त्रियांकडूनच मिळाले. त्यांनी सोसलेला अन्याय, त्यांच्या अखंड सर्वांना डावलून त्यांच्या माथी येणारे अपयश आणि त्यांची हिंमत व ताकद पाहूनच स्त्रीवादाचा अर्थ कळू लागला. म्हणजे 'घरच्या लेकी' या शीर्षकातून स्मित यांना घरच्या गल्लीतल्या, समूहातल्या स्त्रियांनी दिलेल्या स्त्रीवादाच्या धड्याचे ऋण दर्शवायचे होते, पण याबरोबरच काळया पुरुषांनाही महत्त्वाचा इशारा द्यायचा होता.

साधारणपणे काळ्या समाजात जेव्हा एखादी काळी स्त्री स्वतःला स्त्रीवादी म्हणू लागते तेव्हा काळया वस्तीत, समूहात अवस्था निर्माण होते. ह्या अवस्थेकडे स्मिथना लक्ष वेधायचे होते. स्वतःला स्रीवादी म्हणणारी काळी स्त्री समूहाशी प्रतारणा करते आहे, असा आभास निर्माण केला जातो. अशा स्त्रीवादी स्त्रियांना नावे ठेवून अनेकदा वाळीत टाकण्यात येते. घरा बाहेर हाकले जाते. या स्रीवादाच्या निंदकांना इशारा देणाऱ्या ह्या पुस्तकांने काळ्या स्त्रियांना स्त्रीवादाचे बाळकडू 'बाहेरून' मिळालेले नसून काळ्या घरातूनच कसे मिळालेले आहे हे स्पष्ट केले.

अशाप्रकारे अनेक स्त्रीवादी अभ्यासक कार्यकर्त्यांनी काळ्या स्त्रीवादबद्दल मांडणी केली.

**समारोप**

कृष्णवर्णीय स्त्रीवादाच्या अलीकडील समाज समालोचनांमध्ये चळवळीचे निरीक्षण किंवा आंतरखंडीय भेदभावाच्या 'पोलीसिंग' ने कथितपणे बचावात्मकतेच्या भूमिकेला बळकटी दिली आहे आणि त्याद्वारे जगभरातील रंगीबेरंगी महिलांसाठी सकारात्मक बदलांची कल्पना करण्याची आणि त्याचा पाठपुरावा करण्याची क्षमता मर्यादित केली आहे.

ब्लॅक फेमनिझम, राजकीय आणि सामाजिक चळवळ जी युनायटेड स्टेटस आणि इतर देशांमध्ये काळया महिलांच्या अत्याचाराच्या बहुआयामी पैलूंवर लक्ष केंद्रित करते. अभ्यासाचे क्षेत्र म्हणून कृष्णवर्णीय स्त्रीवाद मुख्य प्रवाहापेक्षा वेगळा आहे. स्त्रीवाद ज्यामध्ये कृष्णवर्णीय स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारे अन्याय समजून घेण्याचा प्रयत्न करतो, इंटरसेक्शन्यालिटी वर दीर्घकाळ जोर देऊन देखील हे वेगळे केले जाते. समकालीन कृष्णवर्णीय स्त्रीवादाची बौद्धिक चौकट सारखीच आहे. स्त्रीवाद रंगीबेरंगी स्त्रियांच्या (विशेषता काळ्या स्त्रिया) दडपशाहीचा दृष्टिकोन जो छेदनबिंदूवर देखील लक्ष केंद्रित करतो. युनायटेड स्टेटस च्या बाहेर, कृष्णवर्णीय स्त्रीवादाला अनेकदा ॲफ्रो-स्त्रीवाद म्हणून संबोधले जाते.

स्वयंअध्यनासाठी प्रश्न -४

प्रश्न- १ अ) योग्य पर्याय निवडा.

१) ............ च्या दशकात उत्तर आधुनिकतावादी संज्ञा प्रचारात आली.

अ) १९६०　　ब) १९६९　　क) १९७९　　ड) १९८०

२. उत्तराधुनिकतावादी स्त्रीवाद्यांनी शरीर व........ व्यक्तिनिष्ठता तयार केली.

अ) लिंगभावाची　　ब) लिंग भेदाची　　क) समानतेची　　ड) समतेची

३. ........ यांनी कृष्णवर्णीय स्त्रीवाद्याचा उल्लेख Feminist ऐवजी Womanist असा केला.

अ) पॉल मार्शल　　ब) बार्बरा स्मित　　क) रोमी मॉरिसन　　ड) ऑलिस वॉकर

४. एकाच वेळी लिंगवाद व वंशवाद विरुद्ध संघर्ष करणारी....... ही विचारधारा आहे.

अ) कृष्णवर्णीय　　ब) श्वेतवर्णीय　　क) पर्यावरणीय　　ड) प्युरीटीन

५. ब्लॅक फॅमिनिझम या विचार प्रणालीची मांडणी प्रथम........ यांनी केली.

अ) केट मिलेट　　ब) बार्बरा स्मिथ　　क) जर्मेन ग्रिअर　　ड) डेव्हिस

ब) खालील जोड्या जुळवा

| | |
|---|---|
| १. जागतिक महिला दिन | अ) Womanist |
| २. बेटी फ्रिडन | ब) स्त्रियांची राष्ट्रीय संघटना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. ब्लॅक फेमिनिझम | | क) ८ मार्च | | |
| ४. बटलर | | ड) बार्बरा स्मिथ | | |
| ५. ॲलीस वॉकर | | इ) स्त्री शरीराचा भौतिकवादी सिद्धांत | | |
| अ) १-ब, | २-अ, | ३-ड, | ४-क, | ५-इ |
| ब) १-क, | २-ब, | ३-ड, | ४-इ, | ५-अ |
| क) १-अ, | २-ब, | ४-क, | ४-ड, | ५-इ |
| ड) २-ड, | २-क, | ३-ब, | ४-अ, | ५-इ |

क) खाली दिलेली वाक्य चूक की बरोबर सांगा.

१. स्त्रीवादी चळवळ ही श्वेतवर्णीय व कृष्णवर्णीय स्त्रियांची चळवळ होती.

२. ॲलीस वॉकर यांनी कृष्णवर्णीय स्त्रीवाद्यांचा उल्लेख Feminist ऐवजी Womanist असा केला.

अ) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे.

ब) पहिले वाक्य चुकीचे आहे दुसरे वाक्य बरोबर आहे.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

ड) दोन्ही बाकी चुकीची आहेत.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **पुरुषप्रधानता** : एक प्रकारे स्त्रियांचे शरीर प्रजनन व लैंगिकता आणि उपजीविकेचे उत्पादन करण्यासाठी लागणारे श्रम यांच्यावरील वासाहतिक वर्चस्व म्हणजे पुरुषसत्ता

२. **समग** : तुरळक, कमी प्रमाणात

३. **लिंगभाव** : शारीरिक भेदापेक्षा सांस्कृतिक व सामाजिक भेदावर आधारलेली लिंग जाणिव

४. **स्त्रीवाद** : स्त्रियांसाठी समान हक्क समांतर ज्या समान संधीची मागणी साठीचे सैद्धांतिक विचार

५. **काळा स्त्रीवाद** : अमेरिकेत प्रस्थापित स्त्रीवादी चळवळी या गोऱ्या स्त्रियांच्या होत्या. त्यात निग्रो (काळ्या) स्त्रियांचा विचार केला नव्हता. तेव्हा काळ्या स्त्रियांनी गोऱ्या स्त्रीवादावर प्रश्न उभे करून स्वतःच्या हक्कांची मागणी काळ्या स्त्रीवादात केली.

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न– १ ची उत्तरे**

प्रश्न– एक अ) रिकाम्या जागा भरा.

१) १७९२ २) स्रीत्वाचे गुढ ३) आर्थिक ४) १९७०

५) ३३% ६) लिंडा ७) १९७५

प्रश्न–दोन अ) योग्य जोड्या जुळवा

अ) १–ब, २–क, ३–ड, ४–अ

ब) खाली दिलेल्या दोन वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर आहे व कोणते वाक्य चुकीचे आहे ते सांगा.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२ ची उत्तरे**

प्रश्न– एक अ) रिकामा जागा भरा.

१) १८ व्या२) लॅटिन ३) भांडवलशाही ४) संपत्ती

५) लिंडा ६) १९७५

ब) खालील योग्य जोड्या जुळवा.

क) १–ड, २–क, ३–अ, ४–ब

क) खालील दिलेल्या वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर व चूक आहे ते लिहा.

अ) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३ ची उत्तरे**

प्रश्न– एक अ) रिकाम्या जागा भरा.

१) १९ व्या२) लैंगिकतेचे राजकारण ३) जर्मेन ग्रिअर

४) समाजवादी ५) मार्क्सवादी

ब) योग्य जोड्या जुळवा

ब) १–ड, २–क, ३–ब, ४–अ

क) खाली दिलेल्या वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर आहे व कोणते वाक्य चुकीचे आहे ते लिहा.

क) पहिले वाक्य चुकीचे आहे व दुसरे वाक्य बरोबर आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–४ ची उत्तरे**

प्रश्न– एक अ) रिकामा जागा भरा

१. १९७९ २. लिंगभावाची ३. ऑलीस वॉकर ४. कृष्णवर्णीय

५) बार्बरा स्मित

ब) योग्य जोड्या जुळवा

ब) १–क, २–ब, ३–ड, ४–इ, ५–अ

ब) खालील दिलेल्या वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर व चूक आहे ते लिहा.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

## १.५ सारांश:

सर्व सैद्धांतिक स्त्रीवादी तत्त्वज्ञानाची बीजे अमेरिकेतील स्त्री हक्काच्या चळवळमध्ये सापडतात. पुढाकारलेल्या अमेरिकेत स्री ही गुलामाप्रमाणे पुरुष सत्ताक समाजव्यवस्थेच्या कचाट्यात होती आणि तिला ही जाणीव होण्यासाठी बराच काळ जावा लागला. शैक्षणिक सुविधांमुळे व विविध क्षेत्रात काम करण्याच्या अनुभवामुळे अमेरिकेत प्रथम मताधिकारी चळवळ सुरू झाली. इ. स. १८८० च्या लंडन येथील गुलामगिरी विरुद्ध मेळाव्यात अमेरिकन स्त्री प्रतिनिधीही उपस्थित होत्या. मात्र त्यांना उपस्थित राहण्यास मनाई करण्यात आली.

अमेरिकेतील लुसी स्टीन यांनी महिला आंदोलन सुरू केले. इ. स. १८९० नंतर स्त्रियांना मतदानाचा असावा या राजकीय मागणीसाठी विविध देशात चळवळी सुरू झाल्या. इंग्लंडमध्ये मतदान अधिकारासाठी झालेल्या आंदोलनातून स्री चळवळीला व्यापक दिशा मिळाली. महायुद्धातील स्त्रियांच्या कार्याने प्रभावित होऊन इंग्लंडने मतदानाचा अधिकार बहाल करण्याचे पाऊल उचलले. इ. स. १९१० मध्ये कोपनहेग येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने जगातील स्त्रियांच्या हक्कांचे स्मरण करण्यासाठी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जावा हा ठराव संमत केला.

इ.स. १८४८ मध्ये एलिझाबेथ कॅडी स्टेटन यांनी स्त्रियांसाठी मेळावा भरवला. त्या मेळाव्यात सेमोका फॉल्स जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा स्रीहक्क चळवळीतला एक महत्त्वाचा जाहीरनामा मानला जातो. या जाहीरनाम्यामध्ये अमेरिकेच्या स्त्रीवादाच्या प्रश्नाने खूप व्यापक रूप घेतले. १९४० ते १९७० या तीस वर्षाच्या कालखंडामध्ये नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५०% पर्यंत वाढले. त्यामुळे अमेरिकेमध्ये इ. स. १९६० मध्ये स्री चळवळीचा उदय झाला. गुलामगिरीच्या निर्मूलनार्थ व पुरुषप्रधान परंपरेने लादलेले पाश तोडून फेकण्यास स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यायला सुरुवात केली. स्त्री श्वेतवर्णीय असो किंवा कृष्णवर्णीय असो पुरुषांच्या लेखी काहीच किंमत नसल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे या चळवळीला गतिशीलता प्राप्त झाली.

इ.स. १९६० मध्ये स्त्रियांची राष्ट्रीय संघटना बेटी फ्रिडन नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आली. या संघटनेला (NOW: National Organisation of Women) या नावाने ओळखले जाते. त्यामुळे स्त्री चळवळीस स्त्री मुक्तीचे रूप आले. १९७० ते १९८० च्या दशकामध्ये स्त्री चळवळने आक्रमक रूप धारण केले. या कालावधीमध्ये एक प्रकारचा जहालपणा या चळवळीला आल्याचे दिसून येते. या चळवळीला प्रतिसाद मिळत असल्यामुळे ही चळवळ वेगाने पुढे जाऊ लागले. इ. स. १९६४ च्या नागरी हक्क कायद्याने वंश लिंगाआधारित भेदभावास तिलांजली देण्यात आली. अमेरिकन संघ व राज्याने भेदभाव निर्मूलनार्थ कायदे केले. स्त्रियांच्या गर्भपाताविषयी मागणीस समर्थन देणारा ऐतिहासिक निकाल इ.स.१९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिला.

जगातील सर्व संस्कृतीने स्त्रियांना दुय्यमत्व दिले. स्त्रीवादाचा विचार करणाऱ्या सर्व सिद्धांताने स्त्रियांच्या समानतेची मांडणी केली आहे. स्त्रीवादाला अनेक कांगोरे आहेत. उदारमतवाद आणि क्रांतिकारी मार्क्सवादी स्त्रीवाद यामध्ये स्त्री-पुरुष संबंधाचा विचार मांडला असला तरी या दोघांमध्ये मूलभूत बदल आहे. उदारमतवादी स्त्रीवाद स्त्रियांच्या शिक्षणावर, समाज सुधारणेवर व कायदेशीर हक्क अधिकारांवर भर देतो. तर मार्क्सवादी स्त्रीवाद स्त्रियांचे शोषण आणि पिळवणूक यांचा नाश केल्या खेरीज मानव मुक्ती मान्य नाही असे सांगतो. उदारमतवादी स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी जॉन स्टुअर्ट मिल याने केली तर मार्क्सवादी स्त्रीवादाची सैद्धांतिक मांडणी एंगल्स व कार्ल मार्क्स यांच्या विचारांतून घडली. स्त्रीवादी चळवळीचे एकूण तीन टप्पे सांगता येतात. पहिल्या टप्प्यामध्ये प्रामुख्याने मतदानाच्या हक्कांसाठी अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स यामध्ये चळवळी झाल्या. दुसऱ्या टप्प्यात स्त्रीवादाची पिछेहाट झाली आणि तिसऱ्या टप्प्यांमध्ये स्त्री चळवळीला पुन्हा गती मिळाली. कारण अमेरिकेतील नागरिकांच्या चळवळी, काळ्यांच्या चळवळी याबरोबरच बेटी फ्रीडन, केट मिलेट, जर्मन गिअर, फायरस्टोन इत्यादी स्त्रीवादी लेखिकेच्या लेखनातून या चळवळीला गती प्राप्त झाली. संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष महिला वर्षे तर १९७५ ते१९८५ हे महिला दशक म्हणून जाहीर केले. २००१ वर्ष महिला सशक्तिकरण म्हणून जाहीर करण्यात आले. यातून स्त्री चळवळीस गती प्राप्त झाली.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवाद म्हणजे काय याबाबतच्या व्याख्या स्पष्ट करा आणि पाश्चात्त्य स्त्रीवादा बद्दल लिहा.

२. स्त्रीवादाचे विविध दृष्टिकोन स्पष्ट करा.

३. उदारमतवादी व मार्क्सवादी स्त्रीवाद स्पष्ट करा.

४. समाजवादी स्त्रीवाद वैशिष्ट्ये, स्वरूप व तत्त्वज्ञानाबद्दल लिहा.

५. जहाल स्त्रीवाद व जहालवादी स्त्रीवाद मांडणारे विचारवंत याबद्दल लिहा.

६. कृष्णवर्णीय स्त्रीवादाबद्दल लिहा.

**ब) टिपा लिहा**

१) पाश्चात स्त्री चळवळीचे टप्पे

२) मार्क्सवादी स्त्रीवाद

३) उदारमतवादी स्त्रीवाद

४) जहालमतवादी स्त्रीवाद

५) उत्तर आधुनिकतावादी स्त्रीवाद

६) कृष्णवर्णीय स्त्रीवाद

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) स्त्रीवाद, लांडे सुमती व तांबे श्रुती, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००७

२) कदम य.ना. आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून ,२०१०.

३) डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१.

४) डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००७.

५) फडके य.दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ५ श्री विद्या प्रकाशन, पुणे

६) डॉ. बोरवंचीकर राजश्री, अमेरिकन संघराज्याचा इतिहास, पब्लिशर्स औरंगाबाद

७) पाटील शोभा, स्त्रीवाद विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

८) विद्युत भागवत, स्त्रीवाद सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन, पुणे,२००८.

९) डॉ. रेगे शर्मिला, काळया स्त्रियांचा विचार व लढा, दिग्नाग प्रकाशन, पुणे


❑❑❑

## घटक २
## लिंगभाव व पितृसत्तेची संकल्पना

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
 २.२.१ लिंग व लिंगभावाची संकल्पना
 २.२.२ श्रमाची लैंगिक विभागणी
 २.२.३ पितृसत्तेचे सामाजिक व सांस्कृतिक पैलू
२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ आधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### २.० उद्दिष्टे

या घटकात आपणांस पुढील बाबी लक्षात येतील–

१) लिंग व लिंगभावाच्या संकल्पनेचा अर्थ, व्याप्ती व महत्त्व लक्षात येईल.
२) स्त्रियांच्या स्थानाची चिकित्सा करण्यासाठी लिंग व लिंगभाव या संकल्पना वापरता येतील.
३) स्त्रियांच्या श्रमाची लैंगिक विभागणी कशी केली आहे, हे समजण्यास मदत होईल.
४) लिंगभाव आधारित श्रमविभागणीमुळे स्त्री–पुरुषांमध्ये निर्माण झालेल्या विषमतेचा शोध घेता येईल.
५) स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाला श्रमाचे लैंगिक विभाजन कसे कारणीभूत होते हे लक्षात येईल.
६) पितृसत्तात्मक समाजाची ओळख होईल व समाजात पितृसत्ता कशी कार्य करते ते लक्षात येईल.
७) पितृसत्ता समाज घट्ट ठेवण्यासाठी संस्कृती कशी कार्य करते. हे समजून घेता येईल.
८) स्त्री–पुरूष समता प्रस्थापित करण्यासाठी विद्यार्थ्यांना असमानतेच्या मुळाचा शोध घेता येईल.
९) इतिहास लेखनामध्ये लिंगभावाच्या दृष्टिकोनाचा विचार कशा पद्धतीने कार्यरत आहे याची जाणीव होईल.
१०) इतिहासाची समज व आकलन होण्यासाठी लिंगभावाच्या दृष्टिकोनाची मदत होईल.

## २.१ प्रास्ताविक

आधुनिक युगात युरोपमध्ये भांडवलशाहीची वाढ झाली. प्युरिटन (धर्म सुधारणावादी) कल्पनांचा उदय, विवेक आणि विज्ञान या अंगाने जन्मलेल्या नव्या कल्पना यातून सामान्य जन नव्या प्रकाशात विविध प्रश्न विचारू लागले. या नव्या परिवर्तनामुळे स्त्रिया आणि पुरूष यांच्या नात्याच्या स्वरुपाबद्दलही चिकित्सक विचार व्यक्त केले जाऊ लागले. औद्योगिक क्रांतीने स्त्रियांच्या स्थानामध्ये परिवर्तन झाले. स्त्रियांच्या कामाचे स्वरूप आणि समाजातील स्थान यामध्ये बदल घडू लागले. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या दर्जा संबंधात अत्यंत निर्णायक आणि अपरिवर्तनीय बदल सुरू झाले त्यासाठी स्त्रियांच्या दुय्यमत्वाची चिकित्सा करण्यासाठी  लिंगभाव व लैंगिकता या संकल्पना वापरल्या जाऊ लागल्या.

अनेक शतके असेच मानले गेले होते की, स्त्री व पुरुषांच्या भूमिका व त्यांचा दर्जा हा त्यांच्या जैविक वैशिष्ट्यांनीच ठरतो. म्हणूनच त्यांच्या भूमिका व तो दर्जा नैसर्गिक आहे. त्यांचा दर्जा कधीच न बदलता येणारा आहे. म्हणजे साधारणपणे स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे कारण त्यांच्या शरीर रचनेत आहे, असे मानण्याची प्रवृत्ती आजही आहे. तिचा प्रतिवाद करण्यासाठी लिंग व लिंगभाव या मधील फरक स्पष्ट केला गेला. म्हणजेच एक प्रकारे स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाचे कारण  त्यांच्या शरीरात आहे. ते नैसर्गिक आहे अशी धारणा जगातील सर्व संस्कृतीत आहे. आणि आजही तसेच समजले जाते. म्हणजे स्त्रियांचे दुय्यमत्व हे नैसर्गिक मानले की, सहाजिकच समाजात अस्तित्वात असणाऱ्या विषमतेची आणि अन्यायाची दखल घेण्याचे काम उरत नाही.

### २.२.१ लिंग व लिंगभावाची संकल्पना

स्त्री-पुरुषांच्या क्षमता, इच्छा व व्यक्तिमत्वातील गुण आणि वर्तणुकीच्या पद्धती लिंगभावात्मक संबंधामुळे निश्चित केला जातात. आणि त्या भिन्नच असतात असे सांगितले जाते. लिंगभावात्मक संबंध शरीर निर्मित नसून स्थल-काल परत्वे भिन्न असणारे समाजनिर्मित असतात.

जेंडर म्हणजेच लिंगभावाच्या संकल्पनेमुळे आपल्याला लिंग आणि लिंगभाव या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, हे मांडणे शक्य झाले आहे. लिंगभाव नैसर्गिक नाही तो सामाजिक व सांस्कृतिक आहे, याचा उत्तम पुरावा म्हणजे स्थळ, काल आणि समाजपरत्वे लिंगभावामध्ये विभिन्नता आढळते. लिंगभाव परिवर्तनीय आहे. लिंगभाव विविध कुटुंबात व समूहात भिन्न असतो. इतकेच नव्हे तर त्याच कुटुंबात वेगवेगळ्या काळातही लिंगभाव वेगळा असतो.

**लिंग** (Sex)

सामान्यत: लिंग या शब्दासाठी जेंडर व सेक्स हे इंग्रजी शब्द पर्यायी शब्द म्हणून वापरले जातात. सामाजिक मानसशास्त्रज्ञांनी या दोन्ही शब्दांमध्ये भेद केला आहे. जेंडर साठी लिंगभाव या संज्ञेचा वापर केला जातो. तर सेक्स साठी लिंग किंवा लिंग-जाती या संज्ञेचा वापर केला जातो.

Gender हा इंग्रजी शब्द लॅटिन Genus शब्दापासून बनला आहे. याचा अर्थ जन्म, कुटुंब, राष्ट्र असा (Birth, Family, Nation) आहे. लिंग हे नैसर्गिक असते. लिंग हे जीवशास्त्रीय आहे. ते स्त्री-

पुरुषांच्या जननेंद्रियातील फरकामुळे दृश्य स्वरुपाचे आहे. लिंगातील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून आहेत. लिंग हे शक्यतो सहजपणे बदलता येत नाही. लिंग हे सर्वत्र सारखे असते म्हणजे ते स्थिर आहे.

प्रत्येक जण नर किंवा मादी म्हणून जन्माला येतो. आणि जननेंद्रियावरून त्याचे किंवा तिचे लिंग ठरते. लिंग ही जैविक विशेषता आहे. ज्यात स्त्री व पुरूष यांची वेगवेगळी गुणसुत्रे, हार्मोन्स, पुनरुत्पादन अवयव आणि अन्य शारीरिक विशेषता असतात. समाजाला नवजात शिशुची पहिली ओळख ही मुलगा किंवा मुलगी या स्वरूपात होत असते. म्हणजेच मुलगा झाला किंवा मुलगी झाली हीच शिशूची पहिली ओळख असते. नवजात शिशुच्या लिंग विषयक सामाजिक ओळखीनंतर त्याच्याशी भिन्न-भिन्न प्रकारच्या सामाजिक आंतरक्रिया घडून येतात व त्यातून लिंग ओळख व लिंग भूमिकेचा विकास साधला जातो. लिंग भूमिकेचा विकास कुटुंब व समाजातून केला जातो. मुलाच्या व मुलीच्या भूमिका निश्चित केल्या जातात.

**लिंगभाव** (Gender)

जन्मानंतर लगेच कुटुंबाकडून आणि समाजाकडून मुलावर लिंगभावात्मक संस्कार बिंबवण्यास सुरुवात होते. मुलाचा जन्म झाला की आनंद साजरा केला जातो. तर मुलगी जन्मली की शोक करतात. मुलावर प्रेम माया, कोडकौतुक, योग्य आहार, आरोग्याची काळजी याची खैरात असते. आणि मुलीला मात्र यातील काहीच मिळत नाही. मुलाने शूरवीर कर्तबगार असावे असे सांगितले जाते. तर मुलींनी प्रेमळ, लाजाळू घरगुती असावे असे शिकवले जाते. खरे तर मुलीच्या शरीरात असे काहीच नसते की ज्यामुळे त्या मुलांसारखे कपडे घालू शकत नाही की मुलांसारखे झाडावर चढणे अगर सायकल चालवणे या गोष्टी त्या करू शकत नाहीत. त्याचप्रमाणे मुलगे बहुलीशी खेळू शकत नाहीत किंवा घरातील स्वयंपाक आणि साफ सफाई वगैरे कामात मदत करू शकत नाही, असे काही त्यांच्या शरीरचनेत नसते. मुलाने अमुकच केले पाहिजे आणि मुलींनी तमुकच केले पाहिजे यासारखे सर्व भेद समाजनिर्मित असतात. म्हणजेच लिंगभाव नैसर्गिक नाही तो सामाजिक व सांस्कृतिक आहे. स्त्री आणि पुरुषांनी आपली ओळख समजून घेणे, मूल्यमापन आणि अपेक्षाकृत वर्तन करणे या सांस्कृतिक कल्पनाशी लिंगभाव संबंधित आहे.

जोन स्कॉट (Joan W. Scott) यांच्या मते, 'लिंगभेदावरून जाणून घेतलेल्या फरकावर आधारित सामाजिक संबंधाचा बनवलेला घटक म्हणजे लिंगभाव आहे. आणि लिंगभाव हा सामर्थ्याचा महत्त्वपूर्ण संबंध दर्शवणारा प्राथमिक मार्ग आहे.' ("Gender is constitute elements of social relationship based on perceived differences of sexes and gender is a primary way of signifying relationship of power.")

ज्युडिथ लॉर्बर (Judith Lorber) याच्या मते, 'संस्कृतीच्या मार्गाने सामाजिक जीवनाचे संघटन करण्यासाठी मानवाने निर्माण केलेली संस्था म्हणजे लिंगभाव होय.' ("Gender is an institutions created by humans to organise their social life through the way of culture existed.")

World Health Organization (WHO) या संघटनेने जेंडर हा शब्द सामाजिक दृष्ट्या बांधलेली भूमिका, वर्तन, कृती आणि स्वाभाविक गुणधर्मानुसार स्त्री आणि पुरुषांची विचारपूर्वक दिलेली संधी या

संदर्भात वापरली जाते. "The socially constructed role, behaviour, activities and attributes that a given society considers appropriate for men and women."

स्त्रीवादी विचारवंताच्या मते लिंगभावाचा अर्थ 'काही सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये' असा होतो. ही वैशिष्ट्ये काळानुरूप व स्थलानुरूप बदलत असतात.

यावरून असे लक्षात येते की, स्त्रिया आणि पुरुषांनी आत्मसात केलेले, वेळेनुसार बदल होणारे आणि संस्कृतीनुसार विस्तृत भिन्नता असणारे, सामाजिक वेगळेपणाशी लिंगभावाची संकल्पना संबंधित आहे. लिंगभाव ही संकल्पना स्त्री आणि पुरुषांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यासाठी वापरतात. यात स्त्री-पुरुषांचे स्थान व भूमिका यात समाजात कसा भेद केला जातो, याचे या संज्ञेमुळे आपणास आकलन होते. म्हणजेच स्त्री-पुरुषांसंबंधीच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषणाचे साधन म्हणून ही संकल्पना वापरली जाते.

लिंगभावाचा अभ्यास म्हणजे पुरूष आणि स्त्रियांच्या अस्मितेचा अभ्यास आहे. यामध्ये सामाजिक संरचना, प्रतीके याचा अंतर्भाव आहे. स्त्रिया आणि पुरूष जगाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात का? आणि त्यानुसार त्यांच्या प्रतिक्रियांमध्ये काय फरक असतो का? हे पाहणे गरजेचे आहे. यासाठी स्त्री आणि पुरुषाला ज्या भूमिकेतून पाहतो ते महत्त्वाचे आहे.

सामान्यपणे सत्ता, स्वायत्तता, व सार्वजनिक जीवन ही विशेषणे पुरूषत्वाशी संबंधित असतात. तर या विरुद्ध दुर्बलता, भावनाप्रधानता, खाजगी जीवन ही विशेषणे स्त्रीत्वाशी संबंधित असतात. वैशिष्ट्यांमधील हे भेद तुलनात्मक नसून ते परस्परांवर अवलंबून असतात. ही वैशिष्ट्ये जीवशास्त्रीय नसून सामाजिक रचनेच्या प्रभावामुळे अस्तित्वात येतात. त्यामुळे राजकारणामध्ये अग्रस्थानावर असलेल्या स्त्रियांना पुरुषांसारखे वागावे लागते. त्यांना असे वागणे यशस्वी होण्यासाठी आवश्यक ठरते. काही वेळा स्त्रिया या पुरुषी वैशिष्ट्ये दाखवतात तर काही वेळा पुरूष हे स्त्रियांशी जोडली गेलेली वैशिष्ट्ये दाखवतात.

**लिंगभाव उतरंड** (Gender Hierarchy)

लिंगभाव ही सामाजिक श्रेणीबद्ध रचना आहे. लिंगभाव उतरंड याचा अर्थ कोणत्याही एका लिंगाच्या समूहाचे प्रभुत्व असणे. सर्व समाजामध्ये व संस्कृतीमध्ये स्त्रियांचे दुय्यमत्व हा लिंगभाव समानतेचा पैलू राहिला आहे. त्यामुळे लिंगभाव संबंध हे बाळाच्या, हिंसेच्या आणि सहकार्याच्या मदतीने श्रेष्ठत्त्व आणि कनिष्ठत्त्व कायम करणारे संबंध असतात. बहुतेक समाजामध्ये लिंगभाव संबंधाचे स्वरूप हे पितृसत्ताक असते. पितृसत्ता म्हणजे अशी सामाजिक व्यवस्था आणि विचारसरणी जिच्यानुसार पुरूष हेच स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात. त्यांचे प्रभुत्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये असते. आणि बहुतेक संसाधने व सामाजिक संस्थांवर पुरुषांचे नियंत्रण असते.

लिंगभावाचे स्वरूप हे स्त्री-पुरुषांमधील संबंध निर्धारित करते. लिंगभावाची उतरंड अतिशय विषम आहे. लिंगभाव सर्व नातेसंबंधात दिसून येतो. कोणत्याही प्रकारचे श्रेष्ठत्त्व हे पुरुषलिंगाशी जोडले जाते. उदा. वधु-पिता व वर-पिता यांच्या नात्याकडे पाहिले तर त्यात वर-पिता श्रेष्ठ असतो. त्याचे मोठ्या प्रमाणात

आदरातिथ्य केले जाते. त्याला मान असतो. वधूपिता हा मुलीचा पिता असल्यामुळे नेहमीच कनिष्ठ आणि सदैव नतमस्तक असतो.

स्त्रिया लिंगभाव व्यवस्थेचा स्वीकार करून त्या स्वतःच स्वतःचे दुय्यमत्व (Subordination) प्रस्थापित करण्यात सहाय्य करतात. स्त्रियांनी दुय्यमत्वाच्या मूल्यांचा अशा प्रकारे अंगीकार केलेला असतो की, स्वेच्छेने त्या मूल्याचे संस्कार व हस्तांतरण त्या आपल्या मुलांवर करत असतात. उदा. घरातील कामाचे विभाजन मुलीने स्वयंपाक केला पाहिजे तर मुलाने घराबाहेरची कामे करावी. तसेच, दोन स्त्रियांमधील सहसंबंधाचे निर्धारण ही लिंगभाव करतो. उदाहरणार्थ, सासू-सून, नणंद-भावजय, वरमाता-वधूमाता मधील संबंध या सर्व संबंधांमध्ये ज्या स्त्रियांचा संबंध वराशी असतो त्या आपोआपच वधूशी संबंधित स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ ठरतात.

नाते-संबंधामध्ये पुरुषी वैशिष्ट्यांना जास्त महत्त्व आहे. लिंगभावामध्ये पुरूष आणि स्त्रियांमध्ये असमान सत्तासंबंध आहे. हे संबंध जसे कुटुंबामध्ये असतात तसेच समाजातील सर्व संस्थामध्येही असतात. पुरुषांचे क्षेत्र मानलेल्या राजकारणात तर स्त्रियांची परिस्थिती अतिशय बिकट आहे. जगातील दहा टक्क्यांपेक्षा कमी राष्ट्र प्रमुख स्त्री आहेत. उच्च पदांमध्ये स्त्रियांचे प्रमाणात अत्यंत कमी आहे. तर मग स्त्रिया आहेत तरी कुठे? सिंथिया एनलो म्हणतात की, स्त्रियांचे अस्तित्व शोधायचे असेल तर ते अपारंपारिक ठिकाणी शोधावे लागेल. सर्वसामान्यपणे जगातील राजकारणाच्या परिघाबाहेर हे अस्तित्व शोधावे लागेल. त्यासाठी स्त्रियांच्या कारकुनी, सचिव, घरगुती मदतनीस, राजवतांच्या पत्नी इत्यादी भूमिका पाहाव्या लागतात. या सर्व भूमिका आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्त्वाच्या आहेत. अर्थातच, स्त्रियांना दृश्यमान करण्याच्या प्रयत्नात या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही की त्या नेहमी कमी पगाराच्या किंवा बिन पगाराच्या कामात प्रसिद्धीपासून सत्तेपासून दूर का असतात. याचे उत्तर मिळण्यासाठी लिंगभाव संवेदनक्षम भिंगदृष्टी असावी लागते.

**स्त्री-पुरुषांमधील सत्तासंबंध**

लिंगभावात्मक संबंध शरीरनिर्धारित नसून स्थल कालपरत्वे भिन्न असणारे, समाजनिर्मित असतात. लिंगभाव संबंधात राजकारण असते. येथे राजकारण हा शब्द कोणत्याही नातेसंबंधांमध्ये सत्तेचा खेळ चालू असतो ही वस्तुस्थिती सुचवतो. कारण समाजात संसाधने, निर्णयक्षमता इत्यादी बाबत सत्ता, अधिकार आणि नियंत्रणाचे विषम वाटप झालेले असते. कुटुंबात सतत राजकारण होत असते आणि त्यात स्त्रियांची सौदा करण्याची शक्ती (Bargaining Power) सतत वापरली जाते. घरातील सर्व सदस्यांना समान प्रमाणात संसाधने सेवा आणि संधी उपलब्ध नसतात. ही विषमता लक्षात घेऊन कुटुंब हे सौदेबाजीचे आणि संघर्षाचे ठिकाण आहे, असे अनेक समाजशास्त्रज्ञ मानतात. कुटुंबात सत्तेसाठीचा तडजोडीचा खेळ अविरत चालू असतो. सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन या गोष्टीला सहकार्य व संघर्ष नमुना संबोधतात. विख्यात स्त्रीवादी अर्थशास्त्रज्ञ बिना अग्रवाल यांनी या संकल्पनेचा विकास केला आहे. त्या म्हणतात की घरदार कुटुंब हे अत्यंत गुंतागुंतीच्या संबंधाचे क्षेत्र आहे की, जिथे लिंगभाव, वय, नात्याचे स्वरूप आणि निर्विवाद

मानलेल्या परंपरा यांच्या आधारावर सतत सत्ता संघर्ष चालू असतो. एवढेच नव्हे तर कुटुंबाप्रमाणे समाज, बाजारपेठा, राज्यसंस्था या सर्व ठिकाणी लिंगभाव संबंधांमध्ये संघर्ष हे अव्याहतपणे चालू असतात. जेव्हा दोन पक्षांच्या सहकार्यांमध्ये हीत दिसते तेव्हा हे सहकार्य करण्यास तयार होतात. थोडक्यात, कुटुंबात ज्या व्यक्तीची घराबाहेर राहून भौतिक गरजा भागवण्याची क्षमता सर्वाधिक असते त्या व्यक्तीची कुटुंबातील सौदा शक्ती अधिक असते. जेव्हा स्त्रियांची उत्पादन क्षमता वाढते आणि विशेषतः जर त्यांच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असेल तर त्यांची सौदा शक्ती अधिक वाढते त्याचप्रमाणे जमीन पैसा किंवा इतर संसाधने यांच्या वापराची संधी असेल, किंवा त्यावर स्त्रियांचे नियंत्रण असेल तर त्यांच्या सौदाशक्तीला अधिक बळकटी प्राप्त होते.

स्त्रियांच्या स्थानांचे मूल्यमापन करण्यासाठी लिंगभावाचे स्थानिक संबंध किंवा स्त्री-पुरुषांमधील सत्तासंबंध बघणे गरजेचे असते. स्त्रियांच्या स्थानात सुधारणा करायची असेल तर प्रचलित रिती रिवाज, नियम, व्यवस्था व स्त्री-पुरुषांमध्ये सत्तासंबंध यात बदल करावे लागतील.

**व्यावहारिक लिंगभाव गरजा** (Practical gender need)

व्यावहारिक लिंगभावाच्या गरजा या स्त्रियांच्या परिस्थितीशी संबंधित (लिंगभाव आधारित श्रम विभाजनाशी) असतात. त्या सहजपणे ओळखता येतात. (उदा. अन्न, स्वच्छ पाणी, औषधे निवारा) यांचा संबंध प्रचलित लिंगभाव आधारित श्रम विभाजनाशी असतो. उदा. स्त्रिया असे म्हणतात की, त्यांना पाणी, इंधन, चारा पाहिजे कारण घराला, मुलांना आणि घरातील जनावरांना सांभाळण्याचे कामे त्यांनाच करावी लागतात. स्त्रियांच्या व्यवहारिक लिंगभाव गरजांची पूर्तता केल्याने प्रचलित सत्ता संबंधांना कसलाच धक्का बसत नसल्याने या गरजांच्या पूर्ततेसाठी राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमापासून व घडामोडी पासून कोणालाही धोका वाटत नाही. विविध विकास कार्यक्रमांमधून या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**व्यूहात्मक लिंगभाव हितसंबंध** (Strategic Gender Interests - SGIs)

व्यूहात्मक लिंगभाव हितसंबंध हे स्त्रियांच्या समाजातील दुय्यम स्थानाशी संबंधित असतात. हे प्रचलित विषम लिंगभाव संबंध बदलून समानतेवर आधारित लिंगभाव संबंध प्रस्थापित करण्याच्या इच्छेशी संबंधित असतात. व्यूहात्मक लिंगभाव संबंध प्रत्यक्षात आणण्यासाठी स्त्रियांनी संघटित होणे, त्यांना निर्णय प्रक्रियेत महत्त्वाच्या पदावर स्त्रियांना सहभागी करून घेणे, स्त्री-पुरुषांमधील भेदभाव करणाऱ्या प्रथा, पद्धती व नियम बदलणे हे करावे लागेल. व त्यातून समतेवर आधारित लिंगभाव प्रस्थापित संबंध प्रस्थापित होऊ शकतील. शिक्षण जागरूकता निर्माण करणे, एकत्र येणे, संघटन करणे, नेतृत्व विकसित करणे, व्यवस्थापन कौशल्य अवगत करणे अशा कृती केल्या तरच स्त्रियांच्या स्थानात बदल होऊ शकतो. पण या कृतीला विरोध होतो कारण या कृती पुरुषी प्रभुत्वाला आव्हान देत असतात. पण अशा पद्धतीने बदल केल्याखेरीज स्त्रियांच्या स्थानांमध्ये दर्जामध्ये बदल होईल व लिंगभाव संबंधात परिवर्तन होईल.

संस्कृतींतून आलेले स्त्री-पुरूष सत्तासंबंध बदलणे सोपे नाही. कारण समाजातील विविध संस्था त्या शासकीय असोत अथवा बिगर शासकीय या संस्था पितृसत्ताक असतात. एवढेच नव्हे तर स्त्री संघटना

देखील पितृसत्ताक संस्कृतीचे अपत्य असतात. जर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडवून आणायचे असेल तर संरचनात्मक व्यवस्था, विकासाच्या योजना, नियोजन व अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेमध्ये मूलभूत बदल करावे लागतील.

**लिंगभाव संवेदनक्षम दृष्टिकोन**

लिंगभाव संवेदनक्षम दृष्टिकोनातून वेगवेगळ्या गोष्टींचा अभ्यास करताना आपण काही ठराविक गोष्टीकडे लक्ष केंद्रित करतो आणि त्या गोष्टी आपणास जास्त स्पष्टपणे दिसू शकतात. लिंगभेदामुळे सामाजिक असमानता निर्माण होते. लिंगभाव संवेदनक्षम दृष्टिकोनामुळे लिंगभावामुळे निर्माण होणाऱ्या असमानता, असुरक्षितता, सामाजिक अन्याय यासारख्या विषयाचे आकलन पटकन होईल. म्हणूनच, लिंगभाव म्हणजे केवळ वर्णनात्मक वैशिष्ट्य नसून विश्लेषणाचे साधन आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने लिंगभेदावर आधारित असमानतेवर काही निर्देशांक तयार केले आहेत. यापैकी पहिला म्हणजे लैंगिक असमानता सूचकांक (Gender Inequality Index - GII) हा निर्देशांक आरोग्य, राजकीय सबलीकरण आणि आर्थिक सहभाग यावर आधारित आहे. तर लिंग विकास सूचकांक (Gender Development Index - GDI) ज्ञान, जीवनमानाचा स्तर आणि अपेक्षित आयुर्मान यावर आधारित आहे. हे दोन्ही निर्देशांक स्त्रियांसंबंधीच्या स्थितीचे मोजमाप करण्यासाठी तयार केले आहेत. या प्रयत्नांमधून स्त्रियांकडे बघण्याचा जगाचा दृष्टिकोनात बदल घडवला जात आहे. विविध देशातील स्त्रियांच्या स्थितीचा दर्जा ठरवला जातो.

Gender Development Index - (GDI) लिंगभाव विकास निर्देशांक तयार केला गेल्यामुळे स्त्रीविषयक ध्येय-धोरणे ठरवण्यास उपयोग होऊ लागला. साक्षरता, अपेक्षित आयुर्मर्यादा, शाळेतील प्रवेश, लिंगभाव सापेक्ष आय मिळकत यासारख्या घटकांचा उपयोग करून राज्याचा लिंगभाव सापेक्ष विकास किती आहे हे पाहिले जाते. यातील प्रमुख गृहीतक असे आहे की, जितकी लिंगभाव असमानता जास्त तितका राज्याच्या विकासाचा दर्जा खातो. लिंगभाव सापेक्ष समानता आणण्यासाठी १९९५ मध्ये बीजिंग महिला परिषदेमधून सर्व सदस्य राष्ट्रांना लिंगभेद संपवण्याचे आवाहन केले गेले. शासनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये लिंगभाव संपुष्टात यावा यासाठी वेगवेगळी ध्येय धोरणे आखण्याचे आणि त्याची कार्यवाही करण्याची आव्हान केले गेले. आंतरराष्ट्रीय स्तरावर अशा पद्धतीने लिंगभाव समानता प्रस्थापित करण्यासाठी पावले उचलली गेली आहेत.

**लिंग व लिंगभाव संकल्पनेच्या अभ्यासाचे महत्त्व**

लिंग व लिंगभाव या संकल्पना मुलतः विश्लेषणाची साधने आहेत किंवा असे सैद्धांतिक रचिते आहेत की, ज्याद्वारे स्त्री-पुरुषांमधील सत्तासंबंध तपासता येतात. त्यांच्यामुळे आपल्या विचारांना तपासून पाहण्यास व सामाजिक वास्तवाचा अधिकाधिक नेमकेपणाने वेध घेण्यास मदत होते. या संकल्पना वास्तवासंबंधी असलेल्या आपल्या आकलनावर परिणाम करतात त्यातून आपले विचार बदलण्यास मदत होते.

लिंगभाव या संकल्पनेनुसार स्त्री-पुरूष या भिन्न जीवशास्त्रीय श्रेणी नसून त्या समाज रचित भिन्न सामाजिक श्रेणी आहेत, याचे ज्ञान होते.

लिंगभाव या संज्ञेच्या माध्यमातून आपण स्त्री-पुरुषांविषयी बोलू शकतो. दोघांमधील संबंध तपासू शकतो. पण लिंगभाव या शब्दाचा वापर केवळ स्त्रियांसंदर्भात करतात. स्त्रियांचे सबलीकरण वा पितृसत्ता या शब्दाप्रमाणेच हा शब्द पुरुषांना विरोध करत नाही.

पितृसत्तेचा अर्थ पुरुषांचे नियंत्रण असलेले जग ज्यात स्त्रियांना पुरुषांच्या प्रभुत्वात राहावे लागते. पितृसत्ता या शब्दातून समाजात कोणाची सत्ता आहे व सत्तेचे पुनर्वाटप कशा प्रकारे झाले आहे हे या संकल्पनेद्वारे स्पष्ट होते.

बहुतेक वेळा लिंगभाव ही संज्ञा केवळ स्त्री-पुरुषांच्या भूमिका, जबाबदाऱ्या, वेगवेगळ्या साधनावर असणारा त्यांचा ताबा, निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग यांचे वर्णन करण्यासाठी वापरली जाते. अशा प्रकारच्या वर्णनातून लिंगभाव ही संज्ञा स्त्री-पुरुषांमधील सत्ता संबंधावर प्रकाश टाकते. यातून स्त्रियांच्या व पुरुषांच्याही शोषणाची व्यवस्था कशी काम करते, याचे आकलन होते. पुरुषांच्या शोषणाची या अर्थाने की कुटुंबाचा आर्थिक गाडा चालवण्याची जबाबदारी केवळ पुरुषांवर निर्धारित केली जाते. ही जबाबदारी लिंगभावातून त्याच्यावर एक प्रकारे लादलेली असते.

स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या मुक्तीच्या प्रक्रिया या अशा प्रकारे परस्पर संबंधित आहेत. आपल्या समाजात पुरुषांनी साथ दिली तरच स्त्रिया पितृसत्ते संबंधीचा पिंजरा तोडून पुढे जाता येईल.

स्त्री आणि पुरुषांना जर मुक्त मानवी संबंध निर्माण करायचे असतील तर त्यांना त्यांची शोषक व्यवस्थेतील भागीदारी सोडावी लागेल आणि हे सर्व केवळ पितृसत्तेत विशेष अधिकार असणाऱ्या पुरुषांनाच लागू आहे, असे नाही तर स्त्रियांना देखील लागू आहे. त्यांचे दोघांचे अस्तित्वच लिंगभाव संज्ञेत बांधले गेले आहे.

कुटुंबात तसेच समाजामध्ये न्याय आणि शांततापूर्ण संबंध निर्माण होण्यासाठी स्त्री-पुरुषांमध्ये समता निर्माण होणे आवश्यक आहे. लिंगभाव समानता प्राप्त करून सर्वांसाठी न्याय आणि शांतता पूर्ण जगाची निर्मिती करण्यासाठी सर्व ठिकाणच्या स्त्री-पुरुषांनी हातात हात घालून प्रयत्न करायला हवेत.

इतिहासाचे लेखन करताना व इतिहास समजून घेताना लिंगभाव या संज्ञेचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. स्त्रीवादी इतिहास लेखन लिंगभावाची संकल्पना समजून घेतल्या शिवाय आकार घेऊ शकत नाही. तर मुळ प्रवाही इतिहास लेखनातील स्त्रियांच्या अदृश्यतेवरही भाष्य करता येणार नाही. स्त्रियांच्या इतिहासातील स्थानाची चिकित्सा करता येणार नाही. लिंगभाव संज्ञेचा विचार करून लिहिलेला इतिहास हा नवसमाज रचनेची नांदी ठरू शकतो. स्त्रियांच्या न्याय हक्काची जाणीव समाजाला करून देऊ शकतो. एकंदरीत स्त्री-पुरुषसमानतेच्या दिशेने समाज मनाचा प्रवाह वळवण्यास अशा पद्धतीचे इतिहासलेखन महत्त्वपूर्ण ठरू शकते.

लिंगभावाच्या संकल्पनेने हे स्पष्ट केले आहे की समस्येचे कारण स्त्री नसून समाज व संस्कृती द्वारा रचलेल्या बाईपण व पुरूषपणाच्या व्याख्या आहेत. या व्याख्या स्त्री-पुरुषांचे अधिकार, जबाबदाऱ्या, त्यांचे कार्यक्षेत्र, इ. कोणत्या असाव्यात ते ठरवतात. या व्याख्या खऱ्या अर्थाने समस्येचे मूळ कारण आहेत. आज स्त्रियांची जी स्थिती आहे ती एका सामाजिक व्यवस्थेमुळे म्हणून स्त्रियांचे स्थान आणि दर्जा बदलायचा असेल तर या सामाजिक व्यवस्थांना आणि व्याख्यांना बदलावे लागेल. समाजामध्ये लिंगभावाची जडणघडण कशी झाली आहे याचे परीक्षण करणे उपयुक्त ठरते. याचाच अर्थ लिंगभावाचा विचार करत असताना लिंगभावावर आधारित श्रमविभाजन व लिंगभावात्मक श्रेणी पद्धतीचा विचार करणे गरजेचे असते. या उपर सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे लिंगभावसंबंधांमध्ये विहित असणाऱ्या सत्ता संबंधाकडे लक्ष देऊन त्याचे योग्य आकलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) लिंग हे ............. आहे.

अ) भौतिक ब) जैविक क) सांस्कृतिक ड) वरीलपैकी नाही

२) लिंगभाव ही संज्ञा ......... आहे.

अ) भौतिक ब) सामाजिक व सांस्कृतिक

क) जीवशास्त्रीय ड) वरीलपैकी नाही

३) ............. हितसंबंध हे स्त्रियांच्या दुय्यम स्थानाशी निगडित असतात.

अ) व्यूहात्मक ब) परिस्थितीजन्य क) जैविक ड) वरीलपैकी सर्व

४) .......... मार्फत लिंग भूमिकेचा विकास साधला जातो.

अ) सामाजिक आंतरक्रिया ब) नैसर्गिक परिस्थिती

क) आर्थिक परिस्थिती ड) वरील पैकी नाही

५) लिंगभाव नैसर्गिक नाही तो ........... आहे.

अ) सामाजिक सांस्कृतिक ब) आर्थिक

क) राजकीय ड) वरीलपैकी नाही

६) स्त्री-पुरुषांच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी विश्लेषणाचे साधन म्हणून ....... संकल्पना वापरली जाते,

अ) लिंगभाव ब) लिंग क) प्रतिके ड) वरीलपैकी नाही

७) लिंगभाव उतरंड याचा अर्थ ......... आहे.

अ) स्त्री-पुरुषांमधील भेद   ब) कोणत्याही एका लिंग समूहाचे प्रभुत्व असणे

क) स्त्रियांचे दुय्यमत्व   ड) वरीलपैकी नाही

८) समाजात कोणत्याही प्रकारचे श्रेष्ठत्त्व हे ......... लिंगाशी जोडले जाते.

अ) स्त्री   ब) पुरूष   क) स्त्री आणि पुरूष ड) वरीलपैकी नाही

९) स्त्रियांच्या स्थानांचे मूल्यमापन करण्यासाठी स्त्री-पुरुषांमधील ......... बघणे गरजेचे असते.

अ) सत्तासंबंध   ब) आर्थिक संबंध   क) राजकीय संबंधित ड) वरीलपैकी नाही

१०) व्यवहारिक लिंगभाव गरजा या ............ शी संबंधित असतात.

अ) लिंगभावावर आधारित श्रमविभागणीशी   ब) राजकारणाशी

क) आर्थिक घडामोडीशी   ड) स्त्रियांच्या संस्कृतीशी

११) व्यूहात्मक लिंगभाव हितसंबंध हे स्त्रियांच्या ............ स्थानाशी संबंधित असतात.

अ) प्रतिष्ठेच्या   ब) दुय्यम   क) समानतेच्या   ड) वरीलपैकी नाही

ब) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | लिंग | अ | स्त्रियांच्या सामाजिक दुय्यमत्वाची संबंधित असतो. |
| २ | लिंगभाव | ब | स्त्रियांच्या लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीशी संबंधित असतात. |
| ३ | व्यूहात्मक लिंगभाव | क | सांस्कृतिक सामाजिक |
| ४ | व्यवहारिक लिंगभाव गरजा | ड | जैविक |

अ) १-ड,   २-क ,   ३-अ ,   ४-ब

ब) १-अ.   २-क,   ३- ड,   ४- ब

क) १- क,   २- अ,   ३- ब   ४- ड

ड) १-ब,   २-ड,   ३-क,   ४-अ

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ - सामान्यपणे सत्ता, स्वायत्तता व सार्वजनिक जीवन हे विशेषणे पुरूषत्वाशी संबंधित असतात.

विधान २- दुर्बलता, भावनाप्रधानता व खाजगी जीवन ही विशेषणे स्त्रीत्वाशी संबंधित असतात.

अ) दोन्ही विधाने बरोबर

ब) पहिले चूक दूसरे बरोबर

क) पहिले बरोबर दुसरे चुक

ड) दोन्ही विधाने चूक

विधान १- घरातील सर्व सदस्यांना समान प्रमाणात संसाधने सेवा आणि संधी उपलब्ध नसतात.

विधान २ - समाजातील संसाधने निर्णय क्षमता इ. बाबत सत्ता, अधिकार आणि नियंत्रणाचे विषम वाटप झालेले असते.

अ) दोन्ही विधाने बरोबर

ब) पहिले चूक दूसरे बरोबर

क) पहिले बरोबर दुसरे चुक

ड) दोन्ही विधाने चूक

### २.२.२ श्रमाची लैंगिक विभागणी

लिंगभावाचा अभ्यास करताना लिंगभाव आधारित श्रम विभाजनाची चिकित्सा करणे व त्यात बदल करणे गरजेचे आहे. पितृसत्ताक सामाजिक रचनेतून स्त्रियांचा विचार केला तर श्रमाच्या क्षेत्रातही त्यांच्या वाट्याला दुय्यमत्व येते. स्त्री आणि पुरूष यांच्या कामाचे वाटप लिंगभाव विभाजनावर आधारित आहे. पुरुषांच्या तुलनेने त्यांच्या बरोबरीने किंवा अधिक काम करूनही स्त्री कामगारांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. या व्यवस्थेत स्त्री कामगारांना औद्योगिक क्षेत्रात दडपशाही किंवा शोषणाला सामोरे जावे लागते. तर कौटुंबिक जबाबदारी स्त्रिया पार पाडत असल्या तरी ते काम विनावेतन स्वरूपात असून त्याची दखल राष्ट्रीय उत्पन्नात घेतली जात नाही.

श्रमाच्या लैंगिक विभागणीवर अलीकडच्या काळात बोलले व लिहिले जाऊ लागले आहे. श्रमाच्या लैंगिक विभाजनाचे स्वरूप व परिणाम यावर चर्चा केली जाऊ लागली व स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाला श्रमाचे लैंगिक विभाजन कारणीभूत ठरवले गेले. यासंबंधीची सैद्धांतिक मांडणी होऊ लागली. स्त्रीवादी अभ्यासकांना वाटते की, श्रमाची लैंगिक विभाजनाचा पाया समजून घेतल्याशिवाय स्त्रीमुक्त होऊ शकत नाही. श्रमाची लैंगिक विभागणी ही स्त्री-पुरुषांच्या जैविक आधारावर केली आहे. स्त्रिया या घरात राहतात मुलांना जन्म

देतात त्यांचे पालन पोषण करतात व घरातील सर्व कामे करतात. उलटपक्षी पुरूष हा त्याच्या जीवशास्त्राचा एक भाग म्हणून कठीण व श्रमाची कामे स्वीकारतो. हे पारंपारिक चित्र श्रमविभागणी संदर्भात लक्षात घेतले जाते.

लिंगभाव आधारित श्रमाच्या विभागणीमुळे विषमतेची आणि श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची उतरंड निर्माण होते. कारण स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या कामाचे समान मूल्यमापन केले जात नाही. तसेच त्यांना दिला जाणारा मोबदलाही समान नसतो. आजही अनेक देशांमध्ये समान कामासाठी समान वेतन या तत्वाचा अंगीकार केलेला दिसत नाही. घरकाम हे विना मोबदला वेतनरहित असते. तसेच आर्थिक मंदीच्या कालखंडामध्ये पहिल्यांदा स्त्री कामगारांना घरचा रस्ता दाखवला जातो. स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाला कारणीभूत ठरणाऱ्या या घटकाकडे अभ्यासकांचे लक्ष अलीकडच्या काळात वळले आहे.

**श्रमाच्या लैंगिक विभागणीचा अर्थ**

श्रमाची लैंगिक विभागणी म्हणजे पुरूष आणि महिलांमध्ये त्यांच्या लिंगानुसार कामाची विभागणी केली जाते. व्यक्तीला काम सोपवताना किंवा कामाचे विभाजन करताना त्याच्या क्षमतेचा विचार न करता फक्त लिंग विचारात घेतले जाते.

सर्वसाधारणपणे, घरातील सर्व बिनपगारी काम स्त्रियांना सोपवले जाते आणि पुरुषांनी कामासाठी बाहेर जाऊन कुटुंबासाठी पैसे कमवावेत. पुरुषांना घरकाम करता येत नाही असे नाही, पण या गोष्टींकडे लक्ष देणे हे महिलांचे काम आहे असे मानले जाते.

**लैंगिक श्रमविभागणीचा जीवशास्त्रीय दृष्टिकोन** (Biological Approach)

लिंगभाव आधारित श्रम विभाजनाला नैसर्गिक मानले जाते. लिओनेल टायगर (Leonel Tiger) व रॉबिन फॉक्स (Robin Fox) यांनी त्यांचे पुस्तक 'द इम्पेरिअल ॲनिमल' (The Imperial Animal) मध्ये श्रमाच्या लैंगिक विभागणीच्या संदर्भात जैविक सिद्धांत मांडला आहे. त्यानुसार टायगर व फॉक्स हे असा युक्तिवाद करतात की पुरूष आणि स्त्रिया यांच्यामध्ये जनुकीय (अनुवांशिक) आधारावर जैविक रचना (Biogrammer) तयार केलेल्या असतात. त्यामुळे पुरूष व स्त्रिया त्यास अनुसरून ठराविक व विशिष्ट प्रकारची कामे करण्याची क्षमता त्याच्या अंगी असते. ही नर व मादीची जैविक रचना पूर्णपणे अपरिवर्तनीय नसून त्यात होणारे बदल खूपच हळूहळू होत असतात. टायगर व फॉक्सच्या मते, स्त्री-पुरुषांच्या अशा भूमिकेत एकाएकी बदल घडून आणणे हे अनैसर्गिक प्रयत्न होतील. टायगर व फॉक्सच्या मते हे बायोग्रामर्स पुरुषांना आक्रमक व वर्चस्ववादी बनवतात. त्यामुळे तेथे भौतिक शक्ती जास्त लागणारी कामे जसे की पूर्वीच्या काळी शिकार करणे या कामांसाठी उपयुक्त असत. तर स्त्रियांना मुले जन्माला घालण्याचे व त्यांचे संगोपन करण्यासाठी.

स्त्रियांच्या शारीरिकतेवर आधारित लिंगभाव संबंध आणि लिंगभाव आधारित श्रम विभाजन नैसर्गिक असते यावर लोक विश्वास ठेवतात. त्यामुळे शरीराच्या पुढे जाऊन विचार करणे या लोकांना अवघड जाते.

प्रत्येक गोष्ट नैसर्गिक आहे हे म्हणणे अतिशय सोयीचे असते. कारण त्यामुळे पितृसत्ताक विशेष अधिकारासंबंधी प्रश्न विचारण्याचा किंवा आव्हान देण्याचा प्रश्नच उरत नाही. त्यामुळे स्त्री-पुरुषांमधील समानता प्रस्थापित करणाऱ्या सर्व प्रकारच्या समान वाटपाच्या सर्व जबाबदाऱ्यांतून हात झटकता येतात.

**लैंगिक श्रमविभागणीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन** (Sociological Approach)

समाजशास्त्रज्ञ ॲन ओकले (Ann Oakley) यांनी आपल्या 'सेक्स, जेंडर अँड सोसायटी' (Sex, Gender and Society) या १९७२ मध्ये प्रकाशित ग्रंथांमध्ये लिओनेल टायगर व रॉबिन फॉक्स यांचा श्रमाच्या लैंगिक विभाजनाचा जैविक सिद्धांत खोडून काढला. ॲन ओकले यांच्या मते, लिंग हे नैसर्गिक आहे तर लिंगभाव हा मात्र सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाचा आहे. ओकले यांच्या मते, लिंग ही संकल्पना नर व मादी या जैविक विभाजनाशी निगडित आहे. त्यांच्या मते, लिंगभाव किंवा जेंडर ही सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाची निर्मिती आहे. संस्कृती ही व्यक्तीची लिंगभावाच्या संबंधित ओळख निर्माण करते. कुटुंबासाठी गृहिणी व आईची भूमिका ही परुषसत्ताक व्यवस्थेमधून निर्माण केलेली आहे. ती पुरुषांच्या सोयीची आहे. आईची भूमिका ही स्त्रियांना व्यावसायिक श्रमापासून दूर ठेवत नाही तर संस्कृतीने रचलेली आई तिला अशा प्रकारच्या श्रमापासून दूर नेते.

सार्वजनिक कार्यालयात व वरिष्ठ व्यवस्थापकीय पदावर स्त्रिया न दिसण्याचे कारण घरात त्यांना पूर्ण वेळ कार्यालयीन कामापेक्षाही अधिक वेळ घरकाम करावे लागते, हेच आहे. स्त्रियांच्या गृहिणी आणि माता या भूमिका त्यांना वैतनिक रोजगाराच्या ठिकाणी दुय्यम स्थान स्वीकारण्यास भाग पाडतात.

**स्त्रियांची उत्पादकता व श्रम शक्तीवर पुरुषांचे नियंत्रण**

अर्थशास्त्राचा प्राथमिक नियम सांगतो की, उत्पादनाच्या चार महत्त्वाच्या घटकांपैकी श्रम हा एक घटक आहे. आताची बाजार व्यवस्था पुरुषसत्ताक आहे. मध्ययुगीन सामंतशाही ही पुरुषसत्ताक होती. पण आदिम समाज मातृसत्ताक होता, अशी मांडणी मार्क्सवादाने केली आहे.

फ्रेड्रिक एंगल्सने (Friedrich Engels) अतिशय स्पष्ट म्हटले आहे की, 'खाजगी संपत्तीच वर्ग आणि लिंगभाव विषमता यांना जन्म देते असते. स्त्रियांच्या प्रजननावरील व लैंगिकतेवरील पुरुषांच्या नियंत्रणास एंगल्स 'मातेच्या अधिकाराची जागतिक ऐतिहासिक हार' असे संबोधतो. तसेच बुर्ज्वा (Bourgeoise) स्त्रियांची स्थिती कामगार वर्गीय स्त्रियांपेक्षा अधिक वाईट आहे कारण बुर्ज्वा वर्गातील स्त्री स्वत:च संपत्ती असते व तिचे स्थान व कार्य वारसांची गर्भधारण करून त्याला जन्म देणे एवढ्या पुरती सीमित असते.

पितृसत्ताक व्यवस्था व आर्थिक संरचना या एकमेकांवर कायम परिणाम करत असतात व स्वतःचे अस्तित्व कायम करत असतात. फ्रेड्रिक एंगल्स याने 'द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट' (The Origin of the Family Private Property and the State) हा ग्रंथ १८८४ मध्ये लिहिला. या ग्रंथात त्याने स्त्रियांच्या दुय्यमत्वाची चर्चा केली आहे. गेल ऑमव्हेट (Gail Omveats) यांनी कार्ल मार्क्स व एंगल्स यांच्या स्त्री विषय विचारांची चिकित्सा केली. गेल ऑमव्हेट यांनी मार्क्सच्या 'दास

कॅपिटल' या ग्रंथात श्रमशक्तीच्या उत्पादनाचे विश्लेषण पितृसत्ताक कुटुंब पद्धतीला गृहीत धरून केले आहे. त्यात कुटुंबात पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांची दडपणूक कशी करते हा स्त्रियांच्या दडपणुकीचा प्रश्न वगळला आहे. तसेच, एंगल्सच्या मांडणीचे विश्लेषण करताना गेल म्हणतात, 'एंगल्सने म्हटल्याप्रमाणे कुटुंब रचनेत स्त्रियांचे शोषण केवळ 'दुय्यम लैंगिक वर्ग' नसून कुटुंब संस्थेतील स्त्रियांची शोषण व्यवस्था ही उत्पादन व्यवस्थेशी निगडित आहे. कुटुंबातील पुरुषप्रधानता अर्थवादाशी निगडित असल्याने एंगल्सचा सकल अर्थवादी विचार कालौघात मार्क्सवादी कार्यकर्ते व लेखकांनी लक्षात घेतला आणि एंगल्सचे स्त्री-पुरूष व कुटुंबातील नातेसंबंध दुर्लक्षित केले. त्यामुळे त्यांच्या या विचारांचा विस्तार त्यांच्या मृत्यूपश्चात मार्क्सवादी कार्यकर्ते व लेखकांनी केला नाही, असा आरोप गेल करतात. थोडक्यात, मार्क्सने स्त्रियांच्या दडपणूकीची फक्त आर्थिक बाजूचा विचार केला. त्याने पितृसत्तेचा विचार गृहीत धरला नाही. तर एंगल्सने मांडलेले स्त्री-पुरूष संबंध व कुटुंबातील नातेसंबंधांचा विचार त्यांच्या अनुयायांनी केला नाही.

पुरूष स्त्रियांच्या घरातील व घराबाहेरील श्रमावर/ उत्पादकतेवर नियंत्रण ठेवतात. स्त्री घरामध्ये नवरा, मुले व अन्य कुटुंबिय यांना आयुष्यभर विविध सेवा पुरवत असते. स्त्रीवादी लेखिका सिल्व्हिया वालबे (Silvia Walby) स्त्रियांच्या या सेवांना पितृसत्ता उत्पादनपद्धती असे म्हणतात. या पद्धतीत घरातील कर्ता पुरूष व अन्य सभासद स्त्रियांच्या कामाचा मालकी हक्क काढून घेतात व तिला गृहिणी वर्गात ढकलतात. तिच्यावर व तिच्या कामावर पुरुषांचा मालकी हक्क प्राप्त होतो. मुलांना जन्म देणे हे नैसर्गिक काम आहे. पण गृहिणीने केलेले घरातील काम हे मुळीच विचारात घेतले जात नाही. ते नैसर्गिक नाही व ते स्त्री-पुरूष दोघेही करू शकतात. या प्रक्रियेत त्या नवऱ्यावर पूर्णपणे अवलंबून राहणाऱ्या बनतात.

पुरुषांचे स्त्रीवर जे अधिकार असतात त्याचा संबंध फक्त तिची लैंगिकता आणि प्रजोत्पादनाची क्षमता एवढ्यापुरतेच मर्यादित नसतात, तर तिची उत्पादन क्षमता आणि श्रमशक्ती या गोष्टीतही त्या गृहित धरल्या जातात. तिच्या लैंगिकतेवर आणि त्यातून निर्माण होणाऱ्या पैदाशीवर ताबा ठेवायचा अधिकार असतो तसाच तिचे श्रम आणि त्या श्रमातून होणारे उत्पादन यावरही पुरुषांचा ताबा असतो. उत्पादनाच्या प्रक्रियेत तिचा सहभाग, प्रत्यक्ष वाटा किती प्रमाणात असतो, यावर तिच्या वाट्याचे मूल्य ठरत नाही. कारण उत्पादित सामग्रीचा व साधनांचा विचार करता ती त्यावर अवलंबित किंवा आश्रित ठरते. आणि कुटुंबामध्ये श्रमिक आणि मोलकरीण म्हणून काम करते. पुरूष निवारा व पोटापुरते अन्न पुरवणारा असतो.

स्त्रियांच्या घराबाहेरील कामावरही पुरुषांचे नियंत्रण असते. पुरूष स्त्रियांना त्यांच्या श्रमाची विक्री करण्यास भाग पाडतात. किंवा ते स्त्रियांना काम करण्यास प्रतिबंध करू शकतात. स्त्रियांच्या श्रमावरील नियंत्रणातून पितृसत्तेमध्ये घरातील पुरुषांना भौतिक फायदा मिळत असतो. नवऱ्याला धनी किंवा मालक अशी भाषा वापरली जाते ती या अर्थाने.

**स्त्रियांच्या श्रमशक्तीचे मूल्य**

१९६०च्या दशकात अखेरीस घरकाम, जननक्रिया, बालसंगोपन हे कुटुंबा अंतर्गत असणारे स्त्रीभिमुख कार्य स्त्रीवादी लेखक व संघटना यांनी पुढे आणले व या कामांना श्रमिक व श्रमाच्या किंमतीशी जोडले गेले

पाहिजे, तसेच, त्यास उत्पादन प्रक्रियेचा भांडवलशाहीतील एक भाग संबोधले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. मात्र हे स्त्रीवादी विचार मार्क्सवादातील आर्थिक वर्ग विग्रहाच्या जागी लैंगिक वर्ग विग्रह विश्लेषण करून सामाजिक सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न करतात. स्त्रियांचे श्रम हा विषय साधा वाटत असला तरी गुंतागुंतीचा आहे.

आपल्या समाजात स्त्रिया अनेक प्रकारचे श्रम करतात. त्या अंगमेहनतीने श्रम करतात. बौद्धिक श्रम करतात. कला निर्मितीचे श्रम करतात. घरगुती श्रम करतात. मुलांना जन्म देऊन त्यांना वाढवण्याचे श्रम करतात. आपले शरीर विकून पुरुषांच्या लैंगिक गरजा पुरवण्याचे श्रम करतात. एकूण पाहता आपण असे म्हणू शकतो की, स्त्रिया करतात त्या सर्व प्रकारच्या श्रमाला समाजाच्या दृष्टिकोनातून कमीच मूल्य आहे. कारण स्त्रियांनी कोणते काम करावे, कसे करावे, कधी करावे हे सर्व पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेच्या चौकटीत ठरते.

स्त्री व पुरूष समान कामे करीत असताना देखील कित्येक राज्यात वेतन ठरवणारी यंत्रणा ही स्त्री पुरुषांच्या वेतनात फरक करते. आणि स्त्रिया परंपरेने करीत असलेल्या कामाचा कमी वेतन दर ठरवून देते. वेतन दर कमी असल्याचे दुसरे एक कारण म्हणजे घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून कामावर येण्यास जर स्त्रीला अर्धा तास उशीर झाला तरी तिला अर्ध्या दिवसाचे वेतन दिले जात नाही. महिला शेतमजुराचे वेतन दर कमी असण्यास काही घटक जबाबदार आहेत. त्यात असंघटित स्वरुपाचा रोजगार वेतन देऊन बाहेरून मजूर आणण्याऐवजी कुटुंबातील सभासदांना त्यांच्या जागी सहज लावण्याची शक्यता, कामाचे हंगामी स्वरूप इत्यादी आहेत. कौटुंबिक जबाबदारी तसेच सामाजिक व मानसिक बंधने ही ऐच्छिक कारणे स्त्रियांच्या हालचालीवर निर्बंध आणीत असली तरी त्यांच्या पतीची व मुलांची जबाबदारी व त्यांच्याप्रती असलेले प्रेम हे स्त्रियांना त्यांच्या इच्छेविरूद्ध दूर कामासाठी न जाण्यास भाग पाडतात. अगदी थोड्या मजुरीवर आणि हंगामा पुरती अत्यंत हलकी कामे त्यांच्या वाट्याला येतात. अनेक वेळा दारिद्र्यामुळे, आर्थिक अडचणीमुळे त्यांना ही  कामे करावी लागतात.

**स्त्रियांनी केलेले काम हे काम म्हणून मानले न जाता एक नैसर्गिक कार्य म्हणून गणले जाणे**

पितृसत्ताक कुटुंबात भारतीय समाजातील पुरूष हे उत्पादन करणाऱ्या शेतीविषयक कार्यक्रमात गुंतवले होते व विशेषतः वरच्या जातीतील स्त्रिया घरी राहून कुटुंबाची काळजी घेत होत्या व घरगुती जबाबदाऱ्या उचलत होत्या. म्हणून स्त्रियांनी केलेले काम हे काम म्हणून मानले न जाता एक नैसर्गिक कार्य म्हणून गणले जाते. व पुरूष जे काम करतात त्याला काम म्हणून मानले जाते. कारण पुरुषांचे काम हे उत्पादनक्षम होते, श्रमाची लैंगिक विभाजन ही संकल्पना ही स्त्रियांचे काम हे त्यांच्या जैविकतेचा  एक भाग व पुरुषांचे काम हे उत्पादनक्षम असे वर्गीकरण करते. म्हणून त्याला काम म्हणून किंमत आहे. भांडवलशाहीमध्ये कामाची संकल्पना ही फक्त पुरूष प्रवृत्तीसाठी वापरली जाते. भांडवलशाहीमध्ये स्त्रियांची वैशिष्ट्यपूर्ण रीतीने गृहिणी म्हणून व्याख्या केली आहे, म्हणजे कामगार म्हणून नाही. गृहिणी ही संकल्पना स्त्रीच्या नैसर्गिक कामाशी जोडली आहे. म्हणून तिचे काम हे काम समजले जात नाही. पुरुषांची कामे ही खरोखर मानवी म्हणजे

उत्पादनक्षम, सुसंगत, नियोजनबद्ध निर्मिती करणारी, जाणीवपूर्वक केलेली असतात. स्त्रियांचे कामे हे त्यांच्या जैविक क्षमतेनुसार, शरीरचनेनुसार निश्चित केलेली असतात, असा समज आहे. स्त्रियांचे काम हे उत्पादनक्षम म्हणून मानले जात नाही व म्हणून त्यांचे अवमूल्यन केले जाते. अशा कामाला मूल्य दिले जात नाही. अशा पद्धतीचे असमान श्रमविभाजन हे पुरुषांचे स्त्रियांवर वर्चस्व व त्यांच्या शोषणाला कारणीभूत होते. हे श्रमविभाजन स्त्रियांना पुरुषांवर अवलंबून राहण्यास भाग पाडते.

**घराबाहेरील काम**

घराबाहेरच्या कामावरही पुरुषांचे नियंत्रण असते. पुरूष स्त्रियांना त्यांच्या श्रमाची विक्री करण्यास भाग पडतात किंवा स्त्रियांना काम करण्यास प्रतिबंध करू शकतात.

औद्योगिकरण, जागतिकीकरण व खाजगीकरणामुळे तसेच बाजार यंत्रणेच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्रियांच्या कामाच्या स्वरूपात काही बदल होत आहेत. स्त्रियांना विविध क्षेत्रात कामाच्या संधी निर्माण झाल्या आहेत. विविध क्षेत्रात त्या काम करत आहेत. घरकाम व घराबाहेरचे काम एकाच वेळी त्यांना करावे लागल्यामुळे दुप्पट कामाचा बोजा त्यांच्यावर पडत आहे. मोठ्या प्रमाणात स्त्रिया असंघटित क्षेत्रात ओढल्या जातात. त्यांना कमी पगाराच्या नोकऱ्या कराव्या लागतात. तसेच घरगुती कामे व्यावसायिक स्तरावर करतात. त्याला आपण घर आधारित उत्पादन, होम बेस्ड प्रॉडक्शन असे म्हणू शकतो, जी एक पिळवणूक करणारी पद्धती आहे. स्त्रियांना घराबाहेर काम करणे सहज शक्य व्हावे म्हणून त्यांच्या घरातील कामापासून त्यांना सुटका मिळणे आवश्यक आहे. पाळणाघर, कॅन्टीन, आरोग्य केंद्र चालवणे ही सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारली गेली पाहिजे.

शारीरिक मेहनत करण्यात स्त्रियांची कुवत पुरुषांपेक्षा कमी आहे, असे म्हटले जाते. हा समजच श्रमाच्या लैंगिक विभाजनाच्या मुळाशी आहे. स्त्रियांच्या अनेक प्रकारच्या श्रमाला समाजाकडून योग्य मूल्य दिले जात नाही. स्त्रियांच्या श्रमाचा जेवढा फायदा समाजाला, त्याच्या कामावरील मालकाला, त्याच्या कुटुंबातील पुरुषांना, बाकी लोकांनाही मिळतो त्याच्या बदल्यात स्त्रियांना फार कमी उत्पन्न मिळते.

शेतीमध्ये स्त्रिया आणि पुरूष काही प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारची कामे करतात. पण स्त्रिया जी कामे करतात ती खरेच कमी महत्त्वाचे असतात का? औद्योगिक क्षेत्रात तर माणसाच्या श्रमाबरोबर यंत्राची शक्ती जोडली जाते त्यामुळे स्त्री आणि पुरूष यांच्या काम करण्याच्या कुवतीत फारसा फरक राहिलेला नाही. युरोपमध्ये पहिल्या महायुद्धाच्या काळात स्त्रियांनीच कारखानदारी चालू ठेवली. मात्र युद्ध संपल्यावर पुरूष पुन्हा आपल्या जागेवर काम करू लागले. आणि एवढेच नव्हे तर स्त्रियांना ही कामे कशी झेपणार नाहीत याविषयी पुन्हा आधीच्याच थाटात बोलू लागले.

बौद्धिक श्रम करण्यास स्त्रिया पुरुषांपेक्षा मुळीच मागे नाहीत. पण त्यांना उच्च पदावर किंवा जबाबदारीच्या जागेवर पुरुषांपेक्षा फार कमी संधी मिळते. एखादी स्त्री कितीही हुशार सुशिक्षित असो, पात्र असो तिला तिच्या नोकरीशिवाय किंवा व्यवसायाशिवाय घरची जबाबदारी घ्यावी लागते. परिणामी स्त्रियांचे सरासरी उत्पन्न सर्व स्तरांमध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी असते. ही वस्तुस्थिती फक्त भारतात नाही तर जगातील

सर्व विकसित देशांमध्ये आहे. स्त्रिया घरातील जबाबदाऱ्या सांभाळतात म्हणून त्यांना पूर्णवेळ काम करणे शक्य होत नाही. त्या असंघटित क्षेत्रात काम करतात. विड्या वळणे, कपड्याला बटन लावणे, पापड लाटणे या सर्व कामाचा मोबदल्या अत्यल्प असतो. शिवाय कामाच्या ठिकाणी कोणत्याही सोयी नाहीत. कामाची शाश्वती नाही. स्त्रिया मिळेल ते काम करायला तयार असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचे उत्पन्न देखील बहुतांशी त्यांच्या कुटुंबातील  पुरूष व मुलांवर खर्च केले जाते.

**घरकाम**

घरगुती कामाला पगार नसतो. सुट्ट्या नसतात. कामाची काही आखणी किंवा मर्यादा नसतात. हे श्रम बाजारात विकले जात नाहीत. म्हणून राष्ट्रीय उत्पादनातही ते मोजले जात नाहीत. स्त्रीला या कामातून सुटका नसते. सामान्यत: या कामात पुरूष फारसा हातभार लावत नाहीत. मुलाला जन्म घालणे, त्याचे पालनपोषण करणे, घरातील लोकांची सेवा करणे, घराची स्वच्छता, रांधा, वाढा, उष्टी काढा अशा पद्धतीची कामे सर्व स्तरातील स्त्रियांना करावी लागतात. या कामाच्या ओझ्याखाली असल्याने त्यांना घराबाहेरील काम करण्यास आवड निर्माण होत नाही व समाजही तशा संधी निर्माण करत नाही. संस्कृतीमध्येही अशा कामाचा गौरव कुठे होताना दिसत नाही परिणामी स्त्रिया घराच्या कामामध्ये गुंतून पडतात. पण दारिद्र्य, गरीबी यात स्त्रिया मोठ्या प्रमाणात भरडल्या जातात. दारिद्र्याची झळ तिला बसते. उदा. स्वस्तात घेतलेले धान्य निवडायला जास्त वेळ द्यावा लागतो. दारिद्र्यामुळे मूलभूत सार्वजनिक सोयींचा अभाव असतो. पाणी आणि इंधन आणण्यात स्त्रीचे अनेक तास व श्रम खर्च होतात. ती ग्रामीण भागातील दूरच्या विहिरीवर पाणी आणणारी, सरपण गोळा करणारी असो किंवा नळावर आणि घासलेटच्या रांगेत नंबर लावणारी शहरातील असो, तिच्या कामाला अंत नसतो. तसेच, या कामाचे मूल्यही नसते. पिण्याचे पाणी स्वच्छ नसते म्हणून घरातील सदस्य आजारी पडतात. त्याचे आजारपण काढण्यात तिचे आणखीन श्रम खर्च होतात. यात स्त्रियांना स्वतःच्या प्रकृतीकडे पाहायला वेळ मिळत नाही. ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा उपलब्ध नसतात. स्त्रियांना कामाची अत्यंत गरज असल्यामुळे त्यांची अडवणूक करून त्यांना कमी पगार दिला जातो.

**स्त्रियांच्या लैंगिक विभाजनाच्या अभ्यासाचे महत्त्व**

जोपर्यंत सामाजिक संपत्तीच्या उत्पादनामध्ये स्त्रिया भाग घेत नाहीत व त्यांचे सर्व श्रम घरगुती कामासाठी खर्ची पडत आहेत, तोपर्यंत स्त्रियांचे दास्यविमोचन होणे अगर त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मिळणे अशक्य आहे. ज्या वेळी मोठ्या प्रमाणावरील सामाजिक उत्पादनामध्ये स्त्रिया भाग घेऊ लागतील आणि घरगुती कामासाठी त्यांना अगदी थोडा वेळ खर्च होईल त्याच वेळी त्यांचे दास्यविमोचन होईल आणि ही गोष्ट आजच्या आधुनिक यांत्रिक उत्पादन पद्धतीमध्ये शक्य आहे. कारण त्या उद्योग-धंद्यात काम करायला स्त्रियांना वाव आहे. इतकेच नव्हे तर त्यांच्या कामाला मागणीही निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे ह्या उद्योग-धंद्यात घरगुती कामाचे सार्वजनिक उद्योग-धंद्यात रूपांतर होत आहे, याची ओळख झाल्याने इतिहासामध्ये स्त्रियांच्या कार्याची योग्य दखल घेणे शक्य होईल.

श्रमाचे लैंगिक विभाजन ही संकल्पना  स्त्रियांचे काम हे त्यांच्या जीवशास्त्राचा एक भाग व पुरुषांचे काम हे उत्पादनक्षम असे वर्गीकरण करते व म्हणून त्याला काम म्हणून किंमत आहे. स्त्रियांचे काम हे त्यांच्या नैसर्गिक रचनेनुसार निश्चित केलेले म्हणून त्यांच्या कामाकडे बघितले जाते या जाणिवेने इतिहासाकडे बघता येईल.

पुरुषांचे काम हे समाजातील उत्पादनाला योगदान देतात. स्त्रियांचे कामे उत्पादनक्षम असे मानले जात नाही व म्हणून त्याचे अवमूल्यन केले जाते. अशा पद्धतीचे श्रम विभाजन हे पुरुषांचे स्त्रियांवर वर्चस्व व त्याच्या शोषणाला कारणीभूत आहे. हेस श्रम विभाजन स्त्रियांना पुरुषांवर अवलंबून राहण्यास भाग पाडते याची जाण होईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांच्या श्रमाचे लैंगिक विभाजन हे फक्त कुटुंबाशी संबंधित न पाहता संपूर्ण समाजाची रचनात्मक समस्या म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. कुटुंब संस्थेतच नव्हे तर समाजातील सर्व प्रकारच्या संरचनेमध्ये स्त्रियांच्या श्रमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पारंपारिक राहिला आहे. हा दृष्टिकोन इतिहासामध्ये स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित करतो. या दृष्टिकोनाची ओळख इतिहास अभ्यासकास व इतिहासकारास असणे आवश्यक आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न २**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) श्रमाचे लैंगिक विभाजन हे स्त्री-पुरुषांच्या ........... आधारावर केले जाते.

अ) भौतिक ब) आर्थिक क) जैविक ड) वरील पैकी नाही

२) श्रमाच्या .......... विभाजनाचा पाया समजून घेतल्याशिवाय स्त्री मुक्त होऊ शकत नाही.

अ) जैविक ब) लैंगिक क) भौतिक ड) वरील पैकी नाही

३) लैंगिक श्रमविभागणीच्या जीवशास्त्रीय दृष्टिकोनात लिंग आधारित श्रमविभागणीला .......... मानले जाते.

अ) नैसर्गिक ब) आर्थिक क) बरोबर ड) वरील सर्व

४) लिओनेल टायगर व रॉबिन फॉक्स यांनी ........... ग्रंथ लिहिला.

अ) द इम्पेरिअल ॲनिमल ब) हंटिंग सोसायटी

क) द सेकंड शिप्ट ड) द फ्यूचर ऑफ मॅरेजेस

५) 'खाजगी संपत्तीच वर्ग व लिंगभाव यांना जन्म देते' असे .................. याने म्हटले आहे.

अ) हेगेल ब) कार्ल मार्क्स क) एगांल्स ड) वरील पैकी नाही.

६) ॲन ओकले यांनी ........ हा ग्रंथ लिहिला.

अ) द इम्पेरिअल ॲनिमल ब) सेक्स जेंडर ॲड सोसायटी

क) द सेकंड शिप्ट ड) द फ्यूचर ऑफ मॅरेजेस

७) एंगल्सने .............. संपत्ती वर्ग व लिंगभाव विषमता यांना जन्म देते असे म्हटले आहे.

अ) सार्वजनिक ब) सामयिक क) खाजगी ड) वरील पैकी सर्व

८) स्त्रियांच्या ............... पुरूषाच्या नियंत्रणास एंगल्स 'मातेच्या अधिकाराची जागतिक ऐतिहासिक हार' असे संबोधतो.

अ) प्रजनन व लैंगिकतेवरील ब) संपत्ती

क) सत्ता ड) वरील पैकी नाही.

९) .............. या लेखिकेने स्त्रियांच्या कुटुंबातील सेवांना 'पितृसत्ताक उत्पादन पद्धती' असे म्हटले आहे

अ) सिल्व्हिया वालबे ब) रॉबिन फॉक्स

क) ॲन ओकले ड) वरील पैकी नाही

१०) एंगल्स याने ............... हा ग्रंथ लिहिला.

अ) दास कॅपिटल ब) द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी ॲंड द स्टेट

क) द होली फॅमिली ड) वरील पैकी नाही.

ब) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | स्त्रीकेंद्रित | अ | अदृश्य असतात |
| २ | पुरूषकेंद्रित | ब | घरकाम |
| ३ | बाजारपेठांचा हिस्सा नसलेले काम | क | सार्वजनिक क्षेत्रे |
| ४ | स्त्रियांचे श्रम | ड | घर |

अ) १-ड , २-क , ३-ब , ४-अ

ब) १-अ. २-क, ३- ड, ४- ब

क) १- क, २- अ, ३- ब ४- ड

ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ - घरगुती कामाला पगार नसतो, सुट्ट्या नसतात आखणी आणि मर्यादा नसतात.

विधान २ - म्हणून राष्ट्रीय उत्पन्नात ते मोजले जाते.

अ) दोन्ही विधान बरोबर

ब) पहिले चूक दूसरे बरोबर

क) पहिले बरोबर दुसरे चुक

ड) दोन्ही विधाने चूक

## २.२.३ पितृसत्तेचे सामाजिक व सांस्कृतिक पैलू

आधुनिक स्त्रीवादी विचार प्रक्रियेमधील महत्त्वाची संकल्पना म्हणून पितृसत्तेचा विचार होतो. स्त्रीवादी चळवळ, स्त्री अभ्यास, स्त्रीवादी राजकारण या सर्वांना पुढे नेण्यासाठी पितृसत्तेचा विरोध करणे हा एकमेव कार्यक्रम असतो. लिंगभाव या संकल्पनेबरोबरच पितृसत्ता या संकल्पनेचा वापर स्त्रियांना रचनात्मक आणि विवाह व्यवस्थात्मक दुय्यमत्व देण्यासाठी केला जातो, असा स्त्रियांचा आक्षेप आहे. पितृसत्ता ही एक समाजामध्ये पुरुषांचे अधिकार व सत्ता याबाबतची संरचना स्पष्ट करणारी केवळ एक संज्ञा नसून त्याकडे एक विश्लेषणात्मक दृष्टीने बघणे आवश्यक आहे. पितृसत्तेचा उगम, पितृसत्ता म्हणजे काय? हे समजून घेताना पितृसत्तेचे विविध पैलू समजून घेणे आवश्यक आहे. ती का निर्माण झाली, ती टिकली कशी, व ती कशी टिकवली जाते? ही सत्ता कोणत्या प्रकारची आहे हे समजून घ्यावे लागेल. या पुरुषप्रधान व्यवस्थेचे स्वरूप आपल्याला व्यक्तिगत आणि सामूहिक अनुभवातून लक्षात येते. ही व्यवस्था नैसर्गिक नसून सामाजिक स्वरुपाची आहे. तिची सुरूवात कुटुंबापासून होते. या व्यवस्थेचे स्वरूप स्थल, काल, जात, वर्ग यांच्यानुसार बदलते. पुरुषप्रधान व्यवस्था ही केवळ खाजगी जीवनात किंवा कुटुंबांतर्गत असते असे नाही तर ही व्यवस्था समाजातील इतर सार्वजनिक संस्थांमधून देखील कार्यरत असते. धर्म संस्था, अर्थसत्ता, राज्यसंस्था, कायदा व्यवस्था यामध्ये देखील आपल्याला पुरुषप्रधान व्यवस्था दिसून येते.

**पितृसत्तेची संकल्पना**

"Patriarchy' या इंग्रजी शब्दासाठी 'पितृसत्ता' या शब्दाचा वापर केला जातो. पितृसत्ता या संज्ञेमधून ही 'त्याची सत्ता' हा अर्थ ध्वनीत होतो म्हणजे कुटुंबामध्ये चालणारी पित्याची सत्ता असा पितृसत्तेचा अर्थ होतो. पितृसत्ता ही सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या कार्यरत असणारी सत्तेची संरचना आहे. या संरचनेच्या आधारे स्त्रियांना दुय्यमत्व दिले जाते. भेदभाव, दुर्लक्ष, नियंत्रण, शोषण, हिंसा या स्वरूपात स्त्रियांवर कुटुंबात कामाच्या ठिकाणी व समाजात दुय्यमत्व लादले जाते.

पितृसत्ता ही वेगवेगळ्या माध्यमातून काम करते. पितृसत्ता ही स्वतंत्ररित्या काम न करता विविध सामाजिक, धार्मिक संरचनेसोबत काम करते. त्यामुळे त्यांचे अंतरसंबंध तपासावे लागतात. पितृसत्तेची मांडणी करताना बहुविध आणि एकमेकांत गुंतलेल्या पितृसत्ताक व्यवस्था आदिंचा अभ्यास करावा लागतो. समाजामध्ये वैतनिक श्रम, घरगुती उत्पादन, संस्कृती, लैंगिकता, हिंसा आणि राज्य या सहा पितृसत्ताक संरचना असून त्याद्वारे स्त्रियांवर नियंत्रण मिळून पुरुषी सत्ता दृढ करण्यात येते. या संरचना स्त्रियांना दुय्यम ठरवून त्यांचे शोषण करतात आणि स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचे सामान्यीकरण करून त्यांच्या दुय्यमत्त्वाचे समर्थन करतात. अजूनही बहुतांशी स्त्रिया विनावेतन श्रमाचा अविभाज्य भाग आहेत. २०१९ मध्ये राष्ट्रीय आकडेवारी विभागाने (नॅशनल स्टॅटिस्टिक्स डिपार्टमेंट) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारतात सुमारे ८०% महिला विनावेतन कामांमध्ये सहभागी आहेत. स्त्रियांच्या दुय्यमत्वाचे विविध पैलू आणि त्यांची व्यापकता समजून घेण्यासाठी पितृसत्ता ही महत्त्वाची संकल्पना आहे. पुरूष हे पितृसत्ता संरचनेचे प्राथमिक लाभार्थी आहेत आणि स्त्रियांच्या दुय्यमत्वातून पुरुषांचे वर्चस्व टिकून राहते.

कुटुंब हे सामाजिकीकरणाचे केंद्र मानले जाते. कुटुंबामध्ये मुलगा जेव्हा मोठा होतो तेव्हा कुटुंबातील स्त्रियांच्या रक्षणाची, उदरनिर्वाहाची आणि त्यांच्या मूलभूत गरजा पार पाडण्यासाठीची जबाबदारी त्याच्यावर असते. या जाणिवेतून त्यांची जडणघडण होते. तर मुलींची घडण होताना नेहमीच 'परक्याचे धन' असे शब्द तिच्या मनावर बिंबवण्यात येतात. स्त्रियांना कुटुंबात मिळणारी भिन्न वागणूक आणि सत्तासंबंध ही तिच्या दुय्यमत्वाला कारणीभूत असल्याची दिसून येतात. हे सत्तासंबंध पितृसत्ताक व्यवस्था पद्धतशीरपणे घडवत असते. धर्म, संस्कृती व समाज या समाजाच्या संस्था स्त्रियांच्या दुय्यमत्व घडवण्यामध्ये महत्त्वाचे योगदान देतात.

**पितृसत्तेची व्याख्या**

International Encyclopaedia of the Social Science मध्ये patriarchy ही संज्ञा लॅटिन pater (father) आणि arche (rule) या शब्दापासून तयार झालेले आहे. याचा अर्थ आहे वडीलांचे नियम rule of the father असा सांगितला आहे.

Patriarchy is a social system in which family system or entire societies are organized around the idea of father rule where males are primary authority figures. पितृसत्ता ही अशी सामाजिक व्यवस्था आहे ज्यात कुटुंब किंवा संपूर्ण समाजाचे पित्याच्या नियमाप्रमाणे संघटन झालेले असते. ज्यात पुरूष हे प्राथमिक अधिकाराच्या स्वरूपात असतात.

पितृसत्ता ही एक सामाजिक व्यवस्था आहे, ज्यामध्ये राजकीय नेतृत्व, नैतिक अधिकार आणि मालमत्तेचे नियंत्रण या क्षेत्रांमध्ये पुरूष हे प्राथमिक अधिकारी आहेत. समाजशास्त्रज्ञ सिल्व्हिया वालबे यांनी पितृसत्तेची व्याख्या ''सामाजिक संरचना आणि पद्धतीची एक प्रणाली आहे ज्यामध्ये पुरूष स्त्रियांवर वर्चस्व गाजवतात, अत्याचार करतात आणि शोषण करतात'' अशी केली आहे.

थोडक्यात, पितृसत्ता ही एक सामाजिक व्यवस्था आहे जिथे पुरूष बहुसंख्य सत्ता धारण करतात आणि राजकीय नेतृत्व, नैतिक अधिकार आणि मालमत्तेचे नियंत्रण यासारख्या भूमिकांमध्ये वर्चस्व गाजवतात.

**पितृसत्तेची सुरुवात/निर्मिती केव्हा व कशी झाली**

गेर्डा लर्नर (Gerda Lerner) पितृसत्तेच्या निर्मिती संबंधी त्यांच्या 'द क्रिएशन ऑफ पॅट्रियार्की' (The Creation of Patriarchy) या पुस्तकात म्हणतात की, 'पुरुषांप्रमाणे स्त्रिया देखील इतिहासाचा विषय व इतिहासाच्या कर्त्या होत्या. स्त्रियांनी पुरुषां इतकेच किंवा त्याहीपेक्षा अधिक योगदान दिले आहे. अलीकडच्या काळापर्यंत इतिहासकार हे पुरूष होते आणि त्यांनी केवळ पुरुषांनी केलेल्या घटनांची नोंद केली. इतिहासकारांनी पुरुषांच्या अनुभवाला महत्त्वाचे स्थान दिले. स्त्रियांनी जे अनुभवले आणि स्त्रियांना जे महत्त्वाचे वाटले त्यांच्या नोंदी झाल्या नाही. पुरुषांच्या अनुभवाला इतिहासकारांनी इतिहास मानले होते. पितृसत्तेची निर्मिती ही प्रत्यक्षरित्या आदिम राज्य संस्थेमधून झाली आहे. कारण आदिम राज्य संस्थेचा पितृसत्तेची संरचना व कुटुंब हाच महत्त्वाचा घटक होता. पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांच्या लैंगिकतेवर पुरुषांचे नियंत्रण आले. गेर्डा लर्नरच्या मांडणीनुसार हे स्पष्ट होती की, विविध सामाजिक व्यवस्थांमधील पितृसत्तेचा अभ्यास करून असा निष्कर्ष निघतो की, पितृसत्ताक व्यवस्थेला मूळ असा उगम नसून ही व्यवस्था प्रक्रियेतून विकसित होत गेलेली व्यवस्था आहे.'

**पुरुषप्रधान व्यवस्था : संरचना व प्रारूप**

पितृसत्ता ही एकसंघ आणि स्थिर अशी संरचना नाही. तर पितृसत्तेच्या कृतीमध्ये/वर्तनामध्ये विविधता दिसून येते. पितृसत्ता ही सामाजिक संरचना असून ती पुरुषांचे वर्चस्व आणि श्रेष्ठत्त्व या कल्पनेवर आधारित आहे. पुरूष हाच प्रभावशाली असतो त्यामुळे त्याची आवड-निवड, स्वातंत्र्य आणि मत हे नेहमीच विचारात घेतले जाते. दुसऱ्या बाजूला स्त्रिया कितीही संयमी, तार्किक विचार करणाऱ्या असल्या तरी समाजामध्ये त्यांना दुय्यम स्थान मिळते. त्यांना सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक स्थानानुसार कमी अधिक प्रमाणात लिंग आधारित शोषणाला व विषमतेला सामोरे जावे लागते. स्त्रियांवर पुरुषांचे व जात, धर्माचे वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी बालविवाह, विधवा विवाहास बंदी, सतीप्रथा, शारीरिक पावित्र्य आणि लैंगिकतेवर नियंत्रण, इत्यादी बाबी प्रमुखतः पितृसत्ताक समाजामध्ये स्त्रियांवर लादलेल्या दिसून येतात.

आज १९ व्या शतकातील प्रथा-परंपरा नामशेष झाल्या असल्या तरी आजही पितृप्रधान समाजव्यवस्था कार्यरत आहे. ही पुरुषसत्ताक व्यवस्थेची बदलत जाणारी रूपे आणि बदलणारी नियंत्रणाचे प्रकार पूर्णतः दुर्लक्षित होतात. स्त्री प्रश्नाचे ऐतिहासिक भान त्यामुळे हरपले. पुरुषसत्तेचे स्वरूप बदलत असले तरी सत्ता मात्र कायम टिकवली जाते. म्हणून ही सत्ता टिकवण्यासाठी सांस्कृतिक संरचना कशा कार्य करतात, याचा अभ्यास करावा लागणार आहे. उदा. पूर्वी स्त्रियांना घरातून बाहेर पडण्याची मुभा नव्हती. पण आता स्त्रिया घराबाहेर पडतात, शिक्षण घेतात. अर्थार्जन करतात पण त्यांनी किती शिकायचे, नोकरी करायची किंवा नाही, कुठे करायची इत्यादी निर्णय त्यांचे नसतात. त्या कमावत्या झाल्या म्हणून त्यांच्यावर असणारी जातीव्यवस्थेचे, कुटुंबाची बंधने कमी झालेली नसतात. तर या बंधनाचे स्वरूप वर-वर बदलते, पोशाख,

घराबाहेर जाण्याची असलेली मुभा ही पुरुषप्रधान व्यवस्था आधुनिक होत असल्याची लक्षणे व प्रतीक आहे. पण पुरुषप्रधान व्यवस्थेचा अंत झाला असे आपण म्हणू शकत नाही. तर आजच्या आर्थिक परिस्थितीची ती गरज आहे.

पुरुषप्रधान व्यवस्था ही नैसर्गिक नसून सामाजिक आहे. पुरुषप्रधानता या व्यवस्थांचे प्रारूप समजून घेताना कुटुंब व समाजाच्या व्यवहारात ती कसे काम करते याचा अभ्यास बारकाईने झाला पाहिजे. 'स्त्री जन्माला येत नाही ती घडवली जाते' हे फ्रेंच विचारवंत सिमोन द बुव्हाचे विधान प्रसिद्ध आहे. पितृसत्ता समाजात जन्माला आलेल्या स्त्रीचे स्त्रीत्व पुरुषप्रधान विचारमुल्यांद्वारे धर्म, कुटुंब, समाज अशा वेगवेगळ्या यंत्रणा घडवत असतात. स्त्रीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक स्थानिक शोषण यंत्रणाही कार्यरत असतात. त्या केवळ स्त्रीला घडवत नाहीत तर पुरुषालाही घडवतात आणि पुन्हा स्त्रीच्या माध्यमातून शोषण यंत्रणांचे पुनरुत्पादन करतात. काळानुरूप होणारे बदल पचवत शोषणाच्या विविध यंत्रणा व्यवस्था टिकून राहतात.

**पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था :**

जगात सर्वत्र पितृसत्ताक कुटुंब पद्धती प्रचलित आहे. या कुटुंब पद्धतीमध्ये सर्व सत्ता पुरुषांकडे असते. विवाहानंतर पत्नी पतीच्या घरी जाऊन राहते. त्यामुळे पत्नीला त्या कुटुंबाचे सदस्यत्व मिळते. तसेच तिला पतीच्या गोत्रातील एक सदस्य म्हणून मान्यता मिळते. यामध्ये वारसा हक्क मुलास मिळतो. कोणतेही आर्थिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रम असताना पतीला प्राधान्य दिले जाते. सर्व आर्थिक व्यवहार जास्त करून पुरूष पाहतात. पित्याच्या मृत्यूनंतर सर्व व्यवहार आपोआप मुलाकडे येतात. विवाहानंतर वधू वराच्या घरी जाते. कुटुंबामध्ये स्त्रीचा दर्जा दुय्यम असतो. तिचा दरारा असलाच तर सासू या नात्याने सुनेवर असतो. समाजातील लोकरूढीप्रमाणे या प्रकारच्या कुटुंब पद्धतीमध्ये स्त्री-पुरूष यांच्या कामाची वाटणी विषम पद्धतीने झालेली असते.

कुटुंबातील संबंध केवळ रक्ताचे आणि प्रेमाचे नसून ते सत्तेचे आणि अधिकाराचे देखील असतात. पितृसत्तेमध्ये पितृवंशकता, पुरूष कुटुंब प्रमुख, स्त्रियांवर नियंत्रण व दुय्यमत्व इत्यादी बाबी येतात. कुटुंबातील पित्याला सर्व अधिकार प्राप्त असतात. या अधिकाराचा पाया केवळ आर्थिक असतो असे नाही. कारण अनेक ठिकाणी पिता कमावणाराही नसतो तरीही त्याचे कुटुंबात वर्चस्व असते. हे वर्चस्व संस्कृतीने दिलेले असते. पित्याच्या कुटुंबातील सत्तेला समाजात मान्यता असते. पितृसत्तेचा आधार फक्त संपत्ती, खाजगी मालकी, आर्थिक उत्पन्न यात नसते पण या सर्व घटकाचा पितृसत्तेशी संबंध असतो.

स्त्री-पुरूष विषमतेची मुळे पितृसत्ताक कुटुंब व्यवस्थेत आहेत. मुले आणि मुली, स्त्रिया आणि पुरूष यांच्यातील विषमता उपजत नसते. पण ते मुल जन्मल्याबरोबरच किंवा त्याच्याही अगोदर घडवली जाते. एखादी स्त्री गरोदर असते तेव्हापासून तिला मुलगा व्हायला पाहिजे अशी चर्चा सुरू होते. मुलाचा जन्म हा कुटुंबामध्ये आनंदाचा सोहळा असतो. मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात नाही. तसेच कुटुंबामध्ये मुला-मुलींमध्ये फरक केला जातो. भारतात हे सिद्ध झाले आहे की लहानपणी मुला मुलीच्या खाण्या पिण्यावर,

औषध उपचारावर, शिक्षणावर मुलाच्या तुलनेत मुलीवर कमी  खर्च केला जातो. एवढेच नाही तर मुलीच्या हालचालीवर वागणुकीवर नियंत्रण ठेवले जाते. मोठ्याने हसणे मुलीला शोभत नाही असा उपदेश स्वत: आया आपल्या मुलींना देतात. खेड्यात तर वयात आलेली मुलगी म्हणजे तिच्या कुटुंबाला एक ओझं वाटत यातून बालविवाहाची प्रथा निर्माण झाली.

थोडक्यात, पितृसत्तेची सुरूवात कुटुंबातून होते.

**स्त्रियांच्या श्रम शक्तीवर, उत्पादन क्षमतेवर नियंत्रण**

पितृसत्ताक सामाजिक संरचनेतून स्त्रियांचा विचार केला तर श्रमाच्या क्षेत्रातही त्यांच्या वाटेला दुय्यमत्व येते. स्त्री आणि पुरूष यांच्या कामाचे वाटप लिंगभाव विभाजनावर आधारित आहे.

पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांच्या घरातील व घराबाहेरील उत्पादन शक्तीवर बंधने घातली जातात. यांना कोणत्याही मोबदल्याशिवाय घरातील कामे करावी लागतात. स्त्री जन्माचे सार्थक कुटुंबासाठी राबण्यात आहे, असा विचार समाजात रूढ असल्याने ही श्रमविभागणी नैसर्गिक आहे, असा समज निर्माण होतो. तसेच, या श्रमाला काम समजले जात नाही. आपण सुद्धा सहजच काम करणाऱ्या आणि काम न करणाऱ्या असे विभाजन करतो. वास्तविक या ठिकाणी आपण पाणी भरण्यापासून, मुलांच्या पालनपोषणापासून ते कौटुंबिक नाते-संबंध जोपासण्यापर्यंत सर्व कामातील स्त्रियांचे श्रम अमान्य करत असतो. याच बरोबर स्त्रियांच्या घराबाहेरील कामावर सुद्धा त्याचे नियंत्रण नसते. काही वेळा स्त्रियांना विशिष्ट प्रकारचे काम करण्यास भाग पाडले जाते. (उदा. काही जातीत स्त्रियांना लैंगिक श्रम विकण्यास भाग पाडले जाते.) तर इतर वेळेस त्यांच्या घरातील श्रम करण्यावर पाबंदी घातली जाऊ शकते. परिस्थितीनुसार स्त्रियांचे घराबाहेर श्रम करणे मान्य व अमान्य केले जाते. उदा. एखाद्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ढासळली तर त्या घरातील स्त्रियांना अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे लागते उलट पक्षी एखाद्या कुटुंबाला आर्थिक सुबत्ता प्राप्त झाल्यावर स्त्रियांना घरात बंदिस्त केले जाते.

पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांनी बरोबरीने किंवा अधिक काम करूनही स्त्री कामगारांना पुरुषांपेक्षा वेतन कमीच दिले जाते. या व्यवस्थेत स्त्री कामगारांना औद्योगिक क्षेत्रात दडपशाही किंवा शोषणाला सामोरे जावे लागते. कौटुंबिक जबाबदारी स्त्रिया पार पाडत असल्या तरी ते काम विनावेतन स्वरुपातील असून त्याची दखल राष्ट्रीय उत्पन्न उत्पादनात घेतली जात नाही. थोडक्यात, या सर्व बाबीमध्ये स्त्रियांची मर्जी नसते तर ती त्यांच्या कुटुंबाची गरज असते.

**धर्माच्या आधारे स्त्रियांचे स्थान हे दुय्यम ठरते**

धर्मातून माणसाला नैतिक मूल्याची प्राप्ती होते. धर्म मानसाच्या आध्यात्मिक गरजा पूर्ण करतो. धर्म स्त्रियांच्या गौण स्थानाची पारलौकिक कारणमिमांसा करतो आणि या विषमतेवर आधारलेल्या समाजात त्याच्या जगण्याचा अनुभव सुसह्य करतो.

धर्माच्या आधारे स्त्रियांचे स्थान हे दुय्यम ठरते. धर्मामुळे स्त्रियांवर बंधने लादली जातात. पितृसत्ता अशी एक विचारधारा आहे ज्यामध्ये स्त्रिया या नेहमी आपल्या पतीद्वारे शोषित केल्या जातात. स्त्रीवादी परिपेक्षातून धर्म या संकल्पनेत स्त्रीच्या शरीराला नेहमीच पुरुषी संपत्ती मानली जाते, म्हणून स्त्रियांना गुलाम बनविण्यात धर्मच कारणीभूत ठरतो. धर्मामुळे महिला सक्षमीकरणात बाधा येते. तसेच पुरुषप्रधान धर्माने निर्माण केलेल्या परंपरा, धार्मिक बंधने नेमाने स्त्रिया पाळत असल्यामुळे धर्म हा यांना दुबळे ठरवतो. हा सामाजिक संरचनेचा भाग आहे.

**पुरुषप्रधान व्यवस्थेच्या स्त्रिया वाहक**

या संबंधाने डेनिस कान्दियोती यांनी 'पितृसत्तात्मक वाटाघाटी' (Bargaining with Patriarchy) या त्याच्या लेखात त्यांनी स्त्रिया कशा पद्धतीने पुरुषसत्ताक व्यवस्था टिकवण्यामध्ये सहाय्य करतात हे स्पष्ट केले आहे.

लिंगभाव अभ्यास संशोधक डेनिस कान्दियोती (Deniz Kandiyoti) यांनी १९८८ मध्ये 'बार्गेनिंग विथ पॅट्रिआर्की' पितृसत्तात्मक वाटाघाटी या त्यांच्या लिखाणामध्ये पितृसत्तेचे विविध पैलू दिले आहेत. डेनिस कान्दियोती लिंगभावाच्या वाटाघाटींबद्दल मुख्य संहिता मांडतात. पितृसत्ता ही फक्त पुरूष स्त्रियांवर गाजवतात असे नसून स्त्रिया देखील स्त्रियांवर पितृसत्ता गाजवतात, पितृसत्ताक समाजाचा परिणाम कुटुंब पद्धतीवर होत असतो. पुरुषांची सत्ता घरातील पुरूष व स्त्रियांवरचा चालते. त्याप्रमाणे घरातील वयस्कर स्त्री ही कुटुंबावर सत्ता प्रस्थापित करते. तिच्यापेक्षा वयाने लहान स्त्रियांवर ती सत्ता गाजवते. लहान स्त्री तिच्यापेक्षा लहान स्त्रीवर सत्ता गाजवते. संशोधक डेनिस कान्दियोती ह्या 'बार्गेनिंग विथ पॅट्रिआर्की'च्या मांडणीतून समाजामध्ये स्त्रिया ह्याच स्त्रियांच्या वैरीण आहेत, या विचारसरणी बाबत चिकित्सक लेखन करतात.

**पितृसत्ता आणि जात व्यवस्था**

आपल्या समाजात कुटुंबाच्या पलीकडे जाणारे त्यानंतरची परिचित विश्व हे जातीचे आहे. जाती व्यवस्था म्हणजे समाजाची एक संरचना (संस्था) आहे. आणि या संरचनेमध्ये कुटुंबाप्रमाणे स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. उच्च जातीची ज्ञान, संपत्ती, सत्ता यावर घट्ट पकड असते. ही पकड घट्ट राहावी म्हणून त्यांच्यामध्ये जातीच्या शुद्धतेचे महत्त्व सर्वाधिक असते. जात स्त्रियांवर लैंगिक नियंत्रण ठेवणारी त्यांचे दुय्यमत्व अधोरेखित करणारी त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेणारी व्यवस्था आहे.

स्त्रीवादी विचारवंत उमा चक्रवर्ती, व्ही. गीता आणि मेरी जॉन (Mery E. John) यांनी जात आणि पितृसत्ता यांच्या अंतरसंबंधाची मांडणी केली. उमा चक्रवर्ती आपल्या 'जेंडरिंग कास्ट : थ्रु अ फेमिनिस्ट लेन्स' (Gendering Caste : Through a Feminist Lens) या पुस्तकात मांडतात की, 'भारतात ब्राह्मणी पितृसत्ता ही पूर्वीपासून अस्तित्वात होती. तसेच जात आणि पितृसत्ता यांचा अंतरसंबंध आहे. जातीतील विवाह ही स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण करण्यासाठी तसेच उच्च जातीतील पुनरुत्पादनावर

नियंत्रण करण्यासाठी होते. स्त्रिया या जात व्यवस्था टिकवण्याचे प्रवेशद्वार असतात. जातीची उतरंड किंवा लिंगभावाची उतरंड हे जाती व्यवस्था टिकवणारी मूलभूत व्यवस्था आहे.'

जात या शब्दाचा जन्माशी संबंध आहे आणि जन्म देणाऱ्या स्त्रिया असतात. त्यांचे हे कार्य समाजाला टिकून ठेवण्यासाठी अगदी आवश्यक असते. हे फक्त नैसर्गिक आणि जैविक अर्थाने नाही तर समाजाची पुनरावृत्ती तिच्या ठरलेल्या संरचनेप्रमाणे झाली पाहिजे, याची जबाबदारी स्त्रियांवर असते.

एखादी स्त्री जेव्हा मुलाला जन्म देते तेव्हा तिच्या नवऱ्याचा वंश चालू ठेवला जातो. या परिस्थितीत तिच्या जननक्षमतेवर नवऱ्याचे व त्याच्या कुटुंबाचे नियंत्रण असणे गरजेचे होते. मुलीचे लग्न होईपर्यंत तिच्या पित्यावर जबाबदारी असते की, विवाहापूर्वी तिचा कुठल्याही पुरुषांशी संबंध येता कामा नये. तिचे लग्न योग्य पुरुषांची म्हणजे जातीतल्याच पुरुषांशी झाले पाहिजे याची काळजी तिचा पिता व भाऊ घेत असतो. आपल्या समाजात जातीच्या अंतर्गत विवाह धर्म संगत मानले जातात. धर्म जातीबाह्य विवाहाला मान्यता देत नाही. अशा पद्धतीने स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण प्रस्थापित करून जाती घट्ट केल्या जातात.

वरच्या जातीच्या पुरुषांची सत्ता, संपत्ती, ज्ञान यावर पकड होती. अशा जाती आपल्या जातीच्या शुद्धतेसंबंधी आग्रही होत्या. सतीची प्रथा व विधवेचे केशवपण करून तिच्या सर्व हालचालीवर कडक नियंत्रण ठेवत यासाठी प्रसंगी बळाचाही वापर करत.

दलित कष्टकरी जातीत आढळणाऱ्या पुरुषसत्तेचे स्वरूप पुरुषसत्ताक व्यवस्थेचा भौतिक पाया आणि विचारप्रणाली नीट तपासून पाहिली तर प्रत्येक जातीची बंदिस्तता त्या-त्या जातीतील स्त्रियांवर असणाऱ्या भिन्न-भिन्न प्रकारच्या नियंत्रणातून घडत असते. जाती स्त्रियांवर बंधने लादून बंदिस्त केल्या जातात. जाती निहाय व्यवसाय आणि लिंग आधारित श्रमविभागणी यांचे परस्पर संबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. जातीच्या उतरंड जेव्हा त्या-त्या जातीत मध्यमवर्ग निर्माण होऊ लागतो. तेव्हा कष्टकरी जातीतील स्त्रिया उंबरठ्याच्या आत जातात. इतकेच नव्हे तर स्वत:कडे असणारे परंपरागत व्यावसायिक कौशल्य गमावून बसतात. त्यांना नव्या नोकऱ्या व्यवसायासाठी लागणारे शिक्षण प्रशिक्षण तज्ज्ञता घेण्यासाठी वाव मिळत नाही. ह्या मध्यमवर्गीय मूल्यानुसार जगताना मारहाण, हुंडा, नवऱ्याची व्यसने इत्यादी प्रश्नाला तिला एकंदरीत सामोरे जावे लागते.

**मध्यमवर्गीकरणाची प्रक्रिया ब्राह्मणी चौकटीत होते**

मध्यमवर्गीय दलित जातीतील पुरुषांना ब्राह्मणी चौकटीतली स्त्रिया अधिक सक्षम, तत्पर वाटतात. अलीकडे दलित जातीतील तरुण मुलगा व सवर्ण जातीतील मुली अशा विवाहाचे प्रमाण अधिक दिसते. मध्यमवर्गीकरणाची प्रक्रिया ब्राह्मणी चौकटीत होते. तेव्हा पुन्हा एकदा नव्या पायावर मातृत्व, अपत्य संगोपन, घरदार याची पुन:स्थापना स्थापना होऊन 'गृहिणी' या चौकटीत शिकलेल्या मध्यमवर्गीय स्त्रियांना कोंबले जाते. पतिव्रता धर्माच्या नव्या चौकटी तयार होतात. पुरुषसत्ता, जात, वर्ग यांच्या साह्याने विषमता आणि स्त्रियांचे दुय्यमत्व कसे टिकवते ते पाहणे गरजेचे आहे.

**पितृसत्ता आणि संस्कृती**

सर्वसाधारण जगातील सर्व संस्कृतीमध्ये स्त्रियांचे काम मुलांना जन्म देणे व त्यांचा सांभाळ करणे हे आहे. पुरुषांना अधिक अधिकार आणि मुलींपेक्षा मुलांना जास्त महत्त्व आहे. स्त्री ही पुरूष केंद्रित संस्कृतीने वेढली गेली आहे. तिला पुरुषसत्ताक संस्कृतीत स्वतंत्र अस्तित्व नाही. तिचे अस्तित्व घरापुरतेच मर्यादित आहे. पुरूष मात्र प्रगतीची घोडदौड करणारा उत्साही निर्माता म्हटला गेला आहे. संस्कृतीत स्त्रीला स्वतःचे अस्तित्व नाही, स्वतःचे स्वत्व नाही. तिने लहानपणी वडीलांवर, तरूणपणी पतीवर व म्हातारपणी मुलावर अवलंबून राहावे, अशी व्यवस्था केली आहे.

वास्तविक पाहता स्त्री ही संस्कृतीरक्षक व संस्कृतीसंवर्धक समजली जाते. संस्कृतीच्या उच्च-निचतेचा मानदंड म्हणजे स्त्री होय. समाजामध्ये व्यक्तीला जे स्थान असते त्याला दर्जा असे म्हणतात. प्रामुख्याने दर्जा हा जन्मभेदावर किंवा लिंगभेदावर प्राप्त होत असतो. जन्माचा संबंध तुम्ही कुठल्या जातीत जन्मला यांच्याशी आहे. त्यानुसार त्या स्त्रीचा दर्जा ठरणार आहे. प्रत्येक जातीची संस्कृती ही भिन्न आहे. जातीच्या उतरंडीत पुरुषसत्ताक व्यवस्था काम करत असते. त्यामुळे प्रत्येक जातीतील स्त्रियांचा दर्जा दुय्यम असला तरी शोषणाचे पदर भिन्न असतात.

संस्कृतीच्या इतिहासात पुरुषांनी घडवलेली प्रतिमा हे स्त्री दास्याचे मूळ कारण आहे. वास्तविक तिला जी परिणामे दिली जातात तशी ती नसते. तरीही तिला तसेच असण्यासाठी तसेच दिसण्यासाठी ती स्वत:वर लादून घ्यावी लागतात. म्हणून इतिहास व संस्कृतीत स्त्रीची तथाकथित उदात्त प्रतिमा एका आधारे फसवी आहे, स्त्रीचे स्वप्न नाकारणारी आहे. समाजाने स्वतःच्या स्वार्थासाठी स्त्रीला देवी बनवून देव्हाऱ्यात ठेवले आणि त्याच समाजाने तिला स्वत:ची दासी बनवून तिचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावून घेतला. भारतीय संस्कृतीत स्त्री-शक्ती, स्त्री-संयम, स्त्री-त्याग, स्त्री-भावना, संवेदनशीलता, सहनशीलता या स्त्रियांच्या गुण वैशिष्ट्यांचा संस्कृती विकासात विशेष उल्लेख केला आहे. किंवा असे म्हणू की या गुणाभोवती गुंफलेली स्त्री प्रतिमा आदर्श मानली गेली. ही प्रतिके स्त्रीला लढाऊ बनवत नाहीत तर शोषिक बनवतात. त्यामुळे समाजामध्ये स्त्रियांकडे नेहमी अबला म्हणून पाहिले गेले आहे.

लग्नव्यवस्था व कुटुंबसंस्था या सामाजिक संस्थेमुळे स्त्रियांवर पुरुषांची मालकी प्रस्थापित होते. स्त्री ही व्यक्ती जन्मापासून तिचे संगोपन होताना सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत समाजाला आपोआप अपेक्षित असणारे बाईपणाचे गुण आत्मसात करते. मुलीला दुबळ्या, सहनशील होण्यास शिकवले जाते. मुलांना आक्रमक व अधिकार गाजवणारा होण्यासाठी उत्तेजन दिले जाते. पुरुषीपणा व बायकीपणा ठरवण्याचे निकष सर्व समाजामध्ये काळाच्या ओघात उत्क्रांत झाले आहेत. या निकषांच्या आधारेच व्यक्तीच्या वर्तनक्रिया तपासून पाहिल्या जातात. पुरूष व स्त्री या संकल्पनेमध्ये सामाजिक आशय अंतर्भूत आहे. हा सामाजिक आशय म्हणजे संस्कृती आहे. धार्मिक, पौराणिक आणि दंतकथांमधून उभी केलेली स्त्रीची प्रतिमा स्त्रियांच्या रोजच्या जीवनावर काय परिणाम घडवून आणते, हा अभ्यासाचा विषय आहे. लग्नसंस्था घेतली तर त्या संबंधाने संस्कृतीत कोणत्या प्रथा-परंपरा आहेत ते पाहवे लागेल. पहिले म्हणजे जातीतच लग्न झाले पाहिजे.

अशा प्रथम लग्न झालेल्या व नवरा जिवंत असलेल्या स्त्रियांना सुवासिनी म्हटले जाते. संस्कृतीमध्ये अशा स्त्रियांना विविध धार्मिक कार्यामध्ये मान असतो. आपल्या समाजामध्ये काही जातीत नवऱ्याच्या मृत्यूनंतर किंवा काडीमोड झाल्यानंतर स्त्रिया दुसरा विवाह करतात. अशा स्त्रियांना सुवासिनीचा मान मिळत नाही. 'कुंकू पुसून शेण लिवायचं का?' असा विचार ती स्त्री करते व दुसऱ्या लग्नापासून दूर राहते. म्हणजे 'सुवासिनीचा गौरव करणे आणि पहिल्या व दुसऱ्या लग्नामध्ये स्पष्टपणे फरक दाखवणे आणि त्यातून स्त्रियांच्या इंद्रिय निग्रहासाठीची यंत्रणा उभी राहते.' पहिल्या आणि दुसऱ्या लग्नामध्ये जो फरक दिसतो तो स्त्रीचे पावित्र्य आणि तिच्या लैंगिकतेचे व्यवस्थापन यावर केंद्रित केलेला असतो. पहिल्या लग्नाचा मान व प्रतिष्ठा असते तर दुसऱ्या लग्नाला कनिष्ठ दर्जा दिला जातो. स्त्री जीवनासंबंधित अशा अनेक प्रतीकांनी संस्कृती व्यापून राहिली आहे. या प्रतीकाला संस्कृतीने दिलेले पावित्र्यामुळे स्त्रियांचे जीवन पुरुषसत्ताक मूल्यामध्ये घडत असते.

लहान वयात लग्न करण्याचा उद्देश मुलींचे कौमार्य आणि पावित्र्य सांभाळणे हा असतो. मातृत्वाला समाज मान्यता मिळवण्यासाठी लैंगिकता ताब्यात ठेवणे, तिच्यावर संयमन ठेवणे हे काम संस्कृती करते. मुलगी वयात आली की तिच्यावर मर्यादा घालण्याचे तंत्र अवलंब दिले जाते. मुलगी वयात आली की, तिची ओटी भरण्याची पद्धत सर्व समाजात प्रचलित आहे. अशा प्रथा परंपरांच्या द्वारे धार्मिक संस्काराच्या द्वारे लैंगिकतेच्या पावित्र्याचे महत्त्व समाजमनावर रूजवले जाते. त्या मुलीला काचेप्रमाणे असणाऱ्या तिच्या शुद्धतेची पूर्ण जाणीव करून दिली जाते.

लिंग हे गुणविशेष निसर्गदत्त आहे. म्हणून जैविक दृष्टीने स्त्री व पुरूष समान आहेत असे म्हटले जाते. असे असूनही स्त्रियांबाबत भेदभाव का केले जातात? किंवा संधी, हक्क इत्यादी बाबत स्त्री-पुरूष विषमतेची स्थिती का निर्माण झाली असा प्रश्न उपस्थित होतो. यासाठी विचारधारा व सामाजिक संरचना ही दोन ठळक कारणे जबाबदार आहेत. असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

**स्त्रियांच्या प्रजोत्पादनावर नियंत्रण**

पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या प्रजोत्पादन शक्तिवर संपूर्ण नियंत्रण ठेवले जाते. मुले केव्हा पाहिजे? किती पाहिजेत? किंवा हवीत का? याबाबतचा निर्णय स्त्रियांच्या हातात नसतो. विवाहबाह्य संबंधातून जन्माला येणाऱ्या संततीला अनौरस ठरवून त्या स्त्रीला कुलटा ठरवले जाते. म्हणजेच, बापाचे नाव असल्याशिवाय स्त्रीने जन्माला घातलेली संतती औरस ठरत नाही. त्याचप्रमाणे शासन देखील कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमांमार्फत स्त्रियांच्या प्रजोत्पादन शक्तीवर नियंत्रण ठेवते. गरीब देशांमध्ये लोकसंख्येला नियंत्रित ठेवण्यासाठी स्त्रीच्या आरोग्याला घातक असणाऱ्या गर्भनिरोधकांचा सतत मारा केला जातो. तर युरोप खंडामध्ये ज्या देशांमध्ये जन्मदर खाली आहे त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे लालूच दाखवून स्त्रियांना प्रजोत्पादनासाठी प्रवृत्त केले जाते. म्हणजे स्त्रियांच्या प्रजोत्पादनावर केवळ कुटुंबामार्फतच नियंत्रण केले जाते असे नाही तर राज्य संस्थाही त्यावर नियंत्रण ठेवते.

पुरुषप्रधान समाजामध्ये मातृत्वाचे अवडंबर माजवले जाते. शिवाय मातृत्वाशिवाय स्त्रीच्या जीवनाचे सार्थक होऊ शकत नाही, असा समजही आपल्या समाजात रूढ झालेला आहे. त्याचबरोबर प्रत्येक स्त्रीने मूल जन्माला घातले पाहिजे. मूल नसलेल्या स्त्रिला समाजात मान नसतो. तिला शुभ कार्यासाठी बोलावले जात नाही, तिची वांझ म्हणून हेटाळणी केली जाते. फक्त मुलीला जन्म देणाऱ्या स्त्रियांनाही समाजात मान नसतो. मात्र मुलाची आई म्हणून स्त्रिला मोठी प्रतिष्ठा समाजात प्राप्त होते. मुलाच्या जैविक मातेने त्याचे पालन पोषण करायला पाहिजे अशी मिथके समाजामध्ये रूढ आहे. आज समाजात या मिथकांपाई किती तरी लायक मुली आपली चांगली नोकरी सोडून मुलाचे पालन पोषण करण्यात धन्यता मानतात.

**स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण**

जैविक पुनरुत्पादनामध्ये स्त्रीची भूमिका महत्त्वाची असते. तिला जातीची शुद्धता आणि सीमा रेषा टिकून ठेवण्यासाठी मुलतः जबाबदार मानले जाते. म्हणून तिच्या लैंगिकतेवर अत्यंत योग्य अशा नियंत्रणाची गरज असते. अशा तऱ्हेने जातीवर आधारित समाजामध्ये स्त्रीची लैंगिकता आणि तिचे व्यवस्थापन हे महत्त्वाचा घटक ठरतो. कर्मकांडाची पवित्रता आणि जातीची ओळख याचे रक्षण करणे, स्त्रियांची लैंगिकता ताब्यात ठेवण्यासाठी कितीतरी सांस्कृतिक रुपकाची निर्मिती आपल्याकडे झाली आहे. एकदा काच तडकली की तिला कायमचा तडा गेला की ती पुन्हा जोडता येत नाही किंवा स्त्रियांचे शरीर हे काचेचे भांडे आहे. ही रुपके स्त्री मनावर अधिराज्य गाजवतात.

पुरुषप्रधान समाजामध्ये लैंगिकतेच्या बाबतीत दुहेरी नीति मूल्ये असल्याचे आपल्याला दिसून येते. पुरुषांच्या स्वैराचाराकडे दुर्लक्ष केले जाते. किंवा वेळ प्रसंगी स्वैराचार हा त्याच्या पुरूषत्वाचा गौरव करणारा देखील ठरतो. स्त्रियांच्या लैंगिकतेशी मात्र संपूर्ण कुटुंबाची, जाती-जमातीची, किंवा समुदायाची इज्जत जोडली जाते. त्यामुळे तिच्यावर अनेक बंधने लादले जातात. दंगली होतात त्यावेळी एक जमात/समुदाय आपला वरचढपणा सिद्ध करण्यासाठी त्याच्या जातीतील स्त्रियांच्या लैंगिकतेचा वापर करतो.

दैनंदिन जीवनातही स्त्रियांच्या लैंगिकतेवर अनेक बंधने घातली जातात. त्यांनी कोणती वेषभूषा करावी, कसे बोलावे चालावे, कोठे जावे, कोठे जाऊ नये, याबाबत कौटुंबिक, धार्मिक व सांस्कृतिक नियमांच्या आधारे कडक नियंत्रण ठेवले जाते. हे नियंत्रण इतक्या सहजतेने ठेवले जाते की स्त्रियांना ते नैसर्गिक वाटते.

**स्त्रियांच्या आर्थिक व सांपत्तिक साधन सामग्रीवर नियंत्रण**

सर्वसाधारण सर्व संस्कृतीमध्ये संपत्ती धारण करण्याचा अधिकार पुरुषांचा आहे. संपत्तीचा वारस हा मुलगाच होऊ शकतो. हे पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. आपल्या संस्कृतीत स्त्री व शूद्राला संपत्ती धारण करण्याचा अधिकार नाही. स्त्रीच्या श्रमातून उत्पन्न झालेल्या संपत्तीवर पुरूषाचाच अधिकार असतो. तसेच आपल्या घरातील संपत्ती घरातच राहावी यासाठी विवाहित स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाल्यानंतर काही समाजामध्ये तिचा विवाह तिच्या दीराशी लावून देत.

पितृसत्ताक पद्धती असलेल्या बहुतेक कुटुंबातून परंपरेने आई-वडील मुलीला वारसाने जमीन द्यायला नाखूष असतात. मुलीला वारसाने जमीन देत नाहीत कारण लग्नानंतर मुलगी गाव सोडून जाणार असते. पण हे तर्कशास्त्र मुलाबाबत लागू केले जात नाही मुलगा जेव्हा नोकरीसाठी शहरात जातो तेव्हा आपला गाव गावाचा हक्क तो अबाधित ठेवतो. भार्या, पुत्री व दास यांचा धनावर कोणताही हक्क नाही. त्यांना जे धन प्राप्त झाले असेल ते त्यांचे नसून त्यांच्या मालकाचे होय अशी प्रथा रूढ होती.

पितृसत्तेची निर्मिती ही प्रत्यक्षरित्या आदिम राज्य संस्थेमधून झाली आहे. कारण आदिम राज्य संस्थेचा पितृसत्तेची संरचना व कुटुंब हाच महत्त्वाचा घटक होता. पितृसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांच्या लैंगिकतेवर पुरुषांचे नियंत्रण आले. गेर्डा लर्नरच्या मांडणीनुसार हे स्पष्ट होती की, विविध सामाजिक व्यवस्थांमधील पितृसत्तेचा अभ्यास करून असा निष्कर्ष निघतो की, पितृसत्ताक व्यवस्थेला मूळ असा उगम नसून ही व्यवस्था प्रक्रियेतून विकसित होत गेलेली व्यवस्था आहे.'

समाजातील विविध प्रकारच्या उतरंडी शोषणाची नाती, त्यांच्याशी स्त्री-पुरूष भेदाचा आणि पितृसत्तेचा अतूट गाढ संबंध आहे हे लक्षात येते. 'स्त्री जन्माला येत नाही ती घडवली जाते' हे फ्रेंच विचारवंत सिमोन द बुव्हाचे (Simone de Beauvoir) विधान जगभराच्या स्त्रीवादी प्रवाहांमध्ये सातत्याने वापरले जाते. पितृसत्ता समाजात जन्माला आलेले स्त्रीचे स्त्रीत्व पुरुषप्रधान विचार मूल्यांद्वारे, धर्म, कुटुंब, समाज अशा वेगवेगळ्या यंत्रणा घडवत असतात. स्त्रीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक स्थानिक शोषण यंत्रणाही कार्यरत असतात. त्या केवळ स्त्रीला घडवत नाहीत तर पुरुषांनाही घडवतात. आणि पुन्हा स्त्रीच्याच माध्यमातून शोषण यंत्रणाचे पुनरुत्पादन करतात. पुरुषसत्ताक व्यवस्था काळानुरूप होणारी बदल पचवत तेवढ्याच खंबीरपणे उभी आहे, टिकून आहे, असे म्हणावे लागते.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) आधुनिक स्त्रीवादी विचार प्रक्रियेतील महत्त्वाची संकल्पना म्हणून ....... चा विचार केला विचार केला जातो.

अ) पितृसत्ता ब) मातृसत्ता क) सांस्कृतिक सत्ता ड) वरील सर्व

२) पुरुषप्रधान व्यवस्था ही नैसर्गिक नसून ............ आहे.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) लिंगभावात्मक ड) वरीलपैकी नाही

३) 'द क्रिएशन ऑफ पॅट्रियार्की' हा ग्रंथ ........... यांनी लिहिला.

अ) गेर्डा लर्नर ब) उमा चक्रवर्ती क) डी गीता ड) वरीलपैकी नाही

४) पितृसत्तेची सुरूवात ...............मधून होते.

अ) जाती संथा ब) राज्यसंस्था क) कुटुंब संस्था ड) नातेसंबंध

५) जाती ............ च्या आधारे बंदिस्त केली जाते.

अ) पुरूषांना जास्त संधी देऊन ब) स्त्रियांवर बंधने घालून

क) कायदे करून ड) वरील पैकी नाही

६) ............ या जाती प्रथेचे प्रवेशद्वार आहेत.

अ) स्त्रिया ब) पुरुष क) संस्कृती ड) राज्य

७) 'पॅट्रियार्की बार्गेनिंग' या संकल्पनेत ............ याने स्त्रिया पुरुषसत्ता टिकविण्यामध्ये सहाय्य करतात हे स्पष्ट केले.

अ) लिंडा गार्डन ब) गेल ऑम्व्हेट क) डेनिस कान्दियोती ड) वरील पैकी नाही

८) बापाचे नाव असल्या शिवाय स्त्रीने जन्माला घातलेले मुल .............. ठरत नाही.

अ) औरस ब) अनौरस क) पवित्र ड) या पैकी नाही

ब) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | पॅट्रिआर्कल बारगेन | अ | द क्रिएशन ऑफ पॅट्रिआर्की |
| २ | उमा चक्रवर्ती, व्ही गीता | ब | स्त्री जन्माला येत नाही ती घडवली जाते. |
| ३ | गेर्डा लर्नर | क | जात आणि पितृसत्ता यांच्या अंतर संबंधाची मांडणी |
| ४ | सिमोन द बुव्हा | ड | डेनिस कान्दियोती |

अ) १-ड , २-क , ३-अ , ४-ब

ब) १-अ. २-क, ३- ड, ४- ब

क) १- क, २- अ, ३- ब ४- ड

ड) १-ब, २-ड, ३-क, ४-अ

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ - पितृसत्ता ही एकसंघ आणि स्थिर अशी संरचना आहे.

विधान २- पितृसत्ता व्यवस्थेला मूळ असा उगम नसून ही व्यवस्था प्रक्रियेतून विकसित होत गेलेली आहे.

अ) दोन्ही विधाने बरोबर

ब) पहिले चूक दूसरे बरोबर

क) पहिले बरोबर दुसरे चुक

ड) दोन्ही विधाने चूक

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) सामाजिक आंतरक्रिया - व्यक्ती व्यक्तींमधील अर्थपूर्ण संबंध

२) स्त्रीवादी दृष्टिकोन - स्त्री हितास प्राधान्यक्रम देऊन लिंगभाव संबंधात परिवर्तन करून समानता आणण्याचा उद्देशाने केलेला अभ्यास

३) श्रमाचे लैंगिक विभाजन - स्त्री -पुरुषांचे त्यांच्या नैसर्गिक क्षमतेनुसार कामाचे केलेले विभाजन

४) जागतिकीकरण - वस्तू, सेवा, ज्ञान, विज्ञान इ. चा प्रसार जागतिक स्तरावर केला जातो. व्यापार, वस्तू व सेवा यांना सहज उपलब्ध होणारी बाजारपेठ व त्यातून होणारा जास्तीत जास्त नफा या सर्व गोष्टीचा अंतर्भाव जागतिकीकरण या संकल्पनेत येतो.

५) बाजार यंत्रणा - बाजार यंत्रणेला मुक्त बाजार व्यवस्था असेही म्हणतात. ही अशी यंत्रणा आहे जिथे बाजारातील किंमत केवळ मागणी आणि पुरवठा यावर आधारित असतात.

६) खासगीकरण - व्यक्तिगत मोठ्या प्रमाणात नफा मिळवण्यासाठीची बाजार व्यवस्था.

७) बूर्ज्वा स्त्री - पाश्चात्य समाजातील उच्चभ्रू स्त्री

८) बायोग्रामर्स - जनुकीय रचनेची संरचना

९) आर्थिक वर्ग विग्रह - मार्क्सच्या सिद्धांतानुसार एखाद्या व्यक्तीचा दर्जा उत्पादन पद्धतीतील त्याच्या भूमिकेद्वारा निर्धारित केला जातो. (तो मालक आहे की कामगार आहे)

१०) लैंगिक वर्ग विग्रह - स्त्रीवादी स्त्रियांचे दुय्यमत्व स्पष्ट करण्यासाठी लिंगभाव ही संज्ञा वापरतात व त्या नुसार समाजाचे वर्गीकरण स्त्री व पुरूषाच्या मध्ये झालेले अधिकाराचे असमान वाटप स्पष्ट करतात.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न १ ची उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) भौतिक २) सामाजिक सांस्कृतिक ३) व्यूहात्मक ४) सामाजिक आंतरक्रिया

५) सामाजिक सांस्कृतिक ६) लिंगभाव ७) कोणत्याही एक लिंग समूहाचे प्रभुत्व असणे

८) पुरूष ९) सत्तासंबंध १०) लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीशी ११) दुय्यम

ब) योग्य जोड्या जुळवा.

१) १-ड , २-क , ३-अ , ४-ब

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

१) अ) दोन्ही विधाने बरोबर

२) अ) दोन्ही विधाने बरोबर

स्वयं अध्ययन प्रश्ना २ उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) जैविक २) लैंगिक ३) नैसर्गिक ४) द इम्पेरियल ऍनिमल ५) एंगल्स

६) सेक्स, जेंडर अँड सोसायटी ७) खाजगी ८) प्रजनन व लैंगिकतेवरील

९) सिल्व्हिया वालबे १०) द ओरिजन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट

ब) योग्य जोड्या जुळवा.

अ) १-ड , २-क , ३-ब , ४-अ

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

क) पहिले बरोबर दुसरे चुक

स्वयं अध्ययन प्रश्ना ३ उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) पितृसत्ता २) सामाजिक ३) गेर्डा लर्नर ४) कुटुंब संस्था ५) स्त्रियांवर बंधने घालून ६) स्त्रिया

७) डेनिस कान्दियोती ८) औरस

ब) योग्य जोड्या जुळवा.

अ) १-ड , २-क , ३-अ , ४-ब

क) विधान चूक की बरोबर ओळखा.

ब) पहिले चूक दूसरे बरोबर

## २.५ सारांश

जगातील सर्वच संस्कृतीमधील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची चिकित्सा करण्यासाठी लिंगभावाची मांडणी करत पितृसत्ता जात, धर्म, संस्कृती, रितीरिवाज, रूढीपरंपरा या सामाजिक संस्था, स्त्रियांना दुय्यमत्वाकडे कशा घेऊन जातात, याचा अभ्यास आपण या प्रकरणात केला आहे.

'स्त्री जन्माला येत नाही ती घडवली जाते' हे फ्रेंच विचारवंत सिमोन द बुव्हाचे विधान जगभराच्या स्त्रीवादी प्रवाह मध्ये सातत्याने वापरली जाते. पितृसत्ता समाजात जन्माला आलेले स्त्रीचे स्त्रीत्व पुरुषप्रधान विचार मूल्यांद्वारे धर्म, कुटुंब अशा वेगवेगळ्या यंत्रणा घडवत असतात. स्त्रीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक स्थानिक शोषण यंत्रनाही कार्यरत असतात. त्या केवळ स्त्रीला घडवत नाहीत तर पुरुषांनाही

घडवतात आणि पुन्हा स्त्रीच्याच माध्यमातून शोषण यंत्रणांचे पुनरुत्पादन करतात. काळानुरूप होणारी बदल पचवत शोषणाच्या विविध यंत्रणा व्यवस्था टिकून राहतात.

लिंग हे नैसर्गिक आहे तर लिंगभाव हा सामाजिक आहे. याचे आकलन करून घेत लिंगभावाच्या संकल्पनेने हे स्पष्ट केले आहे की समस्येचे कारण स्त्री नसून समाज व संस्कृती द्वारा रचलेल्या बाईपण व पुरूषपणाच्या व्याख्या आहेत. या व्याख्या स्त्री-पुरुषांचे अधिकार, जबाबदाऱ्या, त्यांचे कार्यक्षेत्र, इ. कोणत्या असाव्यात ते ठरवतात. या व्याख्या खऱ्या अर्थाने समस्येचे मूळ कारण आहेत. आज स्त्रियांची जी स्थिती आहे ती एका सामाजिक व्यवस्थेमुळे म्हणून स्त्रियांचे स्थान आणि दर्जा बदलायचा असेल तर या सामाजिक व्यवस्थांना आणि व्याख्यांना बदलावे लागेल. समाजामध्ये लिंगभावाची जडणघडण कशी झाली आहे याचे परीक्षण करणे उपयुक्त ठरते. याचाच अर्थ लिंगभावाचा विचार करत असताना लिंगभावावर आधारित श्रमविभाजन व लिंगभावात्मक श्रेणी पद्धतीचा विचार करणे गरजेचे असते. या उपर सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे लिंगभाव संबंधांमध्ये विहित असणाऱ्या सत्ता संबंधाकडे लक्ष देऊन त्याचे योग्य आकलन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

हे सत्तासंबंध स्त्री-पुरुषांच्या श्रमामध्ये कशा पद्धतीने काम करतात हे श्रमाचे लैंगिक विभाजन कशा पद्धतीने केलेले असते यातून दिसून येते. पुरुषांचे काम हे समाजातील उत्पादनाला योगदान देते. स्त्रियांचे कामे उत्पादनक्षम असे मानले जात नाही व म्हणून त्याचे अवमूल्यन केले जाते. अशा पद्धतीचे श्रम विभाजन हे पुरुषांचे स्त्रियांवर वर्चस्व व त्यांच्या शोषणाला कारणीभूत आहे. हे श्रम विभाजन स्त्रियांना पुरुषांवर अवलंबून राहण्यास भाग पाडते.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांच्या श्रमाचे लैंगिक विभाजन हे फक्त कुटुंबाशी संबंधित न पाहता संपूर्ण समाजाची रचनात्मक समस्या म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. कुटुंब संस्थेतच नव्हे तर समाजातील सर्व प्रकारच्या संरचनेमध्ये स्त्रियांच्या श्रमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पारंपारिक राहिला आहे. हा दृष्टिकोन इतिहासामध्ये स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित करतो.

पितृसत्ता या संकल्पनेचा वापर स्त्रियांना रचनात्मक आणि विवाह व्यवस्थात्मक दुय्यमत्व देण्यासाठी केला जातो. पितृसत्ता ही एक विशिष्ट समाजामध्ये पुरुषी अधिकार व सत्तेची संरचना स्पष्ट करणारी संज्ञा नसून त्याकडे एक विश्लेषणात्मक श्रेणी म्हणून बघणे आवश्यक आहे. या पुरुषप्रधान व्यवस्थेचे स्वरूप आपल्याला व्यक्तिगत आणि सामूहिक अनुभवातून लक्षात येते. ही व्यवस्था नैसर्गिक नसून सामाजिक आहे. तिची सुरूवात कुटुंबापासून होते. या व्यवस्थेचे स्वरूप स्थल, काल, जात, वर्ग यांनुसार बदलते. पुरुषप्रधान व्यवस्था ही केवळ खाजगी जीवनात किंवा कुटुंबांतर्गत असते असे नाही तर ही व्यवस्था समाजातील इतर सार्वजनिक संस्थांमधून देखील कार्यरत असते. धर्म संस्था, अर्थसत्ता, राज्यसंस्था, कायदा व्यवस्था यामध्ये देखील आपल्याला पुरुषप्रधान व्यवस्था दिसून येते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा.

१) लिंग

२) लिंग व लिंगभाव संकल्पनेच्या अभ्यासाचे महत्त्व

३) लिंग व लिंगभाव संज्ञेच्या व्याख्या

४) लैंगिक श्रमविभागणीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन

५) लैंगिक श्रमविभागणीचा जीवशास्त्रीय दृष्टिकोन

६) पितृसत्ता व जात व्यवस्था

७) पितृसत्ता व स्त्रियांचे लैंगिक नियंत्रण

८) पितृसत्ता व संस्कृती

ब) थोडक्यात उत्तर लिहा

१) लिंग व लिंगभाव संज्ञा स्पष्ट करून त्याचे महत्त्व अधोरेखित करा.

२) लिंगभाव संकल्पना स्पष्ट करा.

३) श्रमाची लैंगिक विभागणी स्त्रियांच्या दुय्यमत्वाला कशी कारणीभूत ठरते स्पष्ट करा.

४) पितृसत्तेची सामाजिक व सांस्कृतिक रचना स्पष्ट करा.

५) पितृसत्ता व जातीच्या संबंधावर निबंध लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१) पाटील डॉ. पद्मजा, जाधव डॉ. शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २००७.

२) सोनाळकर वंदना, रेगे शर्मिला, पितृसत्ता व स्त्रीमुक्ती, क्रांतीसिंह नाना पाटील अकादमी प्रकाशन, अहमदनगर, द्वितीय आवृत्ती, २००७.

३) भसीन कमला, भाषांतर : तांबे श्रृती, लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती, २०१०.

४) भंगाळे डॉ. शैलजा, सोनवणे डॉ. रंजना, लिंगभाव, विद्यालय आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती, २०१६.

५) डॉ. अंजली रानडे, जागतिक राजकारण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०२२

६) दुबे लिला (अनुवाद विद्युत भागवत), मानवशास्त्रातील लिंगभावाची शोध मोहिम, डायमंड पब्लिकेशन पुणे प्रथमावृत्ती २००९.

७) बगाडे उमेश, ब्राह्मणी पितृसत्तेचा विचारव्यूव्ह, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, २०२१.

८) संपादक प्रा. संजयकुमार कांबळे, डॉ. गेल ऑम्व्हेट समाजशास्त्रीय आकलन, डायमंड पब्लिकेशन, पहिली आवृत्ती २०२२

९) संध्या नरे-पवार, तिची भाकरी कोणी चोरली बहुजन स्त्रीचे वर्तमान, मनोविकास प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २०१४.

❑❑❑

# घटक ३
# जागतिक महिला विचारवंत व कार्यकर्त्या
# (Global Women Thinker and Activist)

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ जागतिक महिला विचारवंत- मेरी क्राफ्ट, सिमोन द बुव्हा

  ३.२.२ केट मिलेट, शूलामीथ फायर स्टोन,

  ३.२.३ जुलीएट मिशेल, बेटी फ्रायडन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं- अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे:–

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला–

१. जागतिक स्त्रीवाद चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी कळेल.

२. पाश्चात्त्य स्त्रीवादाची माहिती मिळेल.

३. जागतिक महिला विचारवंत व समाज सुधारक यांची माहिती मिळेल.

## ३.१ प्रास्ताविक:–

जागतिकीकरणांमध्ये स्त्रीवादाचा विचार प्रथमता पाश्चात्त देशांमध्ये झाला. जागतीकरणाच्या आजच्या काळात पुरुष प्रधानता व स्त्री पुरुष विषमता हे कोणत्या अवस्थेमध्ये पुढे येत आहे ते सहजपणे शोधणे महत्त्वाचे आहे. जागतिक स्तरावर स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाणे, स्त्री म्हणून राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीव यातून जगभर स्री वादी चळवळ उभी राहिली. समान दर्जा प्रस्थापित करायचा असेल तर सामाजिक बदल व्हावे लागतील. सामाजिक बदलांशी स्त्रीवादी या संकल्पनांचा जैव

संबंध असल्यामुळे त्यात वेळोवेळी भर पडत गेली. स्त्रियांचे अधिकार, कर्तव्य, हक्क, प्रश्न, बदलते सामाजिक संघर्ष इत्यादी अनेक घटकांमुळे स्त्रीवादी विचारसरणीचा गाभा बदलत आला आहे.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सोवियत युनियनच्या रूपाने समाजवादाच्या शोषित चळवळींना आधार वाटत होता. या समाजरचनेत स्त्रियांची स्थिती बदलू शकते आणि त्या समान नागरिकत्वाचे हक्क उपभोगू शकतात, असा ठाम विश्वास निर्माण झाला होता. १९२०-६० च्या कालखंडात स्त्रीवादी चळवळींनी स्त्रियांचे काही महत्त्वाचे आणि मूलभूत प्रश्न जगासमोर आणले. या प्रश्नांनी पुरुषप्रधान समाज रचनेला जबरदस्त आव्हान दिले. हे आव्हान स्वीकारून स्त्रीवादी चळवळीने मार्क्सवादी अभ्यास पद्धती स्वीकारली. परंतु मार्क्सवाद स्त्रियांच्या स्त्री म्हणून होणाऱ्या शोषणाबाबत समाधानकारक विश्लेषण देत नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. समाजवादी विचारसरणी आणि समाजरचना सर्व प्रकारचे शोषण आणि विषमता नष्ट करेल या मांडणीला सुद्धा स्त्रीवादाने आव्हान दिले. जगातील सर्व प्रश्नांचा स्त्री दृष्टिकोनातून विचार झाला पाहिजे असा आग्रह स्त्रीयांनी धरला आणि त्यांनी इतरांवर अवलंबून न राहता स्वतःच स्त्रीविषयक अभ्यासास सुरुवात केली. त्यामुळे १९५० पासून निर्माण झालेल्या स्त्रीवादी वाङ्मयाला स्त्रियांच्या बाबतीत आणि जगाच्या दृष्टीने बदलण्याच्या कामात खास महत्त्वाचे स्थान आहे. या काळातील लेखिका, विचारवंत, मानसशास्त्रज्ञ आणि कार्यकर्त्यांनी स्त्रीवादी संकल्पनेमध्ये मोलाची भर घातली आणि कोट्यावधी स्त्रियांच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून दिला. त्याला भाषा, प्रांत, देश यांच्या मर्यादा नाही. त्यामुळे स्त्रीवादी संकल्पना पाश्चात्त्य आहे की पौर्वात्य आहे अशी चर्चा म्हणजे वायफळ आहे. प्रत्येक देशातील प्रश्न वेगळे असू शकतील परंतु स्त्री- पुरुष समानता याबाबतचा विचार वेगळा असू शकत नाही. अविष्कारात फरक पडतो परंतु मूळ गाभा बदलत नाही. त्यामुळेच या आधुनिक स्त्रीवादाने सर्व जगातील स्त्रियांना स्वतःकडे स्त्री म्हणून, स्वतंत्र व्यक्ती म्हणून बघायला शिकविले आहे. ही शिकवण जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे. मात्र त्यानुसार सर्वत्र व्यवहार सुरू झाला आहे असे मात्र नाही. कोणत्याही संकल्पनेनुसार व्यवहार करणे ही जाणीवपूर्वक करायची बाब असते मात्र आपण पूर्णांशाने ते केले नाही.

## ३.२ विषय विवेचन

### स्त्री अभ्यासास प्रारंभ व विकास

स्त्री अभ्यासाची सुरुवात अमेरिकेत झाली असून ती संपूर्ण जगभर पसरली. १९ व्या शतकापासून मतदानाच्या हक्कासाठी इंग्लंड व अमेरिकेतील स्त्रियांनी चळवळी सुरू केल्या. पाश्चात्त्य देशांमधील स्त्री चळवळीची वाटचाल तीन टप्प्यांमध्ये सांगता येते. पहिला टप्पा १९२० पर्यंत कालखंड आहे. या काळात स्त्रियांनी मतदानाच्या हक्कासाठी चळवळी केल्या. १९२० ते १९६० चळवळीचा दुसरा टप्पा सांगता येतो. या काळातील चळवळीची पिछेहाट झाली. या काळात सर्व जग युद्धोत्तर पुनर्रचनेमध्ये गुंतले होते. सन १९६० नंतर तिसरा टप्पा सांगता येतो. या कालखंडात स्त्रीवादी चळवळीने गती पकडलेली दिसून येते. १९६० नंतर अमेरिकेत युद्धविरोधी चळवळी, विद्यार्थी चळवळी, निग्रोंच्या, गुलामांच्या चळवळी यांचा प्रभाव वाढला. बेटी फ्रीडन, सिमॉन दि बुव्हा, जर्मन ग्रियर, केट मिलेट, फायरस्टोन या स्त्रीवादी लेखिकेच्या लेखनाला

महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या लिखाणामुळे स्त्रियांनी गृहिणीची प्रतिमा नाकारून त्यांनी त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी बाहेर पडावे असे विचार वाढू लागले. पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांचे शोषण कसे करते याबद्दल जाणीव निर्माण होऊ लागली. या सर्व प्रयत्नांमुळे स्त्री अभ्यासास गती मिळाली. स्री प्रश्नांच्या मूळापर्यंत जाऊन ती मिटवण्याची उत्तरे कायद्यामार्फत व प्रबोधनामार्फत सोडवली जाऊ लागली. स्त्री अभ्यासास समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, पर्यावरण शास्त्र बरोबरच इतिहासातही स्त्री अभ्यासाला गती मिळाली.

**ब्रिटिश स्त्रीवाद:-**

ब्रिटीश स्त्रीवाद हा अमेरिकन स्री वादाच्या तुलनेने अधिक राजकीय आहे. त्याचा सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनावर अधिक भर आहे. ब्रिटिश स्रीवादाची उभारणी विद्यापीठाबाहेरील प्रकाशन संस्था, वृत्तपत्रे व प्रसार माध्यमे, राजकारणी गट, पंथ यातून झालेली आहे. ब्रिटिश स्त्रीवाद लिंग आणि वर्ग यातील परस्पर संबंधाच्या विश्लेषणावर भर देतो. तसेच पुरुषसत्तेच्या सामाजिक संरचनावर कसा प्रभाव असतो आणि त्यामुळे स्त्रिया कशा दडपल्या जातात, याची मीमांसा करतो.

**फ्रेंच स्त्रीवाद:-**

हा अमेरिकन व ब्रिटिश स्रीवादावरून वेगळा आहे. त्यात भाषिक चिन्ह व्यवस्थेतून अर्थ कसा निष्पन्न होतो, यावर भर दिला जातो. पुरुषप्रधान समाजरचनेतील भाषा व्यवहारावरही पुरुषसत्ता केंद्रस्थानी असते. पुरुषाचा शब्द म्हणजे कायदा, अशी लिंग प्रधान भाषिक सत्ता येथे अस्तित्वात आहे. त्यामुळे ज्ञान क्षेत्रावरही पुरुषसत्ता प्रभाव गाजवीत असते. हेलन सिझू यांनी गेय भाषा रचून नवी स्रीकेंद्री भाषिक रचना निर्माण करण्याचा पर्याय सुचविला. तर अंन रोझलिंड जोन्स हीने स्त्रीचे शरीर हा तिच्या लेखनाचा मूळ स्त्रोत मानून 'शरीरातून लिहिणे' या संकल्पनेवर भर दिला आहे.

**स्त्रीवादी विचार प्रवाह :-**

**उदारमतवादी स्त्रीवाद** (Liberal Feminism):-

संपूर्ण समाज रचना बदलण्यापेक्षा स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी प्राप्त व्हावी यावर भर देणारी ही विचार प्रणाली आहे.

**जहाल स्त्रीवाद** (Radical Feminism):-

स्त्रियांचे शोषण करणाऱ्या पुरुषांविरुद्ध आक्रमक लढा देऊन संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलण्याचा आग्रह धरणारी ही विचार प्रणाली आहे. पुरुष सत्तेचे केंद्र विचलित करणे आणि त्याला समांतर असे स्त्रीप्रधान केंद्र निर्माण करण्यावर या विचारधारेचा भर आहे.

**मूलतत्त्ववादी स्त्रीवाद** (Fundamental Feminism):-

स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक ताकदीने आपले श्रेष्ठत्व सिद्ध करू शकतात. या भूमिकेचा पुरस्कार करणारी हीविचार प्रणाली आहे.

**पर्यावरणवादी स्त्रीवाद** (Environmental feminism):-

ही विचारसरणी वनस्पती आणि प्राणी सृष्टीतील प्रजनन, संगोपन व संवर्धन यातील प्रकृतीकतेशी स्त्री शरीराचे संमेक नाते आहे, यावर भर देते. स्त्री धर्माच्या प्राकृतिकतेत अडसर निर्माण करणाऱ्या गर्भपात, गर्भजल परीक्षा इत्यादी अप्राकृतीक उत्तम विरुद्ध सामाजिक जनजागृती आणण्यावर भर देणारी ही विचारधारा आहे.

## ३.२.१ जागतिक महिला विचारवंत:-

१. मेरी वोल्स्टनक्राफ्ट

२. सिमॉन द बूव्हा

**प्रस्तावना:-**

स्त्रियांच्या हक्काक्षसाठी वैचारिक मांडणी करणारे लेखन १९ व्या शतकात प्रसिद्ध झाले. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणात स्त्रियांच्या प्रश्नाक्षवर जाणीव-जागृती घडून आली. तिच्या दुय्यमत्त्वाची चिकित्सा केली गेली. मेरी वोल्स्टन क्राफ्ट हिने प्रथम इ.स. १७९२ मध्ये 'स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ ब्रिटन मधील स्त्रीवादाला चालना देणारा मानला जातो. या ग्रंथात तिन स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन केले व त्यांना समानतेची वागणूक मिळावी असे मत मांडले. स्त्रियांना समाजामध्ये मानाने जगण्याचा अधिकार आहे व स्त्री स्वतःच्या कर्तृत्वावर स्वतंत्र जीवन जगू शकते, असे प्रतिपादन तिने केले. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता रूसोच्या 'फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन' या ग्रंथात स्त्रियांना फक्त शृंगार, कला व कौशल्याबद्दल ज्ञान द्यावे असे मत व्यक्त केले होते. रुसोच्या या वक्तव्यावर मेरी क्रॉफ्ट हिने जोरदार टीका केली. यावर त्यांनी आपले मत नोंदवले. ती म्हणते, स्त्रियांना सर्व गोष्टींचे शिक्षण द्यावे. त्यामुळे स्त्री ही समाजामध्ये स्वतंत्ररीत्या स्वकर्तृत्वावर वावरू शकते व स्वतंत्र आयुष्य जगू शकते.

मार्गारेट फुलरचे '१९ व्या शतकातील स्त्रिया' (१९४५) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यात स्त्रियांच्या दडपणुकीमुळे मानसिक आणि सांस्कृतिक परिणाम काय होतात याचा तपशील दिला आहे. त्या काळातील अमेरिकी समाजातील स्त्रियांचे महत्त्व सांगणारे हे पुस्तक आहे. तर व्हर्जिनिया वुल्फ या ब्रिटिश लेखिकेने 'A Room Of Ones Own' हा ग्रंथ १९१९ मध्ये लिहिला. त्यात तिने स्त्रियांना आपल्या क्षमतांचा आविष्कार करण्यासाठी पुरुषोत्तर समाज व्यवस्थेत कुठलाच वाव नाही हे स्पष्ट केले.

**१. मेरी वोल्स्टनक्राफ्ट** :-(२७ एप्रिल १७५९-१० सप्टेंबर,१७९७)

**पूर्व वृत्तांत:-**

मेरी वोल्स्टनक्राफ्ट हिचा जन्म २७ एप्रिल १७५९ मध्ये लंडन मधील स्पिटाफिल्ड्स येथे झाला. ही अठराव्या शतकातील लेखिका व तत्त्वज्ञ होती. ती उदारमतवादी स्त्रीवादाचा समर्थन करणारी पहिली स्त्रीवादी विचारवंत होती. तिने महिला हक्का संदर्भात लिखाण केले. तिने आपल्या संक्षिप्त कारकिर्दीत कादंबरी,

प्रदीर्घ लेखन, प्रवास वर्णन, फ्रेंच राज्यक्रांतीवर लेखन, इतिहासाचे एक आचार पुस्तक आणि लहान मुलांसाठीचे पुस्तक असे विविध प्रकारचे लेखन केले. मेरी वोल्स्टन क्राफ्ट यांनी आपल्या 'ए विंडिकेशन ऑफ द राइट्स ऑफ वुमन' (इ.स.१७९२) या पुस्तकात स्त्री पुरुष नैसर्गिकरित्या कनिष्ठ नाहीत असे प्रतिपादन करते व स्त्रियांमध्ये केवळ शिक्षणाची कमतरता असल्याची पुष्टी करते. याशिवाय तिने असे सुचवले की पुरुष आणि स्त्रिया या दोघांना विवेकी व्यक्ती म्हणून वागवले पाहिजे आणि सामाजिक व्यवस्था ही विवेकावर स्थापित आहे अशी कल्पना करते. तिचा हा ग्रंथ स्त्रीवादाला चालना देणारा मानला जातो.

मेरी क्राफ्ट शेतकऱ्याची मुलगी होती. सुरुवातीला तिने शाळेमध्ये शिकवण्याचे काम केले आणि एक गव्हर्नेस म्हणूनही काम केले. एडमंड बर्क यांच्या 'रिफ्लेक्शन्स ऑन द रिव्हॉल्युशन इन फ्रान्स' या पुस्तकाचा मेरी वोल्स्टेन क्राफ्ट हिच्यावर प्रभाव पडला व प्रेरणा मिळाली. तसेच अमेरिकन क्रांती व फ्रान्स क्रांती यांचा तिच्यावर प्रभाव होता. इ.स. १७८८ मध्ये तिने लंडनचे प्रकाशक जोसेफ जॉन्सन यांच्याकडे अनुवादक म्हणून काम सुरू केले. त्यांनी तिची अनेक पुस्तके प्रकाशित केली. १७९२ मध्ये मेरी क्राफ्ट ने इंग्लंड सोडले व पॅरिसमध्ये फ्रान्स क्रांतीचे निरीक्षण करण्यासाठी गेली. तिथे ती अमेरिकी कॅप्टन गिल्बर्ट इमले बरोबर राहिली. १७९४ मध्ये त्याच्यापासून तिने एका मुलीला जन्म दिला. तिचे नाव फैनी असे होते. पण लवकरच तिचे कॅप्टन गिल्बर्ट इमले बरोबरचे संबंध संपुष्टात आले. त्यामुळे व्यथित होऊन तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

**कार्य:–**

**महिला शिक्षणासंबंधी विचार**

मेरीने आपल्या पहिले पुस्तक 'थॉट्स ऑन द एज्युकेशन ऑफ डॉटर्स' मध्ये महिलांच्या शिक्षणाविषयी आपले विचार मांडले आहेत. हे पुस्तक ब्रिटनमधील मध्यमवर्गीय परिवारामध्ये एका आईला आपल्या मुलींबद्दल लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, इमानदारी व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी जे गुण आवश्यक आहेत त्यासाठी प्रोत्साहित करते. क्राफ्टचे प्रयत्न प्रत्येक स्त्रीला शिक्षित करणे हा होता.

**महिला समानता विचार:–**

स्त्रियांनी आपल्या बुद्धिमत्तेवर व विशिष्ट गुणांवर भर दिला पाहिजे. केवळ पतीला प्रसन्न करण्यासाठी आपली ऊर्जा नष्ट करू नये. भलेही पुरुष शारीरिक दृष्ट्या स्त्रियांपेक्षा बलशाली, शक्तिशाली आहेत परंतु विवेक व तर्क यामध्ये स्त्रिया समान आहेत. कारण क्राफ्ट मतानुसार मानव विवेकशील तथा तार्किक प्राणी आहे. म्हणून स्त्रियांना सुद्धा समान अधिकार किंवा स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे आणि हे सर्व शिक्षणातून घडून येईल. म्हणून स्त्रियांना पुरुषांबरोबर शिक्षण दिले पाहिजे.

**स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली (इ.स.१७९२)**

(A Vindication of the Rights of Women)

मेरी क्राफ्ट हिने प्रथम १७९२ मध्ये स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ ब्रिटन मधील स्री वादाला चालना देणारा मानला जातो. या ग्रंथात तीने स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन केले व त्यांना समानतेची वागणूक मिळावी असे मत मांडले. स्त्रियांना समाजामध्ये मानाने जगण्याचा अधिकार आहे व स्री स्वतःच्या कर्तृत्वावर स्वतंत्र जीवन जगू शकते असे प्रतिपादन केले. प्रसिद्ध तत्ववेत्ता रुसोच्या 'फिलॉसॉफी ऑफ एज्युकेशन' या ग्रंथात त्याने स्त्रियांना फक्त शृंगार, कला व काव्याबद्दल ज्ञान द्यावे असे मत व्यक्त केले होते. रुसोच्या या वक्तव्यावर मेरी क्राफ्ट ने जोरदार टीका केली. यावर तिने आपले मत नोंदवले. ती म्हणते, स्त्रियांना सर्व गोष्टीचे शिक्षण द्यावे. त्यामुळे स्त्री ही समाजामध्ये स्वतंत्ररित्या स्वकर्तृत्वावर वावरू शकते व स्वतंत्र आयुष्य जगू शकते.

तिला अशी जाणीव झाली की, तिच्या वेळची शिक्षण व्यवस्था ही जाणीवपूर्वक महिलांना तुच्छ व असक्षम बनवण्यासाठी प्रशिक्षित करते, तिने असे म्हटले आहे की अशी शिक्षण व्यवस्था निर्माण झाली पाहिजे की ज्यामुळे स्त्री-पुरुष या दोघांनाही समान लाभ होईल. परिणामी अशा स्त्रिया निर्माण होतील त्या केवळ चांगल्या सहचरणी बनणार नाहीत तर, अनेक व्यवसायामध्ये सक्षम कार्यकर्त्या देखील होतील. जर महिलांना समान शिक्षणाची संधी मिळाली तर राजकीय व सामाजिक जीवनामध्ये लैंगिक भेदभाव नष्ट होऊ शकतो. व्यक्तीचे महत्त्व त्याची प्रतिभा, योग्यता आणि चरित्र यांच्या आधारावर असले पाहिजे. यापूर्वी सुद्धा अनेक स्त्रीवादी महिलांनी अशा शिक्षण व्यवस्थेबद्दल लिहिले होते. परंतु मेरी क्राफ्ट हिने सुचवलेली ही शिक्षण व्यवस्था एकमेव द्वितीय होती व तिचा परिणाम राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेमध्ये होऊन राजकीय माध्यमा द्वारे परिवर्तन करू शकतात. तिने असा निष्कर्ष काढला की असा जर बदल झाला तर त्याचा पूर्ण समाजाला लाभ होईल.

मेरी क्राफ्ट पुन्हा लंडनला गेली व एक प्रभावशाली कट्टर पंथीयांच्या समूहामध्ये सामील झाली. त्यामध्ये थेवीलियम गॉडविन, थॉमस पेन, थॉमस होलक्राफ्ट, विलियम ब्लॅक, विलियम वर्ड्सवर्थ यांचा समावेश होता. १७९६ मध्ये तिने गॉडविन बरोबर संबंध प्रस्थापित केले व ती त्याच्यापासून गर्भवती झाली. तेव्हा तिने त्याच्याबरोबर विवाह केला. तिचा हा विवाह सुखमय परंतु संक्षिप्त होता. तिने दुसरी मुलगी शेलीला जन्म दिला व तिच्या जन्मानंतर अकरा दिवसानंतर (१० डिसेंबर १७९७) तिचा मृत्यू झाला. तिच्या मृत्यूनंतर तिने केलेले लिखाण, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क या प्रवासादरम्यान तिने लिहिलेली पत्रे, एक समाजशास्त्रीय व उत्तम असा प्रवास वृत्तांत, और मारिया, द रॉग्स  ऑफ वुमन तिच्या मृत्यूनंतर प्रकाशित अपूर्ण रचना आहेत की ज्या 'विंडिकेशन ऑफ राइट्स ऑफ द वुमन' या ग्रंथाचा दुसरा भाग आहे.

अशाप्रकारे मेरी क्राफ्ट उदारमतवादी स्त्रीवादाची समर्थन करणारी पहिली महान स्त्रीवादी विचारवंत होती. ती विवाह आणि परिवार यांच्या विरोधी नव्हती. तिने फक्त  स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर भर दिला. तिने स्त्रियांच्या जीवनामध्ये सर्व बाबतीत समान अधिकार देण्यासाठी ती कार्य केले. तिच्या मतानुसार स्त्रियांना

पुरुषांची मालमत्ता म्हणून बघितले जात आहे.यातून त्यांच्यावर घरगुती हिंसाचारही केले जातात. स्त्रियांचा संपत्तीवर कोणताही अधिकार नाही. म्हणून तिने स्त्रीला तिचा दर्जा देण्यासाठी, स्त्री- पुरुष यांच्यामध्ये समानता आणण्यासाठी प्रयत्न केले.

## २. सिमॉन द बूव्हाः (१९०८-१९८६):-

स्त्रीवादी विचारवंतांमध्ये सिमॉन द बूव्हा हिचे स्थान अनन्यसाधारण आहे. फ्रेंच लेखिका, तत्त्वज्ञ, राजकीय कार्यकर्ती, स्त्रीवादी चळवळीचे अग्रणी म्हणून ती ओळखली जाते. साहित्य, राजकारण आणि स्त्रियांची चळवळ यामध्ये स्वतःचे अस्तित्व निर्माण करणारी, सर्वसाधारण स्त्रियांपासून दूर असलेली, अपरिचित असे व्यक्तिमत्व असलेली सिमॉन द बूव्हा सुरुवातीला स्त्रियांच्या चळवळीपासून अलिप्त होती. दुसऱ्या महायुद्धोत्तर काळात नव्या स्त्रीवाद्यांची जी पहिली पिढी उदयाला आली, तिच्यावर सीमॉन यांच्या 'दि सेकंड सेक्स' (दुय्यम लैंगिक अस्तित्व) या पुस्तकांने खोलवर परिणाम केला. त्यांच्या या पुस्तकांनी प्रथम स्त्रीवादाला इतिहासाच्या पायावर स्थिर करण्याचा प्रयत्न केला. तिचे हे आत्मचरित्र चार खंडांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. त्यामध्ये तिने अत्यंत प्रामाणिक व प्रांजळपणे खाजगी जीवनाबद्दल माहिती दिली आहे.

### पूर्व वृत्तांतः-

सिमॉन दि बूव्हा हिचा जन्म ९ जानेवारी, १९०८ साली पॅरिस येथे एका मध्यमवर्गीय कॅथोलिक कर्मठ बुर्जवा कुटुंबात झाला. तिचे वडील वकील होते व सरदारकी घराण्याशी नाते होते. त्यांना रंगभूमी विषयी ओढ होती. ते ईश्वर न माणणारे व उजव्या शक्तींच्या अतिरेकी गटाला पाठिंबा देणारे होते, तर आई पूर्ण वडिलांविरुद्ध व्यक्तिमत्व असलेली होती. ती कॉन्व्हेंटमध्ये शिकली होती आणि पारंपारिक विचार करणारी होती. या दोहोंमधील असमानतेमुळे सिमॉन द बूव्हाचे बालपण एका अर्थाने कधीही न संपणाऱ्या वाद विवादाने भरलेले होते. त्यामुळेच कदाचित ती विचारवंत झाली. वयाच्या बारा-तेराव्या वर्षी तिने आई-वडिलांविरुद्ध बंड पुकारले आणि कुटुंब नावाची संस्था अनाधिकृत ठरविली. तिने विवाह आणि मातृत्व या दोन्हीतून स्वतःला मोकळे करण्याचा निर्णय घेतला.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना साहित्य आणि तत्त्वज्ञान या विषयांची आवड त्यांच्या मनात निर्माण झाली आणि त्यातूनच अस्तित्ववादाचा अभ्यास त्यांनी चालू केला. तत्त्वज्ञान विषयाचा सखोल अभ्यास करत असताना त्यांची भेट झां-पॉल सात्र नावाच्या तरुण विद्यार्थ्याशी झाली व दोघांमध्ये मैत्री झाली. अस्तित्ववादाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या सात्रचा त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनावर नितांत प्रभाव राहिला. त्याचाही विचार तिच्याप्रमाणेच म्हणजे उजवा विचार, पारंपरिक विचारसरणी, आणि धार्मिकता याबद्दल नाराजी होती. दोघांनाही डाव्या विचारसरणीबद्दल आपलेपणा होता. सर्वप्रथम दोघांनीही अधिकाधिक काळ लेखक म्हणून विचारांची चिकित्सा करणार असे ठरले. सिमॉन आणि सात्र यांच्यामध्ये निर्माण झालेले भाऊबंद शेवटपर्यंत कायम होते.

१९३० च्या दशकात सीमॉन यांनी तत्त्वज्ञान आणि साहित्य यांच्या अध्यापनाचे काम केले .परंतु दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर त्यांना प्राध्यापक पदावरून दूर करण्यात आले. १९४० नंतर त्यांनी

साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश केला आणि लवकरच लेखिका म्हणून ती उदयाला आली. तिच्या साहित्य प्रकारात कादंबरी, नाटक आणि निबंध लेखन यांचा प्रामुख्याने समावेश होतो. नंतरच्या काळात त्यांनी प्रवास वर्णन आणि आत्मचरित्र लेखन करायलाही सुरुवात केली. शी केम टू स्टे (१९४३), द ब्लड ऑफ अदर्स (१९४५), ऑल मेन आर मोर्टल (१९४६), या कादंबऱ्या आणि अमेरिका डे बाय डे (१९४८) आणि द लाँग मार्च (१९५७) ही प्रवासवर्णने, मेमरीज ऑफ अ ड्यूटीफुल डॉटर द (१९५८), द प्राईम लाईफ (१९६०), फोर्स ऑफ सकर्मस्टन्स (१९६३) व ऑल सेट अँड डन (१९७२) ही आत्मचरित्रपर पुस्तके ही त्यांची प्रमुख ग्रंथसंपदा आहे. १९४० च्या दशकात त्यांनी नियतकालिकांमध्ये निबंध लेखन आणि संपादन देखील केले. मात्र स्पॅनिश नागरी युद्ध व दुसरे महायुद्ध या घटना नंतर तिच्या आयुष्यात अमुलाग्र बदल झाले.

**दि सेकंड सेक्स (दुय्यम लैंगिक अस्तित्व):-**

सिमॉन द बूव्हा यांचे 'दि सेकंड सेक्स' हे पुस्तक इ.स. १९४९ साली प्रसिद्ध झाले. हे पुस्तक लिहिताना त्यांनी स्त्रीवादी म्हणून लेखन केले नाही. या पुस्तकात दडपलेल्या गटांचा एक भाग म्हणून स्त्रियांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याला सामाजिक परिस्थितीमुळे मर्यादा कशा पडतात या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सांगतात की 'दी सेकंड सेक्स' हे पुस्तक जवळजवळ अपघातानेच माझ्याकडून लिहिले गेले. परंतु तिला स्वतःबद्दल बोलायचे होते. पण असे करत असताना तिला स्त्रियांच्या स्थितीबद्दल वर्णन करणे आवश्यक वाटले. तिने असे म्हटले आहे की वयाची चाळीशी उलटल्यानंतर जगातला असा एक घटक तिला दिसला की तिने तो कधीच लक्षात घेतला नव्हता. स्त्रियांच्या परिस्थितीचा विचार मनात ठेवून ती स्वतःकडे बाई म्हणून पाहू लागली. जेव्हा तिचे पुस्तक इतर स्त्रियांना आपले वाटू लागले. तेव्हा ती म्हणते की मी स्त्रीवादी झाले.

या पुस्तकात त्यांनी स्त्रियांच्या संदर्भात अस्तित्ववादाचा सिद्धांत मांडला आहे. व्यक्तीचे अस्तित्व हे त्याच्या शरीराबरोबरच मानसिक जाणिवेवर अवलंबून असते. हे अस्तित्ववादाचे मूलभूत गृहीतक असते. या सिद्धांताच्या आधारे त्यांनी स्त्री-पुरुष यातील सामाजिक भेद हे स्पष्ट केला आहे. स्त्रीला मिळणारे दुय्यम स्थान हे नैसर्गिक नसून ज्या प्रकारे तिला वाढवले जाते, तिच्यावर संस्कार केले जातात, त्यातून ती निर्माण होते. स्वातंत्र्य, निर्णय क्षमता, तर्कनिष्ठता, आत्मविश्वास हे पुरूषांचे गुण मानले गेले असल्यामुळे ते गुण स्त्रीमध्ये रुजवले जात नाहीत. पुरुष स्वतःला आद्यतत्त्व व स्त्रीला दुय्यम तत्त्व समजतो. त्यामुळे पुरुष स्त्रीचे शोषण करतो. स्त्री-पुरुषांमधील भेदभाव, आपण स्त्री असल्याची सतत जाणिव आणि भोवतालच्या समाजाने पुरुष प्रधानता जोपासणे, संपूर्ण समाज व्यवस्थाच पुरुष केंद्रित असणे या सगळ्यात स्त्री समस्याचे मूळ आहे. स्त्रीला सशक्त व सबला बनवायचे असेल तर तिच्या मानसिकतेमध्ये बदल झाला पाहिजे. स्त्रीत्वाचा तिला अभिमान वाटला पाहिजे. त्यामुळे ताठ मानेने ती आयुष्याला सामोरे जाऊ शकेल. सीमॉन यांच्या मते वैयक्तिक सुखापेक्षा वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्व आहे. त्यांच्या मते स्त्री ही जन्मत नाही तर ती घडविली जाते. स्त्री व पुरुष यांच्यातील नैसर्गिक फरकांना अवास्तव महत्त्व दिल्यामुळेच त्यांच्या सामाजिक स्तरांमध्ये दरी निर्माण झाली आहे.

सीमॉन यांनी ज्या काळात लिखाण लिहिले त्या काळातील स्त्री चळवळीला प्रामुख्याने स्त्रियांचे अर्थार्जनाचे हक्क, स्त्रियांचे राजकीय हक्क यासाठी काम करत होती. मात्र त्या समस्यांचे मूळ स्त्रीचे सामाजिक स्थान दुय्यम असण्यात आहे. याविषयी फारसे विचार केला गेला नव्हता व या स्वरूपाचे काही लेखन निर्माण झाले नव्हते. त्यामुळे सिमॉन यांचे विचार हे स्त्रीवादी चळवळीला एक वेगळी दिशा देणारे ठरले. या अर्थाने त्यांना स्त्रीवादी चळवळीची अग्रणी मानले जाते.

मात्र स्त्रियांच्या समस्यांविषयी विवेचन करताना पुरुषांच्या भूमिकेत कशाप्रकारे बदल व्हायला हवा याविषयी सीमॉन कोणतेही मुद्दे मांडत नाही. टीकाकारांच्या मते समाजात सीमॉन यांच्या अनेक मुद्द्यांवर टीका होत असली तरी स्त्रियांची मानसिकता बदलण्यात, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यात तसेच स्त्रीत्व, त्यांचे कुटुंबातील स्थान, त्यांची पुनरूत्पादन क्षमता आणि त्याविषयी निर्णय घेण्याचा त्यांचा हक्क, कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे होणारे शोषण अशा प्रश्नांविषयी जागृती निर्माण होण्यात सीमॉन यांच्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकाचे मोठे योगदान आहे. कारण स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची इतकी सखोल कारणमिमांसा कोणी केली नाही.

**मूल्यमापन:–**

स्त्री प्रश्नांच्या संदर्भात सीमॉन दि बूव्हा ही पहिली प्रमुख लेखक आहे जिने या प्रश्नाला तत्त्वज्ञानात्मक पाया दिला. तिच्या लेखनाच्या पूर्वी स्त्रियांच्या प्रश्नाकडे इतर सामाजिक मूल्ये आणि प्रश्न यांच्यापासून तोडून तरी पाहिले गेले होते किंवा त्यांची सोडवणूक अतिशय गुळगुळीत अथवा वरवरच्या पद्धतीने केल्यासारखे दाखवले जात होते. फुरिअर, मार्क्स, एंगेलस, बेबेल, मिल आणि फ्राईड असे काही विचारवंत यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांच्या प्रश्नांची पूर्ण तर्कनिष्ठ चौकट मांडली नव्हती. बूव्हाने जाणीवपूर्वक अस्तित्ववादी दृष्टिकोन स्त्रियांच्या परिस्थितीच्या अभ्यासाला उपयोजित केला आणि स्त्रियांच्या समस्यांना एका उच्च गंभीर पातळीवरील संशोधनाशी जोडले. मानवी विकासात तिच्या विशिष्ट स्वभावामुळे ज्या समस्या, चिंता आणि भावना निर्माण होतात त्यांचे संवेदनक्षम आकलन ज्या तऱ्हेने बूव्हानी केले आहे ते अतुलनीय आहे. तिने जो इतिहासाचा वापर करून स्त्रियांच्या दुययमत्त्वाच्या बदलत्या अविष्कार आणि या यशाबद्दल परिशीलन केले आहे हे सुद्धा तिचे मोठे यश आहे असे सर्व स्त्रीवाद्यांनाही वाटते. बहुतेक स्त्रीवाद्यांनी इतिहासाच्या क्षेत्रात काम करताना तिच्या लेखनाचा आधार घेतला आहे. उदा. समकालीन स्त्रीवाद्यांनी जी लिंग आणि लिंगभाव ही वैचारिक चौकट नंतरच्या काळात विकसित केली त्यावर सीमॉन बुव्हाने जो ऐतिहासिक आढावा घेऊन पुरुषसत्ताक विचार प्रणालीतून स्त्रीचे होणारे सामाजिककरण याचे सम्यक चित्रण मांडले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. स्त्री अभ्यासाची सुरुवात .......... येथे झाली.

अ) इंग्लंड   ब) फ्रान्स   क) अमेरिका   ड) भारत

२. फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क ......... मध्ये प्राप्त झाला.

अ) १९४५   ब) १९५०   क) १९५५   ड) १९६०

३. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या हक्कांसाठी वैचारिक मांडणी करणारा ......... हा मागरिट फुलरचा ग्रंथ प्रसिद्ध झाला.

अ) द सब्जेक्शन ऑफ वुमेन   ब) १९ व्या शतकातील स्त्रिया

क) द सेकंड सेक्स   ड) स्त्री पुरुष तुलना

४. १९७७ मध्ये ......... यांनी Towards a black feminism या पुस्तकात प्रथम कृष्णवर्णीय स्त्रीवादाची मांडणी केली.

अ) बार्बारा स्मिथ   ब) बेटी फ्रीडन   क) मेरी क्राफ्ट   ड) मागरिट फुलर

५) 'विंडिकेशन ऑफ द राइट्स ऑफ वुमन' हा ग्रंथ यांनी लिहिला.

अ) मेरी क्राफ्ट   ब) जॉन स्टुअर्ट मिल क) व्हर्जिनिया उलफ ड) बेटी फ्रीडन

ब) खालील दिलेल्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| १. मेरी वूल्स्टनक्राफ्ट. | अ) द सेकंड सेक्स |
| २. सीमॉन दि बुव्हा. | ब) वूमन इन द नाईन्टीन्थ सेंच्युरी |
| ३. मार्गरेट फुलर. | क) विंडिकेशन ऑफ राईटस ऑफ वूमन |
| ४. बार्बरा स्मिथ. | ड) A Room one's own |
| ५. व्हर्जिनिया उल्फ. | इ) Towards a Black Feminism |

अ) १-ब, २-क, ३-ड, ४-इ, ५-अ

ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड, ५-इ

क) १-क, २-अ, ३-ब, ४-इ, ५-ड

ड) १-ड, २-इ, ३-अ, ४-क, ५-ब

क) खालील वाक्यापैकी चूक व बरोबर लिहा.

१. ब्रिटिश स्त्रीवाद हा अमेरिकन स्त्रीवादाच्या तुलनेने अधिक राजकीय आहे.

२. संपूर्ण समाजरचना बदलण्यापेक्षा स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी प्राप्त व्हावी यावर भर देणारी जहालवादी विचार प्रणाली होय.

अ) पहिले वाक्य चुकीचे आहे दुसरे वाक्य बरोबर आहे.

ब) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

ड) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

### ३.२.३. जागतिक महिला विचारवंत व समाज सुधारक–

१. केट मिलेट २. शुलामीथ फायरस्टोन

### १. केट मिलेट:–

**पूर्व वृत्तांत:**

केट मिलेटचा जन्म १४ सप्टेंबर, १९३४ रोजी मिनेसोटा येथे झाला. त्यांचे शिक्षण कला शाखेत ऑक्सफर्ड विद्यापीठात झाले. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील स्त्रीवादाचा पाया सीमॉन दी बूव्हाचया लेखनाने घातला गेला. केट मिलेट अशी एक प्रमुख प्रभावी लेखक आहे की जिने जहाल स्त्रीवादाच्या आकांक्षा आणि तत्वे यांना वाचा फोडून अभिव्यक्ती दिली. केट मिलेट ही अमेरिकन स्त्रीवादी लेखिका, शिक्षक, कलाकार आणि कार्यकर्ता होती. त्यांच्या 'सेक्सुअल पॉलिटिक्स' या पुस्तकाने त्यांना नाव मिळवून दिले. त्यांचे हे पहिले पुस्तक आहे जे कोलंबिया विद्यापीठातील तिच्या पीएचडी प्रबंधावर आधारित आहे. १९७० मध्ये पीएच.डी. प्रकाशित केले होते. हे पुस्तक स्त्रीवादाचे उत्कृष्ट आणि मुलगामी स्त्रीवादाच्या मुख्य ग्रंथापैकी एक म्हणून ओळखले जाते. यामध्ये स्त्री–पुरुष यांच्यातील संबंधाचे राजकारण हा विषय होता. त्यांच्यामते यातील पुरुष गट स्त्री गटाला नियंत्रित करीत असतो. त्यामुळे स्त्रियांना बंधनाचा, अन्यायाचा सामना करावा लागतो. लैंगिक राजकारणात विसाव्या शतकातील प्रमुख कला आणि साहित्यात पुरुषांच्या वर्चस्वावर स्पष्टपणे लक्ष केंद्रित केले जाते. मिलेटच्या मते, पाश्चात्त्य साहित्य, पितृसत्ताक रचना आणि समाजाची भिन्नता दर्शवते. पुरुषांनी स्त्रियांवर सत्ता प्रस्थापित केली आहे, परंतु ही शक्ती जन्मजात किंवा जैविक गुणा ऐवजी सामाजिक रचनेचा परिणाम आहे असे त्या म्हणतात.

१९७१ साली वेश्या व्यवसायावरील जी पहिली स्त्रीवादी परिषद झाली. त्यामध्ये तिने नेतृत्व दिले आणि सहभाग घेतला. याच वर्षी तिने आपले दुसरे पुस्तक The Prostitution papers- 'वेश्या व्यवसायासंदर्भातील दस्तऐवज' प्रसिद्ध केले. परिवर्तनासाठी काम करणारी नियतकालिके म्हणजे Change Magazine अशा जहाल मासिकांमध्ये तिने अधून मधून वार्ताहर म्हणून कामही केले. १९६८ साली मिलेट यांनी 'लैंगिकतेचे राजकारण: क्रांतीसाठी जाहीरनामा' लिहिला. हा जाहीरनामा कोलंबीया विद्यापीठातील पहिल्या स्त्रीमुक्ती गटाच्या संघटनेसाठी झालेल्या सभेच्या संदर्भात लिहिला. त्यावेळी दि कोलंबिया रेडिओ स्टेशन यांनी तो प्रसिद्ध करण्यास नकार दिला. तेव्हापासून लेखक म्हणून, चित्रपट निर्माती म्हणून, शिल्पकार म्हणून आणि कृतीशील स्त्रीवादी म्हणून तिने आपले आयुष्य घालवले.

१९७० साली मिलेटचे ‘लैंगिकतेचे राजकारण’ या पहिल्याच पुस्तकाने तिला फार मोठी प्रसिद्धी मिळवून दिली. समकालीन अमेरिकन समाजामध्ये स्त्रियांचे जग आणि स्त्रीवाद्यांचे स्थान उंचावण्यामध्ये या पुस्तकांनी मोठी भूमिका बजावली आहे.

**जहाल स्त्रीवादा संदर्भातील मिलेटची पार्श्वभूमी:–**

जहाल स्त्रीवाद स्त्रियांच्या दुय्यम स्थानाची चिकित्सा करतो व सर्वस्वी या दुय्यम परिस्थितीस पुरुषवर्ग कसा जबाबदार आहे याची शहानिशा करतो. ऐतिहासिक दृष्ट्या स्त्रियांचे शोषण हे सर्वात प्रथम झाले. हे शोषण सर्वात जास्त व्याप्ती असणारे म्हणून त्याकडे आपणास पाहता येईल. हे शोषण इतर शोषणाला चौकट पुरवते. अशा शोषणाला स्त्रिया बळी पडतात व स्वतः मात्र या शोषणाबद्दल अज्ञानी असतात. जहाल स्त्रीवादी या संदर्भात स्त्रियांच्या जाणिवा जागृती करतात. स्त्रियांच्या शोषणाची मुळे ही वंशसातत्यात स्त्री आणि पुरुषाने बजावलेल्या भूमिकेत आहेत असे मानतात. हे शोषण शारीरिक/जैविक क्रांतीनेच संपुष्टात येईल असे मानतात. थोडक्यात, स्त्रियांनी मातृत्वाची जबाबदारी नाकारणे असा अर्थ काढता येईल.

मिलेट हिने जहाल स्रीवादा संदर्भात विचार मांडले. त्यामुळे जुन्या आणि नव्या मधील भेद स्पष्ट होतो. स्त्रीचा पुरुषाप्रमाणेच एक लैंगिक स्वभाव असतो आणि तो निश्चित स्वरूपात बाईपणाच्या प्रवृत्ती आणि वागणूकीतून अभिव्यक्त होतो, असे समाजवादी स्त्रीवादी गृहीत धरतात. या विरोधात जहाल स्त्रीवादी मानवी अस्तित्वाला असा काही लैंगिक स्वभाव अस्तित्वात असतो हेच नाकारतात.

मिलेटचे ‘लैंगिकतेचे राजकारण’ हे पुस्तक प्रथमता सामाजिक आणि खाजगी जीवनातील ही पुरुषी वर्चस्वाची रचना नष्ट करू पाहते. स्री वादाची ही जी कल्पना आहे ती १९७० मध्ये अनेक जहाल स्त्रीवादी संकल्पनामधील एक आहे.

**लैंगिकतेचे राजकारण:–**

**क्रांतीसाठी जाहीरनामा–**

१९६८ साली मिलेटने लिहिलेले ‘क्रांतीसाठी जाहीरनामा’ हे परिपत्रक थोडक्यामध्ये तिची भूमिका स्पष्ट करते. जेव्हा एक गट दुसऱ्यावरती सत्ता गाजवतो तेव्हा त्या दोघांमधील नाते राजकीय होते. जेव्हा अशी व्यवस्था बराच काळापर्यंत चालू राहते तेव्हा त्यातून सरंजामशाही किंवा वंशवाद अशा तर्हेच्या प्रणाली तयार होतात. सर्व ऐतिहासिक समाज व संस्कृती बहुतेक पितृसत्ताकतेने ग्रासलेल्या दिसतात. त्यांच्या विचारप्रणालीत पुरुषी वर्चस्व असते. इतर दडपलेल्या गटाप्रमाणे स्त्रियांना सातत्याने शिक्षण प्रतिनिधित्व, प्रतिष्ठेची प्रतिमा आणि आत्मसन्मान तसेच समानतेचा दर्जा आणि माणूस म्हणून ओळखले जाणे हे सर्व सातत्याने नाकारले जाते. अगदी आजही त्यांना मिळणाऱ्या नकाराचे स्वरुप जरी बदलले असले तरी सुद्धा नकार सातत्याने चालूच आहे. स्त्रियांसाठी मुद्दाम दुय्यम दर्जाचे शिक्षण रचले जाते. विवाह किंवा विविध प्रकारच्या वेश्याव्यवसायाच्या चौकटीत लैंगिकतेची विक्री करण्याचे उदरनिर्वाच्या पातळीपर्यंतच तगून राहण्याचे जीवन जगण्याची सक्ती होते. स्त्रिया कोणत्याही अधिकाराची जागा खऱ्या अर्थाने धारण करीत

नाहीत. जणू काही मानव जीवन पद्धती मुलत: पुरुष अथवा नर यांच्यासाठीच घडवली गेली आहे. नर म्हटले की अरेरावी, बुद्धीनिष्ठता, बळजबरी आणि तत्परता असे गणित दिसते. महिला म्हटली की उदासीनता, कृतीहीनता, अज्ञान, सहनशील, गुणी आणि एकूण प्रभावहिनता असे समीकरण दिसते. लैंगिक भूमिका नावाची जी संकल्पना आहे त्यामधून घरकाम आणि बालसंगोपन हे सर्व स्त्रियांना आंदन दिले जाते आणि उरलेले सर्व मानवी पैलू उदाहरणार्थ गुणवत्ता आणि महत्त्वकांक्षा पुरुषांना बहाल केली जाते. पुरुषसत्ताक धर्म संपत्तीची व्यवस्था, कुटुंब, विवाह घर नावाची कल्पना एकूण पौरुषगामी संस्कृती आणि एकूण पुरुषी श्रेष्ठत्वाची आग्रही सर्वमान्य तत्वे या सर्व संस्थांमधून पुरुषांची सत्ता रूढ केली जाते. लैंगिकतेची क्रांती होईल तेव्हा एक विवेकनिष्ठ नैतिक मानवतावादी भूमी तयार होईल. लैंगिक क्रांतीमुळे लैंगिक दडपणूक संपून अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य निर्माण होईल आणि लैंगिक ऊर्जा मुक्त होईल. लैंगिक क्रांतीमुळे स्त्री–पुरुषांमध्ये स्वतंत्र कप्पेबंद गुणवत्तेची रचना, स्वभाव आणि वागणूक असते असे मानणेच संपेल आणि यामुळे मर्यादित, संकुचित, अर्धवट व्यक्तित्वाच्या माणसा ऐवजी सम्यक व्यक्तिमत्त्वे विकसित होतील. ऐतिहासिक काळापासून लैंगिकता ज्याप्रकारे मानवी जीवनात अस्तित्वात आहे तिचा अंत या क्रांतीनंतर होईल. हिंसा, अत्याचार, भांडवलशाही, शोषण आणि युद्धखोर या साऱ्यामधून मुक्त झालेल्या समाज द्वेष, पुरस्कार यामधूनही मुक्त होऊन प्रेमाच्या दिशेने वाटचाल करेल. या सर्व प्रयत्नातून जेव्हा स्त्रीलिंग स्वतंत्र आणि पूर्ण मानवी दर्जा प्राप्त करेल तेव्हा लाखो वर्षाची वंचितता आणि मुक्तता मिळेल आणि दोन्ही लिंगामध्ये विभागले गेलेली माणसे मानवतेकडे वाटचाल करतील, असे मिलेटचे लैंगिक क्रांती बद्दलचे विचार होते.

**लैंगिकतेचे राजकारण यामधील मिलेटने केलेले विश्लेषण:–**

'लैंगिकतेचे राजकारण' या पुस्तकाच्या पहिल्या भागात वैचारिक सूत्र दिसते ते म्हणजे लिंग व लैंगिकता याच्या राजकीय परिणामांकडे बहुतांश वेळा जे दुर्लक्ष होते त्याबद्दल विचार. तिने पहिल्या प्रकरणांमध्ये आगापिछा नसलेली उदाहरणे देऊन मिलर, मेलर आणि जेनेट यांच्या लेखनातून सत्ता आणि वर्चस्व या संकल्पनांची लैंगिक कृतीच्या संदर्भात येणारी साहित्यिक वर्णने देउन त्यातून होणारे परिणाम वर्णिले आहेत. मिलेट म्हणते की, नॉर्मल मेलरच्या 'अमेरिकेचे स्वप्न', या कादंबरीमध्ये स्त्रीची लैंगिकता तिच्या व्यक्तित्वापासून तोडली आहे. पुस्तकाच्या शेवटच्या भागात मिलेटने पुरुष सत्ता संरक्षण उभारणीमध्ये जे हातभार लावतात त्या सर्वांचा अभ्यास केला आहे. डी.एच. लॉरेन्स, हेन्री  मिलर आणि नॉर्मन मेलर या लेखकांचे लेखन मिलेटने प्रतिगामी, क्रांतिविरोधी, लैंगिक राजकारण तपासण्यासाठी अभ्यासले आहे. या प्रसिद्ध लेखनाचा अभ्यास करताना, लेखकांच्या लेखनाचा अभ्यास करताना मिलेटने सीमॉन दीबूव्हाच्या संशोधन पद्धतीचे अनुकरण केले आहे. मिलेटच्या या लेखनानंतर स्त्रीवादी लेखकांना अशा पद्धतीची अभ्यास हाती घेण्यासाठी चालना मिळाली. स्त्री–प्रश्न अभ्यासण्यासाठी या पद्धतीतून एक नवीनच संशोधन पद्धती खुली होती.

**मूल्यमापन:–**

मिलेटचे 'लैंगिकतेचे राजकारण' हे पुस्तक म्हणजे १९६० नंतर जे स्त्रीमुक्तीच्या भूमिकेचे सर्वसाधारण संश्लेषण करण्याचे प्रयत्न झाले, त्यातील हा पहिला प्रयत्न होता, असे सर्व जहाल स्त्रीवादी एकमुखाने मान्य करतात. मिलेटचा हा जो लक्षणीय प्रभाव आहे तो तिच्या एकूण लैंगिकतेच्या क्रांतीसंदर्भातील सैद्धांतिक भूमिकेमुळेच आहे. तिच्यामध्ये लैंगिकतेमध्ये क्रांती व्हायची तर लैंगिकतेच्या राजकारणा संदर्भात आकलन तर आवश्यक आहेच. परंतु पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या सर्व समावेशक सिद्धांकनाच्या विकासाचीही गरज आहे. मिलेटच्या या पुस्तकामुळे स्त्रीवादी चळवळ, जी प्रामुख्याने पुरुषी सार्वभौमत्व खाजगी आणि सार्वजनिक जीवनातून नष्ट करण्याचा प्रयत्न करते, त्या चळवळीची गरज अधोरेखित झाली. तिने लिहिलेला जाहीरनामा किंवा 'लैंगिकतेचे राजकारण' हे पुस्तक अगदी स्त्रीवादी अभ्यासकांना आणि कार्यकर्त्यांना प्रेरणादायी वाटते. सखोल समाज विज्ञानाच्या संशोधनाच्या कार्यक्रम पत्रिकेवर पुरुषसत्ताक व्यवस्था हा प्रश्न स्त्रीवादी संदर्भात आणण्याचे धाडसी पाऊल टाकणारी पहिली स्त्रीवादी विचारवंत हे केट मिलेटचे फार मोठे श्रेय आहे.

२. **शुलामीथ फायरस्टोन:–**

**पूर्व वृत्तांत:**

फायरस्टोन चा जन्म ७ जानेवारी १९४५ रोजी कॅनडामध्ये ओटावा येथे झाला. या कॅनेडियन अमेरिकन मूलगामी स्त्रीवादी लेखिका आणि कार्यकर्त्या होत्या. फायरस्टोन ही सहा मुलांपैकी एक होती. जेव्हा ती लहान होती तेव्हा कुटुंबाने त्यांचे आडनाव फायरस्टोन असे केले आणि सेंट लुईस येथे स्थलांतरित झाले. तिचे वडील किशोरवयात असताना अर्थोडॉक्स झाले होते आणि सुसान फालुतीच्या म्हणण्यानुसार त्यांनी धर्मांतराच्या आदेशाने आपल्या मुलांवर कडक नियंत्रण ठेवले. तिच्या बहिणींपैकी एक तिरसा फायरस्टोन हिने सांगितले की, शूलामीथ फायरस्टोनने तिच्या भावाचा पलंग तयार केला नाही म्हणून वडील तिच्यावर रागवले. तू मुलगी आहेस त्यामुळे तुला ते काम करावेच लागेल असे तिच्या वडिलांनी तिला सांगितले. याचा परिणाम फायरस्टोन वर झाला. फायरस्टोनने कुटुंबाच्या लिंगवादाच्या विरोधात आवाज उठवला.

**शिक्षण:–**

शिलामिथ फायरस्टोनने सेंट लुईस येथील वॉशिंग्टन विद्यापीठात शिक्षण घेतले आणि १९६७ साली 'स्कूल ऑफ द आर्ट इन्स्टिट्यूट ऑफ शिकागो'मधून चित्रकलेची पदवी प्राप्त केली. शिकागोमध्ये असताना तिने वेस्टसाईड हा पहिला महिला मुक्तीगट सुरू केला.

फायरस्टोनला कट्टरपंथी स्त्रीवादी मानले जात होते. कारण त्यांचा असा विश्वास होता की, स्त्रिया अत्याचारीत लैंगिक वर्ग आहेत आणि स्त्रीमुक्ती केवळ जागतिक पितृसत्ताक व्यवस्थेचा क्रांतिकारी उच्चाटन करूनच प्राप्त केली जाऊ शकते. तिने कार्ल मार्क्स आणि फेडरिक एंगलस यांच्या कामावर लक्ष वेधले. 'डायलेक्टिक ऑफ सेक्स', 'द केस फॉर फेमिनिस्ट रिव्होल्युशन' मध्ये ती म्हणते, स्त्रीवाद्यांना केवळ संपूर्ण पाश्चात्य संस्कृतीच नव्हे तर स्वतःच्या संस्कृतीच्या संघटनेवर आणि पुढे निसर्गाच्या संघटनेवर प्रश्नचिन्ह

निर्माण करावे लागेल. तिची एक मुलगामी समजूत अशी होती की, गर्भधारणे दरम्यान आणि बाळंतपणाच्या वेळी स्त्रियांच्या क्षमतेमुळे आणि असुरक्षिततेतून स्त्रियांवर होणारे अत्याचार थेट उत्पन्न होतात. ज्याचा पुरुष फायदा घेऊन शकतात व 'डायलेक्टिक ऑफ सेक्स' मधील तिचा दृष्टिकोन सायबर फेमिनिझमचा अग्रदूत म्हणून देखील पाहिला जाऊ शकतो. शिवाय विविध स्त्रीवादी गटांचा एक भाग म्हणून तिच्या कृती कट्टरपंथी म्हणून पाहिल्या गेल्या. कारण त्यांनी स्त्रियांच्या जीवनाभोवती समस्यांना संबोधित केले, ज्यावर स्त्रियांनी चर्चा केली नाही. फायरस्टोनने हे पुस्तक वयाच्या पंचविसाव्या वर्षी इ.स.१९७० साली लिहिले. या पुस्तकात फायरस्टोनने लैंगिकतेवर आधारित इतिहासाचा भौतिकवादी दृष्टिकोन विकसित करण्याचा प्रयत्न केला होता. या पुस्तकात तिने निर्माण केलेला आदर्श समाज देखील उल्लेखनीय आहे. जहाल स्त्रीवादी भूमिकेची सर्वात समर्थ बोलकी अभिव्यक्ती अशी प्रसिद्धी या पुस्तकाने मिळवली. तिच्या पुस्तकाला संख्येने मोठा आणि अधिक बंडखोर असा वाचक वर्ग मिळाला. समकालीन उत्तर अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळीच्या सुरुवातीच्या काळात या पुस्तकाने फार मोठा परिणाम केला. फायरस्टोनच्या पुस्तकात आपल्याला पुन्हा एकदा पायाभूत वर्गीय विभागणी आणि समाजातील दडपणूक हे लैंगिक स्वरूपाचे असतात असे पाहण्याचा प्रयत्न दिसतो. फायर स्टोनच्या लेखनाचा अभ्यास करणारी ग्रॅहॅम येटस या विद्यार्थिनीच्या मते तर स्त्रीमुक्तीच्या चळवळीतून उदयाला आलेली फायरस्टोन म्हणजे सर्वात महत्त्वाचे खोलवर चिंतन करणारी सैद्धांतिक व्यक्ती होय. तिच्यामध्ये एकीकडे स्त्रीवादी हेतूपूर्वक्ता न सोडता तरीही अत्यंत सर्वव्यापी अशा कल्पना मांडून फायरस्टोन मानवी समाजाचे विश्लेषण सादर करते आणि यातून ती जो कार्यक्रम देते तोही सर्वांना सामावून घेणारा असतो. स्त्रीवादी चळवळीच्या अंतर्गत आणि बाहेर सुद्धा फायरस्टोनच्या पुस्तकांने कृत्रिम पुनरूउत्पादनाच्या वाद विवादाला चालना दिली हे सुद्धा लक्षात घेण्यासारखे आहे.

**शुलामिथ फायरस्टोनची उद्दिष्टे:–**

'लैंगिकतेचे द्वंद्व' या पुस्तकात फायरस्टोन ने एक महत्वकांक्षी प्रयत्न केला आहे तो म्हणजे कामगाराच्या दडपणुकी संदर्भातील. मार्क्सवादी सिद्धांकनाची सांगड लैंगिक दडपणुकीच्या सर्व समावेशक सिद्धांकनाशी घालून त्यातील द्वंद्वात्मकता आणि भौतिकता स्पष्ट करणे. असे सिद्धांकन ती स्त्रियांच्या परिस्थितीला लागू करण्याचा प्रयत्न करते.

फायरस्टोनचे उद्दिष्ट मुळात आहे ते एंगेल आणि मार्क्स यांच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा दृष्टिकोन आणि त्यातील उत्कृष्ट तत्त्वे घेणे व फ्राईडच्या स्त्री पुरुषांच्या अंतर्मनाची आकलन आणि त्याची घडण कशी घडते हे लक्षात घेऊन फ्राईड मधील उत्कृष्ट तत्वे एकत्रित आणण्याचा तिचा प्रयत्न आहे. जहालवाद्यांसाठी तिला जाणीवपूर्वक सिद्धांकन आणि व्यवहार यांचे आलेखन करायचे आहे. असे केल्याने हजारो वर्षे चालत आलेल्या अतिप्राचीन, कर्मठ, वर्गजात व्यवस्थेचे अस्तित्व तसेच लिंग या कोटीक्रमावर आधारित उभीअसलेली वर्णव्यवस्था उखडून निघण्यासाठी भूमी तयार होईल असे तिचे उद्दिष्ट आहे.

**स्त्रीवादी क्रांती साध्य करण्यासाठी पर्यायी कार्यक्रम:–**

स्त्रीवादी क्रांती प्राप्त करण्यासाठी फायरस्टोन एक पर्यायी कार्यक्रम सुचवते. कुटुंब संस्था नष्ट करणे आणि कृत्रिम पुनरुत्पादन साधनांचा वापर करणे असे उद्दिष्ट होते. तिच्या कार्यक्रमामधून ज्याला ती तंत्रवैज्ञानिक किंवा सायबर नेटिक कम्युनिझम म्हणते ते निर्माण होईल, असे ती मांडते. तिचा भर कार्पोरेट जीवनाचे नवे आविष्कार निर्माण करण्यावर आहे. यासंदर्भात तिचे प्रस्ताव तीन क्षेत्रामधील आहेत. त्यामध्ये पहिला प्रस्तावासाठी एकटे राहून व्यवसाय करणारे व्यक्ती एकटे राहण्याची निवड करतात आणि तसे राहून आपल्या व्यवसायाचा पाठपुरावा करतात, अशांचा प्रमुख प्रवाह सोडून जगणाऱ्या जीवनशैली सुद्धा स्वागतार्ह मानल्या पाहिजेत. एकत्र राहण्याच्या प्रयोगाबद्दल ती म्हणते की दोन किंवा अधिक सहकारी मग ते कोणत्याही लिंगाचे असोत म्हणजेच स्त्री वा पुरूष असोत, जेव्हा कायद्याने न बांधता सहजीवनाची व्यवस्था स्वीकारतात आणि परस्परांना निवडून परस्पर संमतीने एकत्र राहणे स्वीकारतात तेव्हा खऱ्या अर्थाने ते दोघे एकमेकांना निवडतात. अशा एकत्र राहण्यात कोणत्याही एका व्यक्तीचे दुसरीवर अवलंबित्व नसते.

तिसऱ्या प्रकारच्या प्रस्तावात ती म्हणते की घरदार निर्माण करणारे जे गट असतील ते एकमेकांशी नव्या करार पद्धतीने एकत्र येतील. संख्येने अगदी दहा–बारा माणसे सर्व तऱ्हेच्या वयोगटातील स्त्रिया आणि पुरुष दोघेही एकत्र येऊन एकत्र राहतील. काही विशिष्ट काळापुरते एकमेकांचे आपले जीवनही जोडून घेतील. परंतु त्यामध्ये दोन व्यक्तींमधील नात्याचा कोणता एक साचा नसेल. त्याला फायरस्टोन विस्तारित कुटुंब म्हणण्याऐवजी जाणून–बुजून 'घरदार' असे म्हणते. फायरस्टोनला घरदार या संस्थेने नैसर्गिक मूल जन्माला घालण्याच्या पद्धती नाकारावेत असे वाटते आणि अशा तऱ्हेने तिला असे वाटते की गर्भधारणा ही क्रिया अंत:प्रेरणा मानणे नाकारले जावे. या व्यवस्थेमध्ये मुलांना तात्काळ दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित होण्याचा विशेष हक्क दिला जाईल. याचा अर्थ एखाद्या घरादारात ती मुले करार करून प्रवेश मिळवतील आणि करार संपवून त्या व्यवस्थेच्या बाहेर पडतील. पुढे ती असे म्हणते की, अशा ज्या सुधारणा होतील त्यासाठी शहराच्या नियोजनामध्ये, वास्तू शिल्पामध्ये, फर्निचरमध्ये योग्य ते बदल होतील. इतकेच नाही तर दैनंदिन जीवनातील सामाजिक कृतीचे प्रकारही अर्थशास्त्राच्या बरोबरीने बदलतील. काम किंवा रोजगार आणि शिक्षण याविषयीची नवी संकल्पना यातून निर्माण होईल. जे काम केवळ सामाजिक मूल्य धारण करणारे असेल आणि त्यातून व्यक्तिगत मूल्य निर्माण होणार नसेल ते काम यंत्राच्या आधारे करून घेतले गेले पाहिजे.

**फायरस्टोनचा भव्य निष्कर्ष :–**

'लैंगिक द्वंद्वात्मकतेच्या' पुस्तकात फायरस्टोन असे म्हणते की कुटुंब नावाच्या संस्थेला पर्याय म्हणून घरदार नावाची व्यापक संदर्भ असणारी व्यवस्था निर्माण झाली आणि मुलांचे पुनरूत्पादन पर्यायी पद्धतीने झाले, त्याचबरोबर जे एकटे राहण्याची निवड करतील त्यांच्या सर्जनशील जीवनशैलीला वाव म्हणून पुनरुत्पादनरहित एकक म्हनून जगण्याची संधी मिळेल आणि यातून सर्व मूलभूत द्वंद्वांना विशेषत: जी आताच्या कुटुंब व्यवस्थेमुळे मानवी आनंदाला अडथळे आणून अशी द्वंद्वे निर्माण होतात, त्या सर्वांची सोडवणूक होईल.

फायरस्टोन ज्याला 'सायबरनेटीक कम्युनिझम' असे म्हणते त्याच्या आधारे प्रगत तंत्रज्ञानाच्या साह्याने आर्थिक वर्ग नष्ट होतील आणि सर्व तऱ्हेच्या श्रमिकांच्या शोषणावरही बंदी येईल. अशा समाजात सर्व लोकांना त्यांच्या फक्त भौतिक गरजांनुसार उपजीविकेचे मार्ग मिळतील. हळूहळू सर्व कंटाळवाणी आणि माणसांना जनावर बनवणारी कामे नष्ट होऊन कामाचे स्वरूप जटील अशा स्वरूपाचे राहील. काम म्हणजे प्रौढ किंवा मुले यांनी सुखी पद्धतीने करायची कृती असे त्याचे स्वरूप राहील. एकदा का मातृत्वाची गोष्ट अदृश्य झाली आणि नातेसंबंधातील शारीरिक नात्यावरील बंदी नष्ट झाली की माणसाची लैंगिकताही पुनर्संघटीत होऊन प्रेमाचा अनिर्बंध प्रवाह चालू राहील.

**समारोप:–**

फायरस्टोनच्या सर्वसाधारण मांडणीची उपयुक्तता काही असो आणि तिच्या आदर्श राज्याच्या कल्पनेवर किती आक्षेप असोत, परंतु मिलेटच्या बरोबरीने तिने स्त्रीवादी सिद्धांकनाची एक परंपरा निर्माण करून स्त्रियांचे दुर्बल अस्तित्व, स्त्रियांवर होणारे संस्कारच्या प्रभावातून त्यांच्या वाट्याला येणाऱ्या भूमिकांशी जोडण्याचे मोठे काम केले. १९७० च्या दशकात ब्रिटन आणि इतर देशांमध्ये फायरस्टोन नंतर आलेल्या स्त्रीवाद्यांनी लैंगिकतेवर आधारित श्रम विभागणी या संकल्पनेवर भर दिला. परंतु मिलेटच्या बरोबरीने फायरस्टोनने मात्र प्रामुख्याने मानसशास्त्रीय संदर्भासह स्त्रियांच्या दुबळेपणाचे विश्लेषण मांडण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या कोंडीसंदर्भात आर्थिक परिणाम महत्त्वाचे असते यात शंका नाही. परंतु ज्या प्रकारे आताच्या काळात स्त्रिया कमी वेतनाचे काम आणि विनावेतन घरकाम स्वीकारतात, त्यामागील सामाजिक संस्काराची प्रक्रिया कमी महत्त्वाची मानणे चूकच ठरेल. म्हणूनच लैंगिक भूमिकाच्या संदर्भात जहाल नियतवादी विश्लेषण ज्याला फायरस्टोनने चालना दिली, त्याच्या मांडणीमध्ये कितीही त्रुटी असल्या तरी त्या विश्लेषणाची मांडणी सार्थ आहे असे ठरते.

**स्वयं अध्ययन प्रश्न– २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'डायलेक्टिक ऑफ सेक्स' हे पुस्तक शिलानमेथ फायरस्टोनने..........साली लिहिले.

अ) १९५० ब) १९६० क) १९७० ड) १९८०

२. ..........हे पुस्तक गंभीर स्त्रीवादी सिद्धांताच्या विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखले जाते.

अ) लैंगिकतेचे द्वंद्व ब) डायलेक्टिक ऑफ सेक्स

क) मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद ड) द सेकंड सेक्स

३. 'न्यूयॉर्क बंडखोर स्त्रिया' या स्त्रीमुक्तीच्या गटात .......... यानी महत्त्वाची भूमिका बजावली.

अ) केट मिलेट ब) बेट्टी फ्रीडन क) शूलामिथ फायरस्टोन ड) जुलियेट मिशेल

४. केट मिलेटचा जन्म.......... येथे झाला.

अ) लंडन ब) फ्रान्स क) मिनेसोटा ड) पॅरिस

५) 'लैंगिकतेचे द्वंद्व' हे पुस्तक ..........यांनी लिहिले.

अ) केट मिलेट ब) बेट्टी फ्रीडन क) शूलामिथ फायरस्टोन ड) जुलीयेट मिशेल

**ब) खाली दिलेली वाक्ये चूक की बरोबर लिहा.**

१. शिलामिथ फायरस्टोनने सेंट्रो येथील वॉशिंग्टन विद्यापीठात शिक्षण घेतले.

२. केट मिलेट ही अमेरिकन स्त्रीवादी लेखिका आहे.

अ) पहिले वाक्य चुकीचे आहे दुसरे वाक्य बरोबर आहे

ब) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे

क) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

ड) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

## ३.२.४ जुलीएट मिशेल, बेटी फ्रीडन

### १. जुलीएट मिशेल:–

**प्रारंभिक जीवन व शिक्षण:–**

जुलीएट मिशेल ही समाजवादी स्त्रीवादी लेखिका म्हणून ओळखली जाते. तिचा जन्म १९४० साली न्यूझीलंडमध्ये झाला.१९४४ मध्ये ते इंग्लंडला गेली. तिथे ती आजी–आजोबांसोबत राहिली. तिचे शालेय शिक्षण किंग आल्फ्रेड स्कूल येथे झाले.१९६२ मध्ये इंग्रजीमध्ये पदवी प्राप्त केली. ऑक्सफर्ड मधील सेंट अॅन्स कॉलेजमध्ये तिने इंग्रजी भाषेच्या अभ्यास करून पदवुत्तर पदवी मिळवली. १९७० ते १९७२ या काळात तिने 'लीडस' आणि 'रीडिंग' या विद्यापीठांमध्ये इंग्रजी साहित्याचे अध्यापन केले. अमेरिकेतील कित्येक विद्यापीठांमध्ये तिने अतिथी प्राध्यापक या नात्याने काम केले. 'दि न्यू लेफ्ट रिव्ह्यु' मासिकाच्या संपादकीय समितीवर तिने काम केले. आणि 'लंडन विमेन्स लिबरेशन वर्कशॉप' या कार्यशाळेची सदस्य म्हणूनही तिने काम केले. वाङ्मयीन परीक्षा, समीक्षा आणि स्त्रियांच्या दडपणुकी संदर्भातील राजकीय सिद्धांत या विषयावर तिचे अनेक निबंध आहेत. तसेच इंग्लंड, कॅनडा आणि अमेरिका या देशांमध्ये स्त्रिया आणि स्त्रियांची मुक्ती या विषयावर तीने सातत्याने व्याख्याने दिली. १९७१ साली 'विमेन्स इस्टेट' (स्त्रियांची मालमत्ता) हे तिचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतरचे तिचे प्रमुख प्रकाशन म्हणजे 'सायको ॲनॅलिसीस अँड फेमिनीझम' (मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद) हे पुस्तक १९७४ मध्ये प्रसिद्ध झाले. तसेच या पुस्तकाबरोबर सहसंपादन केलेले तिचे दुसरे पुस्तक म्हणजे 'द राइट्स अँड रॉंग्स ऑफ वुमेन' (स्त्रियांचे हक्क आणि कमतरता) हे स्त्रिया या विषयावर निबंधाचे संकलन १९७६ साली प्रसिद्ध झाले. १९८४ साली 'विमेन

: दि लाँगेस्ट रिव्होल्युशन' (स्त्रिया एक प्रदीर्घ क्रांती) हे पुस्तक राजकारण, साहित्य आणि मनोविश्लेषण शास्त्र या क्षेत्रातील तिच्या निबंधाचे तसेच व्याख्यानांचे संकलन स्वरूपात प्रसिद्ध झाले.

**केंब्रिज युनिव्हर्सिटी सेंटर फॉर जेंडर स्टडीज:-**

केंब्रिजच्या जीजस कॉलेजमध्ये जुलियट सायको-अनॅलिसिसच्या सहप्राध्यापक होत्या. त्यांनी केंब्रिज विद्यापीठात लिंग अभ्यास केंद्राची स्थापना केली.२०१० मध्ये युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनच्या मनोविश्लेषण युनिटमध्ये मनोविश्लेषणात्मक अभ्यासातील विस्तारित डॉक्टरल स्कूलच्या संचालक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली.

**कार्य:-**

**स्त्रिया एक प्रदीर्घ क्रांती** (Women: The Longest Revolution):-

मिशेल विद्यार्थी दशेत असताना तिने बूव्हाचे 'दि सेकंड सेक्स' पुस्तक वाचले. तिला ते आवडले. परंतु फक्त फ्रान्समधील स्त्रियांना एका अनाकलनीय चौकडीत ते लागू होते असे तिला वाटले. मिशेल स्वतः नव-डाव्या चळवळीत कृतिशील होती आणि तिचा गट तिसऱ्या जगातील देशाविषयीच्या प्रश्नांनी भरलेला होता. अल्जेरियातील अनुभवावर आधारित फ्रान्स फॅनन याने मांडलेल्या विचारांमध्ये 'स्त्रिया नावाची कर्मटशक्ती फक्त क्रांतीनंतरच स्वतंत्र होऊ शकेल' या तर्काने मिशेलच्या संतप्त प्रतिक्रियेला चालना मिळाली आणि स्वतःच्या खाजगी अनुभवाशी जोडून शेवटी तिने 'स्त्रिया एक प्रदीर्घ क्रांती' हे लेखन आपल्या नव डाव्या मित्रांसाठी आणि सहकाऱ्यांसाठी केले. मिशेलने हा निबंध लिहायचे कारण ती मार्क्सवादामध्ये गुंतलेली होती आणि तिला त्या चौकटीत केले जाणारे स्त्रियांच्या भूमिके संदर्भातील अर्थवादी आकलन असमाधानकारक वाटत होते. या निबंधाच्या मांडणीमध्ये तिने लुई अलथुसरच्या लेखनाचा वापर केला. विशेषता त्याने लिहिलेल्या 'अंतर विरोध आणि अतिरिक्त नियतवाद' या निबंधामध्ये त्याने जो विचार प्रणालीचे महत्त्व सांगण्यावर भर दिला आहे त्याचा वापर मिशेलने केला आहे. यासंबंधी मिशेलचा विचार असा होता की भूतकाळात आणि वर्तमान काळात स्त्रियांच्या दडपणकीचे जे सातत्य आहे ते समजून घेण्यासाठी ती स्त्रियांकडे स्त्रीवादी समस्या म्हणून पाहण्याचे स्वीकारते, परंतु उत्तरे मात्र मार्क्सवादी चौकटीतच शोधते. तिच्या मांडणीतून स्पष्ट होते की कर्मठ समाजाची सिद्धांकनाची रचना अर्थवादीपणामुळेच अपयशी ठरते.

मिशेलच्या मते, हिंसा करण्याची क्षमता नसणे हा घटक स्त्रियांच्या दुय्यमत्वा संदर्भात श्रम विभागांमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळवण्यामागे अतिशय महत्त्वाचा आहे. ज्या पद्धतीने स्त्रीच्या शारीरिक दुबळेपणाचा बाऊ केला जातो त्यापेक्षा हा घटक महत्त्वाचा आहे. स्त्रियांच्या कामाचा कोटीक्रम दुय्यम दर्जाचा मानला गेला. यामागे प्रामुख्याने सामाजिक अवकाशात पुरुषांना ज्या प्रमाणात कौर्य आणि बळजबरी करणे शक्य असते, त्यांच्याशी संबंधित आहे. इतिहासामध्ये उत्पादनाच्या एका काळच्या आणि चिकित्सक टप्प्यावर स्त्रियांची जी अदृश्यता दिसते ती मुळामध्ये सामाजिक जुलूम जबरदस्तीतून आणि पुनरुत्पादनाच्या अवकाशातील त्यांच्या भूमिकेमधून निर्माण झाली.

स्त्रीचे जीवन हे उत्पादन, पुनरुत्पादन, लैंगिकता आणि लहान मुलांचे संगोपन आणि संस्कार हे स्त्रीच्या परिस्थितीने बद्ध असते, असे तिला वाटते. जैविकदृष्ट्या दोन लिंगामध्ये फारकत करणे आणि त्यानुसार श्रम विभागणी करणे. या दोघांना एकमेकात अडकलेल्या स्वरूपाची अपरिहार्य आवश्यकता असे मानले गेले होते. तिचे म्हणणे असे आहे की, या विषयावरील समाजवादी लेखक यांनी स्त्रियांच्या दडपणुकीची निश्चिती आणि सातत्य यांचा संबंध स्त्री शारीरिक दृष्ट्या कष्टप्रद काम करण्यासाठी सक्षम नसते हे प्रस्थापित करून मग खाजगी संपत्तीच्या उद्देशाशी त्याची जुळवणूक करतात. त्यासाठी आपण कुटुंब नावाच्या संस्थेच्या संरचनांचा अभ्यास केला पाहिजे. पुनरुत्पादन, लैंगिकता आणि मुलांवर होणारे सामाजिक संस्कार यांच्या अभ्यासाला पर्याय नाही, असे तिचे मत आहे.

अमेरिकेतील समाजवादी स्त्रीवादी लेखिका लीझ व्होगेल हिने मिशेलच्या निबंधाचे मूल्यमापन केले आहे. ती म्हणते की, खरी स्त्रीवादी चळवळ विकसित होण्याच्या कितीतरी आधी मिशेलचे लेखन प्रसिद्ध आहे. स्त्रीमुक्ती चळवळीच्या समाजवादी स्त्रीवादी विचार पद्धतीच्या चौकटीत हे लेखन प्रमुख सिद्धांतिक प्रभाव पाडणारे ठरले. त्यानंतर मिशेलने 'स्त्रीची मालमत्ता' हे पुस्तक आपल्या आधीच्या निबंधावर आधारित लिहिले. त्यामुळे हा प्रभाव अधिकच दृढ झाला. व्होगेलच्या मते, 'स्त्रिया: एक प्रदीर्घ क्रांती' हे मिशेलचे लेखन म्हणजे स्त्री प्रश्नावरील अभिजात मार्क्सवादी साहित्याची केलेली पहिली धारदार चिकित्सा होय. हा निबंध एका अर्थी समाजवादी स्त्रीवादी सैद्धांतिक परिप्रेक्ष विकसित करण्याचा सुरुवातीचा केला गेलेला खास प्रयत्न असल्यामुळे या निबंधाने कुटुंब या एककावर लक्ष केंद्रित केले आहे आणि समकालीन भांडवलशाही समाजातील घरकामाचे श्रम या मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**स्त्रीची योगदान मालमत्ता** (Women's Estate):-

'स्त्रीची योगदान मालमत्ता' हे मिशेलचे पहिले पुस्तक १९७१ साली प्रसिद्ध झाले. अवघ्या १८२ पृष्ठाचे हे पुस्तक आहे आणि त्यातही तिने स्वतःच म्हटले आहे की, जवळजवळ निम्मे पुस्तक म्हणजे आधी लिहिलेल्या पुस्तकावर आधारित आहे. स्त्रीमुक्ती चळवळीचा अगदी अलीकडच्या काळातील इतिहास त्यांच्या राजकारणासह प्राथमिक स्वरूपात परिचित करून देणे असे या पुस्तकाचे स्वरूप आहे. या पुस्तकाच्या प्रस्ताविकामध्ये मिशेल असे नोंदवते की, समकालीन भांडवली समाजामधील स्त्रीची परिस्थिती आणि दडपणूक यांची विशिष्ट परिमाणे लक्षात घ्यायची तर बाईपणा व स्त्रीपणा याचे मानसशास्त्र आणि कुटुंब संस्था या संकल्पना कळीच्या ठरतात. बाईचे बाईपणा असलेले मन कसे विकसित होते आणि आई आणि गृहिणी म्हणून तिची विचार प्रणाली आणि सामाजिक, आर्थिक भूमिका कशी विकसित होते, हे लक्षात घेतले तर बाईला फक्त तिची स्वतःचीच दडपणूक होते असे जाणवण्याचे संदर्भही कळू शकतात. बाईची जी विशिष्ट दडपणूक होते त्यातून तिची व्याख्या केली जाते. आणि म्हणून तिच्या मुक्तीसाठी उदयाला येणाऱ्या कोणत्याही चळवळीला जर तिची भूमिका बदलायची असेल तर विश्लेषण करून ती भूमिका समजून घेतली पाहिजे. तिने असे दाखवून दिले आहे की, १९ व्या शतकातील सर्व महान सामाजिक विचारवंतांनी स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाची आणि मुक्तीची समस्या ओळखली होती. म्हणून क्रांतिकारी चळवळीचा हा एक अभिजात वारसा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. असे असतानाही विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात

समाजवाद्यांच्या वैचारिक चौकटीतून हा प्रश्न दुय्यम किंवा खरे तर अदृश्यच केला गेला, असे मिशेल म्हणते. इतर कोणताही महत्त्वाचा प्रश्न अशा तऱ्हेने विसरला गेला नव्हता. मिशेलने यालाच समकालीन समाजवादाच्या चौकटीतील 'शब्दहीन क्षेत्र' असे नाव दिले आहे. म्हणून ती या सर्व प्रक्रियेला 'प्रतिक्रांती' असा शिक्का मारते. तिच्या मते, यातूनच स्त्री मुक्ती चळवळ फुटून बाहेर पडली आणि तिने स्त्री मुक्तीच्या आवश्यकतेबद्दल पूर्णत: निरागस वा अज्ञानी असणाऱ्या समाजवादी जाणिवेवर आघात केला.

**मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद:–**

'मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद' हे मिशेल चे दुसरे पुस्तक १९७४ साली प्रसिद्ध झाले. ज्यामध्ये तिने मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद यांच्या समेट घडून आणण्याचा प्रयत्न केला. बाईपणाच्या मानसिकतेचे आणि स्त्रियांच्या दडपणुकीच्या विचार प्रणालीचे आकलन विकसित करण्याचा हा प्रयत्न आहे. फ्राईड, राईस आणि लेंग यांच्या लेखनातून लैंगिकता, बाईपणा आणि कुटुंब संस्था यांची मांडणी जशी केली गेली आहे त्याचे मिशेलने विश्लेषण केले आहे.मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद हे पुस्तक अगदी आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचे आणि सैद्धांतिक स्त्रीवादी योगदान म्हणून गौरविले जाते. स्त्रीवादी विचाराच्या सर्व शाखांवर या पुस्तकांने खोलवर परिणाम केला आहे. अगदी जहाल स्त्रीवाद्यांच्या सर्व प्रमुख प्रवाहांची तसेच समाजातील स्त्रीवादी विचारांची ही त्यापासून सुटका झाली नाही. याचे कारण म्हणजे मिशेलने काळजीपूर्वक पद्धतीने अभ्यासाच्या जगातील सर्व मानदंड निरखून, तपासून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रकल्प हाती घेतल्यानंतर मिशेलला समकालीन स्त्रीवादी चिकित्सांच्या प्रमुख प्रवाह विरुद्ध जावे लागले. समकालीन स्त्रीवादयांनी फ्राईड आणि जहाल, अस्तित्ववादी, मानसघटनाशास्त्र अथवा रूपविवेचन शास्त्र, मानसशास्त्र यांची जी चिकित्सा केली होती त्या विरोधात मिशेलला उभे राहावे लागले. त्या काळात उपलब्ध असणाऱ्या कर्मठ, सनातन मानदंडाच्या दृष्टीने मिशेलचे हे काम तिला लोकप्रियतेच्या संदर्भात एकाकी करणारे होते. आणखी एका अर्थाने मिशेलचे हे पुस्तक लक्षणीय आहे. या पुस्तकात मार्क्स आणि फ्राईड यांचा जो समन्वय करण्याचा प्रयत्न केला गेला ते एकमेव द्वितीय आहे.

**मूल्यमापन:–**

मिशेल आपल्या लेखनातून अतिशय गांभीर्याने पुरुषसत्ताक व्यवस्थेचे सिद्धांकन करण्याचा प्रयत्न करते आणि हे करण्यामागे तिचा इतिहासाच्या सर्व टप्प्यांवर स्त्रिया दुय्यम का होतात त्याचे स्पष्टीकरण मिळवायचे हा हेतू होता. अन्य जहाल स्त्रीवादी लेखकांपेक्षा तिचे वेगळेपण असे की, स्त्रियांच्या केवळ तक्रारी व समस्या यांचे रकाने देऊन त्याला सिद्धांत मांडण्याची चूक ती करत नाही. तसेच फायरस्टोनने केले त्याप्रमाणे इतर कोणत्याही सिद्धांकनाचे फक्त यांत्रिक उपयोजन करून पुरुषसत्ताक व्यवस्थेचे सिद्धांत विकसित करत नाही. पुरुषसत्ताक नावाच्या पुरुषी बुजगावण्याचे रूप निर्माण करण्यामागे आणि ते मग उखडून काढण्यामध्ये किंचितही रस नाही. स्त्रियांच्या दडपणुकीचे योग्य असे सिद्धांकन विकसित करण्यासाठी जे शिव धनुष्य पेलावे लागेल त्याची तिला गंभीर जाणीव आहे. म्हणूनच ती समकालीन जगातील सामाजिक विश्लेषणाच्या प्रभावी पद्धतींना एकत्र आणण्याचा खटाटोप करते. तिच्या लेखनात त्रुटी आणि उणिवा असल्या तरी तिचे एकूण

लेखन विशेषता 'मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद' हे पुस्तक गंभीर स्त्रीवादी सिद्धांकनाच्या विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखले जाईल.

## २. बेटी फ्रीडन: (४ फेब्रुवारी १९२१ ते ४ फेब्रुवारी २००६):–

**प्रस्तावना–**

बेटी फ्रीडन ही अमेरिकन स्त्रीवादी लेखिका आणि कार्यकर्त्यी होती. संयुक्त राज्य अमेरिका मध्ये स्त्री चळवळीला स्फूर्ती देणारे एकमेव उदाहरण म्हणजे बेटी फीडन होय! १९६३ साली बेटी फ्रीडनचे 'स्त्रीत्वाचे गुढ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. तिच्या या पुस्तकांनी तिला प्रसिद्धी तर दिलीच परंतु विसाव्या शतकात या पुस्तकांने अमेरिकन स्त्रीवादाच्या पुनरागमनला चालना दिली जे पारंपारिक भूमिकांमध्ये आधुनिक स्त्रियांच्या निराशेची कारणे शोधते.

**पूर्व वृत्तांत:–**

बेटी फ्रिडन यांचा जन्म ४ फेब्रुवारी, १९२१ रोजी पेओरिया येथे झाला. त्यांचे मूळ नाव बेटी गोल्डस्टीन असे होते. त्यांनी १९४२ मध्ये स्मित कॉलेजमधून मानसशास्त्राची पदवी घेतली आणि कॉलिफॉर्निया विद्यापीठ बर्कले येथे एक वर्ष काम केले. त्यानंतर न्यूयॉर्क शहरात ती स्थायिक झाली.१९४७ पर्यंत अनेक नोकऱ्यांवर तिने काम केले. वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ म्हणून तिने सामाजिक संशोधन क्षेत्रात काम केले. परंतु विशेष म्हणजे याच काळात त्या स्वतंत्र लेखन क्षेत्राकडे वळाल्या. अमेरिकेतील आघाडीच्या नियतकालिकांमध्ये त्यांचे लेख प्रसिद्ध झाले. सार्वजनिक शिक्षणाच्या संपन्नतेसाठी जो एक आगळावेगळा प्रयोग केला गेला त्यात कम्युनिटी रिसोर्स पूल (सामूहिक संशोधनाचे एकत्रीकरण) या प्रयोगाची ती जन्मदात्री आहे. अनेक शैक्षणिक व सामाजिक मानसन्मान मिळवल्यानंतर बेटी फ्रीडन येल मधील टेम्पल विद्यापीठात समाजशास्त्राच्या प्राध्यापिका आणि न्यू स्कूल ऑफ सोशल रिसर्च संस्थेत प्राध्यापक म्हणून नियुक्त झाल्या. युरोपमध्ये व अमेरिकेत अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आणि कोलंबीया विद्यापीठातून ज्येष्ठ संशोधन सहाय्यक म्हणून कामही केले. फोर्ड फाउंडेशनच्या अनुदान साह्य मिळाल्यानंतर बदलत्या लैंगिक भूमिका आणि वय होण्याची प्रक्रिया या विषयावर त्यांनी संशोधन केले.

**कार्य:–**

१९६६ ते १९७० या काळात स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटनेची सर्वप्रथम अध्यक्षा म्हणून काम पहिले. समान हक्क, सुधारणा किंवा दुरुस्तीसाठी चालणाऱ्या लढ्यामध्ये अलीकडच्या काही वर्षात त्यांनी मार्गदर्शक नेतृत्व देण्याचे काम केले. घटस्फोट गर्भपात, निवास व्यवस्था, रोजगार, शिक्षण आणि समुदायाचा विकास या संदर्भातील प्रश्न हाताळताना त्यांनी नवे मार्ग हाताळले. अनेक सरकारी, बिन सरकारी समित्यावर त्यांनी महत्त्वाच्या स्थानावर काम केले. स्मित कॉलेजने त्यांना मानद डॉक्टरेट दिली. इ.स. १९७५ मध्ये अमेरिकन ह्युमॅनिस्ट असोसिएशन तर्फे बेटी फ्रीडनला त्यावर्षीचा 'मानवतावादी' म्हणून पुरस्कार मिळाला.

**स्त्रीत्वाचे गुढ** (The feminine Mystique):-

'स्त्रीत्वाचे गुढ' हे पुस्तक फ्रीडनच्या आत्मचरित्रावर प्रकाश टाकते. हा ग्रंथ १४ सप्टेंबर, १९७९ साली लिहिला. यामध्ये त्यांनी स्त्रियांच्या समाजातील दुय्यम स्थानाविषयी मत नोंदवले. स्त्रियांना समाजाने दिलेल्या दुय्यम स्थानामुळे तिला आपले कर्तृत्व दाखवता येत नाही. त्यामुळे ती स्वावलंबी बनू शकत नाही. तिने It Changed my Life या दुसऱ्या पुस्तकाच्या परिचयामध्ये 'स्त्रीत्वाचे गुढ' लिहिण्यामागे कोणती प्रक्रिया घडली याचे वर्णन केले आहे. ती म्हणते, 'मी स्त्रीत्वाचे गुढ लिहिले तो एक अपघात व योगायोग होता. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर प्रथमच हे सर्व लिहिताना माझे आयुष्य एकत्रित आले.' अगदी लेखन करण्यापूर्वी माझी अन्यायविरुद्धची उत्कटता स्त्रियांवर अथवा स्वतःवर देखील केंद्रित नव्हती.

तिचे हे पुस्तक वादग्रस्त आणि बेस्ट सेलर होते. ते अनेक परदेशी भाषांमध्ये अनुवादित झाले होते. तिचे शीर्षक एक शब्द होते जे तिने 'नाव नसलेल्या समस्येचे वर्णन'करण्यासाठी तयार केले होते. म्हणजेच एखाद्या नियुक्त केलेल्या भूमिकेच्या स्वीकृतीमुळे उद्भवणारी नालायकपणाची भावना, ज्यासाठी स्त्री ने तिच्या पतीवर बौद्धिक, आर्थिक आणि भावनिक अवलंबून असणे आवश्यक आहे. एक वर्ग म्हणून स्त्रियांना विविध प्रकारच्या कमी अधिक सूक्ष्म स्वरूपाच्या भेदभावाचा सामना करावा लागला होता.

'फेमिनाईन मिस्टेक' हे पुस्तक पारंपरिक भूमिकांमध्ये आधुनिक स्त्रियांच्या निराशेची कारणे शोधते. या पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतरचा काळ हा अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळीचा उदय म्हणून नोंदविला जातो. १९६६ मध्ये स्त्रियांची राष्ट्रीय संघटना प्रस्थापित करण्यामध्ये बेटी फ्रीडनने पुढाकार घेतला होता. आणि १९६६ या काळात ती या संघटनेची अध्यक्षही होती.

**आणि माझे आयुष्य बदलले:-**

बेटी फ्रीडनने स्त्री चळवळी संदर्भातील सर्व लेखन एकत्र करून त्याचे पुस्तक प्रसिद्ध केले. या पुस्तकात तीने १९६३ ते १९७६ या काळात लिहिलेले लेख, तिची प्रमुख भाषणे, सुप्रसिद्ध आघाडीवर असणारे व्यक्तींच्या वतीने घेतलेल्या मुलाखती आणि तिने लिहिलेले आत्मचरित्रात्मक भाग तसेच तिने केलेल्या स्वतःविषयी नोंदी आहेत. तिच्या या पुस्तकात तिच्या कृती व विचार पद्धतीचे फार महत्त्वाचे मुद्दे सापडतात. या पुस्तकाच्या प्रस्तावनेमध्ये ती स्वच्छपणे सांगते की जेव्हा तिने 'स्त्रीत्वाचे गुढ' हे पुस्तक लिहिले तेव्हा तिला क्रांती वगैरे असे काही जाणीवपूर्वक करायचे नव्हते. मात्र हे पुस्तक लिहिल्यानंतर लेखक आणि स्त्री म्हणून तिचे आयुष्य बदलले. तिला असे वाटते की स्त्रीवादी चळवळीला कोणत्याही प्रकारच्या गुढाची गरज नाही. सैद्धांतिक चौकटीची गरज आहे. तिचा स्त्री चळवळी संदर्भात आक्षेप आहे, तो म्हणजे पुरुषांच्या विरोधात स्त्री चळवळीला वर्गीय युद्धाचे स्वरूप देण्याचे शाब्दिक औवडंबर माजविले जाते. त्याला स्त्रियांची चळवळ म्हणजे पुरुषांविरुद्ध असणारी वर्गीय युद्ध या प्रकारच्या विचाराच्या चौकटीला फ्रीडनचा पूर्णपणे नकार आहे. गर्भधारणा, मातृत्व आणि लैंगिक नाते हे सर्व स्त्रियांचे शत्रू आहेत असे फ्रीडनला वाटत नाही. लैंगिक प्रश्न आणि लैंगिक राजकारणावर अतिरिक्त लक्ष केंद्रित करण्याच्या प्रवृत्तीचा फ्रीडन धिक्कार करते आणि समाजातील स्त्रियांच्या परिस्थितीचा सर्वसाधारण दर्जा काय आहे याकडे लक्ष देण्याचा सल्ला देते.

एकूण काय स्त्री मातृत्व याला मानवी जीवनात एक चांगले मूल्य मानते. तिच्या घरकामाला सुद्धा महत्त्व दिले पाहिजे असे सुचवते.

**दुसरा टप्पा (The Second Stage) :-**

बेटी फ्रीडनने हे पुस्तक १९८१ साली प्रसिद्ध केले. हे 'दुसरे पुस्तक' स्त्रीवादावर लिहिले गेले. पहिल्या भागातील गेल्या वीस वर्षांमध्ये स्त्री चळवळीचा चिकित्सक आढावा ती घेते. दुसऱ्या भागातील आणि व्यक्तीगत पातळीवर स्त्रियांना भरीव सूचना देते. १९६० सालच्या स्त्रीवादी चळवळीनी अमेरिकेतील स्त्रियांची जीवने बदलली, परंतु दुसऱ्या या टप्प्यावर नव्या समस्या, नव्या आर्थिक आणि भावनिक गरजा निर्माण झाल्या. राजकीय दृष्ट्या स्त्रियांची सेवा प्रभावी झाली. पहिल्या टप्प्यावर स्त्रिया गृहिणी आणि मातृत्व या चौकटीत येणाऱ्या त्याग, सेवा या मूल्यांच्या विरोधात प्रतिक्रिया देत होत्या. परंतु दुसऱ्या टप्प्यामध्ये त्या बंदिस्त झाल्या आणि त्यांनी घर आणि कुटुंब या चौकटीवर आपले लक्ष केंद्रित झाले होते त्या ऐवजी नोकरी आणि करिअर या चौकटीवर आपले लक्ष परावर्तित केले.

**मूल्यमापन:-**

बेटी फ्रीडन तिच्या मवाळवादी भूमिकेमुळे तिचा स्त्रीवादी विचार आणि कृतीवर सीमॉन द बुव्हा पेक्षा अधिक प्रभाव पडला. कुटुंब संस्था नष्ट करणे किंवा विवाह अथवा करिअर यातील एका चौकटीची निवड करणे या दोन्ही भूमिका ती नाकारते. जेव्हा समाजवादी स्त्री वादाच्या विश्लेषणाची तार्किक धार तिच्या भूमिकेमध्ये दिसत नाही. तरीसुद्धा अमेरिकेतील स्त्रियांच्या राष्ट्रीय संघटने सारख्या महत्त्वाच्या संघटनेचे मत यातून प्रदर्शित होते. जहाल स्त्रीवाद्यांनी फ्रीडनला नाकारले. कारण त्यांना स्त्रियांची लैंगिकता एका आर्थी मुक्त करायची होती. उदा. जर्मन ग्रिअर असे अधोरेखित करते की स्त्रियांनी पुन्हा एकदा स्वतःची लैंगिकता विकसित करून आपले सम्यक व्यक्तीमत्त्व अभिव्यक्त करावे. म्हणून एका अर्थी फ्रीडन स्त्रियांच्या पारंपरिक मातृत्वाच्या, लैंगिक भूमिकेच्या आणि स्त्रियांच्या जीवनातील बिगर लैंगिक घटकांना महत्त्व देते. स्त्रियांच्या दृष्टीने फ्रीडनला असे वाटते की स्त्रियांना दोन तर्हेच्या गरजा असतात. एकीकडे त्यांना सत्ता, अस्मिता, दर्जा आणि संरक्षण हवे असते. तर दुसरीकडे विवाह, मुले, घर आणि कुटुंब हवे असते. पिढ्यांच्या मांडणीतून असे दिसते की या दोन्ही गरजा स्त्रियांच्या दृष्टीने आणि उत्क्रांत होणाऱ्या मानवी स्थितीच्या दृष्टीने मूलभूत गरजेच्या आहेत.

**स्वयं अध्ययन प्रश्न-३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) जुलिएट मिशेलचा जन्म.......... या ठिकाणी झाला.

अ) अमेरिका ब) फ्रान्स क) जर्मनी ड) न्यूझीलंड

२) 'विमेन्स इस्टेट' हा ग्रंथ .......... हिने लिहिला.

अ) बेटी फ्रीडन ब) ज्युलिएट मिशेल क) कॅट मिलेट ड) जर्मेन ग्रिअर

३) बेटी फ्रीडनने .......... हे आत्मचरित्र लिहिले.

अ) दुसरा टप्पा  ब) वुमेन्स इस्टेट  क) स्त्रीत्वाचे गुढ  ड) स्त्रिया:एक प्रदीर्घ क्रांती

४) बेटी फ्रीडनने 'दुसरा टप्पा' हे पुस्तक .......... साली प्रसिद्ध केले.

अ) १९८०  ब) १९८१  क) १९८२  ड) १९८३

५) .......... कॉलेजने बेटी फ्रीडनला मानद डॉक्टरेट दिली.

अ) स्मित  ब) टेम्पल  क) क्वीन्स  ड) सेंट

**ब) जोड्या जुळवा**

| | |
|---|---|
| १. जुलिएट मिशेल | अ) उदारमतवादी |
| २. बेटी फ्रीडन. | ब) समाजवादी |
| ३. स्त्रीत्वाचे गुढ. | क) १९७६ |
| ४. मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद | ड) १९७४ |
| ५. स्त्रिया: एक प्रदीर्घ क्रांती | इ) १९६३ |

अ) १-ब, २-अ, ३-इ, ४-ड, ५-क

ब) १-अ, २-ब, ३-क, ४-ड, ५-इ

क) १-क, २-ड, ३-अ, ४-ब, ५-इ

ड) १-ड, २-क, ३-ब, ४-अ, ५-इ

क) विधाने चूक की बरोबर सांगा.

१. इ.स. १९७५ साली अमेरिकन ह्युमेनिष्ठ असोसिएशन तर्फे बेटी फ्रिडनला 'मानवतावादी' म्हणून पुरस्कार मिळाला.

२. अमेरिकेतील समाजवादी लेखिका लीझ होगेल हिने मिशेलच्या निबंधाचे मूल्यमापन केले आहे.

अ) पहिले वाक्य बरोबर आहे दुसरे वाक्य चुकीचे आहे.

ब) पहिले वाक्य चुकीचे आहे दुसरे वाक्य बरोबर आहे.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

ड) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

## ३.३ सारांश

युरोपमध्ये सोळाव्या शतकात धर्मसुधारणा चळवळ, पुनरुज्जीवनाची चळवळ, फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती या घटनांनी समाजजीवन ढवळून निघाले. त्याचा परिणाम कला, विद्या, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सामाजिक, आर्थिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडून आले. हे बदल व प्रगती

अशीच चालू राहिली. या घटनांचा प्रभाव फक्त युरोप पुरता मर्यादित न राहता सर्व जगावर पडला. पाश्चात्य स्त्रिया आपल्या हक्क-अधिकारांसाठी झगडू लागल्या. पुढे यातून स्त्री अभ्यासाची सुरुवात झाली. या अभ्यासातून स्त्रियांच्या दडपणुकीच्या कारणांचा शोध घेऊन स्त्रीपुरुष समानतेचा विचार गाभ्याशी ठेवून वेगळ्या स्त्रीवादी विचारसरणीचा उदय झाला. उदारमतवादी, मार्क्सवादी, जहालमतवादी, समाजवादी या प्रवाहातून स्त्रियांच्या समस्या, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचार यांची जाणीव स्त्रियांसोबत समाजाचे होऊ लागली. स्त्रियांच्या हक्कांसाठी, अधिकारांसाठी समाजामध्ये समानतेचे, मानाचे व सन्मानाचे स्थान प्राप्त व्हावे यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. यामुळे स्त्रियांचे प्रश्न समाजा पुढे आले.

स्त्रीवादी चळवळीच्या तिसऱ्या टप्प्यानंतर म्हणजे १९६० नंतर स्त्रीवादी चळवळीला गती मिळाल्याचे दिसून येते. अमेरिकेतील युद्धविरोधी चळवळी, विद्यार्थी चळवळी, निग्रोंच्या गुलामांच्या चळवळी यांचाही प्रभाव स्त्रीवादी चळवळीवर पडला. बेटी फ्रीडन, टी. जर्मन गियर, केट मिलेट, शुलामिथ फायरस्टोन, जुलियेट मिशेल, शीला रोबॉथम इत्यादी स्त्रीवादी लेखिकेच्या लेखनाला महत्त्व प्राप्त झाले. त्यांच्या लिखाणामुळे स्त्रियांनी गृहिणीची प्रतिमा नाकारून त्यांनी त्यांच्या आवडीचे क्षेत्र निवडण्यासाठी बाहेर पडावे असे विचार वाढू लागले. पितृसत्ताक व्यवस्था स्त्रियांचे शोषण करते, याबद्दल जाणीव जागृती निर्माण होऊ लागली. या काळात स्त्रिया जाणीवपूर्वक करिअर म्हणून विविध प्रकारच्या नोकऱ्या व कामे स्वीकारू लागल्या. या काळात कुटुंब नियोजनासाठी आलेल्या गोळ्या आणि दुसऱ्या महायुद्धा नंतर नव्या पिढीतील स्त्रियांचे विचारपूर्वक निर्णय घेण्याची इच्छाशक्ती हे सर्व एकत्र येऊन अमेरिकेतील स्त्रिया घराबाहेर सत्ता मिळवण्यासाठी संघटित झाल्या. बेटी फ्रीडनचे 'स्त्रीत्वाचे गुढ' हे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि जर्मेन ग्रिअर यांनी नोंदवल्याप्रमाणे एका अर्थी दुसऱ्या स्त्रीवादी चळवळीची सुरुवात झाली. स्त्रियांच्या समस्यांचे फ्रीडनने केलेले वर्णन 'नाव नसलेली समस्या' हे अत्यंत लोकप्रिय झाले. केट मिलेटचे 'लैंगिकतेचे राजकारण' हे पुस्तक स्त्रीवादी भूमिकेच्या संदर्भात नवा टप्पा घडणारे ठरले. १९७० मध्ये स्त्रियांच्या लैंगिक नात्यासंदर्भात समलिंगी संभोगाचा प्रश्न उदयाला आला. स्त्री आणि पूरूष दोघांनीही गे मुक्तीची चळवळ उभारुन समलिंगी संभोगाच्या संदर्भात आवाज उठवण्यास सुरुवात केली. केट मिलेट आणि इतर अनेक प्रमुख स्त्रीवाद्यांनी सार्वजनिकरित्या स्वतःची लैंगिकता भिन्न आणि सम अशी दोन्ही प्रकारची आहे असे जाहीर केले.

स्त्रियांचे दुय्यमत्व संपवायचे असेल तर कुटुंब रचनेमध्ये अमुलाग्र बदल करावा लागेल. कुटुंबात मुलं मुली वाढवताना दोघात असमानता निर्माण होते. त्यांच्यावर व्यक्ति म्हणून, माणूस म्हणून संस्कार झाले पाहिजेत. यावर त्यांनी भर दिला. तर शुलामिथ फायरस्टोनच्या मते मूलभूत वर्गीय विभाजन आणि दडपणूक ही लैंगिकतेच्या आधारे केली जाते. स्त्रियांची शोषणाची मुळे ही स्त्री आणि पुरुष यांनी वंशसातत्यात बजावलेल्या भूमिकांमध्ये आहे आणि याचा शेवट स्त्रियांचे शोषण शारीरिक अथवा जैविक क्रांतीनंतर संपुष्टात येईल.

अशाप्रकारे स्त्रीवादी विचारवंतांनी सर्व सिद्धांतानी स्त्रियांच्या समान हक्कांची मांडणी केली आहे. बेटी फ्रीडन, कॅट मिलेट, जर्मन ग्रिअर, फायरस्टोन इत्यादी स्त्रीवादी लेखिकेच्या लिखानातून स्त्रीवादी चळवळीला गती प्राप्त झाली.

## ३.४ पारिभाषिक शब्द:–

१. **पुरुषप्रधानता** : एक प्रकारे स्त्रियांचे शरीर प्रजनन लैंगिकता आणि उपजीविकेची उत्पादन करण्यासाठी लागणारे श्रम यांच्यावरील वासाहातिक वर्चस्व म्हणजे पुरुष सत्ता

२. **लिंगभाव** : शारीरिक भेदापेक्षा सांस्कृतिक व सामाजिक भेदावर आधारलेली लिंग जाणीव

३. **स्त्रीवाद** : स्त्रियांसाठी समान हक्क, समान दर्जा, समान संधींची मागणी साठीचे सैद्धांतिक विचार

४. **लिंगभेद** : स्त्री किंवा पुरुष म्हणून वेगळी वागणूक देणे

५. **स्त्रीवादी विचारसरणी** : स्त्री हक्काची मांडणी करणारी विचारसरणी

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

* स्वयंअध्ययन प्रश्न– १ उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा

१. अमेरिका २.१९४५ ३. १९ व्या शतकातील स्त्रिया ४. बार्बरा स्मिथ

५. मेरी क्राफ्ट

ब) जोड्या जुळवा

क) १–क, २–अ, ३–ब, ४–इ, ५–ड

क) वाक्ये चूक की बरोबर सांगा.

ब) पहिले वाक्य बरोबर आहे व दुसरे वाक्य चुकीचे आहे.

* स्वयंअध्ययन प्रश्न–२ उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१. १९७० २. मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद ३. शूलामीथ फायरस्टोन ४. मिनेसोटा

५. शुलामीथ फायरस्टोन

ब) वाक्य बरोबर की चूक लिहा.

ड) दोन्ही वाक्य बरोबर आहेत.

* स्वयं अध्ययन प्रश्न– ३ उत्तरे

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१. न्युझीलँड २. जुलीएलट मिशेल ३. स्त्रीत्वाचे गुढ ४. १९८१

५. स्मित

ब) जोड्या जुळवा

अ) १-ब, २-अ, ३-इ, ४-ड, ५-क

क) वाक्य चूक की बरोबर लिहा.

क) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

१) मेरी वोल्स्टोनक्राफ्ट या स्त्रीवादी लेखिकेबद्दल लिहा

२) केट मिलेट व तिच्या कार्याबद्दल लिहा.

३) सीमॉन दि बुव्हा व तिच्या लेखनाबद्दल लिहा.

४) केट मिलेट या जहालवादी स्त्रीवादी लेखिकेबद्दल लिहा.

५) शुलामिथ फायरस्टोन बद्दल लिहा

६) जूलिएट मिशेल या समाजवादी लेखिकेविषयी लिहा.

७) बेटी फ्रीडन व तिच्या कार्याबद्दल माहिती लिहा.

**ब) टिपा लिहा**

१) पाश्चात्त्य स्त्री चळवळ व तिचे टप्पे सांगा.

२) मेरी वोल्स्टोनक्राफ्ट

३) सीमॉन दि बुव्हा

४) केट मिलेट

५) बेटी फ्रीडन

६) जुलिएट मिशेल

७) स्त्रिया एक प्रदीर्घ क्रांती

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ:-

१) स्त्रीवाद, लांडे सुमती व तांबे श्रुती, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती, २००७.

२) कदम य. ना. आधुनिक जग, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून, २०१०.

३) डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१.

४) डॉ. पाटील पद्मजा, डॉ. जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००७.

५) फडके य.दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १ ते ५ श्री विद्या प्रकाशन, पुणे.

६) डॉ. मोरवंचीकर राजश्री, अमेरिकन संघराज्याचा इतिहास, पब्लिशर्स, औरंगाबाद.

७) पाटील शोभा, स्त्रीवाद विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

८) विद्युत भागवत, स्त्रीवाद सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.

❑❑❑

# घटक ४
# आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय प्रयत्न

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय विवेचन
  ४.२.१ जागतिक महिला परिषदा
  ४.२.२ यूएन वूमन संघटना
  ४.२.३ राष्ट्रीय महिला आयोग व राज्य महिला आयोग
४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ
४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ आधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे

या घटकात आपणाला लक्षात येईल की,

१) स्त्रियांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्न लक्षात येतील.

२) जागतिक महिला परिषदांचा इतिहास समजण्यास मदत होईल.

३) बीजिंग महिला परिषदेत मंजूर झालेला कृती व्यासपीठ दस्तऐवज समजून घेता येईल.

४) आंतरराष्ट्रीय स्तरावर यूएन वूमन ही संघटना स्त्रियांसाठी काम करते. या संघटनेची कार्यपद्धती व महत्त्व लक्षात येईल.

५) राष्ट्रीय स्तरावर स्त्रियांसाठी काम करणाऱ्या राष्ट्रीय महिला आयोगाची कार्यपद्धती व महत्त्व लक्षात येईल.

६) राज्य महिला आयोगाची माहिती समजून घेता येईल.

७) एकंदरीत या प्रकरणात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची चिकित्सा करता येणार आहे.

## ४.१ प्रस्तावना

स्त्री-पुरूष समानतेचा प्रश्न नवसमाज रचनेचा आणि परिवर्तनवादी चळवळीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. स्त्री-पुरूष समानतेच्या प्रश्नाला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक अशी विविध अंगे आहेत. हा प्रश्न गुंतागुंतीचा बनलेला आहे. जागतिक पातळीचा विचार केला तर प्रत्येक देशाची संस्कृती त्याच्या धर्मानुसार ठरत असते. प्रश्न हा आहे की, प्रत्येक धर्माने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले आहे. पुरूषसत्ताक व्यवस्थेला मान्यता दिली आहे. या समाजाचे भिन्न, आचार-विचार असले तरी स्त्रीच्या दुय्यमत्त्वाला मान्यता मात्र जगभरातील समाज देतो. स्त्रियांचे हे दुय्यमत्व नष्ट करणे व त्यांना सर्व क्षेत्रात पुरूषांबरोबर समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी जागतिक स्तरावर व राष्ट्रीय स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. संयुक्त राष्ट्राने पुढाकार घेऊन स्त्रियांच्या समस्येकडे जगाचे लक्ष वेधले. कारण संयुक्त राष्ट्राच्या सनदेत लिंगभेदासह कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मानवी स्वातंत्र्याचा व मूलभूत हक्कांचा आदर करणे हे प्रमुख उद्दिष्ट मानले आहे. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा उल्लेख केला आहे. परिणामी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्री-पुरूष समतेसाठी प्रयत्न केले जाऊ लागले. या प्रयत्नातूनच आंतरराष्ट्रीय स्त्री परिषदा भरविल्या गेल्या. या परिषदांमधून स्त्री प्रश्नांची चर्चा केली गेली या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी बीजिंग परिषदेत कृती आराखडा तयार केला. त्याची अंमलबजावणी संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी आपल्या देशामधून केला. त्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने यूएन वूमन ही संघटना निर्माण केली. परिणामी भारतातही स्त्री प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी राष्ट्रीय महिला आयोगाची निर्मिती करण्यात आली. भारतातील राज्यांनी आप-आपल्या राज्यासाठी राज्य महिला आयोगाची निर्मिती केली. यूएन वूमन संघटना सदस्य राष्ट्राच्या देशात उभ्या राहिल्या. या सर्व प्रयत्नांतून एक सुसंघटित, नियोजनबद्ध कार्य स्त्रियांच्या प्रश्नाबाबत सुरू झाले, त्याचा आढावा आपण या प्रयत्ना घेणार आहोत.

### ४.२.१ जागतिक महिला परिषदा

स्त्री-पुरूष समानतेचा प्रश्न बहुआयामी आहे. स्त्री-पुरूषांच्या सर्वांगीण जीवनाला व्यापून टाकणारा आहे. म्हणजे स्त्री-पुरूषांच्या जीवनातील विविध पातळ्यांवरील विषमता नष्ट होत नाही तो पर्यंत प्रत्येक पायरीवर आपणाला लढा द्यावा लागणार आहे. असे लढे देश पातळीवरच नव्हे तर जागतिक पातळीवरही द्यावे लागणार आहेत. त्याची सुरूवात झाली आहे. जागतिक महिला परिषदा त्याचे उत्तम उदाहरण आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर शासकीय (संयुक्त राष्ट्र संघटना) व बिगर शासकीय (स्वयंसेवी संघटना) प्रयत्नशील आहेत. जागतिक पातळीवर स्त्रियांच्या प्रश्नांवर चर्चा करून त्या प्रश्नांसाठी कृतीयुक्त कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन केले जाते. संयुक्त राष्ट्र संघाचे सभासद राष्ट्रे त्याचे पालन करतात.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने महिलांच्या जागतिक परिषदा आयोजित केल्या जाऊ लागल्या आहेत. त्याच बरोबर समांतर अशा बिगर सरकारी संस्थांच्या (NGO) महिला प्रतिनिधींच्या परिषदाही घेतल्या जाऊ लागल्या. या परिषदाही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पाठिंब्याने होऊ लागल्या. म्हणजे शासकीय प्रतिनिधींच्या व बिगर सरकारी प्रतिनिधींच्या परिषदा एकाच वेळी एकाच शहरात होऊ लागल्या. या मुळे

स्त्री प्रश्नांचा विचार करणारे जागतिक व्यासपीठ निर्माण झाले आहे. या व्यासपीठामुळे स्त्रियांमध्ये नवी उमेद व उत्साह निर्माण झाला आहे. तर परिवर्तनवादी चळवळीला स्त्री-पुरूष समानतेचा मुद्दा महत्त्वाचा व आवश्यक आहे, याचे भान निर्माण होत आहे. ८ मार्च हा 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून जगभरात महिला व पुरूष साजरा करत आहेत.

**संयुक्त राष्ट्र संघटना**

संयुक्त राष्ट्राच्या सनदेत लिंगभेदासह कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मानवी स्वातंत्र्याचा व मूलभूत हक्कांचा आदर करणे हे उद्दिष्ट मानले आहे. कलम १ मध्ये अशी तरतूद आहे की, लिंग, भाषा, वंश, धर्म या आधारांवर मनुष्यात कोणताही भेदभाव केला जाणार नाही. मूलभूत स्वातंत्र्य वृद्धिंगत करणे व त्यांना सन्मान प्राप्त करून देणे यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळवणे हे संयुक्त राष्ट्राचे उद्दिष्ट आहे. संयुक्त राष्ट्राच्या सनदेत स्त्रियांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा उल्लेख आहे.

**पहिली महिला परिषद-मेक्सिको सिटी (१९७५)**

मेक्सिको सिटी येथे १९७५ साली संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांच्या शासकीय प्रतिनिधींची पहिली जागतिक महिला परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला २००० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेने स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तन करण्यासाठी कृती कार्यक्रम तयार केला. या कार्यक्रमाचे दोन महत्त्वाचे मसुदे तयार केले. 'स्त्रियांची समानता' आणि 'शांतता आणि विकासातील स्त्रियांचे योगदान.' या परिषदेत १९७५ ते १९८५ हे आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर करण्यात आले. संयुक्त राष्ट्रानी आयोजित केलेल्या या परिषदेला समांतर अशी बिगर शासकीय संस्थांची (NGO) परिषदही मेक्सिको येथे भरली. या परिषदेमध्ये जवळजवळ ३००० बिगर शासकीय संस्थांमध्ये (NGO) काम करणारे प्रतिनिधी हजर होते. मेक्सिको परिषदेने महिला दशकासाठी जागतिक पातळीवर कृती कार्यक्रमाद्वारा दिशा देण्याचा प्रयत्न केला. १९७६ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने स्त्रियांसाठी एक ऐच्छिक निधीची स्थापना केली. पुढे १९८५ मध्ये यालाच व्यापक स्वरूप देण्यात आले आणि संयुक्त राष्ट्राचा स्त्रियांसाठीचा विकास निधी अशा प्रकारची स्वायत्त संघटना निर्माण केली.

**दुसरी जागतिक महिला परिषद कोपेनहेगन (१९८०)**

दुसरी जागतिक महिला परिषद कोपेनहेगन या ठिकाणी १९८० मध्ये घेण्यात आली. पहिल्या महिला परिषदेत १९७५ ते १९८५ हे आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर करण्यात आले. या स्त्री दशकाच्या मध्यावर स्त्री दशकातील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्रामुख्याने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला विविध देशातील ८००० प्रतिनिधी हजर होते. या परिषदेमध्ये १५० कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन केले होते. या चर्चा सत्रांमध्ये स्त्रियांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. स्त्रियांची लैंगिक गुलामगिरी, घरकामाचे वेतन, स्त्रीवाद, अनुरूप तंत्रज्ञान, स्त्री-अभ्यास, इत्यादी विषयांवर चर्चा झाल्या. या परिषदेचे फलित म्हणजे आंतरराष्ट्रीय पातळीवर तयार झालेली यंत्रणा, (NETWORK) आणि जागतिक पातळीवर स्त्री चळवळीला मान्यता मिळाली.

**तिसरी जागतिक महिला परिषद नैरोबी १९८५**

केनियाची राजधानी नैरोबी या ठिकाणी तिसरी जागतिक महिला परिषद झाली. या परिषदेने महिला दशकाची सांगता झाली. या परिषदेसाठी शासकीय स्तरावरील २००० प्रतिनिधी हजर होते. तर बिगर–सरकारी १५००० प्रतिनिधी देश विदेशातून हजर होते. दि. १० ते १९ जुलै १९८५ या काळात परिषदेची हजारावर चर्चासत्रे आणि कार्यशाळा झाल्या. या परिषदेत स्त्रियांसंबंधित काही नव्या प्रश्नांची चर्चा झाली. त्यात स्त्री कायदा आणि विकास, कला आणि साहित्यातील स्त्री, स्त्री संबंधीचे संशोधन, तिसऱ्या जगातील स्त्रियांचा दृष्टिकोन इ. प्रमुख विषय होते. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे बिगर–सरकारी व्यासपीठावर (NGO-FORUM) तीन गट स्पष्ट दिसत होते ते म्हणजे एक साम्राज्यवादी, दुसरा समाजवादी व तिसरा साम्राज्यवाद विरोधी. तिसऱ्या जगातील अविकसित राष्ट्रातील स्त्रियांचा प्रभाव या खुल्या व्यासपीठावर पडला होता. या स्त्रियांची संख्या ६०% इतकी होती. स्त्री चळवळीची सुरूवात पाश्चात्य राष्ट्रात झाली असली तरी या परिषदेतील तिसऱ्या जगातील महिलांनी ही चळवळ तळागाळापर्यंत गेल्याचे दाखवून दिले. या परिषदेत अनेक विषयावर विचारमंथन झाले. यातून स्त्री–मुक्ती चळवळीचा इत्यंभूत माहिती मिळाली. स्त्री–मुक्ती चळवळीला दिशा मिळाली. या परिषदेत झालेल्या विचार मंथनातून स्त्रियांच्या एकूणच आर्थिक, सामाजिक व राजकीय हक्कांचा जो जागतिक आढावा घेण्यात आला त्यातून अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या. उदा. स्त्रिया जगातील एकूण कामांपैकी दोन तृतियांश कष्ट उपसतात. तिसऱ्या जगातील ग्रामीण स्त्रिया आठवड्याचे १०० तास काम करतात. ८८% सरपण स्त्रिया गोळा करतात. तर या उलट जागतिक उत्पादनाच्या केवळ ५% हिस्सा स्त्रियांना मिळतो. तर हा हिस्सा १% पेक्षा कमी स्त्रियांच्या मालकीचा असतो.

या परिषदेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जगभरातील स्त्रियांनी आफ्रिकेतील वर्ण द्वेषी राजवटी विरूद्ध आणि इस्त्राईलच्या वंशवादा विरूद्ध एकमुखाने आवाज उठवला. तसेच, या परिषदेत लिबरल फेमिनिस्ट, मार्क्सिस्ट फेमिनिस्ट, रॅडिकल फेमिनिस्ट या विचार प्रवाहांचे पडसाद या परिषदेवर पडले.

**नैरोबी येथील जागतिक महिला परिषदेची फलश्रृती**

या परिषदेत स्त्री–प्रश्नांबाबत सकारात्मक दृष्टिकोन घेण्याचा निर्णय झाला. या पुढे रिता संघर्ष करावयाचा नाही. तर धोरणात्मक हस्तक्षेप करावयाचा हे निश्चित झाले. यातूनच विकसनशील आणि विकसित देशातील स्त्रियांसाठी 'भविष्यकालीन रणनीती' (FORWARD LOOKING STRATEGIES) स्वीकारण्यात आली. अशा रितीने नैरोबी परिषदेने स्त्रियांच्या स्थितीमध्ये अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया सुरू केली. या धोरणाने समता, विकास आणि शांतता या तत्वांवर आधारित नवीन जागतिक व्यवस्था निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले. आणि त्यासाठी शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या तीन क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवले. 'भविष्यकालीन धोरणाकडे' एक परिपूर्ण धोरण म्हणून पाहिले

जात असले तरी स्त्री चळवळीतील कार्यकर्त्यांनी त्यावर कृती करण्या ऐवजी टिकाच केली. त्यांच्या मते, या योजनांचा जोपर्यंत शासनावर दबाव येत नाही तो पर्यंत ती निरर्थक आहे.

**बीजिंग परिषद**

बीजिंग परिषदेने जगातील सर्व स्तरातील महिलांना एकत्रित करून त्यांना एका प्लॅटफॉर्मवर आणले. त्याच्या प्रश्नांची चर्चा करून त्यावर तोडगा काढण्याचे मार्ग सुचवले. स्त्रियांसंबंधित काळजी करणारी क्षेत्रे निश्चित केली. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शासनाची भूमिका आणि क्षेत्र निश्चित करून दिली.

**बीजिंग परिषदेची पूर्वतयारी**

१९४६ साली संयुक्त राष्ट्रांनी स्त्रियांचे सामाजिक स्थान निश्चित करण्यासाठी 'कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वूमन' (CSW) या आयोगाची नियुक्ती केली होती. याच आयोगाकडून महिला परिषदेची सर्व जबाबदारी घेतली जाते. न्यूयॉर्क शहरात त्याचे मुख्यालय आहे. या कार्यालया मार्फत परिषदेत मांडले जाणारे ठराव, सूचना, इत्यादी तयार करण्याचे काम केले जाते. त्यांनी तयार केलेले अहवाल संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक मंडळापुढे संमतीसाठी पाठवले जातात. तेथून ते अखेरचे शिक्कामोर्तब करण्यासाठी आमसभेकडे पाठवले जातात आणि नंतर ते परिषदे पुढे मांडले जातात.

**महिला परिषदेच्या यशस्वी संयोजनासाठी संयुक्त राष्ट्राकडून जगाचे पाच विभाग**

महिला परिषदेच्या यशस्वी संयोजनासाठी संयुक्त राष्ट्राकडून जगाचे पाच विभाग केले आहेत.

१) आशिया आणि पॅसिफिक विभाग २) लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन विभाग ३) उत्तर अमेरिका आणि युरोप ४) पश्चिम आशिया ५) अफ्रिका

या प्रत्येक विभागाकडून महिला परिषदेच्या पूर्वतयारीसाठी प्रत्येक देशात आणि त्या नंतर प्रादेशिक पातळीवर विविध चर्चा, बैठका घडवून आणल्या जातात आणि त्या आधारावरच प्रत्येक विभागाचा अहवाल तयार केला जातो. हे सर्व अहवाल महिला परिषदेच्या पूर्वतयारीच्या जागतिक बैठकीत एकत्र आणले गेले.

**संयुक्त राष्ट्र सभासद राष्ट्रांमधून परिषदेची तयारी**

प्रत्येक राष्ट्राने परिषदेच्या तयारीसाठी स्वतंत्र यंत्रणा तयार केली होती. निरनिराळ्या समित्या नेमून त्यांच्याकडून निरनिराळ्या विषयावर अभ्यास पूर्ण निबंध तयार केले गेले. त्यातून मग राष्ट्राचा अधिकृत अहवाल तयार करण्यात आला. याला समांतर असा बिगर शासकीय संस्थांचाही अहवाल तयार केला गेला.

संयुक्त राष्ट्राच्या सभासद राष्ट्रांमधून स्त्रियांच्या दर्जासंबंधी परिषदा झाल्या. या राष्ट्रांमधून सरकारी प्रतिनिधींच्या परिषदेला समांतर अशी बिगर सरकारी संस्थांची (NGO) देखील परिषद झाली. या विभागीय परिषदेचे नियोजन आणि संघटन ७० सदस्याच्या नियोजन समितीकडे देण्यात आले. कुनिंग सुपात्रा मस्दित यांची निमंत्रक म्हणून नेमणूक करण्यात आली. महिला परिषदेच्या नियोजनासाठी करण्यात आलेल्या जगाच्या पाच विभागातून ज्या प्रमाणे शासकीय पातळीवर बैठका व परिषदा घेण्यात येत होत्या–त्या पद्धतीने बिगर

शासकीय पातळीवरही बैठका व परिषदाचे आयोजन करण्यात आले. या विविध देशातील, प्रदेशातील शासकीय व बिगर शासकीय संस्थांनी आपल्या राष्ट्रातील स्त्रियांच्या परिस्थिती संबंधीचे अहवाल व निवेदने तयार केली.

**विभागीय पातळीवरील परिषदा**

यानंतर प्रादेशिक पातळीवर सरकारी प्रतिनिधींच्या आणि बिगर सरकारी संस्थांच्या परिषदा १९९३ – १९९५ या काळात झाल्या. या परिषदांमध्ये प्रत्येक देशातील प्रतिनिधींच्या विचारांची व अहवालाची देवाण–घेवाण करण्यात आली आणि त्या आधारावर प्रादेशिक अहवाल तयार करण्यात आले. त्या–त्या विभागातील बिगर शासकीय संस्थांकडूनही प्रादेशिक अहवाल तयार करण्यात आले. या बिगर सरकारी संस्थानी सरकारी अहवालात सत्य परिस्थिती झाकली जाऊ नये म्हणून सरकारी परिषदावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. या विभागीय परिषदा त्या–त्या विभागात पार पडल्या या परिषदांमधून विभागीय अहवाल तयार केले गेले.

| अ. क्र. | महिला परिषदेसाठी केलेले जगाचे विभाग | विभागीय परिषदेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | आशिया आणि पॅसिफीक विभाग | इंडोनेशियामध्ये जकार्ता जून ७ ते १४ १९९४ |
| २ | लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन विभाग | अर्जेन्टीनामध्ये मारडेल प्लाटा २६ ते ३० सप्टेंबर १९९४ |
| ३ | उत्तर अमेरिका आणि युरोप | ऑस्ट्रीयामध्ये व्हिएन्ना १७ ते २१ ऑक्टोबर १९९४ |
| ४ | पश्चिम आशिया | जॉर्डनमध्ये अम्मान ९ व १० नोव्हेंबर १९९४ |
| ५ | अफ्रिका | सेनेगलमध्ये डक्कार १२ ते १५ नोव्हेंबर १९९४ |

या सर्व विभागीय परिषदांमध्ये स्त्रियांच्या सर्वसामान्य प्रश्नांवर गरीबी, वाढता हिंसाचार, शस्त्रास्त्र स्पर्धा, वांशिक कलह, स्त्री अत्याचार, निर्णय प्रक्रियेतील असमान सहभाग या बाबत एकमत झाले. प्रत्येक विभागाने आपापल्या विभागातील प्रादेशिक प्रश्नालाही महत्त्व दिले. त्या प्रश्नाला वाचा फोडली. या सर्व विभागीय परिषदांमध्ये सरकारी पातळीवरील परिषदा प्रमाणेच बिगर शासकीय संघटनांच्या समांतर परिषदाही पार पडल्या. या परिषदांमधून स्त्रियांच्या स्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यावर चर्चा करण्यात आली व विभागीय अहवाल तयार झाले.

**प्रेपकॉम** (PREPCOM) **न्यूयॉर्क**

बीजिंग परिषदेच्या पूर्वतयारीसाठी व त्यामध्ये सादर केल्या जाणाऱ्या कृती आराखड्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी प्रेपकॉमच्या बैठका होत होत्या. (PREPCOM- PREPARATORY COMMTTEE) या बैठकांत प्रत्येक देशाचे व पाचही विभागाचे प्रतिनिधी हजर असत. या पूर्वतयारी समितीच्या दुसरी बैठक मार्च १९९४ ला झाली. या बैठकीत स्त्रियांसंबंधित ११ क्षेत्रांना काळजी करणारे क्षेत्र

म्हणून प्राधान्य देण्यात आले. गरीबी, शिक्षण, आरोग्य आणि आरोग्य सुविधा, स्त्रियांवरील अत्याचार, शस्त्र-संघर्ष किंवा इतर प्रकारचे संघर्ष आणि स्त्रिया, अर्थव्यवस्था, राजकीय सहभाग, अपूर्ण साधने आणि यंत्रणा, मानवी हक्क, प्रसारमाध्यमे आणि पर्यावरण ही ती क्षेत्र आहेत.

पूर्वतयारी समितीची (प्रेपकॉम) अंतिम बैठक १५ मार्च ते ७ एप्रिल १९९५ या काळात न्यूयॉर्क येथे झाली. या बैठकीत कृती व्यासपीठ दस्तऐवजाला अंतिम स्वरूप देताना भिन्न दृष्टिकोनामुळे राष्ट्रा-राष्ट्रांत व प्रतिनिधीमध्ये अनेक वेळा संघर्ष झाले. बिगर सरकारी संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. या सर्व बैठकांमधून बीजिंग परिषदेत स्वीकारण्यात यावयाच्या कृती व्यासपीठावर (आराखड्यावर) दस्तऐवजांवर चर्चा झाली आणि प्रत्येक राज्याने व प्रादेशिक गटाने आपल्यास अनुकूल अशा विषयाचा समावेश कृती व्यासपीठ दस्तऐवजात करण्याचा प्रयत्न केला. भारताच्या आग्रहामुळे ‘दहशतवाद हा मूलभूत मानवी हक्कांचा भंग करतो’ म्हणून दहशतवादाचा निषेध करणारे कलम मसुद्यात घालण्यात आले. अर्थात, या प्रदेशातील राज्ये, विशेषत: पाकिस्तान या बद्दल नाराज होते. जी ७७ देशाच्या आग्रहामुळे कृती व्यासपीठ दस्तऐवजात ‘मुलींची सातत्याने होणारी पिळवणूक’ हे १२ वे काळजी करणारे क्षेत्र म्हणून घालण्यात आले. यासाठी युरोपियन संघाने विरोध दर्शवला होता. प्रत्येक स्त्रिला केव्हा, किती आणि कशी मुले असावीत हे ठरवण्याचा हक्क असला पाहिजे. या संबंधाने ‘होली सी’ या संयुक्त राष्ट्र निरीक्षक संघटनेने विरोध केला. तसेच, उजव्या संघटनेनेही विरोध केला. (होली सी ही संघटना कॅथालिक चर्चची सर्वोच्च संघटना आहे जिला संयुक्त राष्ट्राच्या सभांना निरीक्षक म्हणून उपस्थित राहण्याचा अधिकार आहे.) स्त्रियांच्या मूलभूत मानवी हक्कांच्या संरक्षणातील, लैंगिक, प्रजोत्पादन विषयक आणि आरोग्यविषयक हक्क हा प्राथमिक टप्पा आहे, अशी भूमिका असलेल्या जाहीरनाम्यावर ८३ देशांतील ६५० प्रतिनिधींनी या वेळी स्वाक्षरी केली.

आर्थिक तरतुदी संबंधित चर्चेतही बरेच मतभेद झाले. पुरेसा निधी उपलब्ध नसेल तर कृती व्यासपीठाची अंमलबजावणी करणे अवघड जाईल, अशा प्रकारची भूमिका प्रामुख्याने तिसऱ्या जगातील प्रतिनिधींनी घेतली. लष्करी खर्च कमी करून तो निधी कृती व्यासपीठाच्या अंमलबजावणीसाठी वापरला जावा, असे मसुद्याच्या २२८ च्या परिच्छेदात स्पष्ट केले. तसेच, कर्ज देणाऱ्या राष्ट्रांनी कर्जासंबंधीच्या अटी शिथिल कराव्यात, त्यामुळे कृती व्यासपीठाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक निधी वापरता येईल, असा आग्रह तिसऱ्या जगातील स्त्रियांनी धरला. अर्थातच, विकसित राष्ट्रांनी याला विरोध करून भांडवलशाही राष्ट्रांनी आपली पकड दृढ करण्याचा प्रयत्न होता. विकसित पाश्चात्य आणि तिसऱ्या जगातील स्त्रियांचे प्रश्न भिन्न-भिन्न होते. तिसऱ्या जगातील स्त्रिया भूकबळी व हुंडाबळी यासारखे प्रश्न मांडत होत्या तर पाश्चात्य जगातील समलिंगी संभोग व पाहिजे तेथे मुलांना दूध पाजणे यासारखे प्रश्न मांडत होत्या.

याच वेळी स्त्रियांची वास्तव स्थिती विशद करणारा जाहीरनामा स्वयंसेवी संस्थांकडून समांतर पातळीवर तयार करण्यात आला. या जाहीरनाम्याला पाचही विभागात दिनांक १४ व १५ मार्च १९९५ ला २७ स्त्रियांच्या समितीकडून अंतिम रूप देण्यात आले.

**स्वयंसेवी संस्थांचे 'कृती व्यासपीठ दस्तऐवज'** (Draft Platform for Action) **निर्माण करण्यामधील योगदान**

शासकीय पातळीला समांतर असणाऱ्या स्वयंसेवी संस्थानी कृती व्यासपीठ दस्तऐवज तयार करताना महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वयंसेवी संस्थानी शासकीय पातळीवर तयार करण्यात आलेल्या कृती व्यासपीठामध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. परंतु या स्वयंसेवी संस्थांना अनेक वेळा शासकीय पातळ्यांवर प्रवेश नाकारला गेला. मसुद्याच्या प्राथमिक वाचनाच्या वेळी स्वयंसेवी संस्थाना प्रवेश असावा अशी त्यांनी भूमिका घेतली असली तरी त्यांना प्रवेश मिळाला नाही. याबद्दल स्त्री संघटनांनी नापसंती व्यक्त केली.

**भारतातील बीजिंग परिषदेची पूर्वतयारी**

मेक्सिको, कोपेनहेगन व नैरोबी येथे ज्या आंतरराष्ट्रीय स्त्री परिषदा झाल्या त्याच्या तुलनेत बीजिंग परिषदेची पूर्वतयारीची प्रक्रिया आधिक व्यापक व सुसूत्रीकरणाची होती.

**सुलभीकरण समिती** (Inter-Agency Facilitating Committee For Beijing- IFCB)

भारतामध्ये बीजिंग परिषदेच्या तयारीसाठी अंतरसंस्थात्मक सुलभीकरण समिती (Inter-Agency Facilitating Committee For Beijing- IFCB) स्थापन केली होती. या समितीने बीजिंग परिषदेच्या पूर्वतयारीची माहिती सर्व पातळ्यांवर पोहचवली. भारतीय स्त्रियांपुढील प्रमुख प्रश्नांवर चर्चा, परिषदा व कार्यशाळा आयोजित करणे, संशोधन करून त्या आधारांवर अहवाल आणि निबंध तयार करण्यासाठी प्रोत्साहित करणे तसेच, तळागाळात काम करणाऱ्या स्त्रियांना संपूर्ण प्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि स्वयंसेवी संस्था यांचा परिषदेच्या पूर्वतयारीतील सहभाग अधिकाधिक वाढविणे, ही महत्त्वपूर्ण कामे या समितीने केली. ही कामे करण्यासाठी भारतात दोन ठिकाणी को-ऑर्डिनेशन युनिट सुरू करण्यात आले. १९९३ला दिल्ली येथे तर १९९४ला बंगलोर येथे कोऑरडिनेशन युनिट (CU) सुरू केले.

**को-ऑर्डिनेशन युनिट** (CU- **सी.यू.**)

संपूर्ण भारतातील तळागाळातील स्त्रियांचे प्रश्न, स्त्री संघटनांचे प्रश्न राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी सी. यू. ने प्रयत्न केले. सर्व स्तरातील स्त्रियांचे अनुभव जमा करून प्रश्न समजून घेऊन त्यांच्या प्रश्नांचे विश्लेषण करून त्याचा अग्रक्रम ठरविला जावा, यासाठी सी. यू. प्रयत्नशील होते. स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधात भिन्न-भिन्न क्षेत्रात काम करणाऱ्या संघटना व स्त्रिया यांच्यात समन्वय साधण्यासाठी सी.यू.ने संपूर्ण भारतभरात विविध बैठका, मेळावे, परिषदा, कृती सत्रे इत्यादींचे आयोजन केले.

या चर्चासत्राला व कृती सत्राला सी.यू.चे प्रतिनिधीही हजर असत. या चर्चासत्रांमधून उपस्थित केलेल्या महत्त्वपूर्ण प्रश्नांचा राष्ट्रीय मसुद्यात समावेश करण्याचा प्रयत्न सी.यू.ने केला. बीजिंग परिषदेसाठी सर्वांना माहिती पुरविणारे व संपर्क केंद्र म्हणून सी.यू.ने काम केले.

**शासकीय पातळीवरील प्रयत्न**

बीजिंग परिषदेची शासकीय पातळीवरील सर्व जबाबदारी, मानवी संसाधन मंत्रालयांतर्गत असलेल्या महिला व बालविकास खात्याने उचलली.

भारताच्या स्त्रियांसंबंधीचा राष्ट्रीय मसुदा तयार करण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी त्यांनी सी.यू. आणि विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या स्त्री संघटनांची आणि कार्यकर्त्यांची मदत घेतली. तयार झालेल्या राष्ट्रीय मसुद्याचा आराखडा प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतरित करून संपूर्ण भारतात वितरित करण्यात आला. यावर स्वयंसेवी संस्था स्त्री संघटनांनी चर्चा केली आणि मसुद्यामध्ये बदलही सुचवले. महत्त्वाच्या विषयांना अग्रक्रम मिळावा आणि मसुद्याचे पुनर्लेखन करावे यासाठी स्त्री संघटनांनी आग्रह धरला.

या सर्व प्रयत्नानंतर बीजिंग परिषदेत सहभागी होण्यासाठी भारतातून ३५० प्रतिनिधी गेले. त्यातील १५० सी.यू.च्या तयारी प्रक्रियेतून आलेले होते. तर २०० स्वतंत्ररित्या सहभागी झाले. यात प्रामुख्याने स्त्री-अभ्यासक, स्त्री कार्यकर्त्या, माध्यमातून आणि प्रसार माध्यमातील स्त्रिया अशा विविध क्षेत्रातील स्त्री प्रश्नांशी जोडलेले स्त्रिया होत्या. अर्थात त्याबरोबर शासकीय श्रेष्ठ मंडळी होती.

संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांच्या सरकारी प्रतिनिधींची परिषद बीजिंग येथे ४ सप्टेंबरला सुरू झाली. ४ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर १९९५ या काळात झालेल्या या परिषदेत ११९ देशाच्या १२००० प्रतिनिधींनी सहभाग घेतला. प्रत्येक देशाचे शिष्टमंडळ आले होते. त्याबरोबर जगातील २००० स्वयंसेवी संस्थांना निरीक्षक म्हणूनही आमंत्रित करण्यात आलेले होते.

चीनचे अध्यक्ष जियांग जेमिन यांनी परिषदेचे उद्घाटन केले. उद्घाटनाच्या या कार्यक्रमाला संयुक्त राष्ट्राच्या सर्व संघटनांचे प्रमुख उपस्थित होते. काही राष्ट्र प्रमुखांबरोबरच या परिषदेत २६ राष्ट्राध्यक्षांच्या पत्नी उपस्थित होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने हिलरी क्लिंटन आणि इजिप्तच्या श्रीमती सुसाना मुबारक यांचा समावेश होतो. भारताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व त्या वेळेसचे मानव संसाधन मंत्री माधवराव शिंदे यांनी केले. माधवराव शिंदे यांनी आपल्या भाषणात बीजिंग परिषदेच्या निमित्ताने भारतीय शासनाच्या भावी योजनांचा आढावा घेतला. ते म्हणाले, 'या परिषदेत स्वीकारण्यात यावयाच्या कृती व्यासपीठाच्या योग्य अंमलबजावणीसाठी एक संस्थात्मक यंत्रणा उभी केली जाईल. तसेच, स्त्रियांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी एका आयुक्ताची निवड केली जाईल. स्त्रियांसंबंधी व्यापक स्वरुपाचे राष्ट्रीय धोरण तयार करण्याचा प्रयत्न भारतीय शासनाकडून केला जाईल, असे आश्वासन त्यांनी या वेळी दिले. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित नवीन जागतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी भारत पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन त्यांनी दिले. या परिषदेत कृती व्यासपीठ दस्तऐवजाला मान्यता देण्यात आली. १८९ देशानी कृती दस्तऐवज स्वीकारला.

कृती व्यासपीठ दस्तऐवज (Draft Platform for Action) स्त्री प्रश्नांना समर्थपणे सामोरे जाणारी आणि त्यासाठी कृती व्यासपीठ स्वीकारणारी बीजिंग परिषद ही पहिलीच महिला परिषद ठरली. कृती व्यासपीठ धोरणात्मक मांडणीतून स्त्रीहक्कांसाठी प्रयत्नांची बांधिलकी मान्य करणारा दस्तऐवज आहे.

स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा हा दस्तऐवज २०० पाणी व एक लाख शब्दाचा आहे. हा दस्तऐवज १५ सप्टेंबर १९९५ला बीजिंग परिषदेत स्वीकारण्यात आला.

**कृती व्यासपीठाचे चार भाग आहेत**

१) जागतिक जाहीरनामा २) चिंताजनक क्षेत्रे ३) व्यूहरचनात्मक उद्दिष्टे व कृती ४) संस्थात्मक व्यवस्था आणि आर्थिक व्यवस्था या भागांचा समावेश आहे.

**१) जागतिक जाहीरनामा**

बीजिंग परिषदेत स्त्रियांसंबंधित जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'या परिषदेत सहभागी झालेली आम्ही सरकारे, स्त्रियांसाठी व संपूर्ण मानव जातीसाठी समता, विकास व शांतता प्रस्थापित करण्याची उद्दिष्टे पुढे नेण्याचा निर्धार करतो.' अशा अर्थाचा जाहीरनामा या परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला.

**२) चिंताजनक क्षेत्रे**

या दस्तऐवजात स्त्रियांसंबंधीचे १२ क्षेत्रे काळजीचे किंवा चिंताजनक क्षेत्रे म्हणून समावेश करण्यात आला. गरिबी, शिक्षण, आरोग्य, हिंसा, सशस्त्र संघर्ष, आर्थिक सहभाग, सत्ता सहभाग, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, राज्य आणि आंतरराष्ट्रीय यंत्रणा, मानवी हक्क, स्त्रिया आणि प्रसार माध्यमे, पर्यावरण आणि स्त्रिया व बालिका ही सर्व क्षेत्रे स्त्रियांच्या विकासातील प्रमुख अडथळे आहेत असे मान्य करण्यात आले व त्यासंबंधी उपायही सुचविले आहेत.

**३) व्यूहरचनात्मक उद्दिष्टे व कृती**

समता, विकास व शांतता प्रस्थापित होण्यासाठी स्त्रियांचे सक्षमीकरण जीवनाच्या सर्व क्षेत्रातील समतेवर आधारित सहभाग, निर्णय प्रक्रियेतील सहभाग, सत्ता सहभागात वाव ही कृती व्यासपीठाची मूलभूत उद्दिष्टे आहेत. स्त्रियांचे हक्क हे मानवी हक्क आहेत. समान हक्क, समान संधी, उत्पादन साधनांची समान उपलब्धी, कौटुंबिक जबाबदाऱ्यात समान सहभाग, व समतोल भागीदारी या गोष्टी वैयक्तिक कौटुंबिक कल्याणासाठी तसेच, लोकशाही दृढ करण्यासाठी आवश्यक आहेत, अशा प्रकारची सर्व क्षेत्रात समानता प्रस्थापित करण्याचे धोरण व उद्दिष्टे कृती व्यासपीठात अंतर्भूत केली होती.

कृती व्यासपीठ अंमलबजावणी करताना राष्ट्रीय सरकारे व आंतरराष्ट्रीय समाजाची बांधिलकी आवश्यक आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण व प्रगती या विषयी सरकारांनी परिषदांमधून व्यक्त केलेली बांधिलकी कृतीत आणण्याला अग्रक्रम देणे जरूरीचे आहे, असे कृती संदर्भातील कृती व्यासपीठात नमूद केले आहे.

**४) संस्थात्मक व्यवस्था आणि आर्थिक व्यवस्था या भागांचा समावेश**

कृती व्यासपीठाच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर निधी व साधनांची उपलब्धता जरुरी आहे. यासाठी उपलब्ध यंत्रणांबरोबरच नव्या यंत्रणांचा विचार करणे, समान हक्क, समान जबाबदाऱ्या, समान संधी व सर्व स्तरावरील यंत्रणांत स्त्री-पुरुषांच्या समान सहभागाची बांधिलकी यातून

कृती व्यासपीठाची यशस्वी अंमलबजावणी शक्य आहे. कृती व्यासपीठाच्या अंमलबजावणीकरीता विकसनशील देशांना आंतरराष्ट्रीय सहकार्य व मदत देणे.

लिंग समानतेच्या दृष्टिकोनातून धोरणे व कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीची ग्वाही आम्ही व्यक्त करतो. संयुक्त राष्ट्र संघ सदस्य सरकारे, आंतरराष्ट्रीय निधी संस्था, सर्व स्त्री-पुरुष, स्वायत्त बिगर शासकीय संघटना यांची बांधिलकी व अंमलबजावणीतील सहकार्य व सहभाग अशा संयुक्त प्रयत्नांची गरज आम्ही नमूद करतो, असे कृती व्यासपीठ दस्तऐवजात नमूद केले आहे.

थोडक्यात, बीजिंग परिषद ही स्त्रीहक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली. या परिषदेत सर्व राष्ट्रांनी कृतीमय दस्तऐवज मंजूर केला त्यामुळे जगभरातील स्त्री चळवळीला दिशा मिळाली.

भाषिक, वांशिक, सांस्कृतिक, विकासात्मक अशा विविध पातळ्यांवर जगातील स्त्रियांमध्ये विविधता असली तरी स्त्री म्हणून एकत्र संवादासाठी, विचार विनिमयासाठी सर्व स्त्रियांना एकाच व्यासपीठावर आणण्याचे महत्त्वपूर्ण काम बीजिंग परिषदेने केले. त्या अनुषंगाने जगभरातील वेगवेगळ्या प्रदेशात राहणाऱ्या स्त्रियांमध्ये विचार मंथन झाले आणि स्त्री म्हणून संघटित आणि सूत्रबद्ध प्रयत्नांना यश येऊन सर्वांना मान्य असा कृती व्यासपीठ दस्तऐवज मंजूर करण्यात आला. केवळ जागतिकच नव्हे तर देशांतर्गत पातळ्यांवरही या निमित्ताने स्त्री प्रश्नांची सांगोपांग चर्चा झाली आणि स्त्री प्रश्नांचे अग्रक्रमही निश्चित झाले. विविध ठिकाणी या कामात काम करणाऱ्या संघटनांच्या सुसूत्रीकरणाच्या प्रक्रियेला त्यामुळे गती आली.

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) ................ हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो.

१) ८ मार्च　२) ६ मार्च　३) १५ एप्रिल　४) १५ मार्च

२) संयुक्त राष्ट्र संघाच्या कलम १ मध्ये ............. च्या आधारांवर कोणताही भेदभाव केला जाणार नाही असे स्पष्ट केले.

अ) लिंग, भाषा, वंश, व धर्म　ब) देशाच्या

क) संस्कृतीच्या　ड) वरील पैकी नाही

३) पहिली जागतिक महिला परिषद ............. साली झाली

अ) १९७५　ब) १९७६　क) १९७८　ड) वरील पैकी नाही

४) पहिली जागतिक महिला परिषद ............. शहरात झाली.

अ) मेक्सिको सिटी　ब) पॅरिस　क) वॉशिंग्टन　ड) नैरोबी

५) ................... जागतिक महिला परिषदेत १९७५ ते १९८५ हे आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून जाहीर करण्यात आले.

अ) पहिल्या ब) दुसऱ्या क) तिसऱ्या ड) वरील पैकी नाही

६) दुसरी जागतिक महिला परिषद ........... या शहरात झाली.

अ) कोपेनहेगन ब) मेक्सिको क) पॅरिस ड) हेग

७) तिसरी जागतिक महिला परिषद ............. या ठिकाणी झाली.

अ) नैरोबी ब) कोपेनहेगन क) मेक्सिको सिटी ड) वरील पैकी नाही

८) 'कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वूमन' या आयोगाचे मुख्यालय ........ या ठिकाणी आहे.

अ) न्यूयॉर्क ब) नैरोबी क) वॉशिंग्टन ड) पॅरिस

९) भारताच्या आग्रहामुळे कृती व्यासपीठ दस्तऐवजात ........... संबंधित निषेध करणारे कलम घालण्यात आले.

अ) दहशतवाद ब) हिंसाचार क) धार्मिक हिंसाचार ड) वरील सर्व

१०) प्रत्येक स्त्रीला केव्हा, किती आणि कशी मुले असावी या संबंधाने ......... संघटनेने विरोध दर्शवला.

अ) होली सी ब) कॅथोलिक चच क) इसिस ड) वरील पैकी नाही

ब) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | ब | |
|---|---|---|---|
| १ | मेक्सिको सिटी | अ | १९७५ |
| २ | कोपनेहगन | ब | १९८५ |
| ३ | नैरोबी | क | १९८० |
| ४ | बीजिंग | ड | १९९५ |

१. १-ब, २-अ, ३-ड, ४-क

२. १-अ, २-क, ३-ब, ४-ड

३. १-ड, २-अ, ३-क, ४-ब

४. १-क, २-ब, ३-ड, ४-अ

### ४.२.२ U.N. Women **यूएन वूमन संघटना** (The United Nations Entity for Gender Equality and the Empowerment)

स्त्री-पुरूष समानता मानवाच्या उज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानता हा केवळ मूलभूत मानवी हक्कच नाही, स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित झाली तर समाजाच्या विकासाची गती दुप्पट होईल. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाने अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, उत्पादकता वाढीला चालना

मिळेल. पण हे समाजाच्या हिताचे असतानाही लैंगिक असमानता प्रत्येक समाजात खोलवर रुजलेली आहे. महिलांना शिक्षण, योग्य कामाचा अभाव आहे. लैंगिक असमानतेमुळे अनेक क्षेत्रातील संधी पासून त्या वंचित राहतात. वेतनातील तफावतीचा सामना करावा लागतो. त्यांना मूलभूत शिक्षण व आरोग्य सेवा यापासूनही दूर आहेत. जगातील सर्व भागांमध्ये महिलांना हिंसा आणि भेदभाव सहन करावा लागतो. राजकीय आणि आर्थिक निर्णय प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व कमी आहे, अशी परिस्थिती जगभरातील स्त्रियांची आहे.

यूएन वूमन ही संघटना संयुक्त राष्ट्र संघाची एक संस्था आहे. संयुक्त राष्ट्र संघ स्थापन झाल्यानंतर या संघटनेने इतर कार्याबरोबरच स्त्रियांसाठी पुढाकार घेऊन त्यांच्या समस्येकडे जगाचे लक्ष वेधले. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत लिंगभेदासह कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता, मानवी स्वातंत्र्याचा व मूलभूत हक्कांचा आदर करणे, हे प्रमुख उद्दिष्ट मानलेले आहे. कलम १ मध्ये तशी तरतूद करून ठेवली आहे. लिंग, भाषा, वंश, धर्म या आधारांवर मनुष्यात कोणताही भेदभाव केला जाऊ नये. मूलभूत स्वातंत्र्य वृद्धिंगत करणे व त्यांना सन्मान प्राप्त करून देणे यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळवणे हे संयुक्त राष्ट्र संघाचे उद्दिष्ट आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत स्त्रियांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहण्याचा उल्लेख केलेला आहे.

**संयुक्त राष्ट्र संघाने स्त्रियांसाठी केलेले कार्य**

संयुक्त राष्ट्र संघाने सन १९४६ मध्ये महिलांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी महिला आयोगाची स्थापना केली. स्त्रियांना समाजात पुरुषाच्या बरोबरीने स्थान मिळावे, स्त्री-पुरुष समानतेचे तत्व मान्य व्हावे या संबंधाने या आयोगाने वेळोवेळी पुढाकार घेतला.

संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेने वेळोवेळी स्त्रियांसंबंधी ठराव मंजूर केले. महिला राजकीय हक्क ठराव १९५२ मध्ये संमत केला. या ठरावात महिलांना पुरुषांच्या बरोबरचे राजकीय हक्क देण्यासंबंधी आग्रह धरण्यात आला. राजकीय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढावा, त्यांना महत्त्वाच्या सार्वजनिक पदावर कार्य करण्याची संधी दिली जावी हा राजकीय हक्कांचा ठराव संमत करण्यामागील मुख्य उद्देश होता. १९६७ मध्ये महिलांविरूद्धचा भेदभाव दूर करण्यासंबंधीचा जाहीरनामा स्वीकृत केला. त्या संबंधाने १९७९ मध्ये आमसभेने ठराव संमत केला. महिलांविरुद्ध कोणत्याही प्रकारचा दुजाभाव केला जाऊ नये, याकरिता जाहीरनामा स्वीकृत करण्यात आला होता. १९५७ मध्ये विवाहित महिलांच्या राष्ट्रीयत्त्वासंबंधी आमसभेमध्ये ठराव संमत केला. तसेच, १९६२ मध्ये विवाहाचे किमान वय व विवाहाची नोंदणी या संबंधीचा ठराव आमसभेने मंजूर केला.

संयुक्त राष्ट्रांनी सन १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे केले होते. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने सन १९७५ ते १९८५ हे दशक महिला दशक म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. या दशकाला समानता विकास व शांततेचे दशक म्हणून घोषित करण्यात आले.

तसेच, आंतरराष्ट्रीय महिला परिषदा त्यांनी भरवल्या होत्या. या परिषदेची माहिती आपण घेतलेली आहे. बीजिंग परिषदेत मंजूर केलाला 'कृती व्यासपीठ अराखडयाची' लिंग-भाव समानता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने कितपत प्रगती केली आहे, याचा आढावा घेण्यासाठी दर पाच वर्षांनी महिला परिषदा भरविल्या जातात.

सन १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा महिला विकास निधी स्थापन करण्यात आला. महिलांशी संबंधित विविध प्रश्नांचा अभ्यास करणे आणि महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची दखल घेणे हा त्यामागील प्रमुख उद्देश होता. संयुक्त राष्ट्रांनी सर्व सभासद राष्ट्र आणि निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय संघटना यांच्या सहकार्याने हा निधी उभारण्यात आला आहे.

**यूएन-वूमन**

अनेक वर्षांपासून, संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक स्तरावर लैंगिक समानतेला चालना देण्यासाठी कार्य केले. हे कार्य करताना त्यांना गंभीर आव्हानांचा सामना केला, ज्यामध्ये अपर्याप्त निधीचा समावेश आहे. लैंगिक समानतेच्या मुद्यांवर संयुक्त राष्ट्रांच्या स्त्रियांसंबंधित ध्येय-धोरणाला, विविध कार्यक्रमांना निर्देशित करण्यासाठी एकही मान्यताप्राप्त चालक संस्था नव्हती. तेव्हा युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने जुलै २०१० मध्ये UN Women, 'द युनायटेड नेशन्स एंटिटी फॉर जेंडर इक्वॅलिटी ॲन्ड द एमपॉवरमेंट' ची (The United Nations Entity for Gender Equality and the Empowerment) स्थापना केली. संयुक्त राष्ट्र सदस्य देशांनी लैंगिक समानता आणि महिला सक्षमीकरण ही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांना गती देण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले. यूएन वूमनची निर्मिती ही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुधारणा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आली आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेद्वारा यूएन-वूमन ही संघटना लैंगिक समानता आणि महिला सबलीकरणासाठी स्थापन करण्यात आली. ही संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांसाठी व मुलींसाठी कार्य करते. या संघटनेची स्थापना २ जुलै २०१० मध्ये संयुक्त राष्ट्र आमसभेद्वारा केली गेली. यूएन वूमनची स्थापना संयुक्त राष्ट्र सुधार ॲजेंड्यानुसार झाली आहे. या संघटनेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे.

**उद्देश्य**

यूएन-वूमन ही संघटना लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी जागतिक मानके निर्माण करते. या मानकांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सदस्य राष्ट्रांना सामर्थ्य देते. जगभरातील महिला आणि मुलींच्या विकासासाठी आवश्यक कायदे, धोरणे, कार्यक्रम तयार करते व त्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करते. यासाठी सदस्य राष्ट्रांची सरकारे आणि नागरी समाजाला सोबत घेऊन काम करते. महिला आणि मुलींसाठी शाश्वत विकास उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्यासाठी ते जागतिक स्तरावर कार्य करते. लैंगिक समानता व सक्षमीकरणासाठी चार धोरणात्मक क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे. ती चार महत्त्वपूर्ण क्षेत्रे म्हणजे स्त्रियांचे नेतृत्व, राजकीय सहभाग, आर्थिक सक्षमीकरण व स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचारापासून त्यांची मुक्ती,

ही आहेत. या क्षेत्राद्वारे जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये महिलांच्या समान सहभागाचा पाठपुरावा करणे हा यूएन वूमनचा उद्देश्य आहे.

**रचना**

यूएन-वूमन ही जागतिक पातळीवरील संयुक्त राष्ट्र संघाची महिलांसाठी काम करणारी एक महत्त्वाची संघटना आहे. या संघटनेचा विस्तार विश्वव्यापी आहे. लिंगभाव समानता व महिला सबलीकरणाच्या कामी या संघटनेमध्ये इ.स. २०२० पर्यंत उच्च उत्पन्न गटातील देशांसह एकूण ९५ देश व भू-प्रदेशांचा सहभाग व पाठिंबा प्राप्त आहे. या संघटनेचा या सर्व देशातील महिला संघटनांशी संबंध व संपर्क घट्ट आहे. जागतिक स्तरावरील स्त्री-प्रश्नांची योग्य जाण बाळगणारी ही संघटना आहे. त्यांचा संपर्क शासन संस्था, संयुक्त राष्ट्र संघाच्या भगिनी संघटना, संयुक्त राष्ट्र संघाच्या देशातील विविध शासकीय व अशासकीय संघटना, खाजगी संस्था, आणि तेथील लोक यांच्याशी चांगला सहयोग आहे. संयुक्त राष्ट्र संघाची एक संघटना म्हणून स्त्रियांचे प्रश्नांना वाचा फोडण्याचे उत्तम कार्य करत आहे.

या संघटनेचे कामकाज द्विस्तरीय पद्धतीने चालते. ही एक बहुस्तरीय रचना आहे. एकामध्ये संयुक्त राष्ट्र संघाची आमसभा (General Assembly), आर्थिक व सामाजिक परिषद (ECOSOC), आणि कार्यकारी मंडळ (Executive Board) यांचा समावेश आहे. ही संरचना संघटनेचे कामकाज, कामाच्या पद्धती बाबत धोरणात्मक मार्गदर्शन व देखरेख करते. कार्यान्वियनाच्या कार्यपद्धतीबाबत धोरण ठरवणे संदर्भात सल्ला देते. तर दुसऱ्या स्तरावर संस्थेमध्ये आमसभा (General Assembly), आर्थिक व सामाजिक परिषद (ECOSOC) व स्त्रियांच्या स्थिती बाबतचा आयोग (Commission on the Status of Women) यांचा समावेश होतो.  ही विंग यूएन-वूमन या संघटनेस मानके निश्चित करून देण्याचे काम करते. तसेच, त्या संदर्भातील ध्येय-धोरणे आखून देण्यास मदत करते.

या संघटनेचे नियमन आर्थिक व सामाजिक परिषद व आमसभा यांनी घालून दिलेल्या तत्त्वांवर आधारित व कार्यकारी मंडळाने निश्चित करून दिलेल्या धोरणानुसार अंडर-सेक्रेटरी जनरल (कार्यकारी संचालक) कामकाज करतो.  संयुक्त राष्ट्र संघाच्या सेक्रेटरी जनरल  अंडर सेक्रेटरी जनरलची नियुक्ती  ४ वर्षा साठी करतो. त्याला दुसऱ्या टर्मसाठी ही नियुक्त करता येते पण त्या व्यक्तीस  तिसऱ्या वेळी नियुक्त केले जात नाही.

**कार्यकारी मंडळ** (Executive Board)

कार्यकारी मंडळाचा वार्षिक कालखंड हा कॅलेंडर वर्षाप्रमाणे १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असा असतो. प्रती वर्ष आर्थिक व सामाजिक परिषद, संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांमधून कार्यकारी मंडळाच्या सदस्यांची निवड केली जाते. कार्यकारी मंडळ हे स्थायी असते. यामध्ये प्रत्येक वर्षी ठराविक संख्येमध्येच नवीन सदस्य निवडले जातात. प्रत्येक सदस्याचा कार्यकाळ हा ३ वर्षांचा असतो. पश्चिमी युरोप व इतर काही राष्ट्रे यांच्या मार्फत चक्रांकित वेळा पत्रकाप्रमाणे (rotational schedule) सदस्यांची नेमणुकीसाठी नामांकन केली जाते. काही राष्ट्रे ३ वर्षांचा कालखंड पूर्ण करत नाहीत. प्रत्येक सदस्य राष्ट्राला कार्यकारी

मंडळात संधी मिळेल हे या पद्धतीने पाहिले जाते. कार्य मंडळ ५ संचालकांचे असून त्यातील एक अध्यक्ष असतो तर इतर ४ सदस्य उपाध्यक्ष असतात. हे अध्यक्ष, उपाध्यक्ष एकूण ४१ सदस्यांमधून निवडले जातात.

कार्यकारी मंडळामध्ये एकूण ४१ सदस्य असतात. त्यापैकी अफ्रिकी राष्ट्रांमधून १०, आशियायी राष्ट्रांमधून १०, पूर्व युरोपीय राष्ट्रांमधून ४, लॅटिन अमेरिका व कॅरिबियन बेटातील राष्ट्रे ६, पश्चिमी युरोप राष्ट्रे व इतर राष्ट्रांमधून ५, आणि सर्वाधिक सहभाग देणाऱ्या राष्ट्रांतील ६ सदस्य असतात.

**यूएन–वूमनच्या कार्यकारी मंडळाचे कार्य**

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या कामकाज दि. २० डिसेंबर १९९३ च्या ठराव क्र. ४८/१६२ नुसार व महासभेच्या ठराव क्र. ६४/२८९ मधील तरतुदीनुसार चालते. हे मंडळ साधारणतः कार्यकारी मंडळ व यूएन-वूमनच्या ठरवून दिलेल्या कार्यप्रणालीच्या अधिन राहून अंडर सेक्रेटरी जनरल (कार्यकारी संचालक) यांस मार्गदर्शन करत असते. तसेच, मंडळ हे देखील खात्री करून घेते की, या कार्यान्वयन कार्यप्रणाली आणि ध्येय–धोरणे आमसभा, आर्थिक व सामाजिक परिषद यांनी घालून दिलेल्या सर्वसाधारण नीतिविषयक मार्गदर्शक सूचना यांच्याशी सुसंगत आहे किंवा नाही याची खात्री करते व संघटनेच्या कामाचे संनियंत्रण करते, ध्येय–धोरणांना मान्यता देते, आणि सदस्या राष्ट्रांच्या पातळीवरील कार्यक्रम व उपक्रमांना मान्यता देते. तसेच, त्यांच्या प्रशासकीय व आर्थिक आराखड्यांना मान्यता देणे, अर्थसंकल्पासह सर्व बाबींना मान्यता देण्याचे काम हे कार्यकारी मंडळ करत असते.

**कार्यकारी मंडळाची कार्ये**

यूएन–वूमनचे कार्यकारी मंडळ त्याच्या कार्यप्रणालीमध्ये काळानुरूप अर्जित अनुभवांच्या आधारे सतत बदल करते. त्यांचे काम अंडर–सेक्रेटरी–जनरल (कार्यकारी संचालक) यांना केवळ मार्गदर्शन करण्यापुरते मर्यादित असते. कार्यकारी मंडळ दोन सरकारांमध्ये समन्वय करणे, आमसभा व आर्थिक व सामाजिक परिषदेने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे यूएन–वूमन या संघटनेचे कामकाज चालते किंवा नाही हे पाहणे, संयुक्त राष्ट्र संघाने निर्धारित केलेल्या सनदेप्रमाणे सोपविलेल्या जबाबदारी प्रमाणे कामकाज चालते किंवा नाही हे पाहण्याचे कार्य करते. तसेच, यूएन–वूमन ही संघटना सेवा/सल्ला प्रदान करावयाचा संबंधित राष्ट्रांच्या आवश्यकता व गरजेला खरी उतरते की नाही, हे पाहणे आवश्यक असते. आर्थिक व सामाजिक परिषदेच्या अधिकाराखाली यूएन–वूमनचे कार्यकारी मंडळाची कार्ये पुढील प्रमाणे आहेत–

अ) आर्थिक व सामाजिक परिषदेच्या सहकार्याने व सल्ल्याप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेने तयार केलेली धोरणे राबवणे.

ब) अंडर–सेक्रेटरी–जनरल/कार्यकारी संचालक यांजकडून यूएन–वूमनच्या कामा संदर्भातील माहिती घेणे व सल्ला देणे.

क) आमसभा व आर्थिक व सामाजिक परिषदेने केलेल्या नीति निर्धारणांशी यूएन-वूमनचे कामकाज सुसंगत असल्याची खात्री करून घेणे. तसेच, ते निर्धारित सनदेतील जबाबदारीप्रमाणे कामकाज चालते किंवा नाही, हे पाहणे.

ड) यूएन-वूमनच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे.

ढ) प्रशासकीय व अर्थसंकल्पीय आराखड्यास मान्यता देणे.

ण) आर्थिक व सामाजिक परिषदेस व आवश्यकतेनुसार या परिषदेच्या माध्यमातून महासभेस नवीन उपक्रमांची शिफारस करणे.

त) नाविन्यपूर्ण उपक्रम तपासणे व त्यांस प्रोत्साहन देणे.

थ) आर्थिक व सामाजिक परिषदेस वार्षिक अहवाल सादर करणे, तसेच, क्षेत्रीय स्तरावरील समन्वयाच्या अनुषंगाने उचित शिफारसींचा यात समावेश असेल, हे पाहणे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांच्या प्रश्नाला महत्त्व देऊन यूएन वूमन या प्रश्नावर कृती कार्यक्रमाचे मार्गदर्शन करते. सदस्य राष्ट्रामध्ये हे कार्यक्रम राबवण्यासाठी संबंधित राष्ट्राला बळ देते. तसेच बीजिंग परिषदेमध्ये मंजूर झालेला कृती व्यासपीठ दस्तऐवजाचा पाठपुरावा करते. एकंदरीत आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम, त्याच बरोबर स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी मानके तयार करते. जगभरातील स्त्रियांच्या प्रगतीचा आढावा घेते व त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करते. यूएन वूमनने स्त्रियांचे नेतृत्व, राजकीय सहभाग, आर्थिक सक्षमीकरण व स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचारापासून त्यांची मुक्ती या चार प्रमुख मूलभूत मुद्यांवर भर दिला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-२**

अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने महिला राजकीय हक्क ठराव ......... साली संमत केला.

अ) १९५२ ब) १९४७ क) १९४० ड) १९५०

२) .......... साली संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने विवाहित महिलांच्या राष्ट्रीयत्त्वा संबंधित ठराव संमत केला.

अ) १९४७ ब) १९४८ क) १९५७ ड) १९४०

३) संयुक्त राष्ट्राच्या महिला विकास निधी ......... साली स्थापन करण्यात आला.

अ) १९८५ ब) १९८० क) १९८७ ड) वरील पैकी नाही

४) संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने ......... साली विवाहाचे किमान वय व विवाह नोंदणी यासंबंधीचा ठराव पास केला.

अ) १९७०　　ब) १९६२　　क) १९४६　　ड) १९५५

५) यूएन वूमनची स्थापना ........... झाली.

अ) २०१३　　ब) १९२२　　क) १९९०　　ड) २०१०

६) यूएन वूमन संघटनेचे मुख्यालय ......... शहरात आहे.

अ) न्यूयॉर्क　　ब) पॅरिस　　क) वॉशिंग्टन　　ड) शांघाय

७) लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी मानके तयार करण्याचे कार्य ........ संघटना करते.

अ) सिटो　　ब) नाटो　　क) यूएन वूमन　　ड) वरील सर्व

८) यूएन वूमनच्या कार्यकारी मंडळातील सदस्य संख्या ........ असते.

अ) ४१　　ब) ४५　　क) ४७　　ड) ५०

९) यूएन वूमनच्या अंडर सेक्रेटरी जनरलची नियुक्ती ........ वर्षासाठी केली जाते.

अ) ५　　ब) ४　　क) ६　　ड) ३

१०) अंडर सेक्रेटरी जनरलची नियुक्ती ......... हा करतो.

अ) युनायटेड नेशनचा जनरल सेक्रेटरी　　ब) सामाजिक परिषदेचा प्रमुख

क) आम सभेचा अध्यक्ष　　ड) वरील पैकी नाही

ब) योग्य जोड्या जुळवा.

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी मंडळाचे सदस्य आशियाई राष्ट्र | अ | ४ |
| २ | कार्यकारी मंडळाचे सदस्य पूर्व युरोपियन राष्ट्रा | ब | १० |
| ३ | कार्यकारी मंडळाचे सदस्य पश्चिम युरोपियन राष्ट्र | क | ६ |
| ४ | कार्यकारी मंडळाचे सदस्य लॅटिन अमेरिका व कॅरिबियन बेट | ड | ५ |

१. १-ब, २-अ, ३-ड, ४-क

२. १-क, २-अ, ३-ब, ४-ड

३. १-अ, २-ड, ३-क, ४-ब

४. १-ड, २-अ, ३-ब, ४-क

### ४.२.३ राष्ट्रीय महिला आयोग (National Commission for Women - NSW)

राष्ट्रीय महिला आयोग भारत सरकारने स्त्रियांच्या हक्काचे जतन करणे. महिला अत्याचाराविरूद्ध आवाज उठवणे इत्यादिंसाठी सन १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्याच्या अंतर्गत भारत सरकारने ३१ जानेवारी १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. हा आयोग संविधानिक आहे. सर्वसामान्य महिलांच्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देणे हा मुख्य उद्देश महिला आयोगाच्या स्थापनेमागे होता.

**राष्ट्रीय महिला आयोग स्थापन करण्यामागची पार्श्वभूमी**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या स्थापनेपूर्वी महिलांसाठी शासन विविध धोरणे व कार्यक्रम राबवत होते. पाचव्या पंचवार्षिक योजनेनंतर स्त्रियांच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. महिलांसाठी राबवण्यात येणारी ध्येय-धोरणे व कार्यक्रम कल्याणकारी होते. ते स्त्रियांच्या कल्याण कार्यक्रमांकडून विकासात्मक कार्यक्रमाकडे वळला. या दृष्टिकोनामुळे स्त्रियांची वाटचाल समतेच्या दिशेने होण्याची गरज तज्ञांनी प्रतिपादन केली. त्यानुसार स्त्रियांना समता प्रदान करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे, त्यांना पुरुषांइतक्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच, स्त्रियांस संबंधित समाजाचा दृष्टिकोन स्त्रियांसंबंधित वर्तन बदलण्यासाठी त्या अनुषंगाने कायद्यात जाणीवपूर्वक बदल घडवून आणण्यासाठी सरकारने भारतीय स्त्रियांच्या दर्जाविषयी अहवाल समिती नेमली. Committee for Status of Women in India (CSWI) या समितीच्या अहवालानुसार भारत सरकारने स्त्रीविषयक धोरणात काही विकासात्मक बदल केले. ६ व्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांच्या विकासातील प्रमुख अडथळे लक्षात घेऊन या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांचे शिक्षण, रोजगार व आरोग्य या त्रिसुत्रीय कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. कुटुंब हे विकासाचे प्रमुख केंद्र मानण्यात आले. राष्ट्रीय आयोग आरोग्य धोरण १९९३ मध्ये बाळांतपणातील व अन्य प्रसंगी घडून येणारे माता मृत्यू रोखण्याची ध्येय ठरवण्यात आलेले होते. पण हे ध्येय पूर्ण करण्यात सरकारला म्हणावे तसे यश आले नाही. गरोदर महिला व पौगंडावस्थेतील मुली यांच्यासाठी १९९३ साली राष्ट्रीय आहार योजना सुरू केली. तसेच, १९८८ ते २००० या काळात स्त्रियांसाठी 'राष्ट्रीय परिपेक्ष योजना' National Perspective Plan for Women ही योजना राबवण्याचा निर्धारित करण्यात आले होते. महिला व बालविकास, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, शिक्षण, युवा विकास, रोजगार आणि नियोजन क्षेत्राशी संबंधित शास्त्रज्ञ, शिक्षण तज्ञ आणि वरिष्ठ गटाने स्त्रियांच्या संदर्भातील योजना व कार्यक्रमाचे परिक्षण केले. व स्त्रियांसाठी राष्ट्रीय परिपेक्ष योजनेने मानव विकास, कृषी, रोजगार, कायदा आणि राजकीय सहभागिता, इत्यादी क्षेत्रासंबंधी व्यापक शिफारसी सुचवल्या होत्या. भारत सरकारने विविध कालखंडात स्त्रियांसाठी विविध धोरणे आणि कार्यक्रम आखले होते पण हे धोरण पुरेशे नव्हते.

**राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना**

भारतातील महिलांच्या स्थितीबाबतच्या समितीने (Committee on the Status of Women in India CSWI) सुमारे दोन दशकांपूर्वी तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि महिलांच्या सामाजिक-आर्थिक

विकासाला गती देण्यासाठी सर्वेक्षण व सातत्यपूर्ण लक्ष ठेवण्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्याची शिफारस केली होती. 'राष्ट्रीय परिपेक्ष योजना' National perspective plan for women (१९८८ ते २०००) या योजना सहित विविध समित्या, आयोग, यांनी राष्ट्रीय स्तरावर महिलांसाठी आयोग असावा अशी मागणी केली होती. त्यानुसार ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य महिला आयोग स्थापनेचा क्रम पुढील प्रमाणे आहे.

१. सन १९८८-२००० या कालखंडात महिलांसाठी वेळोवेळी स्थापन झालेल्या समित्या/आयोग यांसह तयार केलेल्या राष्ट्रीय यथार्थदर्शी आराखड्यामध्ये महिलांसाठी एखादी सर्वोच्च संस्था स्थापन करण्याची शिफारस केली गेली.

२. सन १९९० च्या दरम्यान, केंद्र सरकारने विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि तज्ञांशी स्थापन करावयाच्या प्रस्तावित आयोगाची रचना, कार्ये, अधिकार इत्यादींबाबत सल्लामसलत केली.

३. मे १९९० मध्ये लोकसभेत या संदर्भातील विधेयक मांडण्यात आले.

४. जुलै १९९० मध्ये, मनुष्यबळ विकास मंत्रालयाने विधेयकाबाबत सूचना जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील परिषद आयोजित केली. ऑगस्ट १९९० मध्ये सरकारने या आयोगास दिवाणी न्यायालयाच्या समकक्ष अधिकार देण्याबाबत अनेक दुरुस्त्या आणि नवीन तरतुदी प्रस्तावित केल्या.

५. अखेर हे विधेयक दि. ३० ऑगस्ट १९९० रोजी मंजूर झाले आणि त्यास राष्ट्रपतीची संमती प्राप्त झाली.

राष्ट्रीय महिला आयोग ही भारताच्या संविधानातील तरतुदीनुसार भारत सरकारने (भारत सरकारचा १९९० च्या अधिनियम क्र. २० अंतर्गत) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना ३१ जानेवारी १९९२ ला केली.

महिला अत्याचारांविरूद्धच्या कायद्याचे पुनर्मूल्यांकन करून विशिष्ट वैयक्तिक तक्रारींमध्ये हस्तक्षेप करणे हे महिला आयोगाची मूलभूत कार्य मानण्यात आले. स्त्रियांमध्ये कायदेविषयक जाणीव जागृती करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन या आयोगामार्फत केले जाते. 'कौटुंबिक महिला लोक अदालतीचे' आयोजन आयोगामार्फत केले जाते. तसेच, कौटुंबिक तक्रारीबाबत समुपदेशन केले जाते. स्त्रियांचे अधिकार त्यांची वंचितता या संबंधातील तक्रारींचे परीक्षण करताना कायद्याचे उल्लंघन झालेले आढळल्यास त्या संदर्भात आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार मिळतात. एखाद्या व्यक्तीच्या सत्यतेचे परीक्षण करण्याचा व त्याची शपथेवर साक्ष घेण्याचा अधिकारही आयोगाला आहे. त्याचप्रमाणे एखाद्या दस्तऐवजाचे आणि प्रतिज्ञापत्राची मागणी आयोगाला संबंधितांकडे करता येते. स्त्रियांच्या संदर्भातील सर्व प्रश्नांच्या बाबतीत भारत सरकारला राष्ट्रीय महिला आयोगाशी सल्लामसलत करणे बंधनकारक असते.

राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणेच प्रत्येक राज्य सरकारने त्यांच्या-त्यांच्या राज्यात स्वतंत्र महिला आयोग स्थापन करण्याचा सल्ला केंद्र सरकारने सर्व राज्यांना दिला होता. त्यानुसार राष्ट्रीय महिला

आयोगाच्या संकेतस्थळावरील २०२२ अखेर अपडेट केलेल्या माहितीनुसार भारतात २९ राज्यांमध्ये स्वतंत्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच, २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये राज्य महिला आयोग कार्यरत आहेत.

**राष्ट्रीय महिला आयोगाची रचना**

आयोगाच्या स्थापनेसंबंधी कायद्यानुसार आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि पाच सदस्य असतात. अध्यक्ष आणि सदस्य हे तीन वर्ष कमाल मुदतीसाठी केंद्र सरकार मार्फत नियुक्त केले जातात. या विषयात आस्था असलेले आणि यासंदर्भात कार्य केलेल्यांची नियुक्ती केली जाते. पाचपैकी किमान एक सदस्य अनुसूचित जाती आणि एक अनुसूचित जमातीतून नियुक्त केला जातो. एक सदस्य सचिव ही आयोगावर केंद्र सरकारमार्फत नियुक्त केला जातो. सदस्य सचिव हा नागरी सेवा किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही नागरी सेवेतील व्यक्ती असतो.

राष्ट्रीय महिला आयोगाची कार्यकक्षा जम्मू आणि काश्मीरचे राज्य वगळता संपूर्ण भारत आहे. आयोगाला जरूरीनुसार कार्यालय, कर्मचारीवर्ग आणि इतर सुविधा पुरवण्याची जबाबदारी केंद्र सरकारवर आहे. राष्ट्रीय महिला आयोगाचे मुख्य कार्यालय नवी दिल्लीत आहे. सध्या श्रीमती रेखा शर्मा या आयोगाच्या अध्यक्ष आहेत. २०१४ पासून २०१८ पर्यंत ललिता कुमारमंगलम या अध्यक्षा होत्या.

**राष्ट्रीय महिला आयोगाची कार्ये**

१९९२ साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर भारत सरकारने राष्ट्रीय महिला आयोगाचे पुढील उद्दिष्ट कार्य पार पाडावी असा सल्ला आयोगाला दिला होता. ही कार्य खालील प्रमाणे

१) महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदीचे अध्ययन करून त्यावर लक्ष ठेवणे. महिलांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या कायद्याचे पुनरावलोकन करून त्यात आवश्यकतेनुसार दुरुस्त्या सुचवणे.

२) महिलांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्याशी संबंधित विविध बाबींचे संशोधन व अध्ययन करणे. त्यांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देणे.

३) महिलांच्या हक्कांचे रक्षण करणे याकरिता महिला हक्कांचे उल्लंघन झाल्या संबंधीच्या घटनांची दखल घेऊन त्याबाबत चौकशी करणे.

४) महिलांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी त्यांच्याकडून आलेल्या विनंती अर्जावर विचार करणे व त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करणे.

५) असहाय्य व गरजू स्त्रियांना कायदेविषयक अथवा अन्य बाबीची मदत करण्यासाठी पुढाकार घेणे. महिलांना सन्मानाची वागणूक देण्याबद्दल लोकांमध्ये जाणीव निर्माण करणे, इ. बाबतीत महिला आयोगाने हिरीरीने पुढाकार (महिला आयोगाने) घेऊन महिलांच्या सबलीकरणास हातभार लावला आहे.

६) स्त्रियांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणे, कायद्याचे अंमलबजावणी न करणे, धोरणात्मक निर्णय यांना संमती न देणे याबाबतच्या तक्रारीच्या तक्रारींची स्वत:हून दखल घेण्याचे कार्य आयोगाचे आहे.

७) स्त्रियांचे प्रतिनिधित्व सर्व क्षेत्रात वाढवण्यासाठी योग्य मार्ग सुचविणारे सूचनात्मक आणि शैक्षणिक संशोधन करणे की, ज्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीत अडथळा आणणारे किंवा त्याच जबाबदार घटक ओळखण्याचे कार्यही आयोगाला करावे लागते.

८) सर्वसाधारणपणे स्त्रियांवर अन्याय होईल अशा घटनेच्या विरोधातील खटले चालवण्यासाठी आवश्यक तेवढा निधी संबंधितांना उपलब्ध करून देण्याचे कार्य आयोगाला करावे लागते.

९) तुरूंग, सुधारगृह, स्त्रियांच्या संस्था किंवा इतर जागा की जेथे स्त्रियांना बंदिस्त करून ठेवले जाते, अशा ठिकाणचे परीक्षण करणे आणि अत्यावश्यक असेल तर संबंधित अधिकाऱ्यांबरोबर उपाययोजनात्मक कृती करण्यास सांगण्याचे कार्यही महिला आयोगाला पार पाडावे लागते.

**महिला आयोगाने भारत सरकारकडे केलेल्या शिफारशी**

महिला आयोगाने स्त्रियांवर विपरीत परिणाम करणाऱ्या विविध कायद्याचे मूल्यमापन केले आणि देशभरातील स्त्रियांच्या सामाजिक आर्थिक स्थितीची स्थितीच्या पाहणीसाठी अध्ययनासाठी अनुदानही दिले. त्याचबरोबर या राष्ट्रीय महिला आयोगाने भारत सरकारला अनेक शिफारसी केल्या आहेत. अर्थात आयोगाच्या या विविध शिफारसी भारत सरकारने स्वीकारल्याच पाहिजेत असे कोणतेही बंधन सरकारवर नाही. याबाबतची नोंद स्त्री-अभ्यास क्षेत्रातील अभ्यासकांनी व तज्ज्ञांनी घेणे आवश्यक आहे. महिला आयोगाकडे फक्त सल्ला देण्याची क्षमता असली तरी सरकारकडे पाठपुरावा करण्याची प्रचंड ताकद आयोगाकडे आहे. आयोगाच्या शिफारसी सहजपणे झिडकारणे वा नाकारणे सरकारला सहज शक्य नाही.

भारत सरकारला काही महत्त्वाच्या शिफारसी महिला आयोगाने केलेल्या आहेत.

१) हिंदू विवाह कायदा १९५५ मध्ये काही दुरुस्त्या करण्याची शिफारस केली. त्यानुसार आता प्रत्येक हिंदू विवाहाची नोंद विवाह नोंदणी अधिकाऱ्याकडे करणे बंधनकारक करण्यात आले. विवाहाच्या प्रसंगी उपस्थित असलेल्या नातेवाईक, मित्रांनी दिलेल्या भेट वस्तूची यादी करून त्याचीही नोंद करणे आवश्यक आहे.

२) एखाद्या तुरुंगात एखाद्या स्त्री कैद्यांवर जर बलात्कार झाला व त्याची तक्रार तिने संबंधित अधिकाऱ्याकडे दाखल केली असेल तर बलात्कारपीडितांकडून नोंदवलेली माहिती खोटी आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी संबंधित आरोपीकडे सोपवणे.

३) भारताची संसद आणि राज्यातील विधिमंडळे या स्त्रियांसाठी एक १/३ किंवा ३३% जागा आरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य सरकारने योग्य ती पावले उचलावीत म्हणून आयोगाने प्रयत्न केले.

४) केंद्र सरकार अर्थ मंत्रालय, श्रम विभाग आणि नियोजन आयोगाने तयार केलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा स्त्रियांतील गरीब घटकांवर कोणता परिणाम होतो याचे सर्वेक्षण महिला आयोगाने करून त्यावर आधारित कृती करणे तसेच, स्त्रियांवर विपरीत परिणाम करणाऱ्या घटकांना आळा

घालण्यासाठी विशेष धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आयोगातर्फे योग्य प्रयत्न करण्याची गरज आहे.

**महिला आयोगात तक्रार कधी करता येते?**

- कौटुंबिक हिंसाचाराबाबत महिला तक्रार करू शकते.
- कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण होत असल्यास
- हुंडा मागणी, हुंडाबळी, बलात्कार, लैंगिक अत्याचार पीडित महिला तक्रार करू शकतात.
- ॲसिड ॲटॅक पीडित महिला
- कोणत्या महिलेची तक्रार पोलीस स्टेशनला केलेली असेल.
- जर पोलिसांकडे तक्रार नोंदवून पण कारवाई होत नसेल तर.

**तक्रार कशी करावी?**

- तुम्ही प्रथम १०९१ वर कॉल करू शकता. तिथे म्हणणे ऐकले गेले नाही तर तुम्ही राष्ट्रीय महिला आयोगाच्या संकेतस्थळावर जाऊन तक्रार दाखल करू शकता. त्यानंतर तुम्हाला पावती क्रमांक मिळेल. कमिशन दहा दिवसांत तक्रारीवर काम करते, तुम्ही थेट पोलिसांकडेही तक्रारही दाखल करू शकता.
- राष्ट्रीय महिला आयोगासमोर तक्रार दाखल करू इच्छिणारी व्यक्ती आयोगाचे अधिकृत संकेतस्थळ ncwapps.nic.in वर 'ऑनलाईन  तक्रारी नोंदवा' या कलमाखाली तक्रार करून तसे करू शकते.
- महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे पोष्टाद्वारे अथवा ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात तक्रार दाखल करता येते. तसेच, आयोगाचा दूरध्वनी क्रमांक (०२२) २६५९२७०७ अथवा हेल्पलाईन क्रमांक १५५२०९ वर देखील तक्रार दाखल करता येते.
- राष्ट्रीय महिला आयोगास पुढील संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज करून तक्रार करू शकतात. लिंक http://ncwapps.nic.in/onlinecomplaintsv२/
- राष्ट्रीय महिला आयोगाकडे 'PLOT NO 21, FC33, Institutional Area, Jasola, New Delhi, Delhi 110025' या पत्त्यावर स्वत: जाऊन तक्रार नोंदवू शकतात.
- राष्ट्रीय महिला आयोगाच्या महिला हेल्पलाईन १८००-१८०-५२२० या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून.

**राष्ट्रीय महिला आयोगावर होणाऱ्या टिका**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्यपद्धतीवर अनेक टिकाही होतात. काही अभ्यासकांस असे वाटते की, राष्ट्रीय महिला आयोगाची निर्मिती ही स्त्री चळवळीच्या वाटचालीचा प्रभावी वेग कमी करण्यासाठी राज्यांकडून करण्यात आला. महिला आयोगाकडे खूप कमी सत्ता आहे अनेक वेळेला आयोग राज्यांचे

मुखपत्र म्हणून काम करतात. महिला आयोग हा जरी संविधानात्मक मंडळ असला तरी त्याचा जाहीरनामा क्रांतीकारी नाही. तसेच, महिला आयोगाला फक्त शिफारस करण्याचे अधिकार आहेत. त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मात्र नाहीत. असे असले तरी काही अभ्यासकांना राष्ट्रीय महिला आयोग महिला सक्षमीकरणाचे एक साधन बनू शकतो असा विश्वास आहे. आयोग विविध कार्यशाळा, परिसंवाद, परिषदा, वादविवाद सत्र, बैठका आणि वेळोवेळी सरकारला केलेल्या शिफारसी यातून स्वत:चे अस्तित्व त्याने सिद्ध केले आहे.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९९३ रोजी कायदा क्र. XV, 1993 अंतर्गत करण्यात आली आहे. या आयोगात एक अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य, एक सदस्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांचा समावेश आहे, पोलीस महासंचालक हे पदसिद्ध सदस्य असतात. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे सदस्य विविध क्षेत्रातील तज्ञ, समाजसेवक, वकील, आणि महिला प्रतिनिधी असतात. सदस्यांची निवड राज्य सरकार करत असते. आयोगाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शासनाने एकूण ३९ कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी दिली आहे.

आयोगाच्या सदस्यांमध्ये सामान्यतः खालील प्रकारच्या व्यक्तींची सदस्य म्हणून निवड राज्यशासन करते.

१. समाजशास्त्र, मानसशास्त्र या क्षेत्रातील तज्ञ महिला.

२. महिलांच्या सामाजिक व आर्थिक समस्यांवर कार्य करणारे समाजसेवक.

३. महिलांच्या कायदेशीर समस्यांवर मार्गदर्शन करणारे वकील.

४. महिला प्रतिनिधी म्हणून महिलांच्या विविध संघटनेमध्ये सक्रिय असलेल्या महिलांची निवड सदस्य म्हणून केली जाते.

आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती राज्य सरकार करते. आणि त्यांच्या कार्यकालाचे नियम तसेच जबाबदाऱ्या देखील सरकारच ठरवते. सदस्यांची सध्याची यादी आणि त्यांच्या कार्यकारी भूमिका राज्य महिला आयोगाच्या वेबसाइटवर किंवा संबंधित सरकारी घोषणांद्वारे उपलब्ध असतात.

सध्या महाराष्ट राज्य महिला आयोगाचे पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क.** | **नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | रुपाली चाकणकर | अध्यक्ष |
| २. | माया पाटोळे | सदस्य सचिव |
| ३. | ॲड. गौरी छाब्रिया | सदस्य |
| ४. | सुप्रदा फातार्फेकर | सदस्य |
| ५. | श्रीमती उत्कर्षा रुपवते | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६. | ॲड. संगीता चव्हाण | सदस्य |
| ७. | श्रीमती दीपिका चव्हाण | सदस्य |
| ८. | श्रीमती आभा पांडे | सदस्य |
| ९. | रश्मी शुक्ला (IPS) | DGP तथा पदसिद्ध सदस्य |

**आयोगाच्या शक्ती :**

राज्य महिला आयोग ही एक सांविधानिक संस्था असून त्यास दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहेत. या आधिकारामुळे आयोगास कोणत्याही न्यायालय किंवा कार्यालयातून कोणत्याही सार्वजनिक नोंदीची मागणी करणे, साक्षीदार आणि दस्तऐवजांच्या पडताळणीचे आदेश देणे, कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून हजर राहण्यासाठी आदेश देणे आणि कोणत्याही प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करणे यांचा समावेश होतो.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची कार्यपद्धती**

महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या तक्रारींचे निवारण करणे, महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी शासनाला उपाययोजनासाठी सहाय्य करणे.

**आयोगाचे समुपदेशन आणि मोफत कायदेशीर मदत केंद्र :**

महिलांवरील हिंसाचार निर्मूलन हे आयोगाने निर्धारित केलेले मुख्य लक्ष क्षेत्र आहे. महिलांच्या शोषण, छळ, अत्याचार, इत्यादी प्रकरणांची माहिती मिळताच, आयोग तातडीने संबंधित सरकार/पोलीस प्राधिकरणाशी संपर्क साधून योग्य पडताळणी करण्यासाठी आणि गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी उपाययोजना करतो. आयोगाच्या कार्यालयात विवाहित जीवनाशी संबंधित प्रकरणे, संपत्तीचे मुद्दे, हुंडाबळी, बलात्कार, कार्यस्थळावर लैंगिक शोषण इत्यादी अनेक प्रकरणे नोंदवली जातात.

महिलांवरील अत्याचाराशी संबंधित प्रकरणे हाताळण्यासाठी आयोग महिलांना कोणत्याही कायदेशीर कारवाईपूर्वी समुपदेशन सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न करतो. यासाठी मुंबईतील आयोगाच्या कार्यालयात १८ मार्च १९९५ रोजी एक समुपदेशन आणि मोफत कायदेशीर मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

या केंद्रातील समुपदेशक महिला तक्रारकर्त्यांच्या समस्यांचे विश्लेषण करून पुढील कारवाईचा निर्णय घेतात. महाराष्ट्र कायदा क्र. XV, 1993 च्या कलम १२ (२) अंतर्गत, समुपदेशक संबंधित पक्षाला समन्स पाठवून दोन्ही पक्षांची व त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांची संयुक्त बैठक घेतात. गुन्हेगारीसंबंधित तक्रारी नोंदवण्यासाठी पोलिसांची मदत घेतली जाते. जिल्हा व तालुका स्तरावरील महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी आयोगाने जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महापालिका यांच्यामार्फत समुपदेशन केंद्रे आणि मोफत कायदेशीर मदत सेवा सुरू केल्या आहेत. सध्या महाराष्ट्र राज्यात २९८ अशा प्रकारची समुपदेशन केंद्रे आहेत. आवश्यकता भासल्यास, पीडित महिलेला संरक्षक संस्थेत (प्रोटेक्शन होम/स्वाधार गृह/नारी

निकेतन) ठेवले जाते किंवा कुटुंब सहाय्यता संस्थांकडे संदर्भित केले जाते. तिला वैद्यकीय, मानसोपचार, शैक्षणिक, व्यावसायिक आणि इतर सेवांसह इतर सेवांकडेही संदर्भित केले जाते. जर दोन्ही पक्षांमध्ये समझोता होऊ शकत नसेल तर त्यांना मोफत कायदेशीर मदत दिली जाते.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने महाराष्ट्रात राबवलेले उपक्रम (Initiatives)**

१. **मीशन ई–सुरक्षा (Mission-e-Surksha)**

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि मेटा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरातील महिलांना सायबर सुरक्षित करण्यासाठी आयोजित मिशन ई सुरक्षा उपक्रम राबविण्यात आला.

२. **'महिला आयोग आपल्या दारी'** उपक्रमांतर्गत विविध जिल्ह्यात जनसुनावणी घेण्यात येत आहे.

३. **'यंग इंडिया अनचेन्ड' उपक्रम** ('Young India Unchained')

महिलांविषयक गुन्हेगारीला, तस्करीला आळा घालण्यासाठी राज्य महिला आयोग आणि यंग इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतल्या ३० महाविद्यालयात 'यंग इंडिया अनचेन्ड' हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचा शुभारंभ करण्यात आला.

यंग इंडिया अनचेन्ड (YIU) ही तरुणांसाठी आणि तरुणांद्वारे तयार केलेली एक सामूहिक चळवळ आहे, जी तरुणांवर होणाऱ्या सर्व प्रकारच्या सुरक्षिततेच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आहे, ज्यामध्ये लैंगिक तस्करीचाही समावेश आहे.

४. **आढावा बैठका**

महिला व बालकांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने विविध जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठका घेतल्या जातात. त्यायोगे महिलाविषयक तक्रींचे निवारण करण्यासाठी चालना देण्यात येते.

५. **जन सुनावणी**

राज्य महिला आयोगाच्या वतीने राज्याच्या विविध जिल्ह्यात 'महिला आयोग आपल्या दारी' उपक्रमाअंतर्गत जन सुनावणी घेतल्या जातात.

६. **आरोग्यवारी**

राज्य महिला आरोगाच्या वतीने आषाढी वारीला पायी जाणाऱ्या महिला वारकऱ्यांच्या आरोग्याच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या आरोग्यवारी अभियान राबवण्यात आले. राज्य महिला आयोगाच्या आरोग्यवारी या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक १०–१२ किलोमीटर वरती सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आले. स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष असून वृद्ध वारकरी महिलांसाठी विसावा कक्ष उपलब्ध करून देण्यात आला आहे. तर महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निर्भयापथक २४ तास उपलब्ध केले गेले.

असे अनेकविध उपक्रमांच्या आधारे महिलांच्या सबलीकरण व तक्रारींचे निराकरण केले जाते.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना ............. साली झाली.

अ) १९९० ब) १९९२ क) १९९४ ड) वरीलपैकी नाही

२) राष्ट्रीय महिला आयोगचा अध्यक्ष ........ वर्षासाठी नियुक्त केला जातो.

१) ५ ब) ४ क) ५ ड) ३

३) राष्ट्रीय महिला आयोगात अनुसूचित जाती व जमातीचे ............. सदस्य नियुक्त केले जातात.

अ) अनुसूचित जाती १ व अनुसूचित जमाती १

ब) अनुसूचित जाती २ अनुसूचित जमाती १

क) अनुसूचित जाती १ व अनुसूचित जमाती २ ड) वरीलपैकी नाही

४) राष्ट्रीय महिला आयोगातील सचिवाची नियुक्ती ........ मार्फत केली जाते.

अ) राज्य सरकार ब) न्यायालयाचे न्यायाधीश

क) केंद्र सरकार ड) वरीलपैकी नाही

५) राष्ट्रीय महिला आयोगाची कार्यकक्षा .......... राज्य वगळून संपूर्ण भारतभर आहे.

अ) मणीपूर ब) मिझोरम क) जम्मू व काश्मीर ड) राजस्थान

६) राष्ट्रीय महिला आयोगाचे मुख्य कार्यालय ............ येथे आहे.

अ) मुंबई ब) कलकत्ता क) अहमदाबाद ड) दिल्ली

७) .................... या सध्या राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष आहेत.

अ) डॉ. पौर्णिमा अडवाणी ब) डॉ. गिरीजा व्यास

क) ललिता कुमारमंगलम ड) रेखा शर्मा

८) कौटुंबिक महिला लोक अदालतीचे आयोजन ........... आयोग करतो.

अ) राष्ट्रीय महिला आयोग ब) श्रम मंत्रालय

क) न्यायालय ड) वरील सर्व

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

विधान १ : राष्ट्रीय महिला आयोगाला दिवाणी न्यायालयाचे अधिकार प्राप्त आहेत.

विधान २ : राष्ट्रीय महिला आयोगाने केलेल्या शिफारसी स्वीकारणे शासनावर बंधनकारक आहे.

अ) पहिले विधान बरोबर दुसरे चूक

ब) पहिले विधान चूक दुसरे बरोबर

क) दोन्ही विधाने चूक

ड) दोन्ही विधाने बरोबर

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) सरपण - स्त्रिया रानोमाळी भटकून जळाऊ लाकडे जमा करून आणतात.

२) धोरणात्मक हस्तक्षेप - धोरण निर्माण करावयाच्या प्रक्रियेत सकारात्मक हस्तक्षेप

३) वंशवाद - वंशाच्या आधारांवर भेदभाव

४) विकसनशील देश - तुलनेने कमी राहणीमान, अविकसित औद्योगीक पाया आणि मध्यम ते कमी मानवी विकास निर्देशांक असलेले देश.

५) जी-७७ देश - जगातील विकसनशील देशाचा समूह संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंतर्गत एक संघटन

## ४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयंअध्ययन प्रश्न १ :

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) ८ मार्च | २) लिंग, भाषा, वंश, धर्म | | ३) १९७५ |
| ४) मेक्सिको सिटी | ५) पहिल्या | | ६) कोपेनहेगन |
| ७) नैरोबी | ८) न्युर्यार्क | ९) दहशतवाद | १०) होली सी |

ब) योग्य जोड्या जुळवा.

१) १-अ, २-क , ३- ब , ४- ड

स्वयंअध्ययन प्रश्न २ :

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) १९५२ | २) १९५७ | ३) १९८५ | ४) १९६२ |
| ५) जुलै २०१० | ६) न्यूयॉर्क | ७) यूएन वूमन | ८) ४१ |
| ९) ४ | १०) युनायटेट नेशनचा जनरल सेक्रेटरी | | |

ब) योग्य जोड्या जुळवा.

१- ब, २-अ, ३-ड, ४-क

स्वयंअध्ययन प्रश्न ३ :

अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.

१) १९९२ २) ३ ३) अनुसूचित जाती १ व अनुसूचित जमाती १

४) केंद्र सरकार ५) जम्मू व काश्मीर ६) दिल्ली ७) रेखा शर्मा

८) राष्ट्रीय महिला आयोग

ब) विधान चूक की बरोबर ओळखा.

पहिले विधान बरोबर दुसरे चूक

## ४.५ सारांश

लिंगभेद आधारावर केलेला कोणताही भेदभाव हा मूलभूत हक्कांची पायमल्ली करणारा आहे. संयुक्त राष्ट्र संघ स्त्री-पुरुष समानतेच्या बाबत बांधील आहे. स्त्री-पुरुष समानता म्हणजे त्याची प्रतिष्ठा, माणूस म्हणून असलेले त्याचे अस्तित्व, हक्क, संधी आणि जबाबदाऱ्या या सर्वांबाबत असलेली त्यांची समानता अपेक्षित आहे. संयुक्त राष्ट्रांनी स्त्रियांना बंधनमुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवून व त्यांची प्रतिष्ठा वाढवण्याचे हेतूने त्याबाबतचे अनेक कायदे संमत केले. मानवी हक्क, न्याय, समानता या बाबतीत संयुक्त राष्ट्रांनी फार मोठे कार्य केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्त्रियांच्या विविध प्रश्नांच्या बाबतीतही त्यांनी फार मोठे पाठबळ उभे केले. त्याद्वारे महिलांचे हक्क आणि त्यांचे सबलीकरण या गोष्टींना चालना देण्याचे व त्यात प्रगती करण्याचे कार्य केले.

हक्काचे संहितीकरण करण्याबरोबरच महिलांची आर्थिक व सामाजिक वस्तुस्थिती विचारात घेतली. त्यासाठी धोरण तयार करणे, विचारसरणीत बदल करणे, राजकीय बांधिलकी आणि संस्था बांधणी या गोष्टींचा विचार संयुक्त राष्ट्र संघाने सतत केलेला आहे. महिलांना जर समानता मिळवण्याची असेल तर विकास होणे आवश्यक आहे हे ओळखून संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर महिलांच्या हक्कासंबंधीच्या चळवळीने खऱ्या अर्थाने वेग घेतला. मेक्सिको सिटीमधील १९७५ च्या पहिल्या जागतिक महिला परिषदेत पहिल्यांदा जागतिक कृती योजनांचा आणि समता, विकास व शांतता या विषयावर आधारित 'जागतिक महिला दशका'चा स्वीकार केला. दुसरी जागतिक महिला परिषद कोपेनहेगन मध्ये १९८० या वर्षी घेण्यात आली. या परिषदेत शिक्षण, रोजगार व आरोग्य या तीन विषयावर भर देण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या महिला दशकाच्या समानता, विकास व शांतता या धोरणाचा आढावा घेण्यासाठी व मूल्यमापन करण्यासाठी नैरोबी येथे तिसरी जागतिक महिला परिषद घेण्यात आली. चौथी महिला परिषद बीजिंग येथे १९८५ मध्ये भरविण्यात आली. या परिषदेत महिलांचे मानवी हक्कांच्या क्षेत्रातील मूलभूत हक्क निश्चित करण्यात आले. या परिषदेत महिलांच्या प्रगतीचा विचार करण्यासाठी कृतीसाठी व्यासपीठ दस्तऐवज तयार करण्यात आला. यामध्ये महिलांच्या विकासाच्या बाबतीत अडथळे ठरणाऱ्या १२ चिंतेची गंभीर क्षेत्रे निश्चित करण्यात आली होती. यामध्ये शासन, आंतरराष्ट्रीय समाज,

बिगर-सरकारी संघटना व खाजगी क्षेत्र यांनी महिलांच्या प्रगतीतले अडथळे दूर करण्यासाठी अनुरूप धोरणात्मक उद्दिष्टे व कृती सुचवली होती.

महिलांच्या संबंधित ध्येय-धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने यूएन वूमन या संघटनेची जून २०१० मध्ये स्थापना केली. या संघटनेने लैंगिक समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले. नेतृत्व, राजकीय सहभाग व आर्थिक सक्षमीकरण यासाठी ही क्षेत्रे निश्चित केली.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या या ध्येय-धोरणांचा स्वीकार भारत सरकारने केला. १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली व या आयोगाप्रमाणे प्रत्येक राज्याने महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्यांना राज्य महिला आयोगाची निर्मिती करण्याचे आदेश दिले. या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची निर्मिती २५ जानेवारी १९९३ मध्ये करण्यात आली.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१) जागतिक महिला परिषदेचा इतिहास स्पष्ट करा.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेचे महिला विषयक कार्य स्पष्ट करा.

३) 'यूएन-वूमन स्त्रियांच्या विकासात सामर्थ्य देते' स्पष्ट करा.

४) यूएन वुमन या संघटनेची कार्यपद्धती व महत्त्व अधोरेखित करा.

५) राष्ट्रीय महिला आयोगाची कार्यपद्धती व महत्त्व स्पष्ट करा.

६) राज्य महिला आयोगाची माहिती स्पष्ट करा.

ब) टिपा लिहा

१) बीजिंग परिषद

२) यूएन वूमन

३) राज्य महिला आयोग

४) राष्ट्रीय महिला आयोग

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१) डॉ. भारती पाटील, बीजिंग जागतिक परिषद, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधनी इचलकरंजी.

२) प्रा. एस. एस. देशपांडे, मानवी हक्क, चेतक बुक्स पुणे, २०१६.

३) प्रा. पी. के. कुलकर्णी, मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन पुणे, २०१३.

४) http://ncw.nic.in/ राष्ट्रीय महिला आयोगाचे अधिकृत संकेतस्थळ.

५) National Commission for Women. (2024, June 12). in Wikipedia.

https://en.wikipedia.org/wiki/National Commission for Women.

**संदर्भ**

1. Maharashtra State Commission for Women Act, 1993

२. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे अधिकृत संकेतस्थळ https://mscw.org.in/

३. महाराष्ट्र महिला आयोगाने प्रसिद्ध केलेले वार्षिक अहवाल https://mscw.org.in/

४. राष्ट्रीय महिला आयोगाने पुढील संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले अहवाल–

https://ncw.nic.in/reports/publications/reports-published-by-the-commission

५. महाराष्ट्र राज्य महिला व बालकल्याण विभाग यांचे अधिकृत संकेतस्थळ

https://womenchild.maharashtra.gov.in/

❑❑❑